# महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती
## (२०१८ -२०१९)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**नवी मुंबई महानगरपालिका, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, सांगली महानगरपालिका, सांगली जिल्हा परिषद, डहाणू नगरपरिषद यांच्या सेवेतील महिला अधिकारी/कर्मचारी यांची भरती, आरक्षण, अनुशेष व पदोन्नती, नवी मुंबई महानगरपालिका, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, सांगली महानगरपालिका, सांगली जिल्हा परिषद, डहाणू नगरपरिषद तर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांबाबतचा**

# अकरावा अहवाल

सत्यमेव जयते

**(हा अहवाल विधानसभेस/विधानपरिषदेस दिनांक        फेब्रुवारी/मार्च २०१९ रोजी सादर करण्यात आला.)**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०१९

# महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती
## (२०१८ -२०१९)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**नवी मुंबई महानगरपालिका, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, सांगली महानगरपालिका, सांगली जिल्हा परिषद, डहाणू नगरपरिषद यांच्या सेवेतील महिला अधिकारी/कर्मचारी यांची भरती, आरक्षण, अनुशेष व पदोन्नती, नवी मुंबई महानगरपालिका, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, सांगली महानगरपालिका, सांगली जिल्हा परिषद, डहाणू नगरपरिषद तर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांबाबतचा**

# अकरावा अहवाल

**महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती**
**सन २०१७-२०१८**

(१) **समिती प्रमुख :**
(२) डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स.
(३) **समिती सदस्य**
(४) श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स.
(५) प्रा. मेधा कुलकर्णी, वि.स.स.
(६) श्रीमती सीमा हिरे, वि.स.स.
(७) श्रीमती स्नेहलता कोल्हे, वि.स.स.
(८) श्रीमती तृप्ती सावंत, वि.स.स.
(९) श्री. अशोक पाटील, वि.स.स.
(१०) श्री. नारायण पाटील, वि.स.स.
(११) श्रीमती अमिता चव्हाण, वि.स.स.
(१२) श्रीमती दिपीका चव्हाण, वि.स.स.
(१३) श्रीमती सुमन पाटील, वि.स.स.
(१४) श्रीमती स्मिता वाघ, वि.प.स.
(१५) श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स.
(१६) ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स.
(१७) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**
श्री. जितेंद्र भोळे, सचिव (का.),
श्री. विलास आठवले, सहसचिव (२) (का.),
श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव,
श्रीमती प्रियांका कांदळगांवकर, कक्ष अधिकारी.

**महिलांचे हक्क व कल्याण समिती**
**सन २०१६-२०१७**

**समिती प्रमुख**

(१) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स.

**समिती सदस्य**

(२) श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स.
(३) श्रीमती मोनिका राजळे, वि.स.स.
(४) श्रीमती सीमा हिरे, वि.स.स.
(५) डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स.
(६) श्रीमती स्नेहलता कोल्हे, वि.स.स.
(७) श्री. प्रतापराव पाटील-चिखलीकर, वि.स.स.
(८) श्री. योगेश घोलप, वि.स.स.
(९) कु. प्रणिती शिंदे, वि.स.स.
(१०) श्रीमती संध्यादेवी कुपेकर, वि.स.स.
(११) श्रीमती दिपीका चव्हाण, वि.स.स.
(१२) श्रीमती स्मिता वाघ, वि.प.स.
(१३) श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स.
(१४) श्री. सतिश चव्हाण, वि.प.स.
(१५) ॲड .हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,
श्री. विलास आठवले, उप सचिव,
श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव,
श्रीमती माधवी सुर्वे, कक्ष अधिकारी.

**अनुक्रमणिका**


| अ. क्र. | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| (१) | प्रस्तावना | (सात) |
| (२) | अहवाल | १ |
| (३) | नवी मुंबई महानगरपालिका (प्रकरण १) | २ |
| | १.१ नवी मुंबई महानगरपालिकेतील रिक्त पदांचा अनुशेष भरण्याबाबत. | २ |
| | १.२ नवी मुंबई महानगरपालिकेचे अंदाजपत्रक व महिलांच्या कल्याणकारी योजना. | १७ |
| (४) | कल्याण-डोंबिवली महानगरपालिका (प्रकरण २) | ४० |
| | २.१ कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतील रिक्त पदांचा अनुशेष भरण्याबाबत. | ४० |
| | २.२ कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे अंदाजपत्रक व महिलांच्या कल्याणकारी योजना. | ६२ |
| (५) | सांगली महानगरपालिका (प्रकरण ३) | ८० |
| | ३.१ सांगली महानगरपालिकेतील रिक्त पदांचा अनुशेष भरण्याबाबत.. | ८० |
| | ३.२ सांगली महानगरपालिकेचे अंदाजपत्रक व महिलांच्या कल्याणकारी योजना. | ८९ |
| (६) | सांगली जिल्हा परिषद (प्रकरण ४) | ११७ |
| | ४.१ सांगली जिल्हा परिषदेतील रिक्त पदांचा अनुशेष भरण्याबाबत.. | ११७ |
| | ४.२ सांगली जिल्हा परिषदेचे अंदाजपत्रक व महिलांच्या कल्याणकारी योजना. | १२६ |
| (७) | डहाणू नगर परिषद (प्रकरण ५) | १४२ |
| | ५.१ डहाणू नगरपरिषदेतील रिक्त पदांचा अनुशेष भरण्याबाबत. | १४२ |
| | ५.२ डहाणू नगरपरिषदेचे अंदाजपत्रक व महिलांच्या कल्याणकारी योजना. | १५१ |
| (८) | परिशिष्ट-"अ" विभागाची माहिती | १७१ |
| | परिशिष्ट "ब" शासन निर्णय | २६३ |
| | परिशिष्ट-"क" - बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त | २८७ |

**प्रस्तावना**

मी महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीची समिती प्रमुख, समितीने आपल्या वतीने अधिकार दिल्यावरुन समितीचा हा अकरावा अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

"नवी मुंबई महानगरपालिका, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, सांगली महानगरपालिका, सांगली जिल्हा परिषद, डहाणू नगरपरिषद **यांच्या सेवेतील महिला अधिकारी/कर्मचारी यांची भरती, आरक्षण, अनुशेष व पदोन्नती तसेच नगरपरिषदेतर्फे त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना**" यासंबंधी समितीने माहिती जाणून घेण्याचे ठरविले. त्यानुसार नवी मुंबई महानगरपालिका, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, सांगली महानगरपालिका, सांगली जिल्हा परिषद, डहाणू नगरपरिषद येथे दिलेल्या भेटी संदर्भातील माहिती मागविण्यात आली. प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक २८ ऑक्टोंबर,२०१५ रोजी नवी मुंबई महानगरपालिका, दिनांक १२ जुलै, २०१७ रोजी कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, दिनांक १९ नोव्हेंबर, २०१५ रोजी सांगली महानगरपालिका, दिनांक २० नोव्हेंबर, २०१५ रोजी सांगली जिल्हा परिषद, दिनांक २५ एप्रिल,२०१७ रोजी डहाणू नगरपरिषद यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती व समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने सचिव, महिला व बालविकास विभाग, सचिव, नगरविकास विभाग, सचिव, संसदीय कार्य विभाग, सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, सचिव,सामाजिक न्याय विभाग, सचिव, सामान्य प्रशासन विभाग, सचिव, गृह विभाग, सचिव, आदिवासी विकास विभाग, सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, सचिव, महसूल व वन विभाग यांची दिनांक ७ जून, २०१७, दिनांक २० जून, २०१८, दिनांक ५ सप्टेंबर, २०१८, दिनांक ०३ जानेवारी, २०१९ व दिनांक ०८ जानेवारी, २०१९ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी उपलब्ध झालेल्या माहितीचा सर्वंकष विचार करुन समितीने त्यासंदर्भात आपले अभिप्राय व शिफारशी या अहवालात समाविष्ट केल्या आहेत.

प्रश्नावलीनुसार नवी मुंबई महानगरपालिका, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, सांगली महानगरपालिका, सांगली जिल्हा परिषद, डहाणू नगरपरिषद यांचेकडून प्राप्त झालेली माहिती व विभागीय सचिवांच्या साक्षीसाठी तयार केलेल्या प्रश्नावलीच्या अनुषंगाने प्राप्त झालेली माहिती, शासन निर्णय तसेच समितीच्या बैठकीचे कार्यवृत्त दिलेले आहे.

समितीच्या दिनांक २६ फेब्रुवारी, २०१९ रोजी झालेल्या बैठकीत प्रारुप अहवालावर विचार करुन तो संमत करण्यात आला.

साक्षीच्या वेळी सचिव, महिला व बालविकास विभाग, सचिव, नगरविकास विभाग, सचिव, संसदीय कार्य विभाग, सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, सचिव,सामाजिक न्याय विभाग, सचिव, सामान्य प्रशासन विभाग, सचिव, गृह विभाग, सचिव, आदिवासी विकास विभाग, सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, सचिव, महसूल व वन विभाग तसेच नवी मुंबई महानगरपालिका, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, सांगली महानगरपालिका, सांगली जिल्हा परिषद, डहाणू नगरपरिषदेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी समितीसमोर उपस्थित राहून समितीला आवश्यक ती माहिती देऊन सहाय्य केल्याबाबत समिती त्यांची आभारी आहे.

**विधान भवन,**
**मुंबई,**
दिनांक २६ फेब्रुवारी. २०१९.

**डॉ. भारती लव्हेकर,**
समिती प्रमुख,
महिला व बालकांचे हक्क
आणि कल्याण समिती.

## अहवाल

## "नवी मुंबई महानगरपालिका, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, सांगली महानगरपालिका, सांगली जिल्हा परिषद, डहाणू नगरपरिषद"

महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीने "नवी मुंबई महानगरपालिका, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, सांगली महानगरपालिका, सांगली जिल्हा परिषद, डहाणू नगरपरिषद यासंबंधी माहिती जाणून घेण्याचे ठरविले त्यानुसार नवी मुंबई महानगरपालिका, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, सांगली महानगरपालिका, सांगली जिल्हा परिषद, डहाणू नगरपरिषद यांच्याकडून प्रश्नावली संदर्भात माहिती मागविण्यात आली. प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक २८ ऑक्टोंबर,२०१५ रोजी नवी मुंबई महानगरपालिका, दिनांक १२ जुलै,२०१७ रोजी कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, दिनांक १९ नोव्हेंबर, २०१५ रोजी सांगली महानगरपालिका, दिनांक २० नोव्हेंबर, २०१५ रोजी सांगली जिल्हा परिषद, दिनांक २५ एप्रिल, २०१७ रोजी डहाणू नगरपरिषद येथे भेटी दिल्या, नवी मुंबई महानगरपालिका, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, सांगली महानगरपालिका, सांगली जिल्हा परिषद, डहाणू नगरपरिषद यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती व समितीने दिलेल्या भेटीच्यावेळी आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका, आयुक्त कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, आयुक्त, सांगली महानगरपालिका, मुख्य कार्यकारी अधिकारी, सांगली जिल्हा परिषद, मुख्याधिकारी, डहाणू नगरपरिषद यांनी उपस्थित राहून समितीस माहिती दिली.

समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने सचिव, महिला व बालविकास विभाग, सचिव, नगरविकास विभाग, सचिव, संसदीय कार्य विभाग, सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, सचिव,सामाजिक न्याय विभाग, सचिव, सामान्य प्रशासन विभाग, सचिव, गृह विभाग, सचिव, आदिवासी विकास विभाग, सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, सचिव, महसूल व वन विभाग यांची दिनांक ७ जून, २०१७, दिनांक २० जून, २०१८, दिनांक ५ सप्टेंबर, २०१८, दिनांक ०३ जानेवारी, २०१९ व दिनांक ०८ जानेवारी,२०१९ रोजी साक्ष घेतली. उक्त साक्षीत उपस्थित झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेला अहवाल पुढीलप्रमाणे आहे :—

## १. नवी मुंबई महानगरपालिका

### १.१. नवी मुंबई महानगरपालिकेतील रिक्त पदांचा अनुशेष भरण्याबाबत :-

मंगळवार, दिनांक २८ ऑक्टोबर, २०१५ रोजी महिलांचे हक्क आणि कल्याण समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी नवी मुंबई महानगरपालिका यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती मागविण्यात आली होती.

नवी मुंबई महानगरपालिकेतील शासकीय निमशासकीय व शासन अनुदानित संस्थामधील सेवेतील भरतीसाठी महिलांकरीता ३०% जागा आरक्षित ठेवण्याच्या धोरणाची अंमलबजावणी महानगरपालिकांच्या सेवेमध्ये भरती करतांना करण्यात येते काय ? महानगरपालिकेतील वर्ग १ ते ४ तांत्रिक व अतांत्रिक अधिकारी व कर्मचारी यांची मंजूर पद संख्या किती आहे ? त्यापैकी सन २०१४-१५ अखेर किती पदे भरण्यात आली आहेत ? उक्त मंजूर पदांपैकी वर्ग १ ते ४ मधील किती व कोणती पदे महिलांकरीता आरक्षित ठेवण्यात आली आहेत ? महिला उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या वर्ग १ ते ४ मधील पदांपैकी सन २०१४-१५ अखेर एकूण किती पदे रिक्त आहेत, तसेच सदरची पदे रिक्त राहण्याची कारणे काय आहेत ? महानगरपालिकेतील विविध पदांवर महिला उमेदवारांच्या नियुक्त्या करण्याबाबत महानगरपालिकेने सेवाप्रवेश नियमावली तयार केली आहे काय ? महिला उमेदवारांसाठी राखीव असलेली पदे भरण्यासाठी गत तीन वर्षात (सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५) किती वेळा व कोणकोणत्या तारखांना वर्तमानपत्रात कोणकोणती पदे भरण्यासाठी जाहिराती देण्यात आल्या होत्या. महिला उमेदवारांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या पदांसाठी स्वतंत्र नोंदवही (रोस्टर) ठेवण्यात आली आहे काय, असल्यास केव्हापासून ? तसेच ती अद्ययावत स्वरुपात आहे काय, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ? महिला अधिकारी/कर्मचारी यांची भरती व सेवाविषयक बाबी हाताळण्यासाठी महानगरपालिकेमध्ये विशेष कक्ष स्वतंत्ररित्या स्थापन करण्यात आला आहे काय ? असल्यास केंव्हापासून विशेष कक्ष स्थापन केला, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ? अशी समितीने विचारणा केली.

**उपरोक्त प्रकरणी नवी मुंबई महानगरपालिका यांच्याकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली आहे.**

महानगरपालिकेची स्थापना झाल्यापासून माहे ऑगस्ट, २०१५ अखेर पालिकेत सेवेत एकूण २३६५ इतके अधिकारी व कर्मचारी कार्यरत असून त्यापैकी महिला अधिकारी व कर्मचारी यांची संख्या ९११ इतकी आहे.

शासन नियमाप्रमाणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. वृत्तपत्रात आवश्यक पदांची जाहिरात देताना महिलांसाठी ३०% जागा राखीव असल्याचे नमूद करण्यात येते. भरती प्रक्रियेमध्ये सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्रमांक एसआरव्ही.१०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ दि. १६ मार्च १९९९, महिला व बालकल्याण विभागाचा शासन निर्णय क्र. संकिर्ण-१०९६/प्र.क्र.३०/का-२, दि. ०१ ऑगस्ट १९९७ व शासन निर्णय क्र. ८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२ दि. २५ मे २००१ शासन निर्णयामध्ये दिलेल्या सुचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात येते. (परिशिष्ठ-क) सन २००८ पासून शालेय शिक्षण व क्रिडा विभाग स्पर्धा परीक्षा (CET) घेवून शिक्षकांची भरती केली जाते. महिला आरक्षण शासन निर्णय, महिला व बालकल्याण विभाग क्रमांक ८२/२००१ मसेआ २०००/प्र.क्र.४१५/का.२, दिनांक २५ मे २००१ नुसार कार्यवाही केली जाते.

महानगरपालिकेमध्ये वर्ग १ ते ४ तांत्रिक व अतांत्रिक अधिकारी व कर्मचारी यांचा मंजूर पद संख्येचा तपशिल सोबत जोडला आहे. त्यापैकी सन २०१४-१५ अखेर (डिसेंबर-१४ पर्यंत) १५२९ पदे भरण्यात आलेली आहेत.

**( परिशिष्ठ-अ)**

| | **तांत्रिक** | | **अतांत्रिक** | |
|---|---|---|---|---|
| | मंजूर | कार्यरत | मंजूर | कार्यरत |
| अधिकारी | ० | ० | ० | ० |
| कर्मचारी | ० | ० | ७१५ | ५६७ |
| **एकूण** | **०** | **०** | **७१५** | **५६७** |

| | **तांत्रिक** | | **अतांत्रिक** | |
|---|---|---|---|---|
| | मंजूर | कार्यरत | मंजूर | कार्यरत |
| अधिकारी | ० | ० | ० | ० |
| कर्मचारी | ० | ० | ० | ८३ |
| **एकूण** | **०** | **०** | **०** | **८३** |

उक्त मंजूर पदांपैकी वर्ग १ ते ४ मधील महिलांकरीता आरक्षित ठेवण्यात आलेल्या पदांचा तपशिल सोबत जोडला आहे. ( **परिशिष्ठ-ड**)

| | तांत्रिक | | अतांत्रिक | |
|---|---|---|---|---|
| | मंजूर | महिलांसाठी आरक्षीत | मंजूर | महिलांसाठी आरक्षीत |
| अधिकारी | ० | ० | ० | |
| कर्मचारी | ० | ० | ७१५ | २१५ |
| **एकूण** | **०** | **०** | **७१५** | **२१५** |

नवी मुंबई महानगरपालिका माध्यमिक शिक्षण विभागाच्या शाळांसाठी सद्य:स्थितीत शिक्षकांची पदे शासनाकडे मंजुरीसाठी प्रस्तावित आहेत.

महिला उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या वर्ग १ ते ४ मधील पदे भरण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्रमांक एसआरव्ही.१०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ दि. १६ मार्च १९९९, महिला व बालकल्याण विभागाचा शासन निर्णय क्र. संकिर्ण-१०९६/प्र.क्र.३०/का-२, दि. ०१ ऑगस्ट १९९७ व शासन निर्णय क्र. ८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२ दि. २५ मे २००१ या शासन निर्णयाचा अवलंब करून कार्यवाही करण्यात येते. तसेच शिक्षक कर्मचाऱ्यांच्या तपशिलाबाबतच्या माहितीकरीता **परिशिष्ठ-ब** चे अवलोकन करावे. शालेय शिक्षण विभागामार्फत स्पर्धा परीक्षा (CET) घेवून शिक्षकांची पदे भरली जातात.

महिला व बालकल्याण विभागाचा शासन निर्णय क्र.८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२ दि. २५ मे, २००१ मधील अट क्र. ७ व ८ मध्ये भरती वर्षात त्या त्या प्रवर्गातील महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाहीत तर सदर आरक्षण इतरत्र अदला बदल न करता त्या त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारांमार्फत भरण्यात यावे व महिलांच्या आरक्षणाचा अनुशेष पुढे ओढण्यात येवू नये अशी तरतूद आहे. सद्य:स्थितीत भरती वर्ष सन २०१४-१५ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहीरातींची भरती प्रक्रिया कार्यालयीन प्रणालीत आहे. ( **परिशिष्ठ-इ)**

उक्त शासन निर्णयानुसार महिलांचा अनुशेष पुढे ओढण्याची तरतुद नसल्याने महिलांसाठी विशिष्ट असे रिक्त पद नाही.

| | **महिलांसाठी राखीव पदे** | **भरलेली पदे** | **शेरा** |
|---|---|---|---|
| अधिकारी | ० | ० | - |
| कर्मचारी | २१५ | ४११ | - |
| **एकूण** | **२१५** | **४११** | - |
| | **महिलांसाठी राखीव पदे** | **भरलेली पदे** | **शेरा** |
| अधिकारी | ० | ० | - |
| कर्मचारी | ० | ३४ | - |
| **एकूण** | **०** | **३४** | - |

विविध पदांवर महिला उमेदवारांच्या नियुक्त्या करण्याबाबत महानगरपालिकेने स्वतंत्र सेवाप्रवेश नियमावली तयार केलेली नाही. शालेय शिक्षण विभागामार्फत स्पर्धा परीक्षा (CET) घेवून शिक्षकांची पदे भरली जातात. त्यामुळे सेवाप्रवेश नियमावली या कार्यालयाकडून तयार केली नाही. महिला उमेदवारांच्या नियुक्त्या करण्याबाबत सेवाप्रवेश नियमावली तयार करणेबाबत शासनाकडून कोणतेही निर्देश नसल्याने सदरची नियमावली महापालिका शिक्षण विभागाने अद्याप तयार केलेली नाही.

सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ या ३ वर्षात केवळ महिलांची पदे भरण्याबाबत जाहिरात देण्यात आलेली नाही. सन (२०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५) या गत ३ वर्षात शालेय शिक्षण विभागामार्फत भरती झालेली नाही. त्यामुळे माहिती निरंक आहे.

महिला उमेदवारांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या पदासाठी स्वतंत्र नोंदवही (रोस्टर) ठेवण्यात आलेली नाही. तथापि, शासन नियमानुसार बिंदुनामावलीची (रोस्टर) कार्यवाही करण्यात येते. महिला उमेदवारांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या पदासाठी स्वतंत्र नोंदवही (रोस्टर) ठेवण्याबाबत शासनाचे कोणत्याही प्रकारचे निर्देश नाहीत.

महिला उमेदवारांसाठी राखीव असलेल्या रिक्त पदांबाबत व पदे भरल्याबाबतचा अहवाल सचिव, महिला व बालविकास विभाग तसेच सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय यांचेकडून कोणतेही आदेश प्राप्त नसल्यामुळे अशा प्रकारचा अहवाल पाठविण्यात आलेला नाही. तसेच सन २०१२-१३ ते २०१४-१५ या तीन वर्षात शासनामार्फत भरती झालेली नाही.

महापालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांची भरती व सेवाविषयक बाबी ह्या प्रशासन विभागामार्फत हाताळण्यात येतात. महिला अधिकारी/कर्मचारी यांची भरती व सेवाविषयक बाबी हाताळण्याकरीता स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आलेला नाही. मात्र प्रशासन विभागात २५% एवढे महिला कर्मचारी कार्यरत आहेत. (अधिक्षक-०३, वरीष्ठ लिपिक-३, लिपिक-टंकलेखक-०४, शिपाई-१) नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागातील शिक्षक कर्मचाऱ्यांच्या भरती व सेवाविषयक बाबी ह्या शिक्षण विभागाच्या आस्थापनेमार्फत हाताळण्यात येतात. महिला अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी महानगरपालिकेकडून महिला कक्ष व महिलांकरीता तक्रार निवारण समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

**नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त यांची साक्ष :—**

मंगळवार, दिनांक २८ ऑक्टोबर, २०१५ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी आयुक्त यांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने महानगरपालिकेमध्ये संवर्गनिहाय महिलांची किती पदे रिक्त आहेत, केव्हा पासून रिक्त आहेत व ती कधी भरण्यात येणार आहेत ? अशी विचारणा केली.

त्यावर आयुक्त यांनी महानगरपालिकेतील तांत्रिक (सरळसेवा) मधील गट-अ संवर्गातील पदे शासनाकडून प्रतिनियुक्तीने भरण्यात येतात. गट-ब संवर्गातील पद संख्या निरंक आहे. गट-क संवर्गात महिला आरक्षणांतर्गत २२ पदे रिक्त आहेत. तसेच गट-ड संवर्गामध्ये महिला आरक्षणांतर्गत असलेली ४ पदे रिक्त आहेत. महिला आरक्षणांतर्गत अतांत्रिक (सरळसेवा व पदोन्नती) मधील गट-ब संवर्गात १ पद रिक्त आहे, गट-क संवर्गात ६ पदे व गट-ड संवर्गात ३ पदे रिक्त आहेत.

महानगरपालिकेतील रिक्त पदे भरण्यासाठी सन २०१४ मध्ये वृत्तपत्रामध्ये जाहिरात दिलेली असून लवकरात लवकर रिक्त पदे भरण्यात येतील. महानगरपालिकेचा आकृतीबंध मान्यतेसाठी शासनाकडे पाठविण्यात आला असून तो अंतिम टप्प्यात आहे, त्यासंबंधीची नस्ती मुख्यमंत्री महोदयाकडे पाठविल्याची माहिती प्राप्त झाली आहे. सदर आकृतीबंध मान्यता मिळाल्यानंतर १२०८ पदांना मंजूरी मिळेल व ती तातडीने भरण्याची कार्यवाही करण्यात येईल, असे समितीस सांगितले.

समितीने महानगरपालिकेकडून रिक्त पदे भरण्याची जाहिरात कोणत्या वर्तमानपत्रामध्ये देण्यात येते ? अशी विचारणा केली.

त्यावर अतिरिक्त आयुक्त यांनी राज्यस्तरावरील जवळपास १० ते १२ वर्तमानपत्रामध्ये महानगरपालिकेची रिक्त पदे भरण्याबाबतची जाहिरात देण्यात येते, असे समितीस सांगितले.

समितीने शासनाकडे मंजूरीसाठी पाठविण्यात आलेल्या आकृतीबंधामधील १२०० पदा मध्ये महिलांचे आरक्षण आहे काय ? अशी विचारणा केली.

त्यावर उपायुक्त यांनी समितीस होय असे सांगितले.

समितीने महानगरपालिकेकडून ऑनलाईन व वर्तमानपत्रामध्ये रिक्त पदांची जाहिरात देण्यात येते, ही बाब ठीक आहे. परंतु सदरील जाहिरातीची माहिती नगरसेविकांच्या क्षेत्रामध्ये देण्याची व्यवस्था करण्यात यावी. कारण वर्तमानपत्रामधील जाहिरातीची त्यांना माहिती मिळत नाही, बरेच लोक वर्तमानपत्र वाचत नाहीत. महानगरपालिकेच्या रिक्त पदांची जाहिरात काढल्यानंतर ती नगरसेवकांच्या प्रत्येक प्रभागामध्ये लावली तर बरेच स्थानिक उमेदवार अर्ज करतील, असे समितीने सूचित केले.

समितीने महिला उमेदवारांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या पदांसाठी स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात आली आहे काय ? अशी विचारणा केली.

त्यावर उपायुक्त यांनी महिला उमेदवारांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या पदांसाठी स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात आली नाही, ती ठेवण्यात येईल व प्रतिवर्षी रोस्टर तपासून घेण्यात येईल, असे समितीस सांगितले.

समितीने महानगरपालिकेमध्ये शासन निर्णयानुसार महिला संवर्गाची ३० टक्के पदे भरणे आवश्यक आहे, असे महानगरपालिकेला सांगितले.

समितीने महानगरपालिकेने विशाखा समितीची स्थापना केली आहे काय ? तसेच विशाखा समितीकडे किती तक्रारी प्राप्त झाल्या त्यामध्ये आरोग्य विभागाची तक्रार होती काय ? अशी विचारणा केली.

त्यावर संचालक यांनी होय, नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये सन २०१० मध्ये विशाखा समितीची स्थापना करण्यात आली असून प्रत्येक विभागाचा एक सदस्य व एका अशासकीय सदस्य यांचा समावेश करण्यात आला आहे व वरिष्ठ महिला अधिकारी यांना समितीच्या अध्यक्ष पदी नियुक्त करण्यात आले आहे. समितीच्या बैठकीस गैरहजर राहणारे सदस्य तसेच सदस्यांनी दिलेला राजीनामा याबाबतचा आढावा घेऊन दरवर्षी एप्रिलमध्ये समिती नव्याने गठीत करण्यात येते.

तसेच विशाखा समितीकडे सन २०१०-११ मध्ये दोन प्रकरणे प्राप्त झाली होती व ती आरोग्य विभागातील होती. पहिली तक्रार परिचारिका व डॉक्टर यांच्या संबंधीची होती, त्या तक्रारीचे निराकरण केले आहे. सदर तक्रारीतील परिचारिका यांचे म्हणणे होते की, डॉक्टर त्यांचा छळ करतात, त्यांची बदली करीत नाही, उशिरापर्यंत थांबवतात.

समितीने लैंगिक छळाबाबत विशाखा समितीस तक्रार प्राप्त झाली आहे काय ? अशी विचारणा केली.

त्यावर संचालक यांनी आतापर्यंत लैंगिक छळाबाबत विशाखा समितीस तक्रार प्राप्त झाली नाही, असे समितीस सांगितले.

समितीने परिचारिकेची तक्रार आयुक्त किंवा प्रशासकीय स्तरावर पाठविली होती काय ? अशी विचारणा केली.

त्यावर संचालक यांनी होय, आयुक्त व विभाग प्रमुख यांचेकडे सदर तक्रार पाठविली होती. संबंधित परिचारिका व डॉक्टर यांचे समुपदेशन करण्यात आले आहे, असे समितीस सांगितले.

समितीने महानगरपालिका आयुक्तांच्या कार्यालयाच्या बाहेर विशाखा समितीचा फलक लावला आहे काय ? अशी विचारणा केली.

त्यावर आयुक्त यांनी महिलांच्या अन्यायासंदर्भात प्रत्येक विभागामध्ये पाठपुरावा करण्यात येतो, परिपत्रक काढण्यात येते व या माध्यमातून विशाखा समितीबाबत सर्व माहिती देण्यात येते. महानगरपालिकेच्या वेबसाईटवर विशाखा समितीचे अध्यक्ष व सर्व सभासद यांचे नाव व संपर्क क्रमांक उपलब्ध करुन दिले आहे, असे समितीस सांगितले.

समितीने महानगरपालिकेत महिलांसाठी स्वतंत्र कक्ष निर्माण केलेला आहे काय ? अशी विचारणा केली.

त्यावर संचालक यांनी तळ मजल्यावर महिलांसाठी स्वतंत्र कक्ष आहे. याशिवाय ईटीसी केंद्रात देखील स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात आलेला आहे. त्या ठिकाणी महिलांचे कौन्सिलींग होते. इटीसी केंद्रात ४ कौन्सिलर आहेत. समितीमध्ये एका कौन्सिलरची आणि कायदेविषयक अभ्यास केलेल्या एका कर्मचाऱ्याची देखील नियुक्ती केलेली आहे, असे समितीस सांगितले.

समितीने महानगरपालिकेत लिगल सेल असावयास पाहिजे, असे नगरसेविकांनी सांगितले होते, याबाबत काय म्हणणे आहे ? अशी विचारणा केली.

त्यावर आयुक्त यांनी विधवा, परितक्त्या किंवा ज्या महिला अडचणीत आहेत त्यांना मोफत कायदे विषयक सल्ला देण्यासाठी तळ मजल्यावर कक्ष स्थापन करावा आणि त्यासाठी वकिलांचे एक पॅनल तयार करावे, असा प्रस्ताव स्थायी समितीच्या अध्यक्षांनी मांडला होता. तसा प्रस्ताव तयार करुन तो महासभेसमोर ठेवणार आहोत, असे समितीस सांगितले.

समितीने महासभेत तसा ठराव करु शकता. विधी सल्लागार असतात किंवा महानगरपालिकेचे वकील असतात त्यांच्याकडून सल्ला घेऊन महिलांना माहिती देऊ शकता. गरीब महिलांना वकील नियुक्त करणे परवडत नाही. कायदे विषयक सल्ला देता किंवा वकीलांची निवड करण्यात येते हे महिलांना कळले पाहिजे, अशा सूचना केल्या.

त्यावर संचालक यांनी सेल तयार केल्यानंतर त्याबाबत वेबसाईटवर माहिती देऊ आणि प्रेस कॉन्सफरन्स घेऊन प्रसिद्धी करु जेणेकरुन नवी मुंबई शहरातील जास्तीत जास्त महिलांना याचा लाभ घेता येईल. तसेच समितीने सूचना केल्याप्रमाणे यापुढे महिला व बाल कल्याण विभागातूनच खर्च करु तसेच विशाखा समितीला निधीची अडचण भासणार नाही, असे समितीस सांगितले.

समितीने यासाठी एखाद्या हेड अंतर्गत तरतूद करावी. लिगल सेल निर्माण करणार आहात. त्यासाठी बजेटमध्ये प्रोव्हिजन करावी. महिलांवर अत्याचार होतात. परंतु महिला पुढे येत नाहीत. या माध्यमातून महिलांना मदत करु शकता, असे समितीने सूचना केल्या.

विशाखा समितीमध्ये ११ सदस्यांचा समावेश असून समितीमध्ये एकाच पुरुष सदस्याचा समावेश असल्याचे दिसून येते. समितीमध्ये ५० टक्क्यापेक्षा जास्त महिलांचा समावेश असला पाहिजे, अशी तरतूद आहे. समितीमध्ये एकाच पुरुष अधिकाऱ्याचा समावेश आहे. आयुक्तांनी आपल्या स्तरावर समितीचे पुनर्गठन करावे आणि समितीमध्ये पुरुष अधिकाऱ्यांची संख्या कमी आहे ती वाढवावी. तसेच समितीमध्ये आरोग्य विभागातील ३-४ सदस्यांचा समावेश आहे. वेगवेगळ्या विभागातील अधिकाऱ्यांचा समितीमध्ये समावेश असला पाहिजे. समितीची कार्यकक्षा कशी आहे, समितीमध्ये कोणाची नियुक्ती केली पाहिजे याबाबत दिनांक १९ सप्टेंबर, २००६ च्या शासन निर्णयामध्ये सविस्तर माहिती नमूद केलेली आहे. त्याप्रमाणे आयुक्तांनी समिती पुनर्गठित करावी, अशा सूचना समितीने केल्या.

समितीने महानगरपालिकेत महिला व बाल कल्याण अधिकारी हे पद आहे काय, असल्यास त्याची कार्यकक्षा काय आहे ? अशी विचारणा केली.

त्यावर आयुक्त यांनी महानगरपालिकेच्या आकृतीबंधात महिला व बाल कल्याण अधिकाऱ्यांचे पद नाही. महिला व बाल कल्याण विभागाची जबाबदारी उपायुक्तांकडे सोपविण्यात आलेली आहे. महिला व बाल कल्याण अधिकारी संवर्गाचे स्वतंत्र पद नसल्यामुळे "नाही" असे उत्तर दिलेले आहे, असे समितीस सांगितले.

समितीने हॉस्पिटलची इमारत बांधून तयार आहे. परंतु अद्याप हॉस्पिटल सुरु झालेले नाही. त्यामुळे लोकांची गैरसोय होत आहे. तेथे साहित्य, डॉक्टर्स व इतर स्टाफ नाही, अशी विचारणा केली.

त्यावर आयुक्त यांनी बेलापूर, नेरुळ आणि ऐरोली येथील हॉस्पिटल्समध्ये बेसिक सर्व्हिसेस सुरु करण्यात आलेल्या आहेत. एमसीएच बेलापूर येथील हॉस्पिटल सुरु आहे. तेथील बेडची संख्या वाढलेली आहे. बेलापूर येथील हॉस्पिटलमध्ये ५० आणि नेरुळ व ऐरोली येथील हॉस्पिटलमध्ये १०० बेड्स आहेत. हॉस्पिटल्स सुरु करण्यासाठी १५०० कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. आता १२०० पदांना मंजुरी मिळालेली आहे, असे समितीस सांगितले.

**मंगळवार, दिनांक २८ ऑक्टोबर, २०१५ रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने समितीला आश्वासित केलेली माहिती :—**

मंगळवार, दिनांक २८ ऑक्टोबर, २०१५ रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने समितीला खालीलप्रमाणे आश्वासित माहिती देण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्रमांक ४६ या शाळेमधील जुन्या इमारतीत प्रसाधनगृह आहे. नवीन इमारतीमध्ये मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधानगृह नव्हते. ते बांधण्यात आले असून दि.२८/०६/२०१७ पासून त्याचा वापर सुरू आहे. शिक्षण विभागाकडून त्याबाबत अहवाल व फोटो प्राप्त करून घेतलेले आहेत.

महिला व बालविकास विभागाकडील दि.२५/०५/२००९ च्या शासन निर्णयानुसार नवी मुंबई महानगरपालिकेतील विविध संवर्गाच्या पदभरतीसाठी दिलेल्या जाहिरातींमध्ये महिलांकरीता ३०% जागा आरक्षित ठेवण्याची अट संवर्गाच्या पदभरती जाहिरातीमध्ये २२७ पदांपैकी ६८ पदे महिलांसाठी आरक्षित दर्शविण्यात आली होती. त्यानुसार सन २०१६ मध्ये नियुक्ती आदेश दिलेल्या ६८ उमेदवारांपैकी, महिला आरक्षणांतर्गत २६ उमेदवारांची निवड करण्यात आली आहे. निवडलेल्या एकूण ६८ उमेदवारांपैकी, ४६ महिला उमेदवार आहेत. त्याचप्रमाणे नवी मुंबई महानगरपालिका आस्थापनेवरील ३२७९ मंजूर पदांपैकी २३३० पदे सद्य:स्थितीत भरण्यात आली असून त्यामध्ये ८९७ महिला कार्यरत आहेत.

नवी मुंबई महानगरपालिका आस्थापनेवरील सर्व १७५ संवर्गाचे रोस्टर अद्ययावत करण्यात आले असून कोकण विभागीय आयुक्त कार्यलयातील मागासवर्ग कक्षाकडून १३६ संवर्गांचे रोस्टर प्रमाणित देखील करून घेण्यात आले आहे.

**विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी खालीलप्रमाणे लेखी माहिती दिली :—**

नवी मुंबई महानगरपालिकेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक ०७ जून, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी नवी मुंबई महानगरपालिकेने पुढील प्रमाणे माहिती दिली. नवी मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवर यापूर्वी ३२७९ पदे मंजूर होती. तसेच महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाचा दिनांक २१ ऑगस्ट, २०१७ रोजीचा शासन निर्णय अन्वये ६५६ नविन पदांना मान्यता दिली असून एकूण ३९३५ पदांचा आकृतीबंध मंजूर झाला आहे. सद्य:स्थितीत २३०० पदे अस्थायी आस्थापनेवर कार्यरत असून यामध्ये एकूण महिला कर्मचा-यांची संख्या ८७९ इतकी आहे. तसेच उर्वरित रिक्त पदे भरताना महिलांसाठी समांतर आरक्षणांतर्गत ३० टक्के पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या आस्थपनेवरील सर्व संवर्गाची पदे बिंदूनामावलीप्रमाणे भरण्यात आली आहेत. सेवा प्रवेश नियम अंतीम झाल्यानंतर बिंदूनामावलीतील अनुशेषाची रिक्त पदे भरण्यात येतील. १७५ संवर्गापैकी १३६ संवर्गाची बिंदूनामावली नोंदवह्या सहाय्यक आयुक्त, मागासवर्ग कक्ष यांच्याकडून प्रमाणित करून घेण्यात आल्या आहेत. उर्वरित ३१ संवर्गाच्या बिंदूनामावल्या गट "ब" मधील आहेत. सदर बिंदूनामावल्या तपासून घेण्यासाठी शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाशी पत्रव्यवहार करण्यात आला होता. तथापि, त्यांनी सेवा नियमांस शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर तपासण्यात येईल असे सांगितले आहे.

आरोग्य विभागासाठी एकूण १८५७ वैद्यकीय पदांचा आकृतीबंध असून सद्य:स्थितीत एकूण ९२५ वैद्यकीय व निमवैद्यकीय अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत. उर्वरित वैद्यकीय व निमवैद्यकीय पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

स्थानिक व राज्यस्तरीय वृत्तपत्रात तसेच नवी मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर जहिरात प्रसिध्द केली जाते.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या ऐरोली व नेरुळ रुग्णालयातील सर्व बाहयरुग्ण विभाग सुरु करण्यात आलेले आहेत. माता बाल रुग्णालय बेलापूर येथे स्त्रीरोग, बालरोग, आणि जनरल ओ.पी.डी. सेवा सुरु करण्यात आलेली आहे. सार्वजनिक रुग्णालय ऐरोली व नेरुळ येथील स्त्रीरोग व बालरोग आंतररुग्ण विभाग देखील सुरु करण्यात आला आहे. सर्व रुग्णालयांना फर्निचर पुरवठा करण्यात आला असून वैद्यकिय उपकरणे खरेदीसाठी निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. खालीलप्रमाणे वैद्यकिय अधिकारी/कर्मचारी उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

| **रुग्णालयाचे नाव** | **वैद्यकिय अधिकारी/तज्ञ** | **निमवैद्यकिय कर्मचारी वर्ग** |
|---|---|---|
| सार्व.रुग्णालय ऐरोली | १५ | ६९ |
| सार्व.रुग्णालय नेरूळ | २८ | ५३ |
| माबारु बेलापूर | ३ | १० |

सन २०१६-१७ मध्ये उपरोक्त महानगरपालिका रुग्णालयांतील सेवेचा लाभ घेतलेल्या रुग्णांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :—

| **विभाग** | **सार्व. रुग्णालय ऐरोली** | **सार्व.रुग्णालय नेरुळ** | **माबारु बेलापूर** |
|---|---|---|---|
| बाहयरुग्ण विभाग | १२६४९३ | ९२५१५ | २३१४३ |
| आंतररुग्ण विभाग | २५७५ | ३२७२ | -- |

**विभागीय सचिवांची साक्ष :—**

नवी मुंबई महानगरपालिकेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक ०७ जून, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी नवी मुंबई महानगरपालिकेतील संवर्गनिहाय रिक्त जागा भरण्यात आल्या काय ? अशी समितीने विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी नवी मुंबई महानगरपालिकेत एकूण ३२७९ पदे मंजूर असून त्यापैकी २३३० पदे कार्यरत आहेत. त्यापैकी ८७९ महिला कर्मचारी आहेत. प्रत्येक भरतीच्या वेळी महिलांसाठी ३० टक्के पदे राखीव असल्याचा उल्लेख जाहिरातीमध्ये केलेला आहे.

समितीने सर्व पदे बिंदूनामवली प्रमाणे भरलेली आहेत काय ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी १७५ संवर्गापैकी १३६ संवर्गाची तपासणी पूर्ण केलेली आहे. उर्वरित संवर्गाची बिंदूनामावली तपासणी करुन घेत आहोत. पदांच्या भरतीबाबत देण्यात येणाऱ्या जाहिरातीमध्ये महिलांसाठी ३० टक्के जागा राखीव असल्याचा उल्लेख केलेला आहे, असे समितीस सांगितले.

समितीने शौचालयाच्या कामाबाबतची सद्य:स्थिती समितीस सांगावी अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी शौचालयाचे कामे पुर्ण करुन ते मार्च २०१७ पासून वापरण्यास सुरुवात केलेली आहे. समितीने केलेल्या सूचनेसुसार तपासणी केलेली आहे. दोन भारतीय व एक पाश्चिमात्य शैलीचे शौचकूप, आहेत. असे समितीस सांगितले.

समितीने बेलापूर, ऐरोली व नेरळ येथील रुग्णालयात पुरेसा कर्मचारी वर्ग आहे किंवा नाही, महिलांची किती पदे भरली आहेत याची माहिती समितीला द्यावी, अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी नेरुळ, ऐरोली येथे नवीन रुग्णालयाचे बांधकाम झाले असल्यामुळे त्यावेळी तेथे फर्निचर व अन्य मनुष्यबळ नव्हते. माहे जुलै, २०१६ पासून रुग्णालय पूर्ण कार्यान्वित केलेले आहे. नेरुळ आणि ऐरोली येथे सार्वजनिक रुग्णालय आणि बेलापूर येथे माता बाल रुग्णालय सुरु केलेले आहे. तेथे पूर्ण फर्निचर दिलेले आहे. आता साधनसामुग्रीचे टेंडर

अंतिम टप्प्यावर आहे. यात एक्स-रे, सिटीस्कॅन वगैरे सारख्या अत्याधुनिक साधनसामुग्री मागविणार आहोत. असे समितीस सांगितले.

समितीने उत्तरामध्ये नमूद केले आहे की, रुग्णालय सुरु करण्यात आले आहे. विना सुविधा रुग्णालय सुरु केले आहे काय ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी कमीत कमी सुविधा देऊन रुग्णालय सुरु करण्यात आले आहे. साधनसामुग्री टेंडरला विलंब झाला आहे. पण आता हे टेंडर अंतिम टप्पावर आहे. असे समितीस सांगितले.

समितीने १०० खाटांचे रुग्णालय सुरु केले आहे. त्यात स्त्री रोग तज्ज्ञ व बाल रोगतज्ज्ञ डॉक्टरांची संख्या किती आहे हे नमूद केलेले नाही. बाळंतीणबाई येते तेव्हा डॉक्टर्स उपलब्ध नसतात. सिझेरीयन होते त्यावेळी प्रॉब्लेम्स निर्माण होतात अशी तेथील स्थानिक नगरसेविकेने तक्रार केली होती. फर्निचर असून उपयोग नाही. डॉक्टर्स असणे महत्वाचे आहे.याबाबत समितीस माहिती द्यावी अशी विचारणा केली असता, त्यावर विभागीय अधिकारी यांनी बेलापूर येथे एक स्त्री रोग तज्ज्ञ महिला आहेत. कंत्राटी पध्दतीने डॉक्टर्स नेमले होते. त्यातील बरेच डॉक्टर्स सोडून गेले. आकृतीबंध मंजूर झाला आहे. परंतु शासनाकडून सेवा प्रवेश नियमाला मंजुरी मिळाली नसल्यामुळे कायम स्वरुपी डॉक्टरांची भरती करण्यात आलेली नाही. असे समितीस सांगितले.

समितीने सिझेरीयन करावयाचे असेल तर एक डॉक्टर पुरेसा नाही. मग अशा वेळी हे सर्व कोण बघते. अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी ऐरोली आणि वाशिम मध्ये डॉक्टर्स आहेत. फक्त बेलापूरमध्ये थोडी अडचण आहे.असे समितीस सांगितले.

समितीने ठाण्यामध्ये एक घटना घडली. एक महिला रस्त्यात बाळंत झाली. तिला रुग्णालयात देखील घेण्यात आले नव्हते. तसे काही घडले तर ? तेव्हा तातडीने स्त्री रोग तज्ज्ञ नेमण्यात येतील असे सांगण्यात आले होते. स्त्री रोग तज्ज्ञ मिळत नसतील तर ऑनररी स्त्री रोग तज्ज्ञ ठेवावेत. महिला स्त्री रोग तज्ज्ञ नेमावेत. असे समितीने सूचना केल्या.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी ऑनररी देखील डॉक्टर्स नेमले होते. ते देखील सोडून गेले आहेत, असे समितीस सांगितले.

समितीने १५०० कर्मचारी लागणार आहेत. त्यापैकी १२०० पदांना मंजूरी मिळाली आहे. १२०० पदांना मंजूरी मिळाली आहे तर मग डॉक्टर्स का उपलब्ध होत नाहीत ? कोणत्या पदांची भरती केली आहे ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी आकृतीबंध मंजूर झाला होता. परंतु, सेवाप्रवेश नियमाला मंजूरी मिळाली नव्हती. यासंबंधी शासनाकडे पाठपुरावा करीत आहोत. यासंबंधात त्यास मंजूरी मिळाल्यानंतर लगेच भरती करण्यात येईल. तो पर्यंत तात्पुरती पदे कंत्राटी पध्दतीने भरुन घेतो.

नेरुळ येथे ४ स्त्री रोग तज्ज्ञ व ४ बाल रोग तज्ज्ञ आहेत. सेवा प्रवेश नियमामुळे अडचण झालेली आहे. सेवा प्रवेश नियम मंजूर करुन घेतो. ऐरोलीमध्ये ४ स्त्री रोग तज्ज्ञ करार पध्दतीने नेमलेले आहेत आणि एक बाल रोग तज्ज्ञ करार पध्दतीने नेमलेला आहे. फक्त बेलापूर येथे अडचण आहे. असे समितीस सांगितले.

समितीने सन २०१७ पर्यंत आपण काहीच केले नाही काय ? बेलापूर येथे स्त्री रोग तज्ज्ञ आहेत काय ? किती दिवसात स्त्री रोग तज्ज्ञांची नेमणूक करणार आहात ? अशी विचारणा केली.

त्यावरी विभागीय अधिकारी यांनी बेलापूर येथे १ स्त्री रोग तज्ज्ञ आहेत. याचा आढावा घेतला आहे. काही प्रमाणात पदे वाढवून देण्याचा देखील निर्णय घेतला आहे. एक महिन्याच्या आत कंत्राटी पध्दतीने डॉक्टर्स भरण्यात येतील. शासनाने सेवा नियमाला मान्यता दिली तर लगेच कायम स्वरुपी डॉक्टर्सची भरती करण्यासंबंधातील कार्यवाही सुरु करण्यात येईल. असे समितीस सांगितले.

समितीने पदे जाहिरात भरतीची कोणकोणत्या वृत्तपत्रात दिले जाते. अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी कायम स्वरुपी पदावर डॉक्टर्स येण्यास तयार आहेत. कंत्राट पध्दतीने डॉक्टरांची भरती करतो. शासनाने सेवा नियमास मान्यता दिली तर कायमस्वरुपी डॉक्टरांची पदे भरण्याची कार्यवाही करता येईल. दर सोमवारी वॉक इन इन्टरव्ह्यू ठेवलेले आहेत. परंतु कंत्राटी पध्दतीची पदे असल्यामुळे डॉक्टर्स उपलब्ध होत नाहीत. मुंबईच्या धर्तीवर पदे भरण्याचा निर्णय तत्वत: घेतलेला आहे.

समितीने डॉक्टर मानधनात वाढ करावी .जो डॉक्टर लाखो रुपये खर्च करुन पदवी घेतो . तो अल्प मानधनावर कसा काय येईल शासनाकडून मान्यता मिळत नसल्यामूळे पदे भरता येत नाही असे त्याचे म्हणणे आहे. याबाबत काय निर्णय घेणार आहेत अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी सेवाप्रवेश नियम त्यांनी सादर केलेले आहेत. ते मंजुरीच्या अंतिम टप्प्यात आहेत. या महिना अखेर सेवाप्रवेशास मान्यता मिळेल असे दिसते. असे समितीस सांगितले.

समितीने पदे भरत नसल्यामुळे या ठिकाणच्या महिलांना खाजगीमध्ये नाईलाजाने नोकरी करावी लागेल. या मानसिकतेमुळे या ठिकाणचे खाजगी हॉस्पिटल्सच चांगले चालत असतील. त्यामुळे सरकारी रुग्णालयांचा उपयोग काय ? अशी विचारणा केली.

विभागीय अधिकारी यांनी महिन्याभरात टेंपररी डॉक्टर्स रिक्रूट करुन घेतो. रिक्रूटमेंट रुलनुसार महिन्याअखेर पर्मनंट भरतीची प्रक्रिया सुरु करु, असे समितीस सांगितले.

**अभिप्राय व शिफारस :**

समितीने नवी मुंबई महानगरपालिकेला दिनांक २८ ऑक्टोबर, २०१५ रोजी दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने आणि दिनांक ७ जुन, २०१७ रोजी घेतलेल्या विभागीय सचिवाच्या साक्षीच्या वेळी नवी मुंबई महानगरपालिकेतील शासकीय निमशासकीय व शासन अनुदानित संस्थामधील सेवेतील भरतीसाठी महिलांकरीता ३०% जागा आरक्षित ठेवण्याच्या धोरणाची अंमलबजावणी महानगरपालिकांच्या सेवेमध्ये भरती करतांना करण्यात येते काय ? अशी समितीने विचारणा केली असता, महानगरपालिकेची स्थापना झाल्यापासून आजपर्यंत सेवेत एकुण २३६५ इतके अधिकारी व कर्मचारी कार्यरत असुन त्यापैकी माहिला अधिकारी व कर्मचारी यांची संख्या ९११ इतकी आहे. तसेच शासन नियमाप्रमाणे भरती प्रक्रियेमध्ये सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्रमांक एसआरव्ही.१०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ, दि. १६ मार्च १९९९, महिला व बाल कल्याण विभागाचा शासन निर्णय क्र. संकिर्ण-१०९६/प्र.क्र.३०/का-२, दि. ०१ ऑगस्ट, १९९७ व शासन निर्णय क्र.८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२, दि. २५ मे २००१ शासन निर्णयामध्ये दिलेल्या सुचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात येते.

उक्त शासन निर्णयानुसार त्या त्या प्रवर्गातील माहिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाहीत तर सदर आरक्षण इतरत्र अदला बदल न करता त्याच्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारामार्फत भरण्यात यावे व महिलांच्या आरक्षणाचा अनुशेष पुढे ओढवण्यात येऊ नये अशी तरतूद केलेली आहे. या तरतुदीमध्ये सुधारणा करुन शासनाने महिला प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध झाल्या नाहित तर ते आरक्षण पुढे ओढुन महिलांनाचा त्या पदासांठी घेण्यात यावे. महानगरपालिकेचा आकृतीबंध शासनाकडून मान्यता मिळून आल्या की, १२०८ पदांना मंजुरी मिळवून ती तातडीने भरण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल असे समितीस सांगितले.

समितीने साक्षीच्या वेळी नेरुळ, एरोली येथीन रुग्णालाच्या बांधकामाबाबत आणि तेथील रिक्त पदाबाबत तसेच साधनसामुग्री बाबत विचारणा केली असता, विभागीय सचिवांना अशी माहिती दिली की, नेरुळ, ऐरोली येथे नवीन रुग्णालयाचे बांधकाम झाले असल्यामुळे त्यावेळी तेथे फर्निचर व अन्य मनुष्यबळ नव्हते. माहे जुलै, २०१६ पासून रुग्णालय पूर्ण कार्यान्वित केलेले आहे. नेरुळ आणि ऐरोली येथे सार्वजनिक रुग्णालय आणि बेलापूर येथे माता बाल रुग्णालय सुरु केलेले आहे. तेथे पूर्ण फर्निचर दिलेले आहे. साधनसामुग्रीचे टेंडर अंतिम टप्प्यावर आहे. यात एक्स-रे, सिटीस्कॅन वगैरे सारख्या अत्याधुनिक साधनसामुग्री मागविणार आहोत, असे समितीस सांगितले.

सबब, याप्रकरणी शासन निर्णयातील समांतर आरक्षणाची अंमलबजावणी ही महिलांच्या रिक्त जागा भरण्यासंदर्भात अन्यायकारक आहे. महिलांना आरक्षणाच्याच जागा मिळत नसताना समांतर आरक्षणाच्या नावाखाली पुरुष उमेदवारांची भरती करणे योग्य नाही. त्यामुळे महिलांकरिता जे ३०% आरक्षण नोकर भरतीमध्ये आहे त्याचे उद्दीष्ट सफल होत नाही व

त्यामुळे शासन निर्णयात दुरुस्ती होणे अत्यंत आवश्यक आहे असे समितीचे मत आहे. **नवी मुंबई महानगरपालिकेतील महिलांसाठी राखीव असलेल्या रिक्त पदांची तात्काळ भरती करण्यासाठी पुन्हा वर्तमानपत्रात जाहिराती देवुन महिलासांठी रिक्त असलेली पदे महिला संवर्गातूनच भरण्यात यावी आणि महिला उमेदवार नसल्यास त्या पदांवर पुरुष उमेदवारांची भरती करण्यात येवु नये अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

**नवी मुंबई महानगरपालिकेने एरोली, नेरुळ येथे बांधण्यात आलेल्या रुग्णालयांमध्ये वैद्यकीय उपकरणे खरेदी करण्याची निविदा प्रक्रिया पुर्ण झाली असल्यास तात्काळ वैद्यकीय साधनसामुग्री खरेदी करुन रुग्णालयाला उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**तसेच शासनाने नवी मुंबई महानगरपालिकेच्या रिक्त पदांच्या प्रस्तावाला मंजुरी देवून सदरहू एकूण १२०० डॉक्टरांची रिक्त पदे तात्काळ भरण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल ३ महिन्यात समितीला सादर करण्यात यावा. अशी समिती आग्रहाची शिफारस करीत आहे.**

### १.२ नवी मुंबई महानगरपालिकेचे गत ३ वर्षांतील वर्षनिहाय अंदाजपत्रक : -

महानगरपालिकेचे गत तीन वर्षांतील वर्षनिहाय सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ मधील वार्षिक अंदाजपत्रक किती रकमेचे आहे ? शासन धोरणानुसार प्रत्येक महानगरपालिकेत महसुली व आस्थापना खर्च वगळून एकूण अंदाजपत्रकाच्या ५% निधी महिला व बालकल्याण विभागासाठी राखून ठेवण्यात येतो. त्या अनुषंगाने महानगरपालिकेत मागील ३ वर्षात सदरहू ५% निधी कसा खर्च करण्यात आला आहे ? महानगरपालिकेमार्फत महिलांचे सबलीकरण करण्याकरीता तसेच आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या महिलांना सक्षम करण्याकरीता देण्यात येणाऱ्या सोई-सवलती इ. योजनांबाबत माहिती देण्यात यावी ? उक्त योजनांवर सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ या तीन वर्षात व वर्षनिहाय व योजनानिहाय एकूण किती खर्च झाला ? महानगरपालिकेच्या एकूण उत्पन्नाच्या किती टक्के रक्कम महिलांसाठी कल्याणकारी योजना राबविण्याबाबत खर्च करण्यात येते ? महिला उद्योजकांसाठी, विशेषत: आर्थिकदृष्ट्या मागास महिला उद्योजकांसाठी उद्योगधंदे उभारण्याकरीता महानगरपालिकेमार्फत विशेष सोई सवलती देण्यात येतात काय ? असल्यास, त्याबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी ? महानगरपालिका क्षेत्रात महापालिकेच्या मालकीचे मंडई/बाजार (मार्केटस्) यांची संख्या किती आहे ? त्या प्रत्येक ठिकाणी एकूण किती गाळे आहेत. गाळ्यांचे प्रकार कोणकोणते आहेत. (उदा. मासळी विक्री, कापड दुकान इ.) ? सदर मार्केट/मंडई/बाजार इ. मधील गाळे वाटपाचे निकष काय आहेत ? सदर मार्केटस् मधील काही गाळे महिलांकरीता राखून ठेवले जातात काय ? असल्यास, किती प्रमाणात आणि गाळे वाटपात महिलांना काही सवलती देण्यात येतात काय ? त्याबाबत माहिती देण्यात यावी ? महानगरपालिकेच्या मालकीच्या मार्केटमधील किती व कोणकोणत्या ठिकाणाचे गाळे महिलांना वितरीत करण्यात आले आहेत ? महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या महिलांच्या कल्याणकारी योजना व सोई सवलती इ. बाबतची माहिती गरजू महिलांपर्यंत पोहचविण्याचे व त्यांनी या योजनांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा यासाठी त्यांना प्रोत्साहीत करण्यासाठी स्वतंत्र अशी यंत्रणा महानगरपालिकेकडे आहे काय, असल्यास, तीचे स्वरुप काय आहे, व त्या यंत्रणेने आतापर्यंत कशा प्रकारे कार्य केले आहे ? महानगरपालिकेमध्ये महिलांसाठी असलेल्या योजनांचे मूल्यमापन करण्यात आले आहे काय ? असल्यास त्याचे निष्कर्ष काय आहेत ? महिलांच्या कल्याणाकरीता राबविण्यात येणाऱ्या योजना व त्यांना देण्यात येणाऱ्या सोईसवलती इ.बाबत महानगरपालिकेला केंद्र शासनाकडून/राज्य शासनाकडून वेगळे अनुदान मिळते काय, असल्यास सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ या तीन वर्षात वर्षनिहाय कोणकोणत्या बाबींवर खर्च करण्यात आला आहे? याबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी ? महिला बचत गट व महिला संस्थांना महानगरपालिकेतर्फे अर्थसहाय्य देण्यात येते काय ? असल्यास गत ३ वर्षात ( सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५) किती महिला बचत गटांना प्रत्येकी रक्कमेचे अर्थसहाय्य करण्यात आले आहे ? महानगरपालिकेमध्ये महिला

नगरसेविकांसाठी व महिला कर्मचाऱ्यांसाठी वेगळा कक्ष राखून ठेवण्यात आला आहे काय ? अशी विचारणा करण्यात आली.

**उपरोक्त प्रकरणी नवी मुंबई महानगरपालिकेकडून खालील प्रमाणे माहिती प्राप्त झाली आहे :-**

(रु. कोटी मध्ये )

| **सन** | **२०१२-१३** | **२०१३-१४** | **२०१४-१५** |
|---|---|---|---|
| अंदाजपत्रकीय रक्कम | २१९९.९० | २६८०.४८ | २०२५.२७ |

मागील ३ वर्षात प्रत्यक्ष झालेला खर्च खालीलप्रमाणे आहे.

(रु. कोटी मध्ये)

| **सन** | **२०१२-१३** | **२०१३-१४** | **२०१४-१५** |
|---|---|---|---|
| तरतूद महिला बाल कल्याण | १८.६५ | १६.७८ | ९.५९ |
| प्रत्यक्ष खर्च | १.०८ | ३.३४ | २.५९ |

महानगरपालिकेच्या समाज विकास विभागामार्फत महिलांकरीता राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांची माहिती परिशिष्ट अ वर जोडण्यात आलेली आहे. ( **परिशिष्ठ-च)**

सन २०१२-१३ ते २०१४-१५ या वर्षातील खर्चाचा तपशिल परिशिष्ट ब वर जोडण्यात आलेला आहे. ( **परिशिष्ठ-छ)**

शासन धोरणानुसार महिला व बालकल्याण कार्यक्रमासाठी महानगरपालिकेने अर्थसंकल्पात तरतूद केलेल्या वार्षिक महसूली उत्पन्नातून, बांधिल खर्च वजा जाता उर्वरीत रक्कमेच्या ५% रक्कम राखून ठेवण्यात येते.

महानगरपालिकेमार्फत महिला उद्योजकांसाठी, तसेच आर्थिकदृष्ट्या मागास महिला उद्योजकांसाठी विशेष उपक्रम सद्य:स्थितीत राबविण्यात येत नाही. परंतु केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान (NULM) च्या धर्तीवर महिला उद्योजकांसाठी मायक्रोफायनान्स द्वारे प्रोत्साहित करणेकरीता पुढील आर्थिक वर्षापासुन योजना प्रस्तावित करणेत येईल.

**१)** महानगरपालिका क्षेत्रात महापालिकेच्या मालकीचे ४६ डेली बाजार/हॉकर्स झोन, ०५ मार्केटस् सिडकोकडून महापालिकेस हस्तांतरीत झालेले आहेत. या सर्व बाजारामधे एकूण १७६४ ओटले आहेत. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र.२५९९/२००१ मध्ये दि. २६/०९/२००१ रोजी दिलेल्या आदेशानुसार कोर्ट कमिशनर यांचे नियंत्रणाखाली सन-२००२ मध्ये सिडकोने महानगरपालिकेकडे हस्तांतर केलेल्या फेरीवाला भुखंडावर ४*६ चौ. फुट मोजमापाची पिचेस दैनंदिन गरजेच्या वस्तु विक्रीकरीता परवानाधारक फेरीवाल्यांना लॉटरी पध्दतीने वाटप करण्यात आलेले आहेत.

**२)** महापालिकेत निहीत झालेले ग्रामपंचायतकालिन १३ मासळी मार्केटस् आहेत.

याशिवाय महानगरपालिकेने खालीलप्रमाणे दुकान/गाळे, गाव-गावठाण, झोपडपट्टी व सिडको नोडल क्षेत्रात विकसित केलेले असून त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| **ठिकाण** | **तपशिल** |
|---|---|
| भारतरत्न स्व. राजीव गांधी क्रिडा संकुल से. ३ अे, बेलापूर दुकान/गाळे | २८ |
| भूखंड क्र.७१,७२ आणि ७३, से.११ सीबीडी किऑक्स (kiosk) | ४६ |
| भूखंड ७६१ ते ७६४, शिरवणे, नेरूळ मार्केट गाळे | १३ |
| भूखंड क्र. १६०, करावे, नेरूळ मार्केट | ०९ |
| डॉ. बाबासाहेब आंबेडकर आवास योजनेअंतर्गत विकसित करण्यात आलेली इमारत, श्रमिकनगर, कोपरखेरणे मार्केट गाळे | ०३ |
| तळवली, नोसील नाका बहुउद्देशिय इमारत, घणसोली मार्केट गाळे | ०३ |
| सावित्रीबाई फुले मंडई, विष्णूनगर दिघा मार्केट गाळे | ०७ |
| **दुकान/गाळे एकूण** | **१०९** |

महापालिका मालकीचे मार्केट/मंडई/बाजार इत्यादी मधील गाळे वाटप महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम ७९ प्रमाणे विहीत निविदा पध्दतीने देकारात जास्तीत जास्त देकार नमूद करणाऱ्या व्यक्ती/संस्थांना वाटप करण्यात येतात. व्यवसायिक जागांच्या वितरणामध्ये गाळे राखून ठेवणेबाबत तरतूद असल्यास तसे शासन निर्णय अथवा शासन परिपत्रक उपलब्ध करून देणे बाबत सामान्य प्रशासन विभाग, व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय, मुंबई ३२ यांना दिनांक ०४/०३/२०१३ रोजीच्या पत्रान्वये विनंती करण्यात आलेली आहे. मात्र, अद्यापपर्यंत याबाबत मार्गदर्शन प्राप्त झालेले नाही. तथापि, सदर निविदा प्रक्रियेमध्ये महिलांसाठी

३० टक्के अग्रक्रम देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. निविदा प्रक्रियेमध्ये महिलांना ३० टक्के प्रथम प्राधान्य दिले जाते. तसेच महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम ७९ (ड) प्रमाणे महापालिकेच्या कोणत्याही मालमत्तेसाठी चालु बाजार मुल्यापेक्षा कमी दर आकारण्याची किंवा सवलत देण्याची तरतूद नाही.

| **ठिकाण** | **तपशिल** |
|---|---|
| भारतरत्न स्व. राजीव गांधी क्रिडा संकुल से. ३ अे, बेलापूर दुकान/गाळे | १० |
| घणसोली येथील मासळी मार्केटमध्ये गाळे | ०५ |
| करावे, सेक्टर -४४ येथील भूखंड क्र.१६० मध्ये एकूण | ०२ |
| भूखंड क्र.७१,७२ आणि ७३, से.११ सीबीडी किऑक्स (kiosk) | ०३ |
| **एकूण** | **२०** |

उपरोक्त नमूद मार्केटमध्ये महिलांना एकूण - २० गाळे वितरीत करण्यात आलेले आहेत. अद्याप पर्यंत महानगरपालिकेमध्ये महिलांसाठी असलेल्या योजनांमध्ये मुल्यांकण करणेत आलेले नाही.

महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना जनसामान्यांपर्यंत पोहचविणेच्या दृष्टीने महानगरपालिकेने सन २००६ पासून समाज विकास विभागाची स्थापना केलेली आहे. सदर विभागामार्फत महिला व बालकल्याण, समाज कल्याण, झोपडपट्टी सुधार समिती अंतर्गत विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना राबविल्या जातात. विविध योजनांची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहचविण्याकरीता विभाग निहाय समुहसंघटकांची नेमणूक करण्यात आली असून सदर समुहसंघटकांमार्फत विभाग क्षेत्रात योजनांबद्दलची माहिती पोहचविण्यात येते. तसेच आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस विविध कल्याणकारी योजनांची प्रसिध्दी स्थानिक वृत्तपत्राद्वारे केली जाते. तसेच योजनांचे माहितीपत्रक छपाईकरून स्थानिक नगरसेवक, पदाधिकारी, संस्था, महिला मंडळे, महिला बचत गट यांना वितरीत करणेत येतात व समुह संघटकामार्फत वेळोवेळी कार्यक्षेत्रात बैठका घेण्यात येतात. यामध्ये राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचे मार्गदर्शन समाजसेवक, सहा. आयुक्त किंवा उप आयुक्त त्याबाबत स्वत: माहिती देतात. तसेच स्थानिक नगरसेवक पदाधिकारी यांचे मार्फत विभागातील विविध कार्यक्रम अंतर्गत ज्या ठिकाणी महिलांचे कार्यक्रम असतात त्या ठिकाणी समुह संघटकामार्फत योजनांची प्रसिध्दी

करणेत येते. या व्यतिरीक्त विभागाअंतर्गत कार्यरत असलेल्या लिंक वर्कर मार्फत देखील योजनांची माहिती घरोघरी पोहचविण्यात येते.

महानगरपालिकेमार्फत महिलांच्या कल्याणाकरीता राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजना व सोयी सवलती याकरीता महानगरपालिकेस केंद्र/राज्य शासनाकडून वेगळे अनुदान प्राप्त होत नाही.

महिला व बालकल्याण अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांमध्ये महिला बचत गट सक्षमीकरणाकरीता तसेच व्यवसाय करत असलेल्या महिला बचत गटात अर्थसहाय्य देण्यात येते. सदर योजने अंतर्गत देण्यात येणाऱ्या लाभाचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| **अ. क्र.** | **कालावधी (वर्ष)** | **अनुदान (रु.)** |
|---|---|---|
| १ | ०२ | ५०००/- |
| २ | ०३ | १००००/- |
| ३ | ०५ | १५०००/- |

सन २०१२-२०१३ ते २०१४-२०१५ या वर्षात उक्त योजने अंतर्गत दिलेल्या लाभाचा तपशिल परिशिष्ट "क" वर जोडलेला आहे.

महापालिकेने महिला नगरसेविकांसाठी वेगळा कक्ष महापालिका मुख्यालय येथे ५ व्या मजल्यावर देण्यात आलेला असून महिला कर्मचाऱ्यासाठी तळ मजला येथील उपहारगृहाच्या बाजूला स्वतंत्र कक्ष देण्यात आलेला आहे.

**नवी मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्त यांची साक्ष :-**

नवी मुंबई महानगरपालिकेला मंगळवार, दिनांक २८ ऑक्टोबर, २०१५ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी आयुक्त यांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने महानगरपालिकेमार्फत महिलांच्या आरोग्यविषयक योजना राबविल्या जातात काय ? अशी विचारणा केली.

त्यावर जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी महानगरपालिकेमार्फत जननी सुरक्षा योजना, जननी शिशू सुरक्षा योजना, कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया इत्यादी योजना राबविल्या जातात. जननी सुरक्षा योजने अंतर्गत प्रसुती झाल्यानंतर लाभार्थी महिलेला ६००/- रुपये दिले जातात.

समितीने बेलापूर येथे मॅटर्निटी होमची इमारत बांधून तयार आहे. परंतु, अद्याप हॉस्पिटल सुरु झालेले नाही. महानगरपालिकेमार्फत महिलांसाठी कोणत्या योजना राबविल्या जातात ? अशी विचारणा केली.

त्यावर जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी जे रुग्ण हॉस्पिटलमध्ये येतात त्यांना आरोग्य सेवा पुरविली जाते. तसेच, एएनएम, सपोर्ट ग्रुपचे लोक फिल्डवर जाऊन लोकांना योजनांची माहिती देतात. नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत चांगल्या प्रकारे आरोग्य सेवा दिली जाते. शासनाच्या रँकिंगमध्ये नवी मुंबई महानगरपालिका तिसऱ्या क्रमांकावर आहे. लोकांना योजनांची माहिती कशी होईल, जास्तीत जास्त लोकांना योजनांचा लाभ कसा मिळेल यासाठी प्रयत्न करतो. उत्तर प्रदेश, बिहार राज्यातून आलेल्या महिलांची प्रसुती घरीच व्हावयास पाहिजे, असा त्यांचा समज असतो. परंतु, अजुनही अर्धा ते एक टक्का महिलांची प्रसुती घरीच होते. त्यांनी प्रसुतीसाठी रुग्णालयात यावे यासाठी फॉलोअप करीत असतो आणि त्यांच्याकडून चांगले सहकार्य मिळत आहे. तसेच महानगरपालिकेच्या रुग्णालयात गायनॉकॉलॉजिस्ट, पेडियाट्रिक असोसिएशन आहे. हायरीस्क पेशन्ट असतील तर त्यांना प्रत्येक वेळी हॉस्पिटलमध्ये येऊन स्त्री रोग तज्ज्ञांकडून तपासणी करुन घेणे शक्य होत नाही. त्यासाठी २१ आरोग्य केंद्रात महिन्यातून एकदा शिबीर आयोजित करतो आणि हायरीस्क रुग्णांना तेथे बोलावून त्यांची स्त्री रोग तज्ज्ञांकडून तपासणी करुन घेतो.

समितीने महानगरपालिकेची ३ ते ४ हॉस्पिटल्स् बांधून तयार आहेत. परंतु, ती अद्याप सुरु झालेली नाहीत, हे खरे आहे काय ? अशी विचारणा केली.

त्यावर जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी ऐरोली येथील हॉस्पिटलमध्ये मागील १ महिन्यापासून माता आणि मुलांसाठी ओपीडी सुरु केलेली आहे. नेरुळ हॉस्पिटलमधील ऑपरेशन थिएटरचा स्टाफ नियुक्त होण्याची वाट बघत आहोत. तेथे दोन-चार दिवसात गायनॉकॉलॉजिस्ट व पेडियाट्रिक विन्डो फॅसिलिटी सुरु करीत आहोत. माता व मुलांना बेसिक आरोग्य सेवा लवकर मिळावी यासाठी प्रयत्न करीत आहोत. असे समितीस सांगितले.

समितीने कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया कार्यक्रम राबविण्यासाठी कोणते प्रयत्न केले जातात ? अशी विचारणा केली.

त्यावर जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी प्रत्येक महिन्याला कॅम्प आयोजित करुन गरोदर माता व मुलांच्या आरोग्याची तपासणी केली जाते. सपोर्ट ग्रुपचे लोक आणि एएनएम यांच्याकडे गरोदर माता व मुलांची यादी असते. गरोदर माता व मुलांना कॅम्पमध्ये बोलाविले जाते आणि त्यांच्या आरोग्याची तपासणी व लसीकरण केले जाते. तसेच, शासनाच्या कोणत्या योजना आहेत, आरोग्याची काळजी कशी घ्यावी याबाबत देखील माहिती दिली जाते. कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेचे जे उद्दिष्ट आहे ते पूर्ण केले जाते.असे समितीस सांगितले.

समितीने कॅम्प घेतल्याचे फक्त कागदोपत्री दाखविले जाते का खरोखर कॅम्प आयोजित केले जातात काय ? अशी विचारणा केली.

त्यावर जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी कॅम्प आयोजित केले जातात. कॅम्प घराच्या जवळ असल्यामुळे जास्तीत जास्त माता व मुले तेथे बेनिफिट घेतात. असे समितीस सांगितले.

समितीने नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात कुपोषित मुले आहेत काय ? अशी विचारणा केली.

त्यावर जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी ४ टीम आहेत. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत ते सर्व शाळांची तपासणी करतात. काही प्रमाणात सॅम, मॅमची मुले आहेत. ते कशा प्रकारे अपग्रेड होतील यासाठी प्रयत्न करीत असतो. असे समितीस सांगितले.

समितीने मुलांना सकस आहार दिला जातो काय ? अशी विचारणा केली.

त्यावर जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी अंगणवाडी मार्फत मुलांना सकस आहार दिला जातो. असे समितीस सांगितले.

समितीने नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात मुलींचा जन्म दर किती आहे ? तसेच, सर्व्हायकल कॅन्सरचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. आरोग्य विभागामार्फत ४-६ महिन्यांनी मेमोग्राफी व पेप्सीम टेस्ट करण्यासाठी कॅम्प आयोजित केले जातात काय ? प्रत्येक नगरसेवकांच्या वॉर्डात असे कॅम्प आयोजित केले तर फर्स्ट स्टेज असलेल्या कॅन्सर रुग्णांचे प्राण वाचवू शकतो. अशी विचारणा केली.

त्यावर जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी मागील वर्षी सेक्स रेश्यो ॲट बर्थ ९३० होता. आता प्रत्येक महिन्याला मॉनिटर करीत आहोत. मागील महिन्यात तो ९५५ होता. स्त्रीभ्रूण हत्या रोखण्यासाठी प्रयत्न करीत आहोत. तसेच, कॅन्सरच्या बाबतीत टाटा इन्स्टीट्यूट बरोबर चर्चा करुन सर्व्हायकल कॅन्सरचे रुग्ण किती आहेत याची माहिती घेत आहोत. असे समितीस सांगितले.

समितीने मेमोग्राफी व पेप्सीन टेस्ट करण्यासाठी कॅम्प घेतलेले आहेत काय ? अशी विचारणा केली.

त्यावर जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी नाही असे समितीस सांगण्यात आले.

त्यावर समितीने आरोग्य विभागामार्फत जनजागृती करण्यासाठी असे कॅम्प आयोजित करावेत. प्रथम स्टाफ पासून सुरुवात करावी. कारण, विभागामध्ये कॅम्प आयोजित केले त्यावेळी काही शासकीय महिला कर्मचाऱ्यांना थर्ड स्टेज कॅन्सर असल्याचे डिटेक्ट झाले. मेडिक्लेम पॉलिसी काढताना ईसीजी काढला जातो त्याप्रमाणे मेमोग्राफी आणि पेप्सीम टेस्ट करणे बंधनकारक करावे. नवी मुंबई महानगरपालिकेचे काम चांगले आहे. आता नवी मुंबईचा स्मार्ट सिटीमध्ये समावेश झालेला आहे. आरोग्य विभागामार्फत असे कॅम्प आयोजित करावेत आणि जनजागृती देखील करावी. अशा प्रकारच्या सूचना समतीने दिल्या.

समितीने बेटी बचाओ, बेटी पढाओ ही योजना राबविण्यासाठी कोणते प्रयत्न केले जातात ? अशी विचारणा केली.

त्यावर जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी शासनाच्या गाईडलाईन्स प्रमाणे या योजनेसाठी त्यांच्या स्तरावर मॉनिटरींग करतो. असे समितीस सांगितले.

समितीने अनेक ठिकाणी स्टिंग ऑपरेशन्स केली जातात. सेक्स रेश्यो अ‍ॅट बर्थ ९३० वरुन ९५५ इतका झालेला आहे. मुलींची संख्या वाढत असेल तर ती चांगली गोष्ट आहे. सोनोग्राफी, रेडिऑलॉजी, गायनॉकॉलॉजी विभागांकडे देखील लक्ष देण्याची आवश्यकता आहे. असे सूचित केले.

समितीने कॅन्सर रुग्णासाठी टाटा हॉस्पिटलच्या धर्तीवर नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात रुग्णालय सुरु करण्याची आवश्यकता आहे. महानगरपालिकेने रिसर्च व ट्रिटमेंट इन्स्टिट्यूट सुरु करण्याची इच्छा प्रदर्शित केल्यास समितीच्या माध्यमातून मदत करण्यात येईल. महानगरपालिका क्षेत्रात अशा प्रकारचे रुग्णालय सुरु केले तर लोकांना कमी पैशामध्ये उपचार मिळतील व त्यांचा खूप फायदा होईल, त्यांना उपचारासाठी मुंबईमध्ये जाण्याची आवश्यकता भासणार नाही. अशा सूचना केल्या.

समितीने शाळेमध्ये मुली व महिलांसाठी टॉयलेट नाही, त्यांना रोड क्रॉस करुन दुसऱ्या शाळेतील टॉयलेटमध्ये जावे लागते. रस्ता क्रॉस करताना काही अपघातासारखी दुर्घटना घडली तर त्याची जिम्मेदारी महानगरपालिकेची राहील, ही बाब लक्षात घेणे आवश्यक आहे. शाळेच्या प्रत्येक इमारतीमध्ये टॉयलेट असणे बंधनकारक आहे. टॉयलेट संबंधी स्वच्छ भारत अभियानांतर्गत केंद्र शासनाने सूचना दिलेल्या आहेत. नवी मुंबई क्षेत्रातील हायवेवर टॉयलेट उभारण्याची आवश्यकता आहे. डायबिटीज् रुग्णांनी दर एक तासाला टॉयलेटला जाणे आवश्यक असते, त्यांच्याकरिता महानगरपालिका क्षेत्रातील हायवेवर टॉयलेट उभारण्याची आवश्यकता आहे.अशी विचारणा केली.

त्यावर आयुक्त यांनी ई-टॉयलेट ही नवीन संकल्पना आहे. महानगरपालिकेने ठाणे-बेलापूर आणि पाम बीच रोड येथे १५ ई-टॉयलेट मंजूर केले असून त्यापैकी ७ ई-टॉयलेट सुरु करण्यात आले आहेत. तसेच, महानगरपालिकेच्या कार्यालयासमोर देखील एक ई-टॉयलेट उभारण्यात आले आहे. महानगरपालिकेमार्फत ई-टॉयलेटचे मॉडिफिकेशन करुन शी-टॉयलेटमध्ये रुपांतर करण्यात येणार असून त्यामध्ये सॅनिटरी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. सी.एस.आर.च्या माध्यमातून रिलायन्स कंपनीने २५ ई-टॉयलेट उपलब्ध करुन देण्याचे मान्य केले असून ते लवकरात लवकर महामार्गावर बसविण्यात येतील. असे समितीस सांगितले.

समितीने हायवेवर महिलांसाठी किती स्वच्छता गृहांचा अंतर्भाव करण्यात येणार आहे ? अशी विचारणा केली.

त्यावर उपायुक्त यांनी हायवेवर उभारावयाच्या टॉयलेटबाबत एक सर्व्हे करुन १३० जागा निवडल्या आहेत त्यामध्ये महिलांसाठी २५ ई-टॉयलेट उभारण्यात येतील. हायवेची जागा ही सिडकोची आहे व तेथे टॉयलेट बसविण्यासाठी त्यांची परवानगी घेण्यात येत आहे. सायन-पनवेल हा मार्ग पीपीपी तत्वावर तयार करण्यात आला असून तो खाजगी कंपनीच्या ताब्यात आहे, त्यामुळे ते जागा देत नाही. सदरील काम सार्वजनिक बांधकाम विभागाने पीपीपी तत्वावर करुन घेतले आहे.

समितीने हायवेवर महिलांसाठी टॉयलेटचा विषय गंभीर आहे, त्यामुळे महानगरपालिकेने त्याबाबत प्राधान्याने उपाय योजना कराव्यात. अशी सूचना समितीने केली.

समितीने महानगरपालिकेने महसूली खर्च व वेतनावरील खर्च वगळून एकूण अंदाजपत्रकाच्या ५ टक्के तरतूद महिला व बालकल्याण विभागाच्या योजनाकरिता केली आहे काय, असल्यास किती केली ? अशी विचारणा केली.

त्यावर आयुक्त यांनी महानगरपालिकेने सन २०१२-१३ मध्ये महिला व बालकल्याण विभागाच्या योजनांकरिता १८.६५ कोटी रुपये तरतूद केली होती. असे समितीस सांगितले.

समितीने महानगरपालिकेने १८ कोटी रुपये तरतूदी पैकी केवळ १ कोटी रुपये का खर्च केले, सर्व निधी का खर्च करण्यात आला नाही ? अशी विचारणा केली.

त्यावर आयुक्त यांनी अंदाजपत्रकीय रकमेच्या ५ टक्के निधी महिला व बालकल्याण विभागासाठी राखून ठेवण्यात आला नाही. अंदाजपत्रकीय रक्कम २१९९ कोटी रुपयापैकी टेन्टेटिव्ह पुरतीच रक्कम कागदोपत्री दाखविण्यात आलेली असते कारण ॲक्च्यूअल रेव्हेन्यूमध्ये बरीच तफावत आहे. अंदाजपत्रकीय रक्कम २१९९ कोटी रुपये असली तरी जवळपास १४००-१५०० कोटी रुपया दरम्यान अंदाजपत्रक असते. असे समितीस सांगितले.

समितीने महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकातून महसूली व वेतनावरील खर्च वगळून एकूण अंदाजपत्रकीय तरतूदीतून १८.६५ कोटी रुपये महिला व बालकल्याण विभागासाठी तरतूद केली, अशी माहिती आपण दिली आहे. महिला व बालकल्याण विभागाच्या योजनावर महानगरपालिकेने तरतूद केलेल्या रक्कमेच्या १० टक्के रक्कम देखील खर्च केली नाही, उर्वरित निधी महानगरपालिकेने कोणत्या योजनावर खर्च केला आहे ? अशी विचारणा केली.

त्यावर आयुक्त यांनी महिला व बालकल्याण योजनेवरील निधी खर्च झाला नाही तर तो दुसऱ्या योजनेकरिता वळविण्यात येतो.असे समितीस सांगितले.

समितीने महिलांच्या कल्याणाकारी योजनेसाठी निधी खर्च करावयास पाहिजे. महिलांसाठी टॉयलेट, जीम, आरोग्य शिबीर, अंगणवाडी, महिलांना प्रशिक्षण देणे या योजनांवर निधी खर्च करावयास पाहिजे होता. सदरील योजनावर खर्च न करता महिला व बालकल्याण विभागाचा निधी कोणत्या योजनेसाठी वळविण्यात आला ? अशी विचारणा केली.

त्यावर आयुक्त यांनी एक कोटी रुपये खर्च केलेला निधी हा महिला व बालकल्याण विभागाच्या योजनेवर खर्च करण्यात आलेला आहे. महिलांच्या इतर योजनावर करण्यात आलेला खर्च त्यामध्ये दाखविण्यात आला नाही. असे समितीस सांगितले.

समितीने महिला व बालकल्याण विभागासाठी महापालिकेने महसुली व वेतनावरील खर्च वगळून एकूण २१९९ कोटी रुपये अंदाजपत्रकीय रकमेतून १८ कोटी रुपये तरतूद केली आहे. सदर तरतूद ही २१९९ कोटी रुपयाच्या ५ टक्के आहे की त्यापेक्षा अधिक आहे ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्य लेखाधिकारी यांनी महापालिकेने महसूली व वेतनावरील खर्च वगळून सन २०१२-१३ च्या एकूण २१९९ कोटी रुपये अंदाजपत्रकीय रकमेतून १८ कोटी रुपये तरतूद केली असून ती एकूणच्या ५ टक्क्या प्रमाणे नाही. ती आवश्यकतेप्रमाणे आहे. असे समितीस सांगितले.

समितीने सन २०१२-१३ मध्ये १.८ कोटी रुपये सन २०१३-१४ मध्ये ३.३४ कोटी रुपये आणि सन २०१४-१५ मध्ये २.५९ कोटी रुपये खर्च झालेले आहेत. महिला व बाल कल्याण विभागासाठी ५ टक्के प्रमाणे जी तरतूद करण्यात आली होती त्यापेक्षा कमी निधी खर्च झालेला आहे. मग उर्वरीत निधी कोठे खर्च करण्यात आला ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्य लेखाधिकारी यांनी संबंधित विभागाने आर्थिक वर्षात निधी खर्च केला नाही तर तो निधी लॅप्स होतो. असे समितीस सांगितले.

समितीने नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात गरीब, कष्टकरी महिला नाहीत काय ? महिला व बाल कल्याणसाठी जी तरतूद करण्यात आली होती तो निधी का खर्च झाला नाही ? अशी विचारणा केली.

त्यावर आयुक्त यांनी निराधार, विधवा, परितक्त्या महिलांच्या मुलींचे विवाहाकरिता अर्थसहाय्य देणे, सर्वसाधारण गटातील गरजू, बेरोजगार, सुशिक्षित महिला व मुलींना व्यावसायिक प्रशिक्षण देणे इत्यादी योजना राबविल्या जातात. असे समितीस सांगितले.

समितीने सन २०१२-१३ मध्ये नोंदणीकृत महिला मंडळ संस्थांना उपकरणे व साहित्य वितरण करण्यासाठी १५ लाख रुपये तरतूद करण्यात आली होती. यापैकी फक्त १० लाख रुपये खर्च झालेले आहेत. १० लाख रुपयांमध्ये किती उपकरणे येतात ? एक घरघंटी घ्यावयाची म्हटले तर १५ ते २० हजार रुपये खर्च होतात. मुंबई महानगरपालिकेत १ लाख रुपये उत्पन्न मर्यादा आहे. नवी मुंबई महानगरपालिकेत २ लाख ४० हजार उपये उत्पन्न मर्यादा आहे. आपल्याला लाभार्थी मिळत नाहीत काय ? मग समूह संघटक काय करतात ? अशी विचारणा केली.

त्यावर उपायुक्त यांयनी २० समूह संघटक आहेत. सन २०१२-१३, २०१३-१४ आणि २०१४-१५ मध्ये महिलांच्या कल्याणकारी योजनांवर जो खर्च करण्यात आलेला आहे तो

तरतुदीपेक्षा अतिशय कमी आहे, हे मान्य आहे. खर्च कमी होण्याचे कारण असे आहे की, लाभार्थ्यांना जातीचा दाखला सादर करणे बंधनकारक आहे. लाभार्थ्यांना बहुतेकवेळा जातीचा दाखला मिळत नाही. महिला व बाल कल्याण अंतर्गत ज्या योजना राबविल्या जातात त्यासाठी लाभार्थ्यांकडून अर्ज मागविले जातात. त्या अर्जामध्ये बऱ्याच त्रुटी असतात. पहिली अट अशी आहे की, लाभार्थी ३ वर्षापासून नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात राहत असला पाहिजे. बहुतांश गरीब लोकांकडे वास्तव्याचा पुरावा नसतो. गरीब लोक भाडेतत्वावर घर घेऊन वास्तव्य करीत असतात. जे गरीब लोक भाडेतत्वावर राहतात त्यांच्याकडे किमान भाडेकरार असला पाहिजे. असे समितीस सांगितले.

समितीने शासन निर्णयानुसार महानगरपालिकेने महसुली व आस्थापना खर्च वगळून एकूण अंदाजपत्रकाच्या ५ टक्के निधी महिलांच्या कल्याणकारी योजनांसाठी राखून ठेवणे बंधनकारक आहे. अंदाजपत्रकात अशी तरतूद केली होती काय ? तत्कालीन कॅफो यांनी या संदर्भात कार्यवाही का केली नाही. अशी विचारणा केली.

त्यावर उपायुक्त यांनी एकूण बजेटच्या ५ टक्के तरतूद करावी, असे आम्ही कॅफो यांच्याकडे पत्र दिलेले आहे. एकूण अंदाजपत्रकाच्या ५ टक्के निधी महिला व बाल कल्याणसाठी राखून ठेवण्यात आलेला नाही आणि खर्च देखील कमी झालेला आहे. महिला व बाल कल्याणसाठी ५ टक्के निधी राखून ठेवण्यात येईल याची यापुढे दक्षता घेऊ. असे समितीस सांगितले.

समितीने एकूण बजेटच्या ५ टक्के निधी महिला व बाल कल्याणसाठी मिळणार आहे, याची कल्पना होती. उपायुक्त म्हणून सदर निधीतून कोणत्या योजना राबविण्याचे ठरविले होते ? अशी विचारणा केली.

त्यावर उपायुक्त यांनी वर्षानुवर्षे गरीब महिलांना पापड, शेवया बनविण्याचे मशीन देत आहोत. गरीब लोकांना त्याच त्याच मशीन देण्यापेक्षा ज्या वस्तूंची त्यांना आवश्यकता आहे त्या वस्तू दिल्या पाहिजेत. त्यासाठी त्यांनी अर्ज करावा आणि बँकेकडून त्यांचे प्रपोजल मंजूर करुन त्यांना अनुदान द्यावे, असे ठरविले होते. असे समितीस सांगितले.

समितीने ९३० कुटुंबांना विविध योजनांचा लाभ देता आला असता. लाभार्थ्यांकडे रेकॉर्ड असताना त्यांना योजनांचा लाभ का दिला नाही ? मग त्यांच्यावर कारवाई का करु नये ? नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात बीपीएल कार्डधारक कुटुंबांची संख्या फक्त २५० इतकीच आहे काय ? अशी विचारणा केली.

त्यावर उपायुक्त यांनी सन १९९९ च्या जनगणनेनुसार ९३० बीपीएल कार्डधारक आहेत. परंतु, आजमितीस महानगरपालिकेकडे फक्त २५० ते २६० बीपीएल कार्डधारक आहेत. असे समितीस सांगितले.

समितीने महिला व बाल कल्याण विभाग आणि समाज कल्याण विभाग हे दोन्ही विभाग वेगळे आहेत. समाज कल्याण विभागामार्फत दलित, आदिवासी, एस.सी., एस.टी. प्रवर्गातील लाभार्थ्यांना योजनांचा लाभ दिला जातो. महानगरपालिकेने शासन निर्णयानुसार एकूण बजेटच्या ५ टक्के निधी महिला व बाल कल्याणसाठी राखून ठेवावयास पाहिजे. त्या प्रमाणे तरतूद केलेली नाही हे मान्य केलेले आहे. महिला व बाल कल्याण आणि समाज कल्याण विभाग हे दोन्ही विभाग वेगळे आहेत. अशी माहिती समितीने दिली.

त्यावर आयुक्त यांनी समाज कल्याण विभागाला योजना विभाग असेही म्हणतो. एस.सी, एस.टी., महिला व बाल कल्याणच्या योजना याच विभागाच्या अंतर्गत राबवितो. मात्र समाज कल्याण विभाग आणि महिला व बाल कल्याण समिती वेगळी आहे. मागील तिन्ही वर्षात एकूण बजेटच्या ५ टक्के तरतूद करण्यात आलेली नाही, ही वस्तुस्थिती आहे. तसेच, जेवढी तरतूद करण्यात येईल ती खर्च होईल याचीही काळजी घेऊ. महिला अधिकारी असल्यामुळे महिलांच्या कल्याणकारी योजना सक्षमपणे राबवितील. अतिरिक्त आयुक्तांकडे देखील हा चार्ज दिलेला आहे. या सर्व योजनांचा आढावा घेण्यासाठी अतिरिक्त आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करतो. योजना प्रभावीपणे कशा राबविता येतील याचा अभ्यास करु. असे समितीस सांगितले.

समितीने महानगरपालिकेने महिलांना किती गाळ्यांचे वाटप केलेले आहे ? ७५ गाळ्यांचे वाटप कशा प्रकारे करण्यात आलेले आहे ? अशी विचारणा केली.

त्यावर अतिरिक्त आयुक्त यांनी महानगरपालिकेच्या मालकीचे एकूण १०९ गाळे असून ७५ गाळ्यांचे वाटप करण्यात आले आहे. यापैकी महिलांना २० गाळ्यांचे वाटप करण्यात आले आहे. महिलांना ३० टक्क्यापेक्षा जास्त गाळ्यांचे वाटप करण्यात आले आहे. गाळे तयार आहेत. परंतु, प्रतिसाद न मिळाल्यामुळे काही गाळ्यांचे वाटप झालेले नाही, ही वस्तुस्थिती आहे. महानगरपालिकेने जेवढ्या बचत गटांना अर्थसहाय्य दिलेले आहे त्यांना प्राधान्याने गाळे देण्याचे धोरण आम्ही ठरविले आहे.

तसेच बेलापूर येथे राजीव गांधी क्रीडा संकुल आहे. श्रीमती कमलाबाई माधव खैरनार यांना गाळा क्र.३ चे वाटप करण्यात आले आहे. श्रीमती तृप्ती अरोरा यांना गाळा क्र.४ चे वाटप करण्यात आले आहे. श्रीमती राणी विष्णू जाधव यांना गाळा क्र.७ चे वाटप करण्यात आले आहे.

समितीने योजना राबवू नये, असे माननीय सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आहेत काय ? १३ कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च केले, सदरील खर्च कोणाच्या आदेशाने करण्यात आला ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी माननीय उच्च न्यायालयाने आदेश दिले होते त्यास माननीय सर्वोच्च न्यायालयामध्ये आव्हान दिले होते व सदर प्रकरणी स्टे देण्यात आला होता. महिला व बालकल्याण समिती स्थापन करण्यात आली नसेल तर त्याबाबतचे सर्व अधिकार महासभेकडे असतात व महासभेच्या मान्यतेने सदरील खर्च करण्यात आला आहे. असे समितीस सांगितले.

समितीने देशात, परदेशात प्रशिक्षण योजनेवर २५,००० रुपये खर्च केला आहे, सदर योजनेवर एवढा कमी खर्च का करण्यात आला, सदर प्रशिक्षण कोठे देण्यात आले होते काय ? अशी विचारणा केली.

विभागीय अधिकारी यांनी देशात, परदेशात प्रशिक्षण योजनेकरिता सन २०१२-१३ मध्ये एकच लाभार्थी प्राप्त असून सदर योजनेवर २५,००० रुपये खर्च करण्यात आला आहे.असे समितीस सांगितले.

शासन निर्णयाप्रमाणे महिला व बालकल्याण समिती कार्यक्रमाच्या माध्यमातून महानगरपालिकेने खर्च केला नाही, असे दिसून येते.असे समितीचे मत आहे.

समितीने प्राथमिक शिक्षण विभागाकडील विद्यार्थ्यांसाठी विविध योजनावर ०.८७ लाख रुपये खर्च दाखविण्यात आला आहे, तो शिक्षण विभागाच्या योजनेतून केला आहे काय ? अशी विचारणा केली.

त्यावर अतिरिक्त आयुक्त यांनी सदरील खर्च महिला व बालकल्याण विभागाच्या योजनेतून केला आहे. असे समितीस सांगितले.

समितीने प्राथमिक शिक्षण विभागातील विद्यार्थ्यांसाठीच्या विविध योजनेवर १३.४१ कोटी रुपये खर्च कशा प्रकारे केला आहे, त्यामध्ये कोणत्या योजनांचा समावेश आहे ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी शिक्षण विभागाकडून कल्याणकारी योजनावर खर्च करण्यात आला असून सर्व योजना आयुक्त महोदयांच्या मान्यतेने समाज विकास विभागाकडे वर्ग करण्यात आल्या होत्या. त्यानुसार विद्यार्थीनींना वॉटर बॅग, पुस्तके, शाळेतील साहित्य इत्यादी योजना राबविण्यात आल्या होत्या. असे समितीस सांगितले.

समितीने महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागाच्या योजनावर सन २०१३-१४ मध्ये २०.२५ कोटी रुपये खर्च केला आहे, त्यामध्ये सदर शासन निर्णयातील योजनांवर खर्च करण्यात आला आहे काय, असल्यास कोणत्या योजनावर खर्च केला आहे ? अशी विचारणा केली.

त्यावर अतिरिक्त आयुक्त यांनी सदर प्रकरणी सविस्तर माहिती सादर करण्यात येईल. महानगरपालिकेने पौष्टिक आहार योजनेवर निधी खर्च केला आहे. असे समितीस सांगितले.

समितीने महिला व बालकल्याण विभागाचा निधी कोणाच्या मान्यतेने खर्च केला आहे ? अशी विचारणा केली.

त्यावर अतिरिक्त आयुक्त यांनी महिला व बालकल्याण समिती सन २०१२ ते २०१४ या कालावधीमध्ये स्थापन करण्यात आली नव्हती, त्यामुळे सदर कालावधीमध्ये महासभेच्या मान्यतेने महिला व बालकल्याण विभागाचा निधी खर्च करण्यात आला आहे. असे समितीस सांगितले.

समितीने महानगरपालिकेच्या शाळेतील शिक्षणाचा दर्जा चांगला असला पाहिजे. महानगरपालिकेच्या शाळांमध्ये इंग्रजी माध्यमाचे शिक्षण मिळाले पाहिजे. तसेच मुले शाळाबाह्य राहू नयेत यासाठी कोणते प्रयत्न केले जातात ? अशी विचारणा केली.

त्यावर उपायुक्त यांनी महानगरपालिकेच्या एकूण ६८ शाळा आहेत. महानगरपालिकेच्या शाळेतील पटसंख्या दरवर्षी वाढत आहे. शिक्षण विभागाचा ७१५ शिक्षकांच्या पद मंजुरीचा प्रस्ताव आहे. सीईटी मार्फत शिक्षक पाठविले आहेत. महानगरपालिकेच्या इयत्ता ९ वी व १० वीच्या १७ शाळा आहेत आणि शाळांचा निकाल ९५ टक्के आहे. महानगरपालिकेच्या शाळेत शिक्षण घेतलेले ४-५ विद्यार्थी व्हीजेटीआय सारख्या संस्थांमध्ये डिप्लोमा कोर्स करीत आहेत. ५-६ शाळांचा १०० टक्के निकाल लागतो आणि इतर शाळांचा ९७-९८ टक्के निकाल लागतो. मॉडरेटर्स मार्फत इयत्ता १० वी तील विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देतो. ज्या प्रमाणे शाळेतील पटसंख्या वाढत आहे त्या प्रमाणे शिक्षकांची संख्या देखील वाढत आहे. ठाणे जिल्ह्यातील सरप्लस शिक्षक पाठविले जातात. महानगरपालिकेने २ इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरु केलेल्या आहेत. महानगरपालिकेच्या सर्व शाळा सेमी इंग्रजी माध्यमाच्या आहेत. तसेच, इयत्ता १ ली पासून गणित विषय इंग्रजीमध्ये शिकविला जातो. पूर्वी बालवाड्या वेगळ्या होत्या. परंतु, आम्ही बालवाड्या हा देखील शाळेचा भाग केलेला आहे. किती मुले बालवाडीमध्ये जातात आणि किती मुले शाळेत प्रवेश घेतात याचे आम्ही स्टॅटेस्टिक घेतो. प्राथमिक शाळेतील एकूण विद्यार्थी संख्या ३०,८८७ इतकी आहे. यापैकी १४,९४४ मुली आणि १५,९४३ मुले आहेत. शाळेत मुलींची संख्या जास्त आहे. तसेच, ज्यावेळी विद्यार्थी शाळा सोडल्याचा दाखला मागतात त्यावेळी तो मुलगा कोणत्या शाळेत प्रवेश घेतो हे बघितले जाते. ड्रॉप आऊटचे प्रमाण कमी आहे. विद्यार्थी अभ्यासात कमजोर असतील तर त्यांना शाळेच्या माध्यमातून विशेष शिक्षण दिले जाते. तसेच मध्यंतरी शाळाबाह्य मुलांचा सर्व्हे केला होता. त्यावेळी १,०९७ मुले आढळून आली होती. सेवाभावी संस्थांच्या माध्यमातून झोपडपट्टीत शाळा सुरु केलेल्या आहेत. शहरात सिग्नल जवळ मुले भीक मागतात. त्यांना जवळच्या शाळेत घेऊन जातो, त्यांना कपडे देतो आणि शाळेत बसवून शिक्षण देतो. वाशी, सायन-पनवेल रोडवरील सिग्नल जवळ भीक मागणाऱ्या विद्यार्थ्यांना पिकअप करुन जवळच्या शाळेत पाठवितो.

समितीने गाळे वाटप करण्यात आलेल्या लाभार्थ्यांचे रेकॉर्ड बघितले लाभार्थ्याने उत्पन्नाचा दाखल सादर करणे बंधनकारक आहे. फाईलमध्ये इतर लाभार्थ्यांचे उत्पन्नाचे दाखले आहेत. परंतु श्रीमती तृप्ती अरोरा यांचा उत्पन्नाचा दाखला नाही. ज्यांनी गाळ्यांचे वाटप केलेले आहे त्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी.

त्यावर आयुक्त यांनी उपायुक्त (मालमत्ता) यांचे मार्फत आपण जनरल बॉडी समोर प्रस्ताव सादर करतो आणि तो मंजूर करुन घेतो.

**मंगळवार, दिनांक २८ ऑक्टोबर, २०१५ रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने समितीला आश्वासित केलेली माहिती :—**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या ऐराली व नेरूळ रूग्णालयातील सर्व बाह्यरूग्ण विभाग सुरू करण्यात आलेली आहेत. माता बाल रूग्णालय बेलापूर येथे स्त्रीरोग, बालरोग आणि जनरल ओ.पी.डी. सेवा सुरू करण्यात आलेली आहे. सार्वजनिक रुग्णालय ऐरोली व नेरूळ येथील स्त्रीरोग व बालरोग आंतररूग्ण विभाग देखील सुरू करण्यात आला आहे. सर्व रुग्णालयांना फर्निचर पुरवठा करण्यात आला असून वैद्यकीय उपकरणे खरेदीसाठी निविदा प्रकिया अंतिम टप्प्यात आहे. खालीलप्रमाणे वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

| **रुग्णालयाचे नाव** | **वैद्यकीय अधिकारो/तज्ञ** | **निमवैद्यकीय कर्मचारी वर्ग** |
|---|---|---|
| सार्व. रुग्णालय ऐरोली | १५ | ६९ |
| सार्व. रुग्णालय नेरूळ | २८ | ५३ |
| माबारू बेलापूर | ३ | १० |

सन २०१६-१७ मध्ये उपरोक्त महापालिका रुग्णालयांतील सेवेचा लाभ घेतेलेल्या रूग्णांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :—

| **विभाग** | **सार्व. रूग्णालय ऐरोली** | **सार्व.रूग्णालय नेरूळ** | **माबारू बेलापूर** |
|---|---|---|---|
| बाह्यरुण विभाग | १२६४९६ | ९२५१५ | २३१४६ |
| आंतरूरग्ण विभाग | २५७५ | ३२७२ | -- |

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील गरीब व अन्यायपिडीत महीलांकरीता पालिकेच्या बेलापूर भवन येथे मोफत कायदेविषयक सल्ला केंद्र सुरू करण्यात येत आहे. सदर कायदेविषयक सल्ला केंद्राकरीता नवी मुंबई कार्यक्षेत्रातील ४ महिला वकिलांची दररोज २

तासांकरिता नेमणूक करण्याची प्रक्रिया पूर्ण् करण्यात आलेली आहे. सदर केंद्राचे प्रत्यक्ष काम जून, २०१७ अखेरीस सुरू करून,त्यास अधिकाधीक प्रसिध्दी देण्यात येत आहे.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात कॅन्सर जनजागृती व रोगनिदान यासाठी दिनांक ०८/०४/२०१७ रोजी नागरी आरोग्य केंद्र, तुर्भे येथे शिबिर आयोजित करण्यात आले होते. त्यामध्ये ५१ महिलांची तपासणी केलेली आहे. तसेच अधिकाधिक जनजागृती व रोगनिदान शिबीर घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील महामार्ग/मुख्य रस्त्यांलगत ३५ सार्वजनिक शौचालये बांधण्यांत आलेली असून, त्ययामध्ये १५ ई-टॉयलेटस्चा समावेश आहे. सदर शौचालयांमधील सिटस्ची संख्या २०६ आहे. तसेच सी.एस.आर.च्या माध्यमातून महानगरपालिका क्षेत्रामध्ये विविध ठिकाणी ६ शी-टॉयलेटस् बसविण्यात आले असून, लवकरच ४ शी-टॉयलेटस् बसविण्यात येत आहेत.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण योजनांवर सन २०१४-२०१५ मध्ये रू. २.५१ कोटी खर्च करण्यात आला होता. सन २०१४-२०१६ मध्ये त्यात वाढ होऊन रू. ३.०० कोटी इतका खर्च करण्यात आला आहे. सन २०१५-१६ व सन २०१६-१७ मध्ये एकूण ८८२१ महिलांना विविध योजनांचा लाभ देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. शहरातील विभाग कार्यालये, रेल्वे स्टेशन, रूग्णालये, बस स्थानके अशा ५० ठिकाणी महिला व बालकल्याण योजनांचे माहितीफलक लावण्यात आलेले आहेत.तसेच स्थानिक नगरसेवक, नवी मुंबई महानगरपालिकाचे १६ समूह संघटक यांचेद्वारे गरजू महिलांशी प्रत्यक्ष संपर्क साधून, योजनांचा प्रचार व प्रसार केला जात आहे.

सन २०१६-२०१७ मध्ये महिला व बालकल्याण विषयक खालील उपक्रम राबविण्यात आले आहेत.

- ३८४५ मुलींना शिष्यवृत्ती वाटप.
- ५२१ महिला/युवतींना व्यवसाय प्रशिक्षण.
- ३५०० मुलींना मासिक पाळीविषयक मार्गदर्शन शिबीर.

उपरोक्त उपक्रमांव्यतिरिक्त खालील उपक्रम नव्याने प्रस्तावित केले आहेत.

- गरजू/पिडीत महिलांकरीता मोफत कायदेविषयक सल्ला केंद्र.
- मोफत कॅन्सर तपासणी शिबीराचे आयोजन.
- महिलांकरीता स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यक्रम.
- मुख्यालयात हिरकणी कक्षाची स्थापना.

- मनपा शाळा, मुख्यालय,विभाग कार्यालये, नाट्यगृह व अपंग प्रशिक्षण केंद्र अशा ५८ ठिकाणी सॅनीटरी नॅपकीन व्हेंडीग मशीन बसविणे.

नवी मुंबई महानगरपालिकेतील महिला व बालकल्याण करीता करण्यात आलेली अंदाजपत्रकीय तरतूद व खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

(रूपये कोटी)

| **कालावधी** | **अंदाजपत्रकीय तरतुदीची (५%) रक्कम** | **करण्यात आलेली तरतूद** | **प्रत्यक्ष खर्च** |
|---|---|---|---|
| २०१२-१३ | ५.७० | ७.३० | १.०८ |
| २०१३-१४ | ३.३७ | १८.६५ | ३.३५ |
| २०१४-१५ | ५.५३ | ९.६० | २.५९ |
| २०१५-१६ | १०.६६ | १५.९० | ३.०० |

नवी मुंबई महानगरपालिकेच्या राजीव गांधी क्रिडा संकुलातील गाळे भाडेपट्ट्याने देणेकरीता वर्तमानपत्रात जाहिर निविदा सूचना प्रसिध्द करून, देकार मागविण्यात आले होते. सदर निविदा खुल्या व सर्वसाधारण गटासाठी असल्याने, त्यातील अटी-शर्तीनुसार जास्तीत जास्त अनामत देणाऱ्या निविदाधारकास लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर गाळेवाटप करण्यात आले आहे. निविदा अटी-शर्तीमध्ये उत्पन्नाचा दाखला सादर करण्याच्या अटीचा समावेश नव्हता. श्रीमती तृप्ती अरोरा यांना स्पर्धात्मक निविदा प्रक्रियाद्वारे, विहीत अटी-शर्तीनुसार गाळयाचे वाटप करण्यात आले आहे

**विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी खालीलप्रमाणे लेखी माहिती दिली :—**

डॉक्टरांची सरळसेवेने भरती होईपर्यंत तुर्त करार पध्दतीवर डॉक्टरांची पदे भरण्यात आली आहेत. करार पध्दतीवरील डॉक्टरांना नियमित वैद्यकीय अधिकारी यांच्या मासिक मुळ वेतन व ग्रेड वेतनानुसार न्युनतम श्रेणीनुसार ठोक मासिक वेतन मानधन देण्यात येते.

नवी मुंबई महापालिकेच्या राजीव गांधी स्टेडीअममधील गाळेवाटपासाठी विहीत पध्दतीने वृत्तपत्रात जाहिर निविदा सूचना प्रसिध्द करून, व्यावसायिक गाळेवाटपासाठी विहीत पध्दतीने वृत्तपत्रात जाहिर निविदा अटी-शर्तीनुसार जास्तीत जास्त देकार नमूद करणाऱ्या व्यक्ती/संस्थाना १० वर्षाकरीता लिव्ह व लायसन्स तत्वावर गाळेवाटप करण्यात आले आहे. निविदा अटी-

शर्तीनुसार गाळावाटपासाठी उत्पनाचा दाखला सादर करणे बंधनकारक नसल्याने,श्रीमती तृप्ती अरोरा यांचेप्रकरणी गाळा वाटपाची कार्यवाही करण्यात आलेली आहे. **(परिशिष्ट-अ)**

मोफत कायदेविषयक सल्ला केंद्राचा शुभारंभ नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालय, से. १५ ए, बेलापूर येथील कार्यालयात तळमजल्यावर दि.०८/०३/२०१६ रोजी करण्यात आला होता. तथापि सदरील सेवा निशुल्क असल्यामुळे तसेच वकिलांमार्फत याकरीता दिरंगाई होत असल्याचे दिसून आले. त्यामुळे दळणवळणाच्या दृष्टीने व केंद्रामध्ये येणाऱ्या महिलांना विनाखंडीत सेवा मिळावी तसेच महिला वकिलांना जबाबदारी निश्चित होणेकरीता मानधन तत्वावर वकिलांची नेमणूक करणेकामी दि. १४/०१/२०१७ ते २४/०१/२०१७ रोजीपर्यत स्वारस्याची अभिव्यक्ती प्रसिध्द करून महिला वकिलांकडून प्रस्ताव मागविण्यात आले. अंतिम दिनांकापर्यत एकूण ८ महिला वकिलांमार्फत याकरीता प्रस्ताव प्राप्त झाले. मधून ०४ वकिलांची नेमणूक करण्यात आली.

सदर केंद्राकरीता आठवडयातील ३ दिवस २ तास निशुल्क सेवा उपलब्ध करून देणेकामी ॲड नयना तळेकर,ॲड शितल उबाळे, ॲड विद्या नाईक, ॲड सपना म्हात्रे या वकीलांची नियुक्ती करण्यात आली असून दर सोमवार ते शनिवार दूपारी ३ ते ५ वाजेपर्यंत केद्राची वेळ ठरविण्यात आली आहे. त्यानुसार दि.०५/०६/२०१७ रोजी सदरील मोफत कायदेविषयक सल्ला केंद्र पुनश्च कार्यान्वित करण्यात आले असून माहे सप्टेंबर २०१७ पर्यत एकूण १५ गरजू महिलांना सल्ला उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. **(परिशिष्ट-ब )**

इंडियन कॅन्सर सोसायटी या संस्थेमार्फत नवी मुंबई महानगरपालिका प्राथमिक आरोग्य केंद्र व माताबाल रूग्णालय या ठिकाणी कार्यरत कर्मचाऱ्यांकरीता क्षमता बांधणी शिबीराचे लाभ घेतलेल्या आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यामार्फत महानगरपालिका कार्यक्षेत्रात महिलांशी कॅन्सर बाबतची प्राथमिक चाचणी करण्यात येईल. तदनंतर संशयित वाटणाऱ्या महिलांची छाननी करून इंडियन कॅन्सर सोसायटी या सस्थेमार्फत नवी मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रामध्ये सदर महिलांकरीता तपासणी शिबीराचे आयोजन माहे नोव्हेंबर, २०१७ पासून करण्यात येणार आहे. **(परिशिष्ट-क)**

महिला व बालकल्याण घटकावर आलेल्या खर्चाचा सुधारीत माहितीचा तपशील सोबत जोडण्यात आला आहे. **(परिशिष्ट-ड)**

**विभागीय सचिवांची साक्ष :-**

नवी मुंबई महानगरपालिकेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक ७ जून, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने एकंदरीत १०९ गाळे असून महिलांना वितरीत केलेल्या गाळयांपैकी श्रीमती तृप्ती अरोरा यांना गाळा देतांना त्यांनी सर्व कागदपत्रांची पुर्तता केली आहे काय ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी हे आरक्षण सर्वसाधारण होते, हे आरक्षण केवळ महिलांसाठीच होते असे नाही. यामध्ये उत्पन्नाची कोणतीही अट नव्हती. लिलाव पध्दतीने गाळयाचे वाटप झालेले असून ज्यांनी सर्वात जास्त डिपॉझिट भरलेले आहे त्यांना गाळे देण्यात आलेले आहेत. असे समितीस सांगितले.

समितीने सदर गाळे बचत गटांना, परितक्त्यांना, अपंगांना द्यावयाचे होते की, श्रीमंत लोकांनाच हे गाळे द्यावयाचे असे शासनाचे धोरण होते काय ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी महानगरपालिकेच्या अधिनियमानुसार महानगरपालिकेच्या मालकीच्या जमिनी किंवा त्यावरील मालमत्तेचे संपूर्ण अधिकार महानगरपालिकेला आहेत. आपल्या गाईडलाईननुसार महानगरपालिकेने कार्यवाही करणे अपेक्षित असते.

समितीने उत्पन्नाचा दाखला, अपंगाचा दाखला किंवा अनुसूचित जातीचा दाखला असावा या क्रायटेरियानुसार गाळयांचे वाटप केले होते काय ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी जाहिरातीमध्ये कोणत्याही प्रकारचे रिझर्व्हेशन दिलेले नव्हते. असे समितीस सांगितले.

समितीने ज्या अधिकाऱ्याने चुकीची जाहिरात दिली त्या अधिकाऱ्यावर कारवाई करावयाची काय ? त्यांना गाळयांची आवश्यकता आहे त्यांनाच गाळे मिळाले नाहीत. अधिकाऱ्यांनी आपल्या स्वार्थासाठी ही जाहिरात दिली होती काय ? तत्कालीन अधिकाऱ्यावर कारवाई करावयाची काय ? जाहिरातींच्या संदर्भातील जीआर समितीला उपलब्ध करुन द्यावा. आपण नियमाप्रमाणे जाहिरात दिली असती तर ही परिस्थिती निर्माण झाली नसती. सगळयात मोठी चूक जाहिरातीची आहे. चूक आहे की, नाही हे सिध्द केले पाहिजे किंवा यासंदर्भातील जीआर समितीला उपलब्ध करुन द्यावा. अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी शासनाचा बचत गटांना प्राधान्य देण्याबाबतचा माहे नोव्हेंबर, २००१ चा युडी-२७ चा जीआर आहे, त्यामध्ये महिला बचत गटांना ३० टक्के प्राधान्य

द्यायचे आहे. त्याची अंमलबजावणी सुरु केली आहे. ही प्रक्रिया २००९ मध्ये वृत्तपत्रात जाहिरात देऊन केली होती. त्याबद्दलचा महासभेचा ठराव आहे. महासभेची मान्यता घेण्यात आली होती.

त्यानुसार आपण स्पर्धात्मक निविदा मागविल्या होत्या. हे सर्व सर्वसाधारण गटासाठी होते. यानंतर शासनाचे परिपत्रक आले,त्यानुसार ३० टक्के महिला बचत गटांना प्राधान्य देतो. एकूण १४२ गाळे आहेत, त्यापैकी ४२ गाळयांसाठी खास महिलांकरीता जाहिरात प्रसिध्द केली आहे. अशी समितीला माहिती देण्यात आली.

समितीने ही २००९ सालातील जाहिरात आहे. २००९ ते २०१५ या काळात तुमचे ऑडिट झाले नाही का ? ऑडिट झाले असेल तर त्यात काही त्रुटी दाखविल्या नाहीत का ? त्यांनी ऑडिटमध्ये काय शेरे नमूद केले होते ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी ऑडिट झाले तरी लोकलेखा समितीपुढील जे आक्षेप असतात ते येतात, उर्वरित आक्षेपांचा निपटारा महापालिका त्यांच्याच स्तरावर करीत असतात. असे समितीस सांगितले.

समितीने शासनाचा जीआर २००१ चा आहे. पहिली जाहिरात जीआरनुसार का काढली नाही ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी एकुण गाळयांपैकी ३० टक्के आरक्षण ठेवावे हे बरोबर आहे. परंतु ते एका जाहिरातीमध्ये द्यावे असे नाही. महापालिकेचे एकूण किती गाळे आहेत त्यापैकी ३० टक्के महिलांसाठी ठेवायचे आहेत. असे समितीस सांगितले.

समितीने व्यक्तिविशिष्टचा विचार करण्यापेक्षा शासन निर्णयानुसार बजेटच्या ५ टक्के हे महिला व बाल हक्कासाठी ठेवायचे आहेत या बद्दल सांगा. नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये बालवाडया, अंगणवाडया आहेत त्यासाठी खाऊ पुरवठा, खेळणी देणे यासाठी खर्च करु शकता. महिलांना प्रशिक्षण देऊन त्यांच्या आरोग्यासाठी हेल्थ कॅम्प लाऊ शकता. मग बजेट मध्ये प्रोव्हिजन असताना सुध्दा हा खर्च का केला नाही ? जर केला नाही तर हा खर्च इतरत्र कुठे वापरला याची माहिती द्या.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी सन २०१६-१७ मध्ये सूचना दिल्याप्रमाणे ३८४५ मुलींना शिष्यवृत्ती दिलेली आहे. तसेच ५२१ महिला आणि युवतीला प्रशिक्षण दिले आहे. असे समितीस सांगितले.

**अभिप्राय व शिफारशी :-**

समितीने दिनांक २५ ऑक्टोबर, २०१५ मध्ये भेटीच्या वेळी आणि दिनांक ७ जून, २०१७ रोजी झालेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी महानगरपालिकेचे गत तीन वर्षातील वर्षनिहाय सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ मधील वार्षिक अंदाजपत्रक किती रकमेचे आहे. शासन धोरणानुसार प्रत्येक महानगरपालिकेत महसूली व आस्थापना खर्च वगळून एकूण अंदाजपत्रकाच्या ५% निधी महिला व बालकल्याण विभागासाठी राखून ठेवण्यात येतो. त्या अनुषंगाने महानगरपालिकेत मागील ३ वर्षात सदरहू ५% निधी कसा खर्च करण्यात आला आहे, महानगरपालिकेमार्फत महिलांचे सबलीकरण करण्याकरीता तसेच आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या महिलांना सक्षम करण्याकरीता देण्यात येणाऱ्या सोई-सवलती इ. योजनांबाबत माहिती तसेच उक्त योजनांवर सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ या तीन वर्षात व वर्षनिहाय व योजनानिहाय एकूण किती खर्च झाला, महानगरपालिकेच्या एकूण उत्पन्नाच्या किती टक्के रक्कम महिलांसाठी कल्याणकारी योजना राबविण्याबाबत खर्च करण्यात आली, महिला उद्योजकांसाठी, विशेषत: आर्थिकदृष्ट्या मागास महिला उद्योजकांसाठी उद्योगधंदे उभारण्याकरीता महानगरपालिकेमार्फत विशेष सोई सवलती देण्यात येतात काय, महानगरपालिका क्षेत्रात महापालिकेच्या मालकीचे मंडई/बाजार (मार्केटस्) यांची संख्या किती आहे, त्या प्रत्येक ठिकाणी एकूण किती गाळे आहेत. गाळ्यांचे प्रकार कोणकोणते आहेत. (उदा. मासळी विक्री, कापड दुकान इ.) सदर मार्केट/मंडई/बाजार इ. मधील गाळे वाटपाचे निकष काय आहेत ? सदर मार्केटस् मधील काही गाळे महिलांकरीता राखून ठेवले जातात काय व त्यनुसार किती प्रमाणात आणि गाळे वाटपात महिलांना काही सवलती देण्यात येतात काय महानगरपालिकेच्या मालकीच्या मार्केटमधील किती व कोणकोणत्या ठिकाणाचे गाळे महिलांना वितरीत करण्यात आले आहेत महानगरपालिकेमध्ये महिला नगरसेविकांसाठी व महिला कर्मचाऱ्यांसाठी वेगळा कक्ष राखून ठेवण्यात आला आहे काय इत्यादीबाबत विचारणा करण्यात आणि त्यावेळी नवी मुंबई महानगरपालिकेकडून अंदाजपत्रकीय रक्कम आणि महिला बालकल्याणासाठी करण्यात आलेली मागील ३ वर्षातील तरतुद याची खालीलप्रमाणे माहिती देण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिकेचे अंदाजपत्रकीय रक्कम सन २०१२-१३ मध्ये २१९९.९० कोटी, सन २०१३-१४ मध्ये २६८०.४८ कोटी सन २०१४-१५ मध्ये २०२५.२७ कोटी, तरतुद करण्यात आली होती.

तसेच मागील ३ वर्षात प्रत्यक्ष झालेला खर्च असा आहे की, तरतूद महिला बाल कल्याण सन २०१२-१३ मध्ये १८.६५ कोटी, सन २०१३-१४ मध्ये १६.८७ कोटी, सन २०१४-१५ मध्ये ९.५९ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. त्यापैकी प्रत्यक्ष खर्च हा सन २०१२-१३ मध्ये

१.०८ कोटी, सन २०१३-१४ मध्ये ३.३४ कोटी, सन २०१४-१५ मध्ये २.५९ कोटी रुपये खर्च करण्यात आलेला आहे. या तरतुदीच्या अनुषंगाने महानगरपलिका मार्फत महिला करिता राबविण्यात येणाऱ्या कल्याणाकारी योजनांवर महानगरपालिका मार्फत महिला उमेदवारांसाठी तसेच आर्थिकदृष्टया मागास असलेल्या महिला उद्योजकांसाठी सद्य:स्थितीत विशेष काही उपक्रम राबविण्यात येत नाही. परंतू केद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियानाच्या धरतीवर माहिला उद्योजकांसाठी मायक्रॉ फॉयन्सद्वारे प्रोत्साहित करण्याकरिता आर्थिक वर्षापासुन काही योजना प्रस्तावित करण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे महानगरपालिकेने स्व:ताच्या मालकीचे ४६ डेली बाजार/हॉकर्स झोन, ५ मार्कटस सिडकोकडून महानगरपालिकेने हस्तारित झालेले आहे. या गाळयाचे वाटप विहित निविदा पध्दतीने जास्तीत जास्त देकार नमुद करणाऱ्या व्यक्ती / संस्थाना वाटप करण्यात येतात. या व्यवसायिक जागेच्या वितरणामध्ये गाळे राखून ठेवण्याबाबत तरतुद असल्यास तसेच शासन निर्णय किवां परिपत्रक उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाच्या सामान्य प्रशासन विभाग तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांना पत्राद्वारे विनंती करण्यात आली असुन अदयापपर्यत याबाबत मार्गदर्शन प्राप्त झाले आहे. तथापि सदर निविदा प्रक्रियामध्ये महिलासांठी ३० टक्के अग्रक्रम देण्याची तरतूद करण्यात आलेली असल्यामुळे महिलांना ३० टक्के प्राधान्य दिले जाते. मात्र महानगरपालिकेच्या कोणत्याही मालमत्तेसाठी चालु बाजार मुल्यापेक्षा कमी दर आकारण्याची किंवा सवलत देण्याची तरतूद देण्यात आलेल्या नाही . सद्य:स्थितीत महिलांना एकुण २० गाळे वितरीत करण्यात आलेले आहे. तसेच महानगरपालिकेमार्फत विविध कल्याणकारी योजना जनसामान्या पर्यत पोचविण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेच्या समाज विकास विभाग काम करत आहे. विविध योजनांची माहिती या विभागाच्या समुह संघटकामार्फत माहिती पोचविण्यात येते. या योजनाची प्रसिध्दी स्थानिक वृत्तपत्राद्वारे माहिती पत्रक स्थानिक नगरसेवक, पदाधिकारी संस्था माहिला मंडळे, महिला बचत गट यांच्या माध्यामातून देण्यात येते तसेच या योजनांची माहिती विभागांतर्गत कार्यरत असलेला लिंक वर्कर मार्फत घरोघरी पोचविण्यात येते.

महिला बाल अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांमध्ये महिला बचत गट सक्षमीकरण तसेच व्यवसाय करणाऱ्या महिला बचत गटांना अर्थसहाय्य देणे याचा समावेश होतो. सदर योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या लाभाचा तपशील पुढील प्रमाणे आहे. कालावधीमध्ये २ वर्षासाठी अनुदान रुपये ५०००/-, ३ वर्षासाठी अनुदान रुपये १००००/-, ५ वर्षासाठी अनुदान रुपये १५०००/- सन २०१२-१३ ते २०१४-२०१५ उक्त योजना अंतर्गत दिलेल्या लाभाचा तपशील परिशिष्ट क्र. 'क' वर जोडला आहे. महापालिकेअंतर्गत महिन्यासाठी जननी सुरक्षा योजना, जननी शिशू सुरक्षा योजना, कुंटुब नियोजन शस्त्राक्रिया, इत्यादी योजना राबविल्या

जातात. जननी सुरक्षा अंतर्गत प्रसूती झाल्यानंतर लाभार्थी महिलेला ६००/- रु दिले जातात यामध्ये गरोदर माताची तपासणी, मुलाच्या आरोग्याची तपासणी, लसीकरण याबाबत माहिती दिली जाते. तसेच महानगरपालिका क्षेत्रातील कुपोषित बालकाची तपासणी वेळोवेळी केली जाते. यात जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी ४ टिम तयार केलेल्या आहेत. राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम अंतर्गत सर्व शाळाची तपासणी करून काही प्रमाणात सॅम मॅम, या मुलांची तपासणी करुन त्यांना योग्य प्रमाणात सोयीसुविधा व आहार पुरविला जातो. यानंतर 'बेटी बचाओ बेटी पढाओ' ही योजना राबविण्यात कोणते प्रयत्न केले जातात. अशी विचारणा केली असता, जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी शासनाच्या गाईड लाईनप्रमाणे या योजनेसाठी मॅानिटरींग केले जाते. अशी माहिती दिली. त्यानंतर समितीने शाळेमध्ये मुलांसाठी व महिलांसाठी टॉयलेटस नाही. काही शाळेतील मुलींना टॉयलेट साठी दूसऱ्या शाळेमध्ये जावे लागते. ही गंभीर बाब आहे. तसेच टॉयलेट संबंधी स्वच्छ भारत अभियानांतर्गत केंद्र शासनाच्या सुचना दिल्या असतानाही हायवेवर टॉयलेट उभारण्यात आलेले नाहीत. याबाबत विचारणा केली असता, आयुक्तांनी ई-टॉयलेट ही नवीन संकल्पना महानगरपालिकेने ठाणे, बेलापुर आणि पाम बिच रोडवर राबविली असुन १५ ई-टॉयलेट मंजूर केले असुन त्यापैकी ७ ई-टॉयलेट सुरू करण्यात आले आहेत. महानगरपालिकेमार्फत महानगरपालिकेच्या कार्यालयासमोर १ ई-टॉयेलेटचे मॅाडीफिकेशन करून ई-टॉयलेटमध्ये रूपांतर करण्यात येत असून त्यामध्ये सॅनटरी नॅपकीन उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच महिलांसाठी हायवेवर टॉयलेट उभारण्याबाबत एक सर्व्हे करून १३० जागा निवडल्या आहेत. त्यामध्ये महिलांसाठी २५ ई-टॉयलेट उभारण्यात येतील. ही जागा सिडकोची आहे व तेथे टॉयलेट बसविण्याची परवानगी घेण्यात येणार आहे.

**सबब, याप्रकरणी महानगरपालिका क्षेत्रांतर्गत महामार्गालगत स्वच्छतागृहांची सोय नसल्याने महिलांची गैरसोय होते. त्यामुळे महानगरपालिकेने केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत महानगरपालिकेच्या क्षेत्रात महामार्गालगत महिलांसाठी स्वच्छतागृहे उभारुन त्यांची देखभाल करण्याच्या दृष्टीने लवकरात लवकर कार्यवाही करण्यात यावी अशी समितीची आग्रहाची शिफारस असून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला ३ महिन्याच्या आत पाठविण्यात यावा.**

समितीने महानगरपालिकेचे महसूली खर्च व वेतनावरील खर्च वगळून एकूण अंदाजपत्रकाच्या ५% तरतूद महिला व बाल कल्याण विभागाच्या योजनांकरीता केली आहे का अशी विचारणा केली असता, आयुक्तांनी महानगरपालिकेचे महिला व बाल कल्याण विभागाच्या योजनेकरीता ५% निधी राखुन ठेवण्यात आलेला नाही. अंदाजपत्रकीय रक्कमपैकी

अंदाजीत रक्कम कागदोपत्री दाखविण्यात आलेली असते. कारण ॲक्च्यूअल महसूलामध्ये बरीच तफावत आहे. यावेळी जवळपास १४०० ते १५०० कोटी रूपयादरम्यान अंदाजपत्रक असते असे समितीस सांगितले. त्यावर समितीनी महिलांच्या कल्याणकारी योजनांसाठी जो निधी खर्च करायवयास पाहिजे तो निधी सह योजनांवर खर्च न करता कोणत्या योजनेसाठी वळविण्यात आला अशी विचारणा केली असता, आयुक्तांनी १ कोटी रुपये खर्च केलेला निधी हा महिला व बाल कल्याण विभागाच्या योजनेवर खर्च करण्याचा आलेला आहे. महिलांच्या इतर योजनांवर करण्यात आलेला खर्च यामध्ये दाखविण्यात आलेला नाही. सन २०१२-१३ मध्ये १.८ कोटी रुपये सन २०१३-१४ मध्ये ३.३४ कोटी रुपये सन २०१४-१५ मध्ये २-५९ कोटी रुपये खर्च झाले आहेत. हा निधी नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील गरीब कष्टकरी महिलांवर खर्च झाला नाही त्याबाबत समिती खेद व्यक्त करते. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील निराधार विधवा, परितक्त्या ,महिलाच्या मुलीच्या विवाहाकरिता अर्थ सहाय्य देणे, सर्वसाधारण गटातील गरजु बेरोजगार, सुरक्षित महिला व मुलींना व्यवसायिक प्रशक्षिण देणे इत्यादी योजन राबविल्या जातात व त्यावर हा निधी खर्च कला जातो अशी माहिती समितीस दिली. शासन निर्णयानुसार खर्च केला जातो किंवा नाही ही बाब समितीसमोर आली नाही.

याबाबत समिती खेद व्यक्त करते. तसेच **५% निधी महिलांच्या कल्याणाकरीता व सक्षमीकरणाकरीता तसेच सबलीकरणावर शासन निर्णयानुसार योग्य पध्दतीने नियोजन करुन त्याप्रमाणे योग्य रितीने खर्च करावा व त्यानुसार ५ टक्के निधी उक्त योजनांवर खर्च केला गेला किंवा नाही याची तपासणी करुन संबंधिताने तो केला नसल्यास त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करून कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल ३ महिन्यात समितीस सादर करावा अशी शिफारस करीत आहे.**

## २. कल्याण-डोंबिवली महानगरपालिका

### २.१ कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडुन खालील माहिती प्राप्त झाली आहे :-

मंगळवार, दिनांक १२ जुलै, २०१७ रोजी महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांच्याकडून खालील प्रमाणे लेखी माहिती मागविण्यात आली होती.

शासकीय, निमशासकीय व शासनानुदातील संस्थांमधील सेवेतील भरतीसाठी महिलाकरिता ३० टक्के जागा आरक्षित ठेवण्याच्या धोरणांची अंमलबजावणी महानगरपालिकांच्या सेवेमध्ये भरती करताना करण्यात येते काय ? असल्यास त्याबाबतचे

निकष, भरतीची पध्दत, इत्यादी बाबत सविस्तर माहिती देण्यात यावी. महानगरपालिकेतील वर्ग १ ते ४ तांत्रिक व अतांत्रिक अधिकारी व कर्मचारी यांची मंजूर पद संख्या किती आहे ? त्यापैकी सन २०१५-१६ अखेर किती पदे भरण्यात आली आहेत ? उक्त मंजूर पदांपैकी वर्ग १ ते४ मधील किती व कोणती पदे माहिलांकरिता आरक्षित ठेवण्यात आली आहेत ? महिला उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या वर्ग १ ते ४ मधील पदे भरण्यासाठी कोणती कार्यपध्दती अवलंविण्यात येते ? महिला उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या वर्ग १ ते ४ मधील पदांपैकी सन २०१५-१६ अखेर एकूण किती पदे भरण्यात आली आहेत व किती व कोणकोणती पदे रिक्त आहेत, तसेच सदरची पदे रिक्त राहण्याची कारणे काय आहेत ? प्रत्येक भरती वर्षामध्ये महिलांसाठी आरक्षित असलेली किती पदे भरण्यात आली ? त्याची संवर्गनिहाय माहिती देण्यात यावी. तसेच किती व कोणती पदे रिक्त आहेत ? सदरहू पदे रिक्त राहण्याची कारणे काय आहेत ? महानगरपालिकेतील विविध पदावर महिला उमेदवारांच्या नियुक्ता करण्याबाबत महानगरपालिकेने सेवाप्रवेश नियमावली तयार केली आहे काय ? महिला अमेदवारांसाठी राखीव असलेली पदे भरण्यासाठी गत तीन वर्षात (सन २०१३-१४,२०१४-१५ व२०१५-१६) वर्षनिहाय किती वेळा व कोणकोणत्या तारखांना वर्तमानपत्रात कोणकोणती पदे भरण्यासाठी जाहिराती देण्यात आल्या होत्या ? महिला उमेदवारांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या पदासाठी स्वतंत्र नोंदवही (रोस्टर) ठेवण्यात आली आहे काय, असल्यास केव्हापासून ? तसेच ती अद्ययावत स्वरुपात आहे काय, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ? महिला अधिकारी/कर्मचारी यांची भरती व सेवाविषयक बाबी हाताळण्यासाठी महानगरपालिकेमध्ये विशेष कक्ष स्वतंत्ररित्या स्थापन करण्यात आला आहे काय ? विशेष कक्ष स्थापन केला नसल्यास त्याची कारणे काय आहेत ? अशी विचारणा केली.

**उपरोक्त प्रकरणी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली आहे :—**

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेची स्थापना दिनांक १ ऑक्टोबर, १९८३ रोजी झालेली आहे. मंजूर आस्थापना सुचीनुसार पदसंख्या, दिनांक १ जानेवारी, २०१७ रोजी महानगरपालिकेत सेवेत कार्यरत असलेले अधिकारी व कर्मचारी संख्या व त्यापैकी कार्यरत महिला अधिकारी व कर्मचारी यांची संख्या याबाबतची आकडेवारी खालील विवरणपत्रामध्ये दर्शविण्यात आली असून, दिनांक १/१/२०१७ रोजी कार्यरत संवर्गनिहाय महिला अधिकारी व कर्मचारी यांची सविस्तर माहिती सोबतच्या **परिशिष्ट-१** मध्ये दर्शविण्यात आली आहे.

**विवरणपत्र**

| वर्ग | मंजूर पद संख्या | दि.१/१/१७ रोजी कार्यरत अधिकारी/कर्मचारी | दि.१/१/१७ रोजी कार्यरत महिला अधिकारी/कर्मचारी |
|---|---|---|---|
| १ | ३२ | ७ | ० |
| २ | १८६ | ९२ | २७ |
| ३ | १५१४ | ९८५ | २९६ |
| ३ (शिक्षक व मुख्याध्यापक) | ४१८ | २९७ | १६४ |
| ४ | ११५१ | ७७४ | १०० |
| ४ वर्ग (रोस्टर व्यतिरिक्त) | ३१८७ | २९४१ | ६४६ |
| **एकूण** | **६४८८** | **५०९६** | **१२३३** |

महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालविकास विभागाकडील शासन निर्णय दि.२५/५/२००१ मधील तरतूदीनुसार महिलांकरिता ३० टक्के जागा आरक्षित ठेवण्याच्या धोरणांची अंमलबजावणी महानगरपालिकेच्या सेवेमध्ये सरळसेवेने भरती करताना करण्यात येते.

महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालविकास विभागाकडील शासन निर्णय दि.२५/५/२००१ मधील तरतूदीनुसार महिलांकरिता ३० टक्के जागा आरक्षित ठेवण्याच्या धोरणांची अंमलबजावणी महानगरपालिकेच्या सेवेमध्ये सरळसेवेने भरती करताना करण्यात येते. शासन परिपत्रक दि.२५/१०/२००५ मध्ये, वर्ग-१ ते वर्ग-४ यांमध्ये सेवा भरती करताना लागू करावयाची एकत्रित मार्गदर्शक तत्त्वे विहित करण्यात आली आहेत.कल्याण डोंबिवली शहर महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१० मध्ये, "उपरोक्त परिपत्रकानुसार मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करण्यात यावा तसेच वेळोवेळी होणारे बदलही अमलांत आणण्यात यावेत." असे नमुद केले आहे. त्यानूसार भरती प्रक्रियेसंदर्भातील शासन निर्णय दि.१९/१०/२००७ तसेच तदनंतर वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयांमध्ये विहित केलेली कार्यपध्दती महानगरपालिकेत अमलात आणण्यात येत आहे. यामध्ये सेवायोजन कार्यालयातून उमेदवारांची

यादी प्राप्त करुन घेणे, त्याचबरोबर रिक्त पदांची जाहिरात वर्तमानपत्रातून देणे तसेच रिक्त पदांची माहिती नोटीसबोर्डावर व महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन ऑनलाईन अर्ज मागविणे, उमेदवारांची लेखी परिक्षा घेऊन/वर्ग-१ च्या उमेदवारांच्या बाबतीत मुलाखतीअंती गुणवत्ताधारक उमेदवारांची निवड करुन, कागदपत्रांच्या छाननीअंती नियुक्ती करणे या स्वरुपाची कार्यपध्दती सरळसेवा भरतीकरिता आणण्यात येते.शिक्षण विभागातील शिक्षक संवर्गातील पदे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्याकडून उपलब्ध करुन देण्यात येतात. याबाबतची आकडेवारी खालील विवरणपत्रामध्ये मध्ये दर्शविण्यात आली आहे.

**विवरणपत्र-१**

| वर्ग | एकूण मंजूर पदे | तांत्रीक | अतांत्रीक |
|---|---|---|---|
| १ | ३२ | १९ | १३ |
| २ | १८६ | १५५ | ३१ |
| ३ | १५१४ | ७५२ | ७६२ |
| ३ (शिक्षक व मुख्याध्यापक) | ४१८ | ४१८ | ० |
| ४ | ११५१ | १२४ | १०२७ |
| वर्ग ४ (रोस्टर व्यतिरिक्त कामगार/सफाई कामगार इ.) | ३१८७ | ० | ३१८७ |
| **एकूण** | **६४८८** | **१४६८** | **५०२०** |

याबाबतची आकडेवारी खालील विवरणपत्रामध्ये दर्शविण्यात आली असून संवर्गनिहाय सविस्तर माहिती दि.३१/१२/२०१६ अखेरच्या (दि.१/१/२०१७ रोजी कार्यरत विवरणपत्रामध्ये) नमूद आहे.

**विवरणपत्र -२**

**दि.३१/१२/२०१६ अखेर मंजूर पदे, भरलेली पदे व रिक्त पदे याचा तपशिल**

| वर्ग | एकूण मंजूर पदे | सरळसेवा | | | पदोन्नती | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
| १ | ३२ | १७ | १ | १६ | १५ | ६ | ९ |
| २ | १८६ | १५१ | ५९ | ९२ | ३५ | ३३ | २ |
| ३ | १५१४ | ९८५ | ६५४ | ३३१ | ५२९ | ३३१ | १८९ |
| ३ (शिक्षक व मुख्याध्यापक)* | ४१८ | ३९०* | २७७ | ११५ | २८ | २० | ८ |
| ४ | ११५१ | ९९१ | ६७१ | ३२० | १६० | १०३ | ५७ |
| ४ (रोस्टर व्यतिरिक्त रोस्टर व्यतिरिक्त कामगार/सफाई कामगार.ई.) | ३१८७ | ३१८७ | २९४१ | २४६ | ० | ० | ० |
| **एकूण** | **६४८८** | **५७२३*** | **४६०३** | **११२०** | **७६७** | **४९३** | **२७४** |

(*) वर्ग ३ (शिक्षक व मुख्याध्यापक) या संवर्गात २७७ + ११५ — ३९३ पदे होतात. परंतु २ गुजराती शिक्षक अतिरिक्त असल्याने ३९० पदे दर्शविण्यात आली आहेत.

याबाबतची आकडेवारी खालील विवरणपत्रामध्ये दर्शविण्यात आली असून संवर्गनिहाय महिला आरक्षणाची माहिती दि.३१/१२/२०१६ अखेरच्या समांतर आरक्षण विवरणपत्रामध्ये नमूद आहे.

समांतर आरक्षण विवरणपत्र
(महिला (३०%)

| वर्ग | एकूण मंजूर पदे | सरळ सेवा पदे | महिलांसाठी राखीव पदे |
|---|---|---|---|
| १ | ३२ | १७ | १ |
| २ | १८६ | १५१ | ४३ |
| ३ | १५१४ | ९८५ | २७६ |
| ३ (शिक्षक मुख्याध्यापक) | ४१८ | ३९० | ११६ |
| ४ | ११५१ | ९९१ | २३६ |
| ४ (रोस्टर व्यतिरिक्त कामगार/सफाई कामगार इ.) | ३१८७ | ३१८७ | २७४ |
| **एकूण** | **६४८८** | **५७२१** | **९४६** |

कल्याण-डोंबिवली शहर महानगरपालिकेत शासन मंजूर सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१० मध्ये विशद केलेल्या तत्वानुसार तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामध्ये विहित केल्याप्रमाणे भरतीप्रक्रिया अवलंबिण्यात येते.

महानगरपालिकेतील पदभरती संदर्भात जाहिरात देतांना महिला उमेदवारांसाठी नियमानुसार ३० टक्के पदे राखीव ठेवली असल्याबाबत कटाक्षाने उल्लेख करण्यात येतो.

याबाबतची आकडेवारी खालील विवरणपत्रामध्ये दर्शविण्यात आली असून संवर्गनिहाय महिला आरक्षणाची माहिती दि.३१/१२/२०१६ अखेरच्या समांतर आरक्षण विवरणपत्रामध्ये नमूद आहे.

कार्यरत संवर्गनिहाय आरक्षित पदांवरील महिला अधिकारी व कर्मचारी यांची सविस्तर माहिती सोबतच्या **परिशिष्ट-२** मध्ये दर्शविण्यात आली आहे. त्याचप्रमाणे पदे रिक्त राहण्याची कारणे सोबतच्या **परिशिष्ट-३** मध्ये दर्शविण्यात आली आहेत.

| वर्ग | महिलांसाठी राखीव पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| १ | १ | ० | १ |
| २ | ४३ | १३ | ३० |
| ३ | २७६ | ८७ | १८९ |
| ३ (शिक्षक व मुख्याध्यापक) | ११६ | ९० | २६ |
| ४ | २३६ | ४५ | १९१ |
| ४ (रोस्टर व्यतिरिक्त कामगार/सफाई कामगार इ.) | २७४ | ६६ | २०८ |
| **एकूण** | **९४६** | **३०१** | **६४५** |

वर्षनिहाय भरण्यात आलेल्या पदांची सविस्तर माहिती अ.क्र.१० च्या माहितीमध्ये नमूद असून गेल्या ३ वर्षात महिला आरक्षणानुसार भरण्यात आलेल्या पदांची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| वर्ग | भरण्यात आलेली पदसंख्या | | |
|---|---|---|---|
| | **२०१३-२०१४** | **२०१४-२०१५** | **२०१५-२०१६** |
| १ | ० | ० | ० |
| २ | ० | ० | ११ (४ उमेदवार हजर झाले नाहीत) |
| ३ | ० | ३ | ० |
| ३ शिक्षक | ० | ० | ० |
| ४ | ० | ० | ० |
| **एकूण** | **०** | **३** | **११** |

**सन २०१३-१४ निरंक**

**सन २०१४-१५**

| **अ.क्र.** | **संवर्ग** | **भरण्यात आलेली पदे** |
|---|---|---|
| १. | स्टाफ नर्स | १ |
| २. | सहाय्यक परिचारीका प्रसविका (ए.एन.एम.) | २ |

**सन २०१५-१६**

| **अ.क्र.** | **संवर्ग** | **भरण्यात आलेली पदे** |
|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी | ११ |

महिलांसाठी राखीव संवर्गनिहाय पदांची माहिती व सदर पदे रिक्त राहण्याची कारणे सोबतच्या **परिशिष्ट-३** मध्ये (जोडपत्रात) दर्शविण्यात आली आहेत.

महिला उमेदवारांच्या नियुक्त्या करण्याबाबत स्वतंत्र सेवाप्रवेश नियमावली तयार करण्यात आलेली नाही. तथापि, महानगरपालिकेने सर्वसाधारण भरतीसाठी सेवा प्रवेश नियम तयार केले असून ते शासनमान्य सर्वसाधारण भरतीसाठी सेवा प्रवेश नियम तयार केले असून ते शासनमान्य आहेत. सदर सेवाप्रवेश नियम दि. १६/१२/२०१० च्या महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झालेले आहेत.

सन २०१३-१४,२०१४-१५ व २०१५-१६ या वर्षात शासन मंजूर पदांमधील सरळसेवेची रिक्त असलेली पदे भरणेकामी वर्तमानपत्रात जाहिराती देण्यात आलेल्या होत्या. त्यामध्ये महिलांसाठी राखीव असलेल्या पदांचा उल्लेख करण्यात आलेला असून, त्याबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | पदनाम | एकूण पद संख्या | महिलांसाठी राखीव पदे | जाहिरात दिनांक | वर्तमानपत्र |
|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय आरोग्य अधिकारी | १ | - | १/३/२०१४ | दै.लोकमत दै.पुण्यनगर दै.जनमत. |
| | प्रकल्प व्यवस्थापन तथ आरसीएच. ऑफिसर | १ | - | | |
| | वैद्यकीय अधिकारी | ३ | - | | |
| | मेट्रन (अधिकारी) | १ | - | | |
| | क्ष-किरण तंत्रज्ञ | १ | - | | |
| | स्टाफ नर्स | ९ | ३ | | |
| | सहा.परि.प्रसविका (एएनएम.) | १० | २ | | |
| | सांख्यिकी अधिकारी तथा लेखापाल (आर.सी.एच) | १ | - | | |
| | सार्व. आरोग्य परिचारीका (पीएचएन) | ५ | १ | | |
| २ | सिस्टीम मॅनेजर | १ | - | २५-६-२०१५ | दै. लोकमत दै.पुण्यनगरी दै.जनमत दै. प्रेस जनरल |
| | मुख्य अग्निशमन अधिकारी | १ | - | | |
| | उपसचिव | १ | - | | |
| | सिस्टभ्म ॲनालिस्ट | १ | - | | |
| | स्थानक अधिकारी (अग्निशमन) | २ | - | | |
| | उप स्थनक अधिकारी (अग्निशमन) | १ | - | | |
| | ड्रायव्हर-कम-ऑपरेटर (अग्निशमन) | ९ | - | | |
| | फायरमन | ४६ | १४ | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | वैद्यकीय अधिकारी (विविध विशेषज्ञ पदे/अपघात कक्ष वैद्यकीय | ९० | २७ | १९/११/२० १५ | दै.महाराष्ट्र टाईम्स, दै.फ्रि प्रेस |
| | अधिकारी/ सामान्य वैद्यकीय अधिकारी) | | | | जर्नल, दै. बहुजनरत्न लोकनायक दै. जनमत |

सन २०१३-१४, २०१४-१५ व २०१५-१६ या वर्षी महिला उमेदवारांसाठी राखीव असलेल्या पदांवर नियुक्त महिला अधिकारी / कर्मचारी याची माहिती प्रश्न क्र.७ च्या उत्तरात नमुद आहे.

| अ. क्र. | पदनाम | एकूण पद संख्या | महिला राखीव पदे | जाहिरात दिनांक | जहिरातीनुसार भरण्यात आलेली राखीव पदे |
|---|---|---|---|---|---|
| १ | स्टाफ नर्स | ९ | ३ | १/३/२०१४ | १ |
| २ | सहा.परि.प्रसविका (एएनएम.) | १० | २ | १/३/२०१४ | २ |
| ३ | वैद्यकीय अधिकारी (विविध विशेषज्ञ पदे / अपघात कक्ष वैद्यकीय अधिकारी / सामान्य वैद्यकीय अधिकारी) | ९० | २७ | १९/११/२०१५ | ११ (एकूण ११ महिला उमेदवारांची निवड करण्यात आली होती, त्यामध्ये ४ महिला उमेदवार हजार झालेल्या नाहीत.) |

महिला उमेदवारांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या पदासाठी समांतर आरक्षणाअंतर्गत स्वतंत्र नोंदवही (रोस्टर) ठेवण्यात आलेली नाही.

तथापि, सामाजिक आरक्षणाअंतर्गत वर्ग-१ व २ च्या बिंदूनामावली नोंदवह्या मंत्रालय पातळीवर तपासणीसाठी सादर करण्यात आल्या असून वर्ग ३ व ४ च्या बिंदूनामावली नोंदवह्यांची तपासणी सहा.आयुक्त, मागासवर्ग कक्ष, विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण भवन, यांचेकडून करण्यात आलेली आहे.

महानगरपालिकेच्या तत्कालीन शिक्षण मंडळामार्फत शिक्षण व मुख्याध्यापक या संवर्गाच्या बिंदूनामावली नोंदवह्या सहायक आयुक्त, मागासवर्ग कक्ष कोकणभवन यांचेकडून जानेवारी, २०१४ मध्ये तपासून घेण्यात आलेल्या आहेत

महिला उमेदवारांसाठी राखीव असलेल्या रिक्त पदांबाबत व पदे भरल्याबाबत अहवाल सचिव, महिला व बाल विकास विभाग / सामान्य प्रशासन विभाग (१६-ब) / नवि-२८ कार्यासन, नगर विकास विभाग, मंत्रालय यांना दि.५/७/२०१७ च्या पत्रान्वये पाठविण्यात आलेला आहे.

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमध्ये महिला अधिकारी / कर्मचारी यांची भरती व सेवाविषयक बाबी हाताळण्यासाठी महानगरपालिकेमध्ये विशेष कक्ष स्वतंत्ररित्या स्थापन करण्यात आलेला नाही.

**कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या आयुक्त यांची साक्ष :—**

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेला दिनांक १२ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी आयुक्त यांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने महानगरपालिकेची स्थापना झाल्यापासून आजमितीस महानगरपालिकेत सेवेत असलेले कर्मचारी व अधिकारी किती आहेत व त्यापैकी महिला अधिकारी व कर्मचारी यांची संख्या किती आहे ? तसेच कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने पृष्ठ क्रमांक १४ वरील विवरणपत्रात माहिती दिलेली आहे. सदर विवरणपत्रात वर्ग-१ मध्ये ३२ मंजूर पद संख्या आहे, दिनांक १ जानेवारी, २०१७ रोजी कार्यरत असणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची संख्या ७ आहे. परंतु, यामध्ये १ जानेवारी, २०१७ पर्यंत कार्यरत महिला व अधिकारी यांची संख्या शून्य दाखविली आहे. अशी विचारणा केली.

त्यावर उपायुक्त यांनी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत एकूण १७ संवर्ग आहेत. कार्यकारी अभियंता संवर्गात एकूण ११ पदे मंजूर आहेत. सरळसेवेने त्यामधील ५ पदे येतात आणि ३० टक्के आरक्षणानुसार महिलांसाठी एक पद येते. इतर संवर्गात एकाकी पदे असल्यामुळे किंवा ३ पेक्षा कमी पदे असल्याने महिलांसाठी पद आरक्षित नाही. असे समितीस सांगितले.

समितीने वैद्यकीय अधिकाऱ्याची ३० टक्के आरक्षणानुसार रिक्त पदे शून्य दाखविली

आहे तसेच वैद्यकीय अधिकाऱ्याची मंजूर पदे किती आहेत ? याबाबत समितीला माहिती द्यावी. अशी विचारणा केली.

त्यावर उपायुक्त यांनी वैद्यकीय अधिकाऱ्याचे एकच पद मंजूर आहे. हे पद विभाग प्रमुखासाठी असते.

समितीने एकूण २७ पदे मंजूर दाखविलेली आहे. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीत किती हॉस्पिटल आहेत ? त्या ठिकाणी किती पदे आहेत ? अशी विचारणा केली.

त्यावर प्रभारी वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीत एकूण दोन हॉस्पिटल्स आहेत आणि त्यामध्ये एकूण १३२ पदे आहेत. ही सर्व पदे भरलेली नाहीत.

समितीने वैद्यकीय अधिकाऱ्याची ११५ पदे मंजूर आहेत. सरळसेवेने येणारी ११५ पदे आहेत. ५४ पदे भरण्यात आलेली आहेत आणि कार्यरत असणाऱ्या कॉलममध्ये "शून्य" दाखविले आहे. प्रकल्पग्रस्तांची ८ पदे येतात. रिक्त पदे केव्हापासूनची आहेत ? अशी विचारणा केली.

त्यावर उपायुक्त यांनी सदरहू तक्ता कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने १९९९ मध्ये मंजूर करुन घेतला होता. सध्याचा स्टेटसप्रमाणे चार्टमध्ये माहिती दिलेली आहे. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमध्ये रिक्त पदे जास्त आहेत, हे मान्य करतो.

समितीने रिक्त पदे भरण्यासाठी कोणती कार्यवाही केलेली आहे ? अशी विचारणा केली.

त्यावर उपायुक्त यांनी रिक्त पदे भरण्यासाठी वेळोवेळी जाहीराती दिलेल्या आहेत. मेडीकल ऑफिसरची पदे भरली जातात. कालांतराने मेडीकल ऑफिसर हे चांगल्या ठिकाणी पोस्टींग घेऊन जात असल्यामुळे पदे रिक्त होत असतात. असे समितीस सांगितले.

समितीने हॉस्पिटलमधील गोरगरीबांना आरोग्य सेवा कशी मिळणार ?

त्यावर आयुक्त यांनी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील आस्थापना खर्च ३५ टक्क्यांच्या आत करावयाचा आहे. परंतु, हा खर्च ३५ टक्क्यांपेक्षा जास्त केलेला आहे. म्हणजे जवळ जवळ ५ टक्के जास्त खर्च झालेला आहे. यासंदर्भात शासनासोबत पत्रव्यवहार केलेला आहे. अनेक वेळा कंत्राटी तत्वावर वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाते. असे समितीस सांगितले.

समितीने आस्थापना खर्च ५ टक्क्यांनी अधिक वाढलेला आहे, अशी माहिती आपल्याला ४ महिन्यापूर्वी कळली होती काय ? शासनाचा निर्णय येईपर्यंत हा जास्तीचा खर्च कशातून करता ? अशी विचारणा केली.

त्यावर अतिरिक्त आयुक्त यांनी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत २७ गावे नुकतीच समाविष्ट झालेली आहेत. त्यामुळे तेथील कर्मचारी वर्ग हा कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत समाविष्ट झालेला आहे. त्यामुळे हा खर्च कम्पलसरी वाढलेला आहे. मेडीकल ऑफिसरची पदे NOHM मधून भरण्यासाठी वेळोवेळी जाहीरात दिली जाते. मेडीकल ऑफिसरची पदे भरली जातात. कालांतराने मेडीकल ऑफिसर हे चांगल्या ठिकाणी पोस्टींग घेऊन गेल्यामुळे येथील पदे रिक्त होत असतात. असे समितीस सांगितले.

समितीने आरोग्य विभागात रिक्त पदे किती आहेत ? कल्याण डोंबिवली महानगरपालिकेची जी रुग्णालये आहेत, त्या ठिकाणी गरीब रुग्णांना योग्य ते उपचार मिळत नाही, असे वारंवार निदर्शनास आलेले आहे. अशी परिस्थिती असेल तर गरीब रुग्णांवर उपचार कसे करणार असा प्रश्न निर्माण होत आहे. ६१ पदे रिक्त आहेत. अशी विचारणा केली.

त्यावर प्रभारी वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी ६१ पदे ही मेडीकल ऑफिसरची रिक्त आहेत. ही सर्व स्पेशॅलिस्ट पदे आहेत. ही पदे मिळत नाहीत. यासंदर्भात वारंवार जाहीरात दिलेली आहे. मेडीकल ऑफिसरची पदे NOHM मधून भरण्यासाठी वेळोवेळी जाहीरात दिली जाते. मेडीकल ऑफिसरची पदे भरली जातात. कालांतराने मेडीकल ऑफिसर हे चांगल्या ठिकाणी पोस्टींग घेऊन गेल्यामुळे येथील पदे रिक्त होत असतात. असे समितीस सांगितले.

समितीने मग हॉस्पिटलचे काम कसे करणार ? अशी विचारणा केली.

त्यावर प्रभारी वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी रिक्त पदे भरण्यासाठी कल्याण डोंबिवली महानगरपालिका आणि NOHM मधून जाहीरात दिलेल्या आहेत. DMER ने तीन वेळा जाहीराती दिलेल्या आहेत. त्यांनी स्पेशल जाहीरात कल्याण डोंबिवली महानगरपालिकेसाठी काढली होती. त्यावेळी देखील आवश्यक ती पदे उपलब्ध होऊ शकली नाहीत.

समितीने जाहीरात दिल्यानंतर वैद्यकीय अधिकारी किंवा वैद्यकीय सुविधा देणारे अधिकारी उपलब्ध होत नसल्याने यासंदर्भात शासनाबरोबर पाठपुरावा केलेला आहे काय ? अशी विचारणा केली.

त्यावर प्रभारी वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्यासाठी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने वेळोवेळी शासनाबरोबर पाठपुरावा केलेला आहे. ८३ पदे खास करुन कल्याण डोंबिवली महानगरपालिकेसाठी मंजूर करण्यात आली होती. त्यानंतर त्याची संख्या ११५ वर गेलेली आहे. ८३ पदे ही जून, २०१५ मध्ये मंजूर झाली होती. त्यापूर्वी ११ कंत्राटी तत्वावर डॉक्टर कार्यरत होते. यानंतर तीन वेळा खास रिक्रुटमेंट केली होती. त्यावेळी यासंदर्भात ऑनलाईन पध्दतीने जाहीरात दिली होती. परंतु, त्यास आवश्यक तेवढा प्रतिसाद मिळालेला नव्हता. वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्यासाठी कल्याण डोंबिवली महानगरपालिका आणि NUHM मार्फत जाहीरात दिली जाणार आहे. असे समितीस सांगितले.

समितीने कोणकोणत्या वर्तमानपत्रात जाहीराती दिलेल्या आहेत ? अशी विचारणा केली असता, त्यावर प्रभारी वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी लोकमत, लोकसत्ता आणि महाराष्ट्र टाईम्स वर्तमानपत्रातून जाहीरात दिली जाते. लेटेस्ट जाहीरात १९ नोव्हेंबर, २०१५ रोजी जाहीरात दिलेली होती. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीत शासनाची हॉस्पिटल्स नाहीत. १२० खाटांचे रुग्णालय आहे. जवळपास ५०० ते ६०० एवढी ओपीडी असते. सर्जिकल डॉक्टरांची संख्या कमी आहे.

समितीने महिला नगरसेविकांकडून सांगण्यात आले होते की, आवश्यक ती औषधे रुग्णालयात उपलब्ध नसतात, याबाबत आपले काय म्हणणे आहे. गायनॉलिजस्ट नाहीत काय ? अशी विचारणा केली.

त्यावर प्रभारी वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी तसे नाही. आवश्यक ती औषधे उपलब्ध आहेत. गायनॉलिजस्ट नाहीत. यासंदर्भात रुग्णांना सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी पॅनॉल केलेले आहे.

समितीने डॉक्टर्स लोकांना किती पगार मिळतो ? अशी विचारणा केली.

त्यावर प्रभारी वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी जवळपास ७० हजार रुपयांपर्यंत पगार मिळतो. ज्यांचे हॉस्पिटल आहे त्यांना पॅनलवर घेतलेले आहे. ते ऑपरेटींग करीत असतात.

समितीने दोन हॉस्पिटल्सची माहिती थोडक्यात द्यावी. कल्याण येथे रुक्मिनी हॉस्पिटल असून शास्त्री नगर डोंबिवली येथे एक हॉस्पिटल आहे. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेची १५ लाख लोकसंख्या असून त्यासाठी फक्त दोन हॉस्पिटल्स आहेत. असे असतानाही हॉस्पिटल्समध्ये पुरेसे डॉक्टर्स उपलब्ध नाहीत. अशी विचारणा केली.

त्यावर आयुक्त कार्पोरेशनच्या हॉस्पिटल्समध्ये डॉक्टरांना ७० ते ८० हजार रुपये पगार मिळतो त्यामुळे येथे येण्यास कोणीही तयार नसतात. आता कार्पोरेशनने चांगल्या डॉक्टरांना निवडून त्यांचे पॅनेल तयार केलेले असून त्यांच्या सर्व्हीसेस कार्पोरेशनच्या हॉस्पिटल्ससाठी घेतल्या जात आहेत. इन्फ्रॉस्ट्रक्चर, रुम्स, ऑपरेशन थिएटर त्यांना उपलब्ध करुन देऊ, असे समितीस सांगितले.

समितीने हॉस्पिटलमध्ये जर गायनॅक डॉक्टर नसतील तर महिलांना कशी सेवा देणार आहात ? अशी विचारणा केली.

त्यावर अतिरिक्त आयुक्त यांनी बीएएमएस झालेले लेडी मेडिकल अधिकारी भरलेले आहेत. मुंबईमध्ये टीचिंग स्टाफ खूप आहे. डॉक्टर्स भरण्यासाठी पुन्हा जाहीरात देऊ.

समितीने हॉस्पिटल्समध्ये साधनसामुग्री आहे का ? हॉस्पिटलमध्ये औषधे मिळत नाहीत अशी काही नगरसेविकांनी समितीकडे तक्रार केली आहे, हे खरे आहे का ? अशी विचारणा केली.

त्यावर दोन हॉस्पिटल्समध्ये दोन मेडिकल स्टोअर्स आहेत. एक्सपायरी रजिस्टर वेगळे ठेवलेले आहे. हाईअर ॲण्टीबॉयोटिक्स उपलब्ध आहे. असे समितीस सांगितले.

समितीने महिला उमेदवारांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या पदासाठी स्वतंत्र नोंदवही (रोस्टर) ठेवण्यात आली आहे काय, असल्यास केव्हापासून ? तसेच ती अद्ययावत स्वरुपात आहे काय, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ? नोंदवही जानेवारी २०१४ मध्ये तपासून घेण्यात आली आहे. अशी विचारणा केली.

त्यावर उपायुक्त यांनी महिलांसाठी मिळणारे आरक्षणासाठी स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात आलेली आहे. मागासवर्ग कक्ष कोकण भवन यांच्याकडून तपासणी करुन महिलांची पदे भरली जातात. दर तीन वर्षांनी रोस्टरची तपासणी करावी असे निर्देश आहेत. असे समितीस सांगितले.

समितीने तुमच्या एकूण किती शाळा आहेत ? अशी विचारणा केली.

त्यावर प्रभारी वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी एकूण ६५ शाळा आहेत.

समितीने मुख्याध्यापकांची ३९० पदे मंजूर असून त्यापेकी २७७ पदे भरलेली आहेत ११५ पदे रिक्त आहेत, शासनाकडे भरतीसाठी कधी मागणी केलेली आहे ? अशी विचारणा केली.

त्यावर उप अभियंता यांनी मुख्याध्यापकांच्या ३९० मंजूर पदांमध्ये २७७ पदे कार्यरत आहेत आणि ११५ पदे रिक्त दाखविली आहेत. शिक्षक भरतीचे अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थांना नाही त्यासाठी शासनाकडे भरतीची मागणी करावी लागते. यावर्षी जुलै महिन्यात बी.एड शिक्षकांची परीक्षा घेणार आहोत.

समितीने मुख्याध्यापकांची ११५ पदे रिक्त असल्यामुळे शालेय शिक्षण विभागाच्या सचिवांची साक्ष घेण्यात आली.

त्यावर उपायुक्त यांनी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत दिनांक १ जानेवारी, २०१७ रोजी कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या ५०९६ आणि महिलांची संख्या १२३३ इतकी आहे असे समितीस सांगितले.

समितीने महिला नगरसेविका आणि कार्यरत असणाऱ्या महिलांसाठी वेगळा कक्ष आहे काय ? अशी विचारणा केली.

त्यावर आयुक्त यांनी महिला नगरसेविका आणि कार्यरत असणाऱ्या अधिकारी, कर्मचारी महिलांसाठी वेगळा कक्ष उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. सदरहू इमारतीच्या प्लॅनचा अभ्यास केल्याअंती महिला नगरसेविका आणि कार्यरत असणाऱ्या अधिकारी, कर्मचारी महिलांसाठी वेगळा कक्ष लवकरात लवकर उपलब्ध करुन देणार आहोत. असे समितीस सांगितले.

समितीने अधिकारी किंवा कर्मचारी महिला भगिनींना हे संयुक्तिक आहे काय ?

डोंबिवली परिसरात राहणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांना तेथील व्यायामशाळेचा उपयोग होऊ शकतो. अशी विचारणा केली.

त्यावर आयुक्त यांनी सदरहू इमारतीच्या प्लॅनचा अभ्यास केल्याअंती व्यायमशाळा कोठे उभारावयाची हे निश्चित केले जाणार आहे. असे समितीस सांगितले.

**बुधवार, दिनांक १२ जुलै, २०१७ रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने समितीला आश्वासित केलेली माहिती :—**

बुधवार, दिनांक १२ जुलै, २०१७ रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने समितीला खालीलप्रमाणे आश्वासित माहिती देण्यात आली.

NUHM अंतर्गत पूर्णवेळ वैद्यकीय आधिकारी ८ पदे आणि अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी १५ पदे भरणेसाठी दि.२/२/२०१८ रोजी जाहीरात देण्यात आली. जाहीरातीनुसार दि.२१/२/१८ राजी थेट मुलाखती घेण्यात आलेल्या असून, मुलाखतीअंती खालीलपुमाणे पदभरती करण्यात आली आहे.

| पदनाम | भरलेली पदसंख्या |
|---|---|
| पूर्णवेळ वैद्यकीय अधिकारी | ७ |
| अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी | ५ |
| प्रयोगशाळा चाचणी तंत्रज्ञ | ८ |
| स्टाफ नर्स | १० |
| औषधनिर्माता | १ |
| सहा. परिचारिका प्रसविका- | ४५ |

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अस्थायी वैद्यकीय अधिकारी यांना कडोंमपा सेवेत सामावून घेण्याबाबतचा अंतिम निर्णय झाल्यानंतर उर्वरित रिक्त पदे व शिल्लक अनुशेष यांचा आढावा घेवुन पद भरती बाबत कार्यवाही करण्यात येईल.

प्रभारी प्रशासन आधिकारी, शिक्षण विभाग यांनी दिनांक २३ मे, २०१८ राजीच्या पत्रान्वये महानगरपालिका अखत्यारीत असलेल्या ६५ शाळा यांना अंतर्गत तक्रार समिती स्थापन करून पुढील योग्य ती कार्यवाही करण्याबाबत आदेशित केले आहे. सर्व शाळामध्ये तक्रार समिती स्थापन करुन समितीची माहिती मुलींना देण्यात आली आहे.

जागे अभावी महापालिका मुख्यालयात महिलांसाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आलेला नाही. याबाबत पर्यायी जागेचा शोध घेवुन स्वतंत्र कक्ष उपलब्ध करून देण्यात येईल.

दिनांक ३ डिसेंबर, २०१६ च्या परिपत्रकान्वये आयुक्तांच्या भेटीसाठी महिन्याचा पहिला, तिसरा व पाचव्या शनिवारी दुपारी ३ ते ४ या कार्यालयीन वेळेत महिला नगरसेविकांसाठी भेटीची वेळ निश्चित केली आहे. सदर परिपत्रकाची अंमलबजावणी करण्यात येते.

**विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांनी खालील प्रमाणे लेखी माहिती दिली :—**

१) वित्त विभागकडील शासन निर्णय दि.२ जून, २०१५ आणि दि.२५ मे, २०१७ अन्वये सद्य:स्थितीत सरळसेवा भरतीवर शासनाकडून निर्बंध लागू आहेत.

२) सामान्य प्रशासन विभागकडील दि.१९ डिसेंबर,२०१७ च्या पत्रान्वये पदोन्नतीच्या कोटयातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुत्या स्वरुपात मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून भरण्याबाबत निर्देश आहेत.

**३)** विघुत, घनकचरा व्यवस्थापन या विभागातील कामे खाजगीकरणाद्वारे करण्यात येत आहेत.

उपरोक्त कारणांमुळे पदे रिक्त आहेत. तथापि, वित्त विभागाकडील शासन निर्णय दि.१६ मे, २०१८ अन्वये सार्वजनिक आरोग्य विभागातील पद भरतीबाबत मान्यता देण्यात आलेली असून सद्यस्थितीत आरोग्य विभागातील पदभरतीबाबत माहीती अ.क्र.२ मध्ये नमूद आहे.

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतील वर्ग-१ ते वर्ग-४ मंजूर पदे, त्यापैकी भरलेली पदे व रिक्त पदे यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.(दि.३१/३/२०१८ अखेर)

| **वर्ग** | **मंजूर पद संख्या** | **कार्यरत पदे** | **रिक्त पदे** |
|---|---|---|---|
| १ | ३२ | १० | २२ |
| २ | १८६ | ८८ | ९८ |
| ३ | १५१४ | ९४१ | ५७३ |
| ३ (शिक्षक व मुख्याध्यापक) | ३४१ | २८७ | ५४ |
| ४ | ११५१ | ७२५ | ४२६ |
| ४ (रोस्टर व्यतिरिक्त कामगार/सफाई कामगार इ.) | ३१८७ | २८८२ | ३०५ |
| **एकूण** | **६४११** | **४९३३** | **१४७८** |

महिला उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या वर्ग १ ते वर्ग ४ मधील कार्यरत व रिक्त पदे

| **वर्ग** | **सरळसेवेची पदे** | **महिलांसाठी राखीव पदे** | **कार्यरत पदे** |
|---|---|---|---|
| १ | १७ | १ | ० |
| २ | १५१ | ४३ | १३ |
| ३ | ९८५ | २७६ | ८७ |
| ३ (शिक्षक व मुख्याध्यापक) | ३९० | ११६ | ९० |
| ४ | ९९१ | २३६ | ४५ |
| ४ (रोस्टर व्यतिरिक्त कामगार/सफाई कामगार इ.) | ३१८७ | २७४ | ६६ |
| **एकूण** | **५७२१** | **९४६** | **३०१** |

जून, २०१५ मध्ये एकूण ६२ पदांची जाहिरात देण्यात आली होती. सदर पदांसाठी लेखी परिक्षा घेण्यात आलेली आहे. महापालिका आस्थापना खर्च ३५ पेक्षा अधिक आहे. वित्त विभाग शासन निर्णय दि. २/६/२०१५ अनुसरुन सदर जाहिरातीमधील पदांची भरती प्रक्रिया अंतिम करण्यात आलेली नाही.

उपरोक्त भरती प्रक्रिया अंतिम करणे कामी नगर विभागाची मान्यता/मार्गदर्शन मिळणेसाठी शासन नगर विकास विभागाकडे पत्र जा.क्र.कडोंमपा/साप्र.मुका/ प्र.क्र.४९८/ ३२९९, दि.२४/१०/२०१६,दि.२२/१२/२०१६, दिनांक ७/१०/२०१७ आणि दिनांक २१/४/२०१८ अन्वये पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. यासंदर्भात शासन मान्यता / मार्गदर्शन प्राप्त झाल्यानंतर उमेदवाराची निवडयादी अंतिम करुन भरती प्रक्रिया पूर्ण करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

कल्याण डोंबिवली महानगरपालिका आस्थापनेवर वेळोवेळी खालीलप्रमाणे शासन निर्णयान्वये वैधकीय अधिकाऱ्यांची एकूण ११५ पदे मंजूर करण्यात आली आहेत.

| अ. क्र. | शासन निर्णय दिनांक | पदसंख्या |
|---|---|---|
| **१)** | दि. १३/९/१९९१ | २७ |
| **२)** | दि. १८/३/२००८ | ५ |
| **३)** | दि. ४/६/२०१५ | ८३ |
| | **एकूण ...** | **११५** |

उपरोक्त प्रमाणे मंजूर पदांमधील असलेली ९० वैद्यकीय अधिकारी विशेषज्ञ पदे भरणेकामी दि.१९/११/२०१५ रोजी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन पात्र उमेवारांकडून अर्ज मागविण्यात आले होते. पात्र उमेदवारांच्या मुलाखतीचा दिनांक, निवड पदे उमेदवार, हजर उमेदवार इत्यादी तपशिल पुढीलप्रमाणे :—

| अ. क्र. | पद | पद-संख्या | मुलाखत दिनांक | मुलाख-तीस बोलवि-लेले संख्या | मुलाख-तीस हजर उमेदार संख्या | निवड/ नियुक्ती उमेद-वार संख्या | नियुक्ती आदेश दिनांक | हजर उमेद-वार संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | विशेषज्ञ वैधकीय अधिकारी | ५० | १६/२/१६ | ५३ | ३९ | २२ | २६/४/१६ | १३ |
| २ | अपघात कक्ष वैधकीय अधिकारी | ११ | २०/७/१६ | १७ | १४ | ११ | १८/१०/१६ | ४ |
| ३ | सामान्य वैधकीय अधिकारी | २९ | २०/०७/१६ | ४८ | २७ | २३ | १८/१०/१६ | १५ |
| | **एकूण** | **९०** | - | **११८** | **८०** | **५६** | - | **३२** |

NUHM अंतर्गत पूर्णवेळ वैधकीय अधिकारी ८ पदे आणि अर्धवेळ वैधकीय अधिकारी १५ पदे आणि आरोग्य विभागातील इतर आवश्यक पदे भरणेसाठी दि. २/२/२०१८ रोजी जाहिरात देण्यात आली. जाहिरातीनुसार दि. २१/१२/२०१८ रोजी थेट मुलाखती घेण्यात आलेल्या असुन, मुलाखतीअंती वैघकीय अधिकारी व आरोग्य विभागातील इतर पदे पुढीलप्रमाणे पदभरती करण्यात आली आहे.

| **पदनाम** | **भरलेली पदसंख्या** |
|---|---|
| पूर्णवेळ वैधकीय अधिकारी | ७ |
| अर्धवेळ वैधकीय अधिकारी | ५ |
| प्रयोगशाळा चाचणी तंत्रज्ञ | ८ |
| स्टाफ नर्स | १० |
| औषधनिर्माता | १ |
| सहा. परिचारिका प्रसविका | ४५ |
| **एकूण** | **७६** |

**१)** सद्य:स्थितीत कडोंमपा आस्थापना सूचीवरील "वैधकीय अधिकारी" ११५ मंजूर पदांमधील ४८ पदे भरलेली असून, ६७ पदे रिक्त आहेत.

**२)** संचालक (वैधकीय), संचालनालय, वैधकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई यांचे कार्यालयाकडून शिफारस करण्यात येणाऱ्यां उमेदवारांना ३६४ दिवस बंधपत्रित कालावधीसाठी वैधकीय अधिकारी म्हणून नियुक्ती देण्यात येते. त्यानुसार सद्यस्थितीत ७ उमेदवार बंधपत्रित वैधकीय अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

**३)** अस्थायी स्वरुपात कंत्राटी पध्दतीने दरमहा एकत्रित मानधनावर २० वैधकीय अधिकारी कार्यरत आहेत.

**४)**याव्यतिरिक्त महापालिका क्षेत्रातील तज्ञ वैद्यकीय मानधनावर २० वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सेवा ऑन कॉल बेसिस तत्वावर उपलब्ध करून घेण्यात येतात.

**५)**उपरोक्त नमूद केल्यानुसार स्थायी-४८, बंध-७, कंत्राटी पध्दतीने अस्थायी स्वरुपात नियुक्त-२० आणि NUHM अंतर्गत पूर्णवेळ / अर्धवेळ - १२ यापमाणे एकूण ८७ वैद्यकीय अधिकारी यांच्या सेवा कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमध्ये सद्यस्थितीत उपलब्ध होत आहेत.

महाराष्ट्र शासन, सामान्य विभाग, शासन परिपत्रक क्र.प्रानिमं १२१८/प्र.क. २७/१३-अ, दि. १४ मार्च, २०१८ अन्वये राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्याशी संबंधित पदभरती प्रक्रिया "महापरिक्षा पोर्टल" द्वारे राबविण्यात शासन निर्देश आहेत. त्यानुसार रिक्त असलेली "वैद्यकीय आधिकारी" पदे भरणेकामी कार्यवाही प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष :—**

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमध्ये कोणत्या कारणामुळे पदे मोठया प्रमाणावर रिक्त ठेवण्यात आली आहेत ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी शासनाच्या वित्त विभागाच्या आदेशाप्रमाणे आस्थापना खर्च हा महसूली उत्पन्नाच्या ३५ टक्क्यांच्या आत असेल तर ती पदे भरण्यास परवानगी आहे. त्यानंतरही काही पदे भरण्याच्या मंजूरीसाठी जाहीराती दिल्या आहेत. असे समितीस सांगितले.

समितीने सदरहू प्रस्ताव पाठवला आहे काय आणि त्यामध्ये काय लिहिले आहे ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी प्रस्ताव नाहीतर सन २०१५ च्या शासन निर्णयाप्रमाणे त्याच दरम्यान काही जाहीराती देऊन भरती केली होती. ती ७८ पदे आहेत आणि यासाठी शासनाने मान्यता द्यावी, अशी परवानगी मागितली आहे. ती पदे शासनाकडे अंतिम मंजुरीच्या स्टेजवर आहे. मोठया प्रमाणात डॉक्टरची पदे रिक्त आहेत. त्यासाठी वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरण्यासाठी परवानगी मिळालेली आहे. शासनाच्या महाराष्ट्र पोर्टल मार्फतच ही सर्व पदे भरण्यासाठी ॲप्रुव्हल झालेले आहे.

समितीने पदे भरण्यासाठी परवानगी मिळाली आहे काय ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी होय, वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरण्यासाठी परवानगी मिळाली आहे. असे समितीस सांगितले.

समितीने वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या पदासाठी परवानगी मिळते तर बाकीच्या पदासाठी का परवानगी मिळत नाही ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी महापालिकेच्या उत्पन्नाच्या ३५ टक्के एवढा आस्थापना खर्च असतो. त्यापुढे जर आस्थापना खर्च वाढत असेल तर ती पदे भरती करण्यासाठी शासनाची मान्यता लागते किंवा अट शिथिल करण्यासाठी शासनाकडे यावे लागते. नाही, कारण वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरण्यासाठी मान्यता दिलेली आहे. असे समितीस सांगितले.

समितीने कधी मान्यता दिली आहे ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी वित्त विभागाकडे शासन निर्णय सन २०१८ अन्वये सार्वजनिक आरोग्य विभागातील पद भरतीबाबत मान्यता देण्यात आली आहे. शासनाने आता कोणतीही भरती करायची असेल तर महाराष्ट्र शासनाचे एक पोर्टल केले आहे. त्यांच्यामार्फतच भरावयाची असल्यामुळे त्यांच्याकडे अप्रोच झालो आहोत. जेव्हा जेव्हा भरती करतो तेव्हा तेव्हा त्याला फार कमी प्रतिसाद मिळतो आणि निवड झालेले उमेदवार आल्यानंतर नोकरी सोडून जाण्याचे प्रमाण भरपूर असते. असे समितीस सांगितले.

समितीने असे का घडते ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी कारण त्यांना इतर ठिकाणी याच्यापेक्षा चांगला प्रॉस्पेक्ट मिळत असेल. त्यांच्या खासगी काही प्रॅक्टीस असू शकतात.

समितीने त्यामुळे मानधन कमी देतो काय ? अशी विचारणा केली.

विभागीय अधिकारी यांनी कमी देत नाही. शासनाच्या नियमाप्रमाणे सर्वत्र पे स्केल सारखेच आहे. असे समितीस सांगितले.

**अभिप्राय व शिफारशी :—**

समितीने कल्याण डोंबिवली महानगरपालिकेला दिनांक १२ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने आणि दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ रोजी घेतलेल्या सचिवांच्या साक्षीच्या वेळी शासकीय, निमशासकीय व शासनानुदातील संस्थांमधील सेवेतील भरतीसाठी महिलाकरिता ३०% जागा आरक्षित ठेवण्याच्या धोरणांची अंमलबजावणी महानगरपालिकांच्या सेवेमध्ये भरती करताना करण्यात येते काय ? असल्यास त्याबाबतचे निकष, भरतीची पध्दत, महानगरपालिकेतील वर्ग १ ते ४ तांत्रिक व अतांत्रिक अधिकारी व कर्मचारी यांची मंजूर पद संख्या नुसार त्यापैकी सन २०१५-१६ अखेर किती पदे का भरण्यात आली नाहित ? महिला उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या वर्ग १ ते ४ मधील पदांपैकी एकूण किती पदे भरण्यात आली आहेत व किती व कोणकोणती पदे रिक्त आहेत, तसेच सदरची पदे रिक्त राहण्याची कारणे

काय आहेत ? प्रत्येक भरती वर्षामध्ये महिलांसाठी आरक्षित असलेली किती पदे भरण्यात आली ? तसेच किती व कोणती पदे रिक्त आहेत, सदरहू पदे रिक्त राहण्याची कारणे काय आहेत ? महानगरपालिकेतील विविध पदावर महिला उमेदवारांच्या नियुक्ता करण्याबाबत महानगरपालिकेने सेवाप्रवेश नियमावली तयार केली आहे काय ? महिला अमेदवारांसाठी राखीव असलेली पदे भरण्यासाठी गत तीन वर्षात (सन २०१३-१४,२०१४-१५ व२०१५-१६) वर्षनिहाय किती वेळा व कोणकोणत्या तारखांना वर्तमानपत्रात कोणकोणती पदे भरण्यासाठी जाहिराती देण्यात आल्या होत्या ? अशी विचारणा केली असता, महानगरपालिकेचे आयुक्त यांनी अशी माहिती दिली की, महानगरपालिकेची स्थापना झाल्यापासून आजपर्यंत सेवेत एकूण ६४८८ इतके अधिकारी व कर्मचारी कार्यरत असून त्यापैकी महिला अधिकारी यांची संख्या १२३३ इतकी आहे. तसेच शासन निर्णयाप्रमाणे भरती प्रक्रियामध्ये सरळसेवेने भरती करताना करण्यात येते. कल्याण-डोंबिवली शहर महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१० मध्ये, त्यानूसार भरती प्रक्रियेसंदर्भातील शासन निर्णय दि.१९/१०/२००७ तसेच तदनंतर वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयांमध्ये विहित केलेली कार्यपध्दती महानगरपालिकेत अमलात आणण्यात येत आहे. दिनांक १ जानेवारी, २०१७ रोजी कार्यरत असणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची संख्या ७ आहे. परंतु, यामध्ये १ जानेवारी, २०१७ पर्यंत कार्यरत महिला व अधिकारी यांची संख्या शून्य दाखविली आहे, अशी विचारणा केली.

त्यावर उपायुक्त यांनी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत एकूण १७ संवर्ग आहेत. कार्यकारी अभियंता संवर्गात एकूण ११ पदे मंजूर आहेत. सरळसेवेने त्यामधील ५ पदे येतात आणि ३० टक्के आरक्षणानुसार महिलांसाठी एक पद येते. इतर संवर्गात एकाकी पदे असल्यामुळे किंवा ३ पेक्षा कमी पदे असल्याने महिलांसाठी पद आरक्षित नाही. असे समितीस सांगितले. समितीने वैद्यकिय अधिकाऱ्यांची ११५ पदे मंजूर आहेत. सरळसेवेत येणारी ११५ पदे आहेत. ५४ पदे भरण्यात आलेली असून ती कार्यरत आहेत. यात प्रकल्पग्रस्तांची ८ पदे येतात. **कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमध्ये रिक्त पदांची संख्या जास्त असून ती अद्यापर्यंत का भरण्यात आली नाहीत याबाबत शासनासोबत वेळोवेळी पाठपुरावा का करण्यात आला नाही याबाबत कल्याण डोंबिवली महानगरपालिकेला कोणतीच उत्तरे देता आली नाहीत याबाबत समिती तीव्र नाराजी व्यक्त करते आणि रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कारवाई करून त्वरीत मंजूरी देवून महिन्यांकरिता सदर रिक्त पदे लवकरात लवकर भरण्याबाबत कारवाई करावी. अशी समिती आग्रहाची शिफारस करीत आहे.**

मेडिकल ऑफीसर्सची एकूण ८३ पदे कल्याण डोंबिवली महानगरपालिकेसाठी मंजूर करण्यात आली होती. त्यानंतर त्यांची संख्या ११५ वर गेली आहे. ८३ पदे ही जून, २०१५ मध्ये मंजूर झाली होती. यांनतर ३ वेळा भरती केली होती. त्यावेळी ऑनलाईन पध्दतीने जाहिरात दिली, परंतु योग्य तेवढा प्रतिसाद मिळाला नाही. वैद्यकिय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्यासाठी कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी राष्ट्रीय शहरी स्वास्थ मिशन मार्फत जाहिरात दिली

जाणार आहे. असे समितीस सांगितले. समितीने साक्षीच्या वेळी माहितीच्या अनुषंगाने कल्याण डोंबिवली महानगरपालिका रुग्णालयाच्या रिक्त पदांबाबत तसेच साधनसामुग्री व दोन्ही रुग्णालयामध्ये किती डॉक्टर कार्यरत आहेत व गॉयनाक डॉक्टर नसतील तर महिलांना सेवा कशी देणार अशी विचारणा केली असता, त्यावर आयुक्त यांनी बीएएमएस झालेले व लेडी मेडिकल डॉक्टरांची भरती केली आहे. असे समितीस सांगितले. या बाबत समिती समाधान व्यक्त करते.

**कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेध्ये ६५ शाळा असून मुख्याध्यापकांची ३९० पदे मंजूर असून त्यापैकी २७७ पदे भरलेली आहेत. त्यापैकी ११५ पदे रिक्त आहेत. मुख्याध्यापकांची पदे रिक्त असल्यामुळे विद्यार्थीनींच्या शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होवू शकतो. शाळेवर योग्य नियंत्रण ठेवण्यासाठी मुख्याध्यापकांची रिक्त पदे लवकरात लवकर भरण्यात यावी अशी समिती शिफारस करीत असून शासनाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला २ महिन्यात पाठविण्यात यावा.**

**२.२ कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे गत ३ वर्षातील वर्षनिहाय अंदाजपत्रक :—**

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे गत तीन वर्षातील वर्षनिहाय सन २०१३-१४, २०१४-१५ व २०१५-१६ मधील वार्षिक अंदाजपत्रक किती रक्कमेचे आहे ? शासन धोरणानुसार प्रत्येक महानगरपालिकेत महसूली व आस्थापना खर्च वगळून एकूण अंदाजपत्रकाच्या ५ टक्के निधी महिला व बालकल्याण विभागासाठी राखून ठेवण्यात येतो. त्या अनुषंगाने आपल्या महानगपालिकेत मागील ३ वर्षात सदरहू ५ टक्के निधी कसा खर्च करण्यात आला आहे ? महानगरपालिकेमार्फत महिलांचे सबलीकरण करण्याकरिता तसेच आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या महिलांना सक्षम करण्याकरिता देण्यात येणाऱ्या सोई-सवलती इ. योजनांबाबत माहिती देण्यात यावी. उक्त योजनांवर सन २०१३-१४, २०१४-१५ व २०१५-१६ या ३ वर्षात व वर्षनिहाय व योजनानिहाय एकूण किती खर्च झाला ? महानगरपालिकेच्या एकूण उत्पन्नाच्या किती टक्के रक्कम महिलांसाठी कल्याणकारी योजना राबविण्याबाबत खर्च करण्यात येते ? महिला उद्योजकांसाठी विशेषत: आर्थिकदृष्ट्या मागास महिला उद्योजकांसाठी उद्योगधंदे उभारण्याकरिता महानगरपालिकेमार्फत विशेष सोई सवलती देण्यात येतात काय ? असल्यास, त्याबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी. सदर मार्केट / मंडई / बाजार इ. मधील गाळे वाटपाचे निकष काय आहेत ? सदर मार्केटस मधील काही गाळे महिलांकरिता राखून ठेवले जातात काय ? असल्यास, किती प्रमाणात आणि गाळे वाटपात महिलांना काही सवलती देण्यात येतात काय ? त्याबाबत माहिती

देण्यात यावी. महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या महिलांच्या कल्याणकारी योजना व सोई सवलती इ. बाबतची माहिती गरजू महिलांपर्यंत पोहचविण्याचे व त्यांनी या योजनांच्या जास्तीत जास्त लाभ घ्यावा यासाठी त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी स्वतंत्र अशी यंत्रणा महानगरपालिकेकडे आहे काय ? महानगरपालिकेमध्ये महिला नगरसेविकांसाठी व महिला कर्मचाऱ्यांसाठी वेगळा कक्ष राखून ठेवण्यात आला आहे काय ? महानगरपालिकेत महिला व बाल कल्याण अधिकारी हे पद आहे काय ? असल्यास त्याची कार्यकक्षा काय आहे ? महिला आरोग्याबाबत महानगरपालिकेमार्फत कोणत्या कल्याणकारी योजना राबविण्यात येतात याबाबत सविस्तर माहिती द्यावी. अशी विचारणा केली.

**उपरोक्त प्रकरणी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली :—**

अ) महानगरपालिकेचे गत तीन वर्षातील वर्षनिहाय अंदाज खालीलप्रमाणे आहे.

(रु. कोटीत)

| सन | मूळ अंदाज | | सुधारीत अंदाज | |
|---|---|---|---|---|
| | जमा | खर्च | जमा | खर्च |
| २०१३-१४ | १५०८.७९ | १५०८.६८ | ११६३.९६ | १०६१.०९ |
| २०१४-१५ | १५९८.८० | १५९८.६९ | ११३१.५९ | १००७.५८ |
| २०१५-१६ | १५३५.७८ | १५३५.६३ | ११३५.९१ | १०५४.३२ |

ब) शासन धोरणानुसार आस्थापना खर्च व महिला व बालकल्याण विभागाकरिता राखून ठेवण्यात आलेला निधी खालीलप्रमाणे आहे.

(रु. कोटीत)

| सन | महसुली व आस्थापना खर्च वजा जाता निव्वळ उत्पन्न | महिला व बालकल्याण विभागाकरीता राखून ठेवण्यात आलेला निधी | |
|---|---|---|---|
| | | मूळ | सुधारीत |
| २०१३-१४ | १००.९३ | ९.४० | ६.९२ |
| २०१४-१५ | २१४.९४ | ७.१५ | ५.७२ |
| २०१५-१६ | १८८.०४ | ९.५० | ६.०० |

या योजने अंतर्गत महिलांचे सबलीकरण करणे आणि आर्थिकदृष्टया मागास असलेल्या महिलांना सक्षम करण्याकरिता जुन, २०१६ मध्ये ३७२ महिलांना शिलाई मशिनचे वाटप करणेत आले आहे. २) गेल्या ३ वर्षा पासून एमएससीआयटी चे प्रशिक्षण ३५० महिलांना आणि डीटीपीचे प्रशिक्षण १५० महिलांना देण्यात आलेले आहे. ३) याशिवाय शिवणक्लास, ब्युटीपार्लरचे देखील प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.

उक्त योजनांवर महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे खर्च करण्यात आलेला आहे.

| सन | खर्च (रुपये लाखात) |
|---|---|
| २०१३-१४ | ३७.९९ |
| २०१४-१५ | १२५.६७ |
| २०१५-१६ | ४२.४५ |

शासन निर्णयानुसार बांधील खर्च वजा जाता निव्वळ उत्पन्नाच्या ५% रक्कम महिला व बालकल्याण विभागाकरिता राखून ठेवली जाते.

(अ) महिला उद्योजकांसाठी विशेषत: आर्थिकदृष्ट्या मागास महिला उद्योजकांसाठी उद्योगधंदे उभारण्याकरिता विशेष सोई सवलती नियमानुसार अनुज्ञेय नाहीत.

(ब) (१) महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिकेच्या मालकीचे मंडई/ बाजार (मार्केटस) यांची संख्या एकूण १३ आहे. त्यापैकी ७ मंडया/मार्केटस मालमत्ता विभागाच्या अखत्यारित असून ४ मार्केट व परवाना विभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत आहेत. सदर मंडई/बाजारांमध्ये फुल विक्री/भाजी विक्री/मासळी विक्रीचा व्यवसाय केला जातो. प्रत्येक मार्केटचे नांव व त्यांमधील ओटे/ गाळे याबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

मालमत्ता विभागाच्या अखत्यारितील मंडया/मार्केट यांची माहिती.

| अ. क्र. | मंडया/मार्केटचे नाव | एकूण ओटे/गाळे |
|---|---|---|
| १) | संत सावतामाळी भाजी मंडई, कल्याण | २०१ |
| २) | कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती, फुल/भाजी मंडई. | ५६४ |
| ३) | अहिल्याबाई चौक भाजी मंडई | ३५ |
| ४) | टिळक चौक भाजी मंडई | १६ |
| ५) | महात्मा फुले मटन /फिश मार्केट, कल्याण प. | ३८ |
| ६) | छत्रपती शिवाजी मंडई, डोंबिवली | ४२ |
| ७) | उर्सेकरवाडी पहिला मजला भाजी मंडई डोंबिवली | १ |

बाजार व परवानाविभागाअंतर्गत कार्यरत मंडई / बाजार (मार्केटस) यांची माहिती

| अ. क्र. | मंडया/मार्केटचे नाव | एकूण ओटे/गाळे |
|---|---|---|
| १) | मटण मासळी मार्केट, म.फुले चौक, छाया टॉकीज जवळ, कल्याण प. | ४६ (६ बंद) |
| २) | मटण मासळी मार्केट, विष्णुनगर पोलीस स्टेशन समोर, डोंबिवली प. | ८६ |
| ३) | नवीन, मंडई, उर्सेकरवाडी, डोंबिवली पू | ११४ |
| ४) | कांतास्मृती इमारतीमधील मच्छी व भाजीमाकेटमधील ओटे | एकूण ५० पैकी २० ओटे वितरित |

**मालमत्ता विभाग**

सदर मार्केट / मंडई /बाजार इ. मधील गाळे वाटपाकरिता अर्जदार महानगरपालिका क्षेत्रातील रहिवासी असण्याबाबतचा निकष ठेवण्यात आलेला आहे.

**बाजार व परवाना विभाग :—**

बाजार व परवाना विभागाअंतर्गत गाळे वाटपाबाबत कोणतेही विशिष्ट निकष नाहीत. मालमत्ता विभागाकडील काही गाळे शासनाच्या धोरणानुसार महिलांकरिता राखून ठेवले जातात. गाळे वाटपात महिलांकरिता सवलती देण्यात येतात. परंतु बाजार व परवाना विभागाकडील मार्केटस मधील गाळे महिलांकरिता राखून ठेवण्यात येत नाहीत अथवा सवलती देण्याबाबतही त्या विभागास कोणतेही अधिकार नाहीत.

**१) मालमत्ता विभाग :—**

| अ. क्र. | मार्केट नाव | महिलांना वितरीत केलेले |
|---|---|---|
| **१)** | संत सावतामाळी भाजी मंडई, कल्याण | ६३ |
| **२)** | कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती, फुल / भाजी मंडई | ९६ |
| ३) | अहिल्याबाई चौक भाजी मंडई | १२ |
| ४) | टिळक चौक भाजी मंडई | ११ |
| ५) | महात्मा फुले मटन/फिश मार्केट, कल्याण (प.) | १ |
| ६) | छत्रपती शिवाजी मंडई, डोंबिवली | ९ |
| ७) | उर्सेकरवाडी पहिला मजला भाजी मंडई डोंबिवली | १ |

**२) मार्केट व परवाना विभाग :—**

| अ. क्र. | मार्केट नाव | महिलांना वितरीत केलेले |
|---|---|---|
| १) | मटण मासळी मार्केट, म.फुले चौक, छाया टॉकीज जवळ, कल्याण प. | ३१ |
| २) | मटण मासळी मार्केट, विष्णुनगर पोलीस स्टेशन समोर, डोंबिवली प. | ३३ |
| ३) | नवीन मंडई, ऊर्सेकरवाडी, डोंबिवली पु. | ३६ |
| ४) | कांतास्मृती इमारतीमधील मच्छी व भाजीमार्केटमधील ओटे | १४ |

महानगरपालिकेच्या कल्याणकारी योजनांची माहिती गरीब व गरजू महिलांपर्यंत पोहचविणे व त्यांना प्रोत्साहीत करणेकरीता महापालिकेमध्ये महिला व बालकल्याण विभाग कार्यरत आहे. त्याचप्रमाणे महानगरपालिका सदस्यांची माहिती वर्तमान पत्रात जाहिरात देऊन, मोक्याच्या ठिकाणी फलक लावून त्याचप्रमाणे महानगरपालिका संकेतस्थळावर योजनांची माहिती प्रसिध्द करुन विविध योजनांची माहिती महिलांपर्येत पोहचविली जाते.

महानगरपालिकेमध्ये महिलांसाठी असलेल्या योजनांचे मूल्यमापन करण्यात आलेले नाही. महिलांच्या कल्याण करीता राबविण्यात येणाऱ्या योजना व त्यांना देण्यात येणाऱ्या सोईसवलती इ.बाबत महापालिकेला केंद्र व राज्य शासनाकडून वेगळे असे अनुदान अद्याप मिळालेले नाही. त्यामुळे सन २०१३-१४, २०१४-१५, व २०१५-१६ या तीन वर्षाची माहिती निरंक आहे.

महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तू विक्री करीता महापालिका क्षेत्रात दिनदयाळ अंत्योदय योजना, राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियाना अंतर्गत नागरी उपजिविका केंद्र (CLC) स्थापन करणे बाबत शासन आदेश आहेत. नागरी उपजिविका केंद्र (CLC) केंद्र महापालिका क्षेत्रात अद्यात पर्यंत सुरु झालेले नाही.

महानगरपालिकेत महिला नगरसेविकांसाठी व महिला कर्मचाऱ्यांसाठी वेगळा कक्ष राखून ठेवण्यात आलेला नाही.

महानगरपालिकेच्या शासनमान्य आस्थानासूचीवर 'महिला व बाल कल्याण अधिकारी' हे पद मंजूर नाही, तथापि महिला व बालकल्याण विभागाअंतर्गत ज्या विविध योजना राबविण्यात येतात त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी उप आयुक्त (महिला व बालकल्याण) हे वर्ग-१ चे अधिकारी कार्यरत आहेत.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत महिला आरोगयाबाबत खालील कल्याणकारी योजना राबविण्यात येतात.

१) जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम (JSSK)

२) जननी सुरक्षा योजना (JSY)

३) फॅमिली प्लॅनिंग कार्यक्रम (FP)

महानगरपालिकेच्या अखत्यारित प्राथमिक (–) ६५ व माध्यमिक (–) २ शाळा आहेत. प्राथमिक शाळांमध्ये एकूण २७० शिक्षक कार्यरत असून माध्यमिक शाळांमध्ये एकूण ७ शिक्षक कार्यरत आहेत. शिक्षण मंडळ दि. १ जानेवारी २०१६ रोजी महानगरपालिकेत समाविष्ट झाले असून शिक्षण विभाग हा एक विभाग म्हणून अस्तित्वात आला आहे.

शिक्षण विभागातील शिक्षक संवर्गातील पदे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्याकडून मागणीनुसार उपलब्ध करुन देण्यात येतात. ३० टक्के आरक्षणानुसार यामध्ये महिला भरती करण्यात येते.

**कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या आयुक्त यांची साक्ष :—**

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेला, मंगळवार, दिनांक १२ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी आयुक्त यांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने महिला नगरसेविकांनी सभेमध्ये बोलू दिले जात नाही, अशी तक्रार केलेली आहे. शिपाईपेक्षा देखील निकृष्ट दर्जाची वागणूक दिली जात असल्याची सर्वपक्षीय महिला नगरसेविकांनी तक्रार केलेली आहे. ही अतिशय गंभीर बाब आहे. बजेटचा निधी कोठे जातो ? वरिष्ठ नगरसेवकांना ४ ते ५ टर्म झालेली आहेत असे नगरसेवक रिंग-सिस्टिमने टेंडर मॅनेज करतात ही बाब खरी आहे काय ? सदर महानगरपालिकेत अधिकारी आणि नगरसेवकांची गोल्डन गँग कार्यरत आहे, अशी देखील तक्रार केलेली आहे. ज्या कर्मचाऱ्यांना साफसफाई करण्याचा ठेका दिलेला आहे, असे कर्मचारी महिला नगरसेविकांना दम देतात. सफाई होत नाही, किती कर्मचारी कार्यरत आहे अशी विचारणा महिला नगरसेविकांनी केली असता त्यांना उडवाउडवीची उत्तरे दिली जातात. आयुक्त भेटीसाठी वेळ देत नाही, अशी देखील तक्रार केलेली आहे. महिला नगरसेविकांना प्रशिक्षण दिले जात नाही. निधी किती मिळतो, कामकाज कसे करावे, याबाबतचे कोणतेही प्रशिक्षण दिलेले नाही. बजेटमधून महिला व बाल कल्याण विभागासाठी ५ टक्के निधी दिला जातो. परंतु, जर त्यामधून महिलांच्या कल्याणासाठी एकही योजना राबविली जात नसेल तर ही अतिशय गंभीर बाब म्हणावी लागणार आहे. महिला नगरसेविकांनी मतदारसंघात एकही विकास कामे होत नाहीत, असे समितीला लिहून दिलेले आहे. ही बाब खरी आहे काय ? अशी विचारणा केली.

त्यावर आयुक्त यांनी साफसफाईबाबतचा आढावा घेतलेला आहे. यामध्ये अनेक प्रश्न आहेत. तत्कालीन आयुक्तांनी महिला नगरसेविकांसाठी शनिवारी भेटण्यासाठीची वेळ निश्चित केलेली आहे. त्याची अंमलबजावणी करणार आहे.

समितीने महिला व बाल कल्याण विभागामार्फत कोणत्या योजना राबविला जातात किंवा कोणती कामे केलेली आहेत ? अशी विचारणा केली.

त्यावर सहाय्यक आयुक्त यांनी महिला नगरसेविकांना यावर्षी SNDT मार्फत प्रशिक्षण देण्याबाबतची कार्यवही करीत आहोत. असे समितीस सांगितले.

समितीने कार्यवाही करीत आहोत असे म्हटले जात आहे. दोन वर्षापूर्वीपासून प्रशिक्षण का दिले नाही, प्रश्न आहे. आपल्याविरोधात समितीने कारवाई का करु नये ? घटनेने महिलांना ५० टक्के आरक्षण दिले आहे. नवनिर्वाचित महिला नगरसेविकांना प्रशासनाच्या कामकाजाबाबतचे प्रशिक्षण का दिले नाही ? लोकल गर्व्हमेंट, यशदामार्फत प्रशिक्षण का दिले नाही ? महिला नगरसेविकांचा आवाज दाबला जात असून, ही अतिशय गंभीर घटना आहे. महानगरपालिकेत केव्हापासून कार्यरत आहात ? अशी विचारणा केली.

त्यावर सहाय्यक आयुक्त यांनी सदरहू महानगरपालिकेत कार्यरत होऊन ११ महिन्यांचा कालावधी झालेला आहे. यापूर्वी रायगड येथील नगरपरिषदेत मुख्याधिकारी म्हणून कार्यरत होतो. प्रशिक्षण घेतले नाही हे कबूल करीत आहे. असे समितीस सांगितले.

समितीने नवनिर्वाचित महिला नगरसेविकांना प्रशासनाच्या कामकाजाबाबतचे प्रशिक्षण का दिले नाही ? महिला व बाल कल्याणमधून कोणकोणती कामे घेतली जातात, याबाबतची माहिती नाही. महिला व बाल कल्याण समितीचे काम पहात असून सभापतींसमवेत आतापर्यंत किती वेळा बैठका घेतलेल्या आहेत ? अशी विचारणा केली.

समितीने सहाय्यक आयुक्त यांनी यावर्षी समिती स्थापन केलेली आहे. यावर्षात आतापर्यंत ४-५ बैठका झालेल्या आहेत. ३९ बाबींसंदर्भात महिला व बाल कल्याण समिती खर्च करण्यासाठी कार्यवाही करीत आहोत, असे समितीस सांगितले.

समितीने पुढे समितीला सन २०१६-२०१७ मधील महसुली खर्च, आस्थापना खर्चाबाबत माहिती द्यावी, तसेच बजेट किती होते याबाबतची देखील माहिती द्यावी ? महसुली खर्च आणि आस्थापना खर्च वगळून किती खर्च झालेला आहे ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्य लेखा अधिकारी यांनी सन २०१६-२०१७ च्या बजेटमध्ये २०७८ कोटी कर्ज रुपये होते. २०८९ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. सन २०१६-२०१७ मधील प्रत्यक्ष उत्पन्न आणि मागील सर्व खर्च वगळून १९८ कोटी रुपये होते. असे समितीस सांगितले.

समितीने १९८ कोटी रुपयांपैकी महिला व बाल कल्याण विभागासाठी ५ टक्केनुसार किती राखीव निधी येतो ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्य लेखा अधिकारी यांनी महिला व बाल कल्याण विभागासाठी ५ टक्केनुसार १० कोटी रुपयांचा राखीव निधी येतो. असे समितीस सांगितले.

समितीने १० कोटी रुपये महिला व बाल कल्याणामधील कोणत्या योजनांवर आणि कसा खर्च केला, उर्वरीत शिल्लक निधी किती आहे, याबाबतची माहिती समितीला द्यावी ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्य लेखा अधिकारी यांनी सन २०१६-२०१७ मधील एकूण खर्च महसुलीमध्ये १२२.२९ लक्ष रुपये, भांडवलीमध्ये ५२.१९ लक्ष रुपये आहे. असे समितीस सांगितले.

समितीने महिला व बाल कल्याण विभागासाठी निधी किती आहे ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्य लेखा अधिकारी यांनी महिला व बाल कल्याण विभागासाठी १०.८० कोटी रुपये ठेवलेला आहे. असे समितीस सांगितले.

समितीने १०.८० कोटी रुपयांमध्ये महिला व बाल कल्याणामधील कोणत्या योजनांवर कसा खर्च केला, उर्वरीत शिल्लक निधी किती आहे, याबाबतची माहिती समितीला द्यावी ? अशी विचारणा केली.

त्यावर सहाय्यक आयुक्त यांनी सन २०१६-२०१७ मध्ये जागतिक महिला दिन साजरा केलेला आहे. महिलांसाठी हळदी कुंकु आणि समाज प्रबोधनाचे कार्यक्रम घेण्यात आले होते. सदस्यांसाठी राजस्थानचा दौरा आयोजित केलेला होता.

समितीने महानगरपालिका क्षेत्रातील गरीब व गरजू महिलांना शिलाईचे वाटप हे महिला नगरसेविकांच्या वॉर्डात केलेले आहे की, सर्वच नगरसेवकांच्या वॉर्डात केलेले आहे ? शिलाई मशिनचे वाटप वॉर्डातील नगरसेवकांना विश्वासात घेऊन केलेले आहे काय ? अशी विचारणा केली.

त्यावर सहाय्यक आयुक्त यांनी यासंदर्भात सर्व नगरसेवकांकडून माहिती मागविली होती. त्याच्या आधारे सर्वांना शिलाईचे प्रशिक्षण दिले होते. प्रक्षिशण पूर्ण झालेल्या जवळ जवळ १७१ लाभार्थी महिलांना शिलाई मशिनचे वाटप केले होते. यासंदर्भात सर्व नगरसेवकांकडून माहिती मागविली होती आणि त्यानंतर पुढील कार्यवाही केली होती. बालवाडीमधील बालकांना आवश्यक त्या साहित्याचे (दप्तर, पाटी, गणवेश, कंपास, वॉटर बॅग ) वाटप केलेले आहे.

समितीने हे सर्व साहित्य शिक्षण विभागाच्या माध्यमातून दिले जाते ? महिला व बाल कल्याण विभागातून शिक्षणासाठी खर्च कसा केला जातो ? बालवाडी मधील बालकांना खाऊचे वाटप केले असेल तर ते मान्य केले जाईल. शासन निर्णयानुसार १७ ते १८ हेड आहेत. त्यानुसार निधी खर्च करणे अभिप्रेत आहे. या ठिकाणी शिक्षणासाठी खर्च केलेला असून, तो चुकीचा आहे. अशी विचारणा केली.

त्यावर सहाय्यक आयुक्त यांनी एकूण ६४ शाळा आहेत. शिक्षण विभागाच्या बजेट हेडमधून शालेय साहित्याचे वाटप केले जाते. जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा आयोजित केली होती.

समितीने जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा आयोजित करण्यासाठी क्रीडा विभागाचा निधी का वापरला जात नाही ? जनतेच्या हिताच्या दृष्टीकोनातून महिलांसाठी योजना राबविणे आवश्यक आहे. जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांकडून जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा आयोजित करण्यासाठी निधी महानगरपालिका मिळतो. हा निधी का वापरला नाही ? अशी विचारणा केली.

त्यावरी सहाय्यक आयुक्त यांनी महानगरपालिका क्षेत्रातील महिलांसाठी तपासणी शिबिर आयोजित केले होते. परंतु, त्यासाठी म्हणावा तसा प्रतिसाद मिळालेला नव्हता. दवाखाना आणि नागरी आरोग्य केंद्रासाठी महिला व बाल कल्याण विभागामार्फत इलेक्ट्रॉनिक उपकरणे उपलब्ध करुन दिली आहेत. दवाखाना आणि नागरी आरोग्य केंद्रासाठी महिला व बाल कल्याण विभागामार्फत वॉटर प्युरिफाय, फ्रिज दिले आहेत.

समितीने शासनाच्या दिनांक ८ नोव्हेंबर, २०१० च्या जी.आर. मध्ये १५ निकष दिलेले आहेत. महिलांच्या कल्याणासाठी ५ टक्के राखीव निधी ठेवण्याची तरतूद आहे. हा निधी खर्च करण्यासाठी १५ निकष दिलेले आहेत. याप्रमाणे सदरचा निधी खर्च केला पाहिजे. महिला बालकल्याणाच्या निधीबाबत महिला नगरसेवकांना काहीही माहीत नाही. समितीने महिला नगरसेविकांना सांगितले की, तुम्हाला मार्गदर्शन करण्याचे काम अधिकाऱ्यांचे आहे. एखाद्या नगरसेविकेने आपणहून एखादे काम सांगितले असेल तर ते शासनाच्या जी.आर. मध्ये बसते की नाही हे पाहण्याची जबाबदारी अधिकाऱ्यांवर असते. ही कमिटी महिलांच्या उत्थानासाठी स्थापन झालेली आहे. महिलांसाठी ज्या योजना राबविल्या जातात, त्या व्यवस्थित राबविल्या जातात की नाही, हे पाहण्याचे काम या समितीचे आहे, परंतु हा निधी अन्य विभागामध्ये वापरणार असाल तर ते चुकीचे आहे. अशा सूचना समितीने महानगरपालिकेला केल्या.

समितीने महिला व बालकल्याणासाठी निधी का वापरला नाही ? समितीने महिला व बालकल्याणाच्या १५ योजना कोणत्या आहेत, हे तुम्हाला माहीत आहे काय ? अशी विचारणा केली.

त्यावर सहाय्यक आयुक्त यांनी महिलांना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. असे समितीस सांगितले.

समितीने महिला व बालकल्याणासाठी १०.८० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. यापैकी किती रक्कम खर्च केली ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्य लेखा अधिकारी यांनी १.७४ कोटी रुपये खर्च केले आहेत. असे समितीस सांगितले.

समितीने ९ कोटी रुपये कोठे वापरले ? १० कोटी ८० लाख रुपयांपैकी १ कोटी ७० लाख रुपये खर्च केले आहेत. उर्वरित निधी कोठे वर्ग केला ? महिलांच्या कल्याणासाठी निधी वापरला जात नाही येथील बऱ्याच महिला नगरसेविकांनी तक्रारी केल्या आहेत. त्यांचे म्हणणे अधिकारी

गांभीर्याने घेत नाहीत. महसुली खर्च, मूळ निधी आणि सुधारित निधी यामध्ये काय फरक आहे ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्य लेखा अधिकारी यांनी सुरुवातीला बजेट तयार केले आणि सुधारित करुन ते फायनल केले. असे समितीस सांगितले.

समितीने सन २०१३-२०१४ मध्ये ३७.०० लाख रुपये खर्च केला आहे. तरतूद मात्र कोटी रुपयांमध्ये आहे. सन २०१४-२०१५ मध्ये महसुली व आस्थापना खर्च वजा जाता मूळ तरतूद ७ कोटी १५ लाख रुपये करण्यात आली होती, परंतु त्यानंतर सुधारित तरतूद ५.७२ कोटी रुपये करण्यात आली. खर्च मात्र १२५ .६७ लाख रुपये करण्यात आला.

त्यावर सहाय्यक आयुक्त यांनी सन २०१४-१५ मध्ये २४४.६६ लाख रुपये खर्च केलेले आहेत. असे समितीस सांगितले.

समितीने सन २०१६-२०१७ मध्ये फक्त १ कोटी ७४ लाख रुपये खर्च केलेले आहेत. बाकीचे पैसे कोठे वर्ग केले ? ही सर्व परिस्थिती पाहता महिलांच्या कल्याणार्थ पैसे वापरले नाहीत असे दिसून येते. ५ टक्के निधी महिलांसाठी का वापरला नाही ? महिला बचत गटांना प्रशिक्षण का दिले नाही, तसेच महिला बचत गटांनी तयार केलेल्या मालाची विक्री करण्याकरिता त्यांच्यासाठी कुठल्याही सोई सवलती दिलेल्या नाहीत. अशी विचारणा केली.

त्यावर सहाय्यक आयुक्त यांनी महिला भवनाच्या दुरुस्तीचे काम चालू आहे.

समितीने गेल्या चार वर्षात महिला भवनामध्ये एखादाही कार्यक्रम का हाती घेतला नाही ? आपण गेल्या चार वर्षामध्ये का दुरुस्ती केली नाही? महिला भवनाची वास्तू बरोबर नव्हती, ती गळत होती तर गेल्या चार वर्षात त्या वास्तूचे रिपेरिंग का केले नाही ? अशी विचारणा केली.

त्यावर सहाय्यक आयुक्त यांनी गेल्या डिसेंबर मध्ये महिला व बालकल्याण विभागाने ते ताब्यात घेतले आहे. ती जागा चार वर्षापूर्वी घेतली आहे, परंतु संबंधित अधिकारी आणि दोघांनी सहा महिन्यापूर्वी ही वास्तू ताब्यात घेतली. सदरची जागा वापरात काढली. त्या विकासकाने त्या जागेवरील तळ मजला महिला भवनासाठी दिलेला आहे. त्या जागेवर डी.पी. आरक्षण होते. तो आपल्यासाठी बांधून घेतला. वरच्या मजल्यावर त्याने सोसायटी तयार केलेली आहे. ७५०० चौ.फूट जागा आहे. त्यापैकी ४५०० चौ.फुट जागा महिला व बालकल्याणासाठी आणि ३००० चौ.फूट जागा इतर कामासाठी ठेवलेली आहे. तेथील आसपासच्या लोकांनी काचा फोडल्या. कलरिंग करुन ती जागा वापरणार आहोत. ३००० चौ.फूटाची जागा निवडणुकीच्या वेळेला शिफ्ट करणार आहोत.

समितीने ४००० चौ.फूट जागा महिला भवनासाठी आहे आणि ३००० चौ.फूट जागा इतर कामासाठी राखून ठेवली आहे. त्या जागेवर डे केर युनिट तयार करावे, अशी समितीची सूचना आहे.

त्यावर प्रभारी व कर निर्धारण व संकलक यांनी महिला व बालकल्याण विभागाचे हे उत्तर आहे. या ठिकाणी स्पेशल योजना उद्योजकांसाठी मालमत्ता विभाग करत नाही. त्यांच्याकडून उद्योजकांसाठी रक्षा बंधन, गणपतीच्या काळात तसेच दिवाळीच्या काळात फराळ करणे, यासाठी जागा उपलब्ध करुन देणे, या बाबी त्यांच्याकडून केल्या जातात. उद्योजक महिलांसाठी कसलीही कार्यवाही केली जात नाही. अंदाजपत्रक तयार करताना चर्चेअंती प्रभाग समितीस्तरावर इफेक्टीव्हली कामे होत नसल्यामुळे प्रभाग समितीसाठी वेगळा निधी ठेवलेला नाही.

समितीने शासनाने प्रभाग समित्या कशासाठी गठित केलेल्या आहेत ? कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत मक्तेदारी चालती काय ? यापूर्वी चर्चा का केली नाही ? एका प्रभागामध्ये सदस्य किती आहेत ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्य लेखा अधिकारी यांनी यासंदर्भात माननीय आयुक्तांसमवेत चर्चा करणार आहोत. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने प्रभाग समित्यांसाठी निधी आरक्षित करुन ठेवलेला आहे. परंतु, तो कमी आहे. प्रभाग समितीसाठी १० लक्ष रुपयांचा निधी आहे. प्रत्येक नगरसेकवकांसाठी १५ लक्ष रुपयांचा वेगळा निधी ठेवलेला असतो. प्रत्येक प्रभागाला वेगवेगळा २० लाख रुपयांचा निधी असतो. एकूण १२७ नगरसेवक आहेत. एका प्रभागामध्ये एकच नगरसेवक असतो.

समितीने प्रभाग समितीमधील १० नगरसेवकांना किती निधी मिळतो आणि प्रत्येक सदस्याला प्रभाग निधी किती मिळतो ? अनौपचारिक बैठकीत महिला नगरसेविकांकडून सांगितले होते की, प्रभाग समितीचा २० लाख रुपयांचा निधी मिळालेला नाही. जर त्यांना २० लाख रुपयांचा निधी दिलेला असेल तर त्यामध्ये कोणकोणती कामे घेतलेली आहेत ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्य लेखा अधिकारी यांनी एका प्रभागामध्ये एका नगरसेवकाला ३५ लक्ष रुपयांचा निधी मिळतो. सिटी इंजिनिअर, हायड्रॉलिक इंजिनिअर यांच्याकडून सर्व कामे केली जातात.

समितीने ही कामे बजेटरी असणार आहेत. बजेटचा फंड कोठे गेला ? जर हायड्रॉलिक इंजिनियरने कामे केलेली आहे. जल अभियंत्याचा निधी असतो. यांची कामे नगरसेवक निधीत किंवा प्रभागात दाखविली जातात काय ? नगरसेविकेला प्रभाग समितीचा २० लक्ष रुपयांचा निधी असेल आणि नगरसेवक निधी १५ लक्ष रुपये असे मिळून ३५ लक्ष रुपयांचा निधी मिळतो. हे ३५ लक्ष रुपये सोडून गार्डन विभागासाठी, SWD साठी, पाणी पुरवठा विभागासाठी वेगळा निधी आहे. स्वच्छ भारत अभियानांतर्गत केंद्र आणि राज्य शासनाकडून महानगरपालिकेला निधी मिळतो. असे असताना देखील एकाही महिला नगरसेविकेच्या वॉर्डात शौचालयाची कामे झालेले नाहीत. मग हा निधी कोठे गेला असा माझा प्रश्न आहे. अशी विचारणा केली.

त्यावर मुख्य लेखा अधिकारी यांनी प्रत्येकाचे हेड वेगळे आहेत. नगरसेविकांना एकूण ३५ लक्ष रुपयांचा निधी मिळतो. मागील दोन वर्षात कोणकोणती कामे केली त्याबाबतची यादी समितीला सादर करण्यात येईल. असे समितीस सांगितले.

त्यावर मुख्य लेखा अधिकारी यांनी स्वच्छ भारत अभियानासंदर्भातील शौचालयाचा विषय आहे. सभेची मान्यता घेऊन पुढील कार्यवाही केली जाते. ८ ते १० कोटी रुपयांची कामे केलेली आहेत. ही कामे जल अभियंत्यांनी प्रत्येक नगरसेवकांकडून लेटर घेऊन केलेली आहेत. असे समितीस सांगितले.

समितीने वरिष्ठ नगरसेवकांच्या वॉर्डात कामे झालेली आहेत आणि जे नवनिर्वाचित नगरसेवक किंवा नगरसेविका आहेत, त्यांच्या वॉर्डात विकास कामेच झालेली नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. महानगरपालिकेत किती सहायक आयुक्त आहेत ? अशी विचारणा केली.

त्यावर आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी हेड क्वॉर्टरमध्ये ४ सहायक आयुक्त आहेत. निधीच्या बाबतीत दुजाभाव केला जाणार नाही. महिला नगरसेवकांसाठी जेवढा निधी असतो तेवढाच राखून ठेवला जातो. असे समितीस सांगितले.

**बुधवार, दिनांक १२ जुलै, २०१७ रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने समितीला आश्वासित केलेली माहिती :—**

बुधवार, दिनांक १२ जुलै, २०१७ रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने समितीला खालीलप्रमाणे आश्वासित माहिती देण्यात आली.

महापालिकेतील ४४ महिला पालिका सदस्यांना स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये महिला प्रतिनिधींचे नेतृत्व या अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

महिला व बालकल्याण विभागा अंतर्गत तसेच याव्यतिरिक्त महिला पालिका सदस्यांना त्यांच्या स्वेच्छा निधी मार्फत कामे करुन त्यांच्या स्वेच्छा निधी मार्फत कामे करुन दिली जातात. यावर्षीच्या सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात प्रत्येक पालिका सदस्यांना त्यांनी सुचविलेल्या कामांकरिता रु.१ कोटी प्रीभागा अंतर्गत तरतूद उपलब्ध करुन देण्यांत आली आहे. त्या निधी मधून सदरची कामे करणेत येतील.

प्रभागांमध्ये दर महिन्यात प्रभाग समितीची बैठक आयोजित करण्यात येते. या बैठकी मध्ये विषय पत्रिकेच्या अनुषंगाने महिला पालिका सदस्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यात येते.

**विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांनी खालील प्रमाणे माहिती दिली :—**

सन २०१६-१७ मध्ये ५% नुसार जेंडर बजेट अंतर्गत महिला व बालकल्याणासाठी ६००.०० लक्ष इतकी तरतूद करण्यात आली होती. या तरतुदीमधून एकूण २६६.३७ लक्ष खर्च झालेला आहे. त्यातील योजना पुढीलप्रमाणे आहेत :—

| अ. क्र. | योजनेचे नांव | खर्च (रुपये लक्षमध्ये) |
|---|---|---|
| १) | डीटीपी प्रशिक्षण | ९,३०,०००/- |
| २) | एमएससीआयटी प्रशिक्षण | १८,५६,२५०/- |
| ३) | महिला संदस्यांकरिता एनएनडीटी शिक्षण | १,९८,०००/- |
| ४) | जागतिक महिला दिन कार्यक्रम | ४,३६,५००/- |
| ५) | मुलांसाठी चित्रकला स्पर्धा | १,९२,०००/- |
| ६) | बालनाट्य स्पर्धा | ९,३७,०००/- |
| ७) | शिलाई मशिन वाटप | ३२,१७,८००/- |
| ८) | रुग्णालयात उपकरणे बसविण | ११,७०,९३०/- |
| ९) | समाज प्रबोधनात्मक कार्यक्रम | ५,९१,०५०/- |
| १०) | स्त्री भ्रुण हत्या जनजागृती | २,००,०००/- |
| ११) | बालसंस्कार प्रशिक्षण | १,४१,९००/- |
| १२) | राजस्थान अभ्यास दौरा | ४,८७,५००/- |
| १३) | आरोग्य वर्धन शिबिर | १,१३,०५०/- |
| १४) | विद्यार्थी गुणगौरव सोहळा | ५,२२,१२५/- |
| १५) | व्यक्तिमत्व विकास शिबिर | ८,४४,५००/- |
| १६) | कायदेविषयक शिबिर | ५,२३,०००/- |
| १७) | जिल्हास्तरीय महिला कबड्डी स्पर्धा | १५,७९,९७५/- |
| १८) | बालवाड्या दुरूस्ती व रंगरंगोटी | ४०,८६,७०९/- |
| १९) | प्रसाधनगृहे बांधणे | ३९,२०,०००/- |
| २०) | बालवाडी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य पुरविणे | ४६,८९,०५० |
| | **एकूण खर्च** | **२,६६,३७,११४**/- |

महानगरपालिकेने उषा कंपनीची शिलाई मशीन्स घेऊन ३७३ पैकी ७२ लाभार्थ्यांना वाटप करण्यात आल्या आहेत.

कल्याण डोंबिवली महापालिकेच्या २ रुग्णालय व १३ नागरी आरोग्य केंद्रात गरोदर माता, प्रसुती झालेल्या महिला व त्यांची नवजात बालके हे नियमित तपासणीसाठी येत असतात. रूग्णालयीन किट (औषधे, लसीकरण) ठेवण्यासाठी ७ रेफ्रिजरेटर, शुध्द पाणी पिण्यासाठी १५ वॉटर प्युरिफायर व ड्रेसिंग साहित्याकरता हॉरिझेंन्टल स्टर्लायझर २ मशिन असे एकूण रू.११,७०,९३०/- चे साहित्य महिला व बालकल्याण निधीमधून खरेदी करण्यात आलेली आहे. सदरचे साहित्य रूग्णालयात उपलब्ध करून देण्याकरिता तत्कालीन महिला व बाल कल्याण

समितीने ठराव क्र. १ दि.२/४/२०१६ अन्वये मंजुरी दिल्यानुसार करण्यात आलेला आहे. सबब उपरोक्त खर्चामध्ये कोणतीही अनियमितता झालेली नाही.

सन २०१७-१८ मध्ये ५ % नुसार जेंडर बजेट अंतर्गत महिला व बालकल्याणसाठी ५३३.०० लक्ष इतकी तरतूद करण्यात आली होती. या तरतुदीमधून एकूण १४९.४२ लक्ष खर्च झाला असून प्रस्तावित खर्च १६१.०० लक्ष इतका आहे. त्यातील योजना पुढीलप्रमाणे आहेत.

| **अ. क्र.** | **योजनेचे नांव** | **खर्च (रुपये लक्षमध्ये)** |
|---|---|---|
| १) | जागतिक महिला दिन कार्यक्रम | ५,१०,०००/- |
| २) | मुलांसाठी चित्रकला स्पर्धा | १,९१,९६२/- |
| ३) | बालनाट्य स्पर्धा | ९,८५,३००/- |
| ४) | बालवाडी दुरूस्ती व रंगरंगोटी | ३०,००,०००/- |
| ५) | महिलांसाठी ओपन जिम | ९,००,०००/- |
| ६) | बैगलोर म्हैसूर व उटी मनपा अभ्यास दौरा | २०,००,०००/- |
| ७) | विद्यार्थी गुणगौरव सोहळा | ५,३१,१२५/- |
| ८) | विद्यार्थी व्यक्तिमत्व विकास शिबीर | ३,२७,६१०/- |
| ९) | कायदेविषयक शिबिर | ५,५७,५१५/- |
| १०) | प्रसाधनगृहे बांधणे | २०,००,०००/- |
| ११) | महिलांना हस्तकला व पाककला प्रशिक्षण | ३,४०,०००/- |
| १२) | महिलांसाठी पारंपारिक व गीतगायन स्पर्धा | ७,२५,०००/- |
| १३) | विद्यार्थी उन्हाळी प्रशिक्षण शिबीर | ९,९७,०००/- |
| १४) | बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण शिबीर व लोणावळा मनशक्ती केंद्र येथे १ दिवसाचे शिबीर | ३,३१,०००/- |
| १५) | महिला बालकांसाठी वाचनालय | १५,४६,२६०/- |
| | **एकूण खर्च** | **१,४९,४२,७७२/-** |

**सन २०१७-१८ मधील प्रस्तावित कामे**

| अ. क्र. | बाब | अपेक्षित खर्च (रूपये लक्षमध्ये) |
|---|---|---|
| १) | नवजात शिशु / बालकांना किट संच पुरविणे | ४५,००,०००/- |
| २) | पल्वलायझर मशिन खरेदी | ८०,००,०००/- |
| ३) | महिला बचत गट मेळावा आयोजित करणे | ३६,००,०००/- |
| | **एकूण खर्च** | **१,६१,००,०००/-** |

विविध कामांकरिता प्रसिद्ध केलेल्या निविदा, त्यास न मिळणारा अपेक्षित प्रतिसाद व त्यामुळे होणारा कालापव्य इ. कारणांमुळे विहित वेळेत काम पूर्ण करता येत नाही. याशिवाय विधानपरिषदेची स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक अचारसंहिता लागू होती त्यामुळे निविदा प्रक्रिया पार पाडता आली नाही.

**विभागीय सचिवांची साक्ष :—**

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक मंगळवार, दिनांक ०५ सप्टेंबर, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने महापालिकेमध्ये महिला व बालकल्याण विभागासाठी ५ टक्के निधी खर्च करण्याच्या तरतुदीनुसार सन २०१६-१७ या वित्तीय वर्षात कोणकोणत्या योजनांवर खर्च केला आहे, त्याची माहिती द्यावी. अशी विचारणा केली.

विभागीय अधिकारी यांनी सन २०१६-१७ या वित्तीय वर्षात ५ टक्के निधी खर्च करण्याच्या तरतुदीनुसार ६ कोटी निधीची तरतूद होती आणि त्यापैकी २.६६ कोटी रुपये इतका निधी खर्च झाला आहे. त्यामध्ये डीटीपी प्रशिक्षण यासारख्या योजना घेतल्या आहेत. एमएस-सीआयटीचे प्रशिक्षण, महिला सदस्यांकरिता एसएनडीटी विद्यापीठातील प्रशिक्षण आहे. जागतिक महिला दिनाचा कार्यक्रम, शिलाई मशीन्स वाटपाचा कार्यक्रम, रुग्णालयात उपकरणे बसविणे, समाज प्रबोधनात्मक कार्यक्रम, स्त्री भ्रूण हत्त्या जन जागृती, बाल नाट्यस्पर्धा, महिलांसाठी चित्रकला स्पर्धा, बाल संस्कार प्रशिक्षण यासाठी राजस्थानचा अभ्यास दौरा, विद्यार्थी गुणगौरव सोहळा, व्यक्तिमत्त्व विकास शिबीर झाले आहे, कायदे विषयक शिबीर, जिल्हा स्तरीय महिला कबड्डी स्पर्धा, बालवाड्या दुरुस्ती व रंगरंगोटी, प्रसाधन गृह बांधणे, बालवाडी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य पुरविणे अशा वेगवेगळ्या योजनेखाली रुपये २,६६,३७,११४/- इतका खर्च सन २०१६-१७ या वित्तीय वर्षात केलेला आहे. सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात रुपये ५ कोटी ३३ लाख या तरतुदींपैकी रुपये १ कोटी ४९ लाख इतका निधी खर्च झाला आहे आणि १ कोटी ६१ लाख रुपये हा निधी वेगवेगळ्या कामांवर खर्च होण्याची प्रक्रिया सुरू आहे. असे समितीस सांगितले.

समितीने सन २०१६-१७ या वित्तीय वर्षात आपण एमएस-सीआयटीचे प्रशिक्षण किती विद्यार्थ्यांना दिले आहे ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी यामध्ये एकूण १८ लाख ५६ हजार रुपये खर्च झाला आहे. त्यातून ४०० लाभार्थ्यांना लाभ झाला आहे. असे समितीस सांगितले.

समितीने शिलाई मशीन्स कोणत्या कंपनीचे व किती लाभार्थ्यांना वाटप केले आहे ? अशी विचारणा केली.

विभागीय अधिकारी यांनी सन २०१६-१७ या वित्तीय वर्षात उषा कंपनीचे शिलाई मन्शीस खरेदी करुन ३७३ पैकी ३७२ लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले आहेत. असे समितीस सांगितले.

समितीने महापालिकेने प्रत्येक महापालिकेमध्ये आस्थापना खर्च आणि महसुली खर्च वगळून एकूण अंदाजपत्रकाच्या ५ टक्के महिला व बालकल्याणासाठी राखून ठेवला निधी वॉटर प्युरीफायरसाठी राखून ठेवला असता तो फ्रिजसाठी का खर्च करण्यात आला ते सांगावे. अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी मुळात १२० बेड्सचे दोन रुग्णालये आणि १३ नागरी आरोग्य केंद्रे आहेत. त्या नागरी आरोग्य केंद्रात किंवा रुग्णालयात येणाऱ्या गरोदर माता, प्रसृत झालेल्या महिला किंवा त्यांचे नवजात बालके तपासणीसाठी येत असतात. त्यामुळे त्या त्या रुग्णालयातील मुलांसाठी ७ रेफ्रिजरेटर्स घेतले आहेत. महिलांना शुध्द पाणी पिण्यासाठी वॉटर प्युरिफायर खरेदी केले आहेत. असे समितीस सांगितले.

समितीने हे साहित्य कोठे खरेदी केले, महिलांसाठीचे ते रुग्णालय होते किंवा कसे ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी हे साहित्य प्रमुख रुग्णालये व नागरी आरोग्य केंद्रासाठी घेतले आहे. मात्र ती रुग्णालये फक्त महिलांसाठीची नाहीत तर महिलांसाठी सुद्धा त्याचा वापर होतो. असे समितीस सांगितले.

समितीने ते बरोबर सांगता. परंतु नॉर्म्सप्रमाणे महिला आणि बालकांसाठी जो खर्च करायचा असतो तो त्या नॉम्सप्रमाणे झालेला नाही. तो फक्त महिला व बालकांसाठीच व्हायला पाहिजे. हा खर्च महिला व बालकांसाठीच केला पाहिजे. हा खर्च जनरल खर्चामध्ये केलेला आहे. त्यामुळे यापुढे तसे होऊ देऊ नका. अशा प्रकारच्या सूचना केल्या.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी होय भविष्यात तो ५ टक्के राखीव निधी फक्त महिला व बालकांसाठीच खर्च करु.

**अभिप्राय व शिफारशी :—**

समितीने कल्याण डोंबिवली महानगरपालिकेला भेट देवून शासन धोरणानुसार प्रत्येक महानगरपालिकेत महसुलीत व आस्थापना खर्च वगळून एकूण अंदाज पत्रकाच्या ५% निधी महिला व बालकल्याण विभागासाठी राखून ठेवण्यात येतो. त्या अनुषंगाने मागील ३ वर्षात सदरहू ५% निधी कसा खर्च करण्यात आला किंवा कसे ? याबाबत माहिती घेतली असता, समितीला सन २०१३-१४ मध्ये एकूण रुपये ११६३.९६ कोटीपैकी रुपये १०६१.०९ कोटी प्रत्यक्ष खर्च करण्यात आला. सन २०१४-१५ मध्ये एकूण ११२१.५९ कोटीपैकी रुपये १००७.५८कोटी प्रत्यक्ष खर्च करण्यात आला. सन २०१५-१५ मध्ये एकूण ११३५.९१ कोटीपैकी रुपये १०५४.३२ कोटी प्रत्यक्ष खर्च करण्यात आलेला आहे.

तसेच शासन धोरणानुसार आस्थापना खर्च महिला व बालकल्याण विभागाकरीता राखून ठेवण्यात आलेला निधी सन २०१३-१४ मध्ये महसुली व आस्थापना खर्च वजा जाता निव्वळ उत्पन्न १००.९३ असून महिला व बालकल्याण विभागाकरीता राखून ठेवण्यात आलेला निधी हा ९.४० असून सुधारीत ६.९२ आहे. तसेच सन २०१४-१५ मध्ये महसुली व आस्थापना खर्च वजा जाता निव्वळ उत्पन्न २१४.९४ असून महिला व बालकल्याण विभागाकरीता राखून ठेवण्यात आलेला निधी हा ०७.१५ असून सुधारीत ५.७२ आहे. तसेच सन २०१५-१६ मध्ये महसुली व आस्थापना खर्च वजा जाता निव्वळ उत्पन्न १८८.०४ असून महिला व बालकल्याण विभागाकरीता राखून ठेवण्यात आलेला निधी हा ९.५० असून सुधारीत ६.०० असा आहे. असे समितीस सांगितले.

महिलांच्या कल्याणाकरीता राबविण्यात येणाऱ्या योजना व त्यांना देण्यात येणाऱ्या सोईसवलती इ. बाबत महापालिकेला केंद्र व राज्य शासनाकडून वेगळे असे अनुदान प्राप्त झालेले नाही त्यामुळे सन २०१३-१४, २०१४-१५ तसेच २०१५-१६ या तीन वर्षाची माहिती निरंक आहे.

बजेटमधून महिला व बालकल्याण विभागासाठी ५% निधी दिला जातो परंतू जर त्यामधून महिलांच्या कल्याणासाठी एकही योजना राबविली जात नाही किंवा महिलांकरीता कोणती कामे केली जातात असे समितीने विचारणा केली असता, त्यावर सहायक आयुक्त यांनी महिला नगरसेविकेसाठी यावर्षी SNDT मार्फत प्रशिक्षण देण्याबाबतची कार्यवाही करीत आहोत. शासनाच्या दिनांक ८ नोव्हेंबर, २०१० च्या शासन निर्णयामध्ये १५ निकष दिलेले आहेत. महिलांच्या कल्याणासाठी ५% राखीव निधी ठेवण्याची तरतूद आहे. त्यानुसार सदरचा निधी खर्च केला पाहिजे. महिला व बालकल्याणासाठी निधी का वापरला नाही अशी समितीने विचारणा केली असता, त्यावर सहायक आयुक्त यांनी महिलांना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. असे समितीस सांगितले. महानगरपालिकेने शासन निर्णयानुसार महिलांसाठी असलेलेला ५% निधी हा महिलांच्या कल्याणासाठी वापरला गेला नाही. याबाबत समिती तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे.

महानगरपालिकेने गेल्या ४ वर्षात महिला भवनामध्ये एकही कार्यक्रम घेतला नाही. तसेच महिला भवनाची गळती होवूनही त्याची दुरुस्ती का केली नाही अशी समितीने विचारणा केली असता, त्यावर सहाय्यक आयुक्त यांनी गेल्या डिसेंबर मध्ये महिला व बालकल्याण विभागाने ते ताब्यात घेतले आहे. ती जागा चार वर्षापूर्वी घेतली आहे, परंतु संबंधित अधिकारी आणि दोघांनी सहा महिन्यापूर्वी ही वास्तू ताब्यात घेतली. सदरची जागा वापरात काढली. त्या विकासकाने त्या जागेवरील तळ मजला महिला भवनासाठी दिलेला आहे. त्या जागेवर डी.पी. आरक्षण होते. तो आपल्यासाठी बांधून घेतला. वरच्या मजल्यावर त्याने सोसायटी तयार केलेली आहे. ७५०० चौ.फूट जागा आहे. त्यापैकी ४५०० चौ.फुट जागा महिला व बालकल्याणासाठी आणि ३००० चौ.फूट जागा इतर कामासाठी ठेवलेली आहे. कलरिंग करुन ती जागा वापरणार आहोत. ३००० चौ.फूटाची जागा निवडणुकीच्या वेळेला शिफ्ट करणार आहोत. असे समितीस सांगितले.

त्यावर समितीने ४००० चौ.फूट जागा महिला भवनासाठी आहे आणि ३००० चौ.फूट जागा इतर कामासाठी राखून ठेवली आहे. त्या ३००० चौ.फूट जागेवर डे-केअर युनिट तयार करावे, अशी समितीने महानगरपालिकेला सूचना केली.

तथापि, सदरचा खर्च हा शासन निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे केलेला नसून अन्य योजनांवर केला असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने शासन निर्णयानुसार सदरहू ५ % निधी खर्च दिनांक ८ नोव्हेंबर, २०१० च्या शासन निर्णयानुसार केलेला दिसून येत नाही. याचाच अर्थ महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची देखील प्रभावीपणे अंमलबजावणी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकडून करण्यात आलेली नाही. व सदरचा खर्च उक्त शासन निर्णयानुसार केलेला नसल्याने इतर योजनांवर केलेला आहे. तो नियमाच्या कक्षेत राहून केला आहे असे समितीला दिसून येत नाही. त्यामुळे ज्या उद्देशाने दिनांक ८ नोव्हेंबर, २०१० रोजीचा शासन निर्गमित करण्यात आला त्या मुळ उद्देशाचे कल्याण-डोबिवली महानगरपालिकेकडून पालन होताना दिसत नाही.

**सबब, याप्रकरणी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकडून महिलांच्या कल्याणकारी योजनांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या ५% निधीच्या शासनाच्या निर्णयाचे पालन झाले नसल्यामुळे याबाबतची चौकशी करुन जे संबंधित अधिकारी याप्रकरणी दोषी असल्याचे आढळल्यास त्यांच्याविरुध्द नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी. तसेच यापुढे कल्याण डोबिवली महानगरपालिकेने कोणत्याही परिस्थितीत शासन निर्णयाचे उल्लंघन न करता महिलांच्या योजनेवरच ५% टक्क्यानुसार खर्च करावा.**

**तसेच महानगरपालिकेने जी ४००० चौ.फूट जागा महिला भवनासाठी आहे. आणि उर्वरीत ३००० चौ.फूट जागा इतर कामासाठी राखून ठेवली आहे. त्या जागेवर डे-केअर युनिट तयार करण्यात यावे यासाठी शासनाने यात लक्ष घालावे. अशी समितीची शिफारस आहे. याबाबत शासनाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला २ महिन्यात कळविण्यात यावा.**

## ३. सांगली महानगरपालिका

### ३.१ सांगली महानगरपालिकेतील रिक्त पदांचा अनुशेष भरण्याबाबत :—

गुरुवार, दिनांक १९ नोव्हेंबर, २०१५ रोजी महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी सांगली महानगरपालिका यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती मागविण्यात आली होती.

समितीने महानगरपालिकेतील शासकीय निमशासकीय व शासन अनुदानित संस्थांमधील सेवेतील भरतीसाठी महिलांकरिता ३० टक्के जागा आरक्षित ठेवण्याच्या धोरणाची अंमलबजावणी महानगरपालिकेच्या सेवेमध्ये भरती करताना करण्यात येते काय, असल्यास त्याबाबतचे निकष भरतीची पद्धत इ.बाबत सविस्तर माहिती देण्यात यावी. महानगरपालिकेतील वर्ग १ ते ४ तांत्रिक व अतांत्रिक अधिकारी व कर्मचारी यांची मंजूर पदसंख्या किती, त्यापैकी सन २०१४-२०१५ अखेर किती पदे भरण्यात आली आहेत ? उक्त मंजूर पदांपेकी वर्ग १ ते ४ मधील किती व कोणते पदे महिलांकरिता आरक्षित ठेवणेत आली आहेत ? महिला उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या वर्ग १ ते ४ मधील पदे भरण्यासाठी कोणती कार्यपद्धती अवलंबण्यात येते ? महिला उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या वर्ग १ ते ४ मधील पदांपैकी सन २०१४-१५ अखेर एकूण किती पदे भरण्यात आली आहेत व किती व कोणकोणती पदे रिक्त आहेत, तसेच सदरची पदे रिक्त होणेची कारणेची काय आहेत ? महिला उमेदवारांसाठी राखीव असलेली पदे भरण्यासाठी गत ३ वर्षांत (१२-१३, १३-१४, १४-१५) वर्ष निहाय किती वेळा व कोणकोणत्या तारखांना वर्तनमानपत्रात कोणकोणती पदे भरण्यासाठी जाहिराती देण्यात आल्या होत्या ? उक्त जाहिरातीनुसार वर्षनिहाय महिला उमेदवारांसाठी राखीव असलेली कोणकोणती पदे भरण्यात आली आहेत ? उक्त जाहिरातीनुसार राखून ठेवणेत आलेल्या पदांसाठी स्वतंत्र नोंदवही (रोस्टर) ठेवणेत आली आहे काय, असल्यास केव्हापासून, तसेच ती अद्ययावत स्वरूपात आहे काय, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ? महिला अधिकारी / कर्मचारी यांची भरती व सेवाविषयक बाब हाताळण्यासाठी महापालिकेमध्ये स्वतंत्ररित्या कक्ष स्थापन करणेत आला आहे काय, असल्यास केव्हापासून, तसेच त्यासाठी किती अधिकारी व कर्मचारी उपलब्ध करून दिले आहेत, विशेष कक्ष स्थापन केला नसल्यास त्याची कारणे काय आहेत ? अशी विचारणा केली.

**उपरोक्त प्रकरणी सांगली महानगरपालिकेकडून खालील प्रमाणे माहिती प्राप्त झाली आहे :—**

महापालिका स्थापना झाल्यापासून आज मितीस कार्यरत अधिकारी व कर्मचारी संख्या खालीलप्रमाणे आहे.

| वर्ग | एकूण संख्या | महिला संख्या |
|---|---|---|
| अ | ९ | २ |
| ब | १८ | ३ |
| क | ४५१ | ७८ |
| ड | १२७२ | २७८ |
| **एकूण** | **१७५०** | **३१८** |

महाराष्ट्र शासन निर्णयानुसार व महापालिका सेवा भरती प्रवेश नियमानुसार नियुक्ती केली जाते. सध्या रोष्टर अद्ययावत करण्याचे काम चालू आहे. त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही ठेवणेत येत आहे.

| वर्ग | एकूण संख्या | तांत्रिक | अतांत्रिक |
|---|---|---|---|
| अ | १८ | १२ | ६ |
| ब | ३८ | ३० | ८ |
| क | ८५३ | ४४६ | ४०७ |
| ड | १४६८ | १० | १४५८ |
| **एकूण** | **२३७७** | **४९८** | **१८७९** |

सन २००४ मध्ये नोकर भरती करणेत आली त्यामध्ये एकूण ४८ महिलांची नियुक्ती केली आहे. पैकी २४ तांत्रिक व २४ अतांत्रिक महिला सेवक आहेत.

महानगरपालिकेच्या मंजूर पदाचे सुधारित बिंदूनामावली नोंदवही नव्याने तयार करण्याचे काम चालू आहे त्यानुसार महिला आरक्षणबाबत कार्यवाही होईल. शासनाकडील धोरणानुसार व मार्गदर्शन नुसार कार्यवाही ठेवणेत येते.

सन २००४ मध्ये भरती करणेत आली आहे. त्यामध्ये महिला उमेदवारांमधून पात्र ४८ उमेदवारांची नियुक्ती करणेत आलेली आहे. सन २००४ नंतर नोकर भरती झालेली नाही व विहीत वयोमानानुसार कर्मचारी सेवा निवृत्त झालेले आहेत.

महापालिका स्थापन झालेपासून फक्त सन २००४ मध्ये नोकर भरती करणेत आली आहे. एकूण मंजूर पदे २३७७ त्यापैकी ६२७ रिक्त आहेत. सन २००४ मध्ये ४८ महिलांची पदे भरलेली आहेत.

महाराष्ट्र शासन निर्णयानुसार व महापालिका सेवा भरती प्रवेश नियमानुसार नियुक्ती केली जाते. सध्या रोष्टर अद्ययावत करण्याचे काम चालू आहे. त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही ठेवणेत येत आहे. विविध पदांवर महिलांची नियुक्ती केलेली आहे.

गत ३ वर्षात (सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५) महापालिकेने नोकरभरती केली नाही. त्यामुळे महिला उमेदवारांसाठी राखीव असलेली पदे भरलेली माहिती निरंक. सध्या रोष्टर अद्ययावत करण्याचे काम चालू आहे.

महिला अधिकारी/कर्मचारी भरती व सेवा विषयक बाबी हाताळणेसाठी स्वतंत्र कक्ष नाही. शासनाच्या आदेशानुसार व मार्गदर्शनानुसार कार्यवाही ठेवणेत येत आहे.

१) **माध्यमिक शाळा : :—**

महापालिकेच्या अखत्यारित १ माध्यमिक शाळा आहे. मिरज हायस्कूल, मिरज या शाळेमध्ये एकूण शिक्षक कर्मचारी ४० त्यापैकी शिक्षक २५ व शिक्षिका १५ तर शिक्षिकेतर एकूण कर्मचारी ७ त्यामध्ये ६ पुरुष कर्मचारी तर १ महिला कर्मचारी कार्यरत आहेत. सध्या कोणतीही भरती केलेली नाही.

**सांगली महानगरपालिकेच्या आयुक्त यांची साक्ष :—**

सांगली महानगरपालिकेला गुरुवार, दिनांक १९ नोव्हेंबर, २०१५ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी आयुक्त यांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने शासन निर्णयाप्रमाणे महिलांना नोकरीमध्ये ३० टक्के आरक्षण असले पाहिजे हे महानगरपालिकेमध्ये आहे काय ? अशी विचारणा केली.

त्यावर आयुक्त यांनी सांगली, मिरज, कुपवाडा शहर महानगरपालिकेची स्थापना सन १९८३ मध्ये झाली, ३ नगरपालिका कर्मचारीवृंद महानगरपालिकेत ॲब्जॉर्ब झाला. महानगरपालिकेच्या वेगळा स्टाफ पॅटर्न मंजूर नाही. महानगरपालिका स्थापन झाल्यानंतर महानगरपालिकेच्या आस्थपनेवर वेगळी नोकरभरती झालेली नाही. महानगरपालिका स्थापन झाल्यानंतर पहिल्यांदा नगरपालिकांच्या आस्थापनांच्या मंजूर पदांपैकी रिक्त असलेल्या पदांसाठी सन २००४ मध्ये फक्त एकदा मागासवर्गीय अनुशेषाची भरती करण्यात आली, त्यावेळी २१८ रिक्त पदांची भरती करण्यात आली, त्यामध्ये ४८ महिला कर्मचारी भरती झाल्या आणि त्यांची टक्केवारी २२ टक्के होती. असे समितीस सांगितले.

समितीने महानगरपालिका स्थापन झाल्यापासून नोकरभरती केली नाही. जुन्या अधिकारी, कर्मचारी यांच्यावर कामकाज चालविले. आपल्याला वाटले नाही का की, कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे, ती पदे भरली पाहिजेत. शासनाला या संदर्भात प्रस्ताव पाठविला का, पाठविला असेल तर कधी पाठविला, किती पदांची आवश्यकता आहे असे शासनाला सांगितले आणि त्याबाबत शासनाने काय अभिप्राय दिला ? अशी विचारणा केली.

त्यावर प्रशासन अधिकारी यांनी महानगरपालिका सन १९९८ ला स्थापन झाल्यानंतर सन २००४ पर्यंत नगरपालिकेच्या कर्मचारी, अधिकारी यांची मदत घेण्यात आली. सन २००४ ला अनुशेष भरती केली आणि त्यामध्ये २१८ पदांची भरती झाली, त्यामध्ये महिलांच्या ३० टक्के आरक्षणाप्रमाणे २२ टक्के महिलांची पदे भरली, सन २०११ मध्ये भरतीसाठी जाहिरात काढली, ती बाब न्यायप्रविष्ठ झाल्यामुळे भरती प्रक्रिय पूर्ण झाली नाही. शासनाने सन २००४ ला फक्त एकदाच भरती प्रक्रिया झाली. सन २०११ ची भरती प्रक्रिया न्यायपविष्ठ झाल्यामुळे ती पूर्ण झाली नाही. रोस्टर, आरआरचे नियम तयार करुन सन २००७ ला शासनाच्या मान्यतेसाठी पाठविले. शासनाने त्या संदर्भात कळविले की, आआरमध्ये दुरुस्ती करण्याची गरज आहे. इतर महानगरपालिकाप्रमाणे स्टाफ पॅटर्न केला पाहिजे. आरआर व स्टाफ पॅटर्न अद्ययावत करुन शासन मान्यतेसाठी पाठवावे, त्यानंतर मान्यता देण्यात येईल, त्याप्रमाणे नवीन स्टाफ पॅटर्न तयार करण्याचे काम सुरु केले आहे. मसुदा तयार आहे. आरआरमध्ये दुरुस्ती करुन शासनाच्या मान्यतेसाठी २ महिन्यांत पाठविण्यात येईल. असे समितीस सांगितले.

समितीने २३७७ मध्ये ३० टक्के महिला कर्मचारी पाहिजेत, त्याप्रमाणे आता किती महिला कर्मचारी आहेत आणि आता महिलांची किती पदे रिक्त आहेत ? अशी विचारणा केली.

त्यावर प्रशासन अधिकारी यांनी रोस्टर तयार झाले पाहिजे होते. आता त्यानुसार सांगता येणे शक्य नाही. रोस्टर अद्ययावत करण्याची प्रक्रिया सुरु आहे. सन २००९ ला रोस्टर पूर्ण अद्यवयावत केले होते आणि त्याप्रमाणे जहिरात काढून सन २०११ ला भरती प्रक्रिया सुरु केली होती. परंतु ती प्रक्रिया न्यायपविष्ठ झाल्यामुळे भरती प्रक्रिया थांबली आहे. आता भरती प्रक्रिया परत करण्यासाठी परत रोस्टर रिव्हाईज करण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. असे समितीस सांगितले.

समितीने संवर्गनिहाय, प्रवर्गनिहाय महिलांच्या रिक्त पदांची माहिती दिलेली नाही. महिलांच्या अनुशेषाप्रमाणे सदंर्भातील माहिती पाहिजे.आपल्या येथे महिलांची भरती प्रक्रिया ३० टक्क्यांच्या आरक्षणाप्रमाणे करण्यात येते का ते पहायचे आहे. आपण आता जो प्रस्ताव शासनाकडे पाठविणार आहात त्यामध्ये महिलांसाठी ३० टक्क्यांचे आरक्षण फॉलो करण्याच्या संदर्भातील बाब नमूद केली आहे का ? अशी विचारणा केली.

त्यावर प्रशासन अधिकारी यांनी सन २०११ मध्ये दिलेल्या जाहिरातीमध्ये महिलांसाठी ३० टक्के आरक्षण राहील असे नमूद केले होते. असे समितीस सांगितले.

समितीने भरतीसाठी जाहिरात कोणकोणत्या वृत्तपत्रांत दिली होती ? अशी विचारणा केली.

त्यावर प्रशासन अधिकारी यांनी तरुण भारत, दैनिक सकाळ या वृत्तपत्रांत भरतीसाठी जाहिरात दिली होती.भरतीची प्रक्रिया लेखी परीक्षेपर्यत पूर्ण झाली होती. परंतु न्यायालयीन दाव्यामुळे प्रक्रिया थांबवावी लागली. मानधनावर काही कर्मचारी गेल्या १०-१५ वर्षापासून काम

करीत होते. भरतीमध्ये त्यांना आरक्षण न ठेवल्यामुळे ते कोर्टात गेले आहेत. असे समितीस सांगितले.

समितीने ही बाब न्यायप्रविष्ट असली तरी न्यायालयातून या संदर्भात लवकर निकाल लावून घेण्यासाठी प्रशासनाने काही प्रयत्न केले आहेत का ? तसेच ही नवीन प्रक्रिया किती दिवसात पूर्ण होईल ? अशी विचारणा केली.

त्यावर प्रशासन अधिकारी यांनी या संदर्भात न्यायालयाचा निर्णय झाला आहे व प्रशासनाने नवीन प्रक्रिया राबवावी, असे आदेश दिलेले आहेत. त्यानुसार प्रशासनाने कार्यवाही सुरु केली आहे. रोस्टर अद्ययावत करण्याचे काम सुरु असून एक ते दीड महिन्यात ते पूर्ण होईल. असे समितीस सांगितले.

समितीने महिलांसाठी आरक्षण ठेवण्यात आले आहे. त्यामुळे भरती व सेवाविषयक बाबी हाताळण्यासाठी स्वतंत्र करण्याची आवश्यकता महानगरपालिकेला भासली नाही का ? अशी विचारणा केली.

त्यावर प्रशासन अधिकारी यांनी महिला तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. तथापि, भरती व सेवाविषयक बाबी हाताळण्यासाठी स्वतंत्रकक्ष स्थापन करण्यात आलेला नाही. याची पूर्तता करु. असे समितीस सांगितले.

**विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी आयुक्त, सांगली महानगरपालिका यांनी खालीलप्रमाणे लेखी माहिती दिली :—**

सन २०११ मध्ये मागासवर्गीय व निर्बध नसलेल्या पदाची अनुशेष भरती प्रकिया राबविणेत आली होती. सदर भरतीच्या जाहिरातीमध्ये खेळाडूंसाठीचे समांतर आरक्षण न ठेवल्याने महानगरपालिकेकडील मानधनावरील कबड्डी खेळाडुनी भरतीस स्थगिती घेतली होती. त्यामुळे प्रक्रिया न्यायप्रविष्ट असल्याने भरती प्रक्रिया पुर्ण होऊ शकली नाही.

तसेच सन २००२ नंतर रिक्त झालेल्या पदानुसार बिदुनामावरील नोंदवहीची पडताळणी झाली नसल्याने भरती प्रक्रिया राबविता आलेली नव्हती.

तसेच नविन भरतीस मा.शासनाचे निर्बंध असल्याने नवीन पद भरती करता आलेली नाही.

सदर स्थगीतीवर महापालिकेने अपील केले होते. सदर महापालिकेच्या अपिलावर दि.०१/१०/२०१४ रोजी महापालिकेच्या बाजूने निकाल झाला होता. तथापि महानगरपालिकेच्या दि. २०/१२/२०१४ रोजीच्या सर्वसाधारण सभेमध्ये भरती प्रक्रियेस ३ वर्षापेक्षा जादा कालावधी झालेने तसेच खेळाडूसाठी आरक्षण ठेवले नसलेने व उमेदवारांची वयोमर्यादा इत्यादी कारणास्तव भरती प्रक्रिया रद्द करण्याचा ठराव क्र.९१ दि. २०/११/२०१४ रोजी झाला.

सदर ठरावाबाबत महानगरपालिकेच्या कायदा सल्लागार यांचेकडून कायदेशिर अभिप्राय घेणेत आला असता त्यांचेकडून मा. शासनाकडून मार्गदर्शन घेणेबाबत अभिप्राय प्राप्त झाला.

त्यानुसार मा. शासनाकडे दि. २१/१२/२०१६ रोजी मार्गदर्शन मागविण्यात आले.

मा.शासनाने दि. १४/०२/२०१८ चे पत्राने सदर प्रकरणी ८ वर्षाचा कालावधी उलटलेने बिदू नामावली नोंदवही तपासणी करुन आरक्षण निश्चित करुन चालू आरक्षण व समांतर आरक्षणानुसार रिक्त पदे भरण्यासाठी मा. अप्पर मुख्य सचिव (सेवा) सामान्य प्रशासन विभाग यांचे अध्यक्षतेखालील समितीची मान्यता घेणेबाबत कळविले आहे.

दरम्यानच्या काळात बरीच पदे रिक्त झालेले महानरगपालिकेची बिंदू नामावली नोंदवही पूर्ण करणेची कार्यवाही सुरु करणेत आली. बिंदू नामावली पडताळणीसाठी मागासवर्ग कक्ष पुणे येथे दि. **१३/०१/२०१५, १०/०२/२०१६,०१/०४/२०१६, २९/०६/२०१६, ०८/०९/२०१६, १७/११/२०१६, २८/११/२०१६, १९/१२/२०१६, १७/०१/२०१७, १८/०२/२०१७, २०/०३/२०१७, १८/०४/२०१७, ०३/०५/२०१७, १३/०७/२०१७, १८/०७/२०१७, ०७/०८/२०१७, ११/०८/२०१७, २६/१०/२०१७, ३१/१०/२०१७, १९/११/२०१७, २३/०२/२०१८, १०/०४/२०१८, ०७/०५/२०१८, २१/०५/२०१८, २५/०५/२०१८, ०६/०६/२०१८** रोजी हजर राहून बिंदू नामावली नोंदवही पडताळणी पुर्ण केली आहे. यापूर्वी बिदू नामावली नोंदवही पडताळणी पूर्ण झाली नसल्याने पदे रिक्त राहिली होती आता सरळसेवेची बिंदुनामावली नोंदवही पडताळणी पूर्ण झाल्याने महिला आरक्षणासह समांतर आरक्षण पद भरतीसाठी प्रक्रिया सुरु करण्यात येत आहे.

महानरगपालिकेमध्ये वर्ग १ ते वर्ग ४ या सवंर्गातील एकूण कार्यरत अधिकारी/ कर्मचारी या कार्यरत महिला अधिकारी/कर्मचारी यांची सख्या खालील प्रमाणे आहे :—

| **वर्ग** | **एकूण कार्यरत अधिकारी/कर्मचारी संख्या** | **एकूण महिला अधिकारी /कर्मचारी संख्या** |
|---|---|---|
| अ | १० | ३ |
| ब | १२ | ५ |
| क | ३८९ | ६८ |
| ड | १२३२ | २४४ |
| **एकूण** | **१६४३** | **३२०** |

महानगरपालिकेच्या १३५ संवर्गाची बिदुनामावलीची नोंदवही पडताळणी पूर्ण झालेली आहे. महिला आरक्षण हे समांतर आरक्षण असल्याने त्यासाठी वेगळी नोंद वही ठेवता येत नाही.

महानगरपालिकेमध्ये महिलांसाठी विश्रांतीकरिता स्वतंत्र कक्ष स्थापन केले आहे. महानगरपलिकेच्या मुख्यालयातील प्रभाग समिती क्रमांक १ च्या कार्यालयात महिलासाठी विश्रांतीकरिता स्वतंत्र कक्ष स्थापन केलेला आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष :—**

सांगली महानगरपालिकेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहिती अनुषंगाने दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ व दिनांक ०८ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने सांगली-मिरज-कुपवाड शहर महानगरपालिकेत वर्ग-१ व वर्ग-४ संवर्गातील पदे कोणत्या कारणांमुळे रिक्त ठेवण्यात आली आहेत. तेथे महिला अधिकारी व कर्मचारी यांची संख्या किती आहे. एकूण किती पदांवर महिला अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे काय ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी सन २०११ मध्ये सांगली-मिरज-कुपवाड शहर महानगरपालिकेमध्ये भरतीची प्रक्रिया सुरु झाली होती. ते प्रकरण न्यायप्रविष्ट झाले आहे. रोस्टरची प्रक्रिया पूर्ण नसल्यामुळे ती भरती प्रक्रिया सन २०१४ मध्ये रद्द करण्यात आली. १४/२/२०१८ च्या शासन निर्णयानुसार असे कळविण्यात आले की, रोस्टरची तपासणी पूर्ण करण्यात यावी. त्यानंतर भरती प्रक्रिया करण्यात यावी. रोस्टरची तपासणी होऊन मंजुरी मिळालेली आहे. महिलांची रोस्टरची तपासणी पूर्ण केलेली आहे. महानगरपालिकेचे निवडणुकीचे वर्षे होते. निवडणुका होऊन एक महिना पूर्ण झालेला आहे. रोस्टरप्रमाणे भरती प्रक्रिया करुन घेण्यात येत आहे. असे समितीस सांगितले.

समितीने महानगरपालिकेमध्ये महिलांसाठी स्वतंत्र विश्रांती कक्ष स्थापन केलेले आहेत काय ? समितीने भेट दिली त्यावेळी विश्रांती कक्ष नव्हता त्यामुळे हा कक्ष केव्हा स्थापन करण्यात आलेला आहे काय ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी महिलांसाठी स्वतंत्र कक्ष स्थापन केलेला आहे त्याचे फोटो आहेत. यामध्ये आणखी काही सुधारणा करण्यात येत आहेत. आता हा कक्ष व्यवस्थित करुन तो चार महिन्यापूर्वी सुरु करण्यात आलेला आहे. समिती येऊन गेल्यावर कक्ष सुरु केला आहे तेथे बोर्ड लावण्यात आलेला आहे. असे समितीस सांगितले.

समितीने महानगरपालिकेत वर्ग १ ते ४ या सवंर्गातील पदे कोणत्या कारणांमुळे रिक्त ठेवण्यात आली आहेत, तसेच तेथे महिला अधिकारी व कर्मचारी यांची संख्या किती आहे, एकूण किती पदांवर महिला अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे ? या प्रश्नांची लेखी माहिती दिलेली नाही. अशी विचारणा केली.

त्यावर आयुक्त यांनी सांगली महानगपालिकेची स्थापना १९९८ मध्ये झाली. यामध्ये तीन शहरे महत्त्वाची होती. सांगली आणि मिरज या "अ" वर्ग नगरपालिका होत्या तर कूपवाड

ही ग्रामपंचायत होती, नंतर नगरपरिषद झाली. त्यानंतर या तीन शहरांची एकत्रित सांगली मिरज आणि कूपवाड महानगरपालिका अस्तित्वात आली. सन १९९८ पासून आजपर्यंत रोस्टर किंवा पद भरतीच्या अनुषंगाने बरीच कामे करीत आहोत. सांगली आणि मिरज नगरपालिका असताना जी नोकरभरती झाली होती तीच भरती अजूनही आहे. ही महानगरपालिका स्थापन होऊन २० वर्षे झाली आहेत. या दोन्ही नगरपालिकांतील १३५ संवर्गाचे एकत्रित रोस्टर विभागीय आयुक्तांकडे मंजुरीसाठी पाठविले होते. ते मंजूर होऊन आले. परंतु दरम्यानच्या काळात १६ टक्के मराठा आरक्षण झाल्यामुळे विभागीय आयुक्तांनी पुन्हा रोस्टर पाठविण्यास सांगितले. त्यानुसार आपण पुन्हा रोस्टर पाठवित आहोत असे समितीस सांगितले.

समितीने जी मेगा भरती होणार आहे त्यामध्ये या रिक्त जागांचा समावेश केला आहे काय ? महिलांचा अनुशेष भरण्याचा देखील विचार करावा. अशी विचारणा केली.

त्यावर आयुक्त यांनी होय आणि महिलांची भरती करणे अनिवार्य आहे. असे समितीस सांगितले. त्यावर समितीने महिलांना टाळून समांतर आरक्षण का राबविता असे समितीचे मत आहे.

**अभिप्राय व शिफारशी :—**

समितीने सांगली महानगरपालिकेला दिनांक १९ नोव्हेंबर, २०१५ रोजी दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने आणि दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ व ८ जानेवारी, २०१९ रोजी घेतलेल्या सचिवांच्या साक्षीच्या वेळी शासकीय, निमशासकीय व शासनानुदानातील संस्थांमधील सेवेतील भरतीसाठी महिलांकरिता ३०% जागा आरक्षित ठेवण्याच्या धोरणांची अंमलबजावणी महानगरपालिकांच्या सेवेमध्ये भरती करताना करण्यात येते काय ? असल्यास त्याबाबतचे निकष, भरतीची पद्धत, इत्यादी बाबत सविस्तर माहिती देण्यात यावी. महिला उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या वर्ग १ ते ४ मधील पदे भरण्यासाठी कोणती कार्यपद्धती अवलंबविण्यात येते ? महिला उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या वर्ग १ ते ४ मधील पदांपैकी सन २०१५-१६ अखेर एकूण किती पदे भरण्यात आली आहेत व किती व कोणकोणती पदे रिक्त आहेत, तसेच सदरची पदे रिक्त राहण्याची कारणे काय आहेत ? अशी विचारणा केली असता, महानगरपालिकेचे आयुक्त यांनी अशी माहिती दिली की, महानगरपालिकेची स्थापना झाल्यापासून आजमितीस सेवेत एकूण १७५० इतके अधिकारी व कर्मचारी कार्यरत असून त्यापैकी महिला अधिकारी यांची संख्या ३१८ इतकी आहे. सन २००४ मध्ये नोकर भरती करण्यात आलेली आहे. एकूण मंजूर पदे २३७७ त्यापैकी ६२७ पदे रिक्त आहेत. सन २००४ मध्ये ४८ महिलांची पदे भरलेली आहेत.

महानगरपालिकेमध्ये वर्ग १ ते ४ या संवर्गातील एकूण कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांची एकूण संख्या १६६३ व एकूण महिला अधिकारी/कर्मचारी यांची संख्या ३२० असून

महानगरपालिकेच्या १३५ संवर्गाची बिंदूनामावलीची नोंदवही पडताळणी पूर्ण झालेली आहे. महिला आरक्षण हे समांतर आरक्षण असल्याने त्यावेळी वेगळी नोंदवही ठेवता येत नाही. त्यावर महिलांना टाळून समांतर आरक्षण महानगरपालिकेने राबवू नये अशा सूचना समितीने दिल्या.

तसेच गत ३ वर्षांत सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये महापालिकेने नोकर भरती केली नाही. त्यामुळे महिला उमेदवारांसाठी राखीव असलेली पदे भरण्यात आली नाहीत. महाराष्ट्र शासन निर्णयानुसार व महापालिका सेवा भरती प्रवेश नियमानुसार नियुक्ती केली जाते. सध्या रोस्टर अद्ययावत करण्याचे काम चालू आहे. ती आवश्यक ती कार्यवाही ठेवणेत येत आहे. शासनाच्या आदेशानुसार व मार्गदर्शनानुसार कार्यवाही ठेवणेत येत आहे.

महानगरपालिकेने स्टाफ पॅटर्न (कर्मचारी संवर्ग) करण्याचे काम सुरू केले होते. नियुक्ती नियमात दुरुस्ती करुन त्याचा मसुदा शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आला असल्याने विभागीय अधिकाऱ्यांनी समितीस सांगितले होते. त्यानुसार सदर मसुद्यास शासनाची मान्यता प्राप्त झाली असल्यास त्यानुषंगाने पालिकेत नोकरभरती करण्याच्या दृष्टीने तसेच महिलांच्या आरक्षित जागा भरण्याअर्थी शासनाने कार्यवाही करावी अशी शिफारस समिती शासनास करीत आहे. तसेच ३० टक्के आरक्षणाप्रमाणे महिलांची भरती प्रक्रियेचा प्रस्ताव शासनाकडे लवकरात लवकर पाठवून महिलांची पदे लवकर भरण्याची तसेच संवर्गनिहाय, प्रवर्गनिहाय महिलांच्या रिक्त पदांची माहिती दिली नाही तसेच सन २०११ मध्ये जाहिरातीत महिलांसाठी ३० टक्के आरक्षण ठेवण्यात आले आहे असे नमूद केले आहे, अशी विभागीय अधिकाऱ्यांनी समितीस माहिती दिली आहे.

**याप्रकरणी सांगली महानगरपालिकेमध्ये समांतर आरक्षण वापरूनही पदे रिक्त असतील तर सदरहू बाब गंभीर आहे. महिलांची जी पदे सहज उपलब्ध असताना ती भरण्यात आलेली नाहीत. महानगरपालिकेने समांतर आरक्षणाचा शासन निर्णय हा समितीने केलेल्या शिफारशीनुसार वापरून महिलांसाठी आरक्षित असलेल्या जागा रिक्त न ठेवता त्या जागेवर महिला उमेदवारांचीच भरती प्रक्रिया राबवावी. महानगरपालिकेने स्टाफ पॅटर्न (कर्मचारी संवर्ग) करण्याचे काम सुरु केले असून नियुक्ती नियमात दुरुस्ती करून शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आलेल्या मसुद्यास शासनाने लवकरात लवकर मंजुरी देवून महानगरपालिकेत नोकरभरती करण्याच्या दृष्टीने तसेच महिलांच्या आरक्षित जागा लवकरात लवकर भरण्यासाठी शासनाने कार्यवाही करावी. अशी समिती आग्रहाची शिफारस करीत असून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला २ महिन्यांत सादर करण्यात यावा.**

### ३.२ सांगली महानगरपालिकेचे गत ३ वर्षातील वर्षनिहाय अंदाजपत्रक :—

महानगरपालिकेचे गत तीन वर्षातील वर्षनिहाय सन २०१२-२०१३, २०१३-२०१४ व २०१४-२०१५ मधील वार्षिक अंदाजपत्रक किती रक्कमेचे आहे ? शासन धोरणानुसार प्रत्येक महानगरपालिकेत महसूली व आस्थापना खर्च वगळून एकुण अंदाजपत्रकाच्या ५० टक्के निधी महिला व बालकल्याण विभागासाठी राखून ठेवण्यात येतो. त्या अनुषंगाने आपल्या महानगरपालिकेतील मागील ३ वर्षात सदरहू ५ टक्के निधी कसा खर्च करण्यात आला आहे ? महिला अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी महानगरपालिकेकडून कोण कोणत्या कल्याणकारी योजना/उपक्रम राबविले जातात ? महानगरपालिकेमार्फत महिलांचे सबलीकरण करण्याकरिता तसेच आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या महिलांना सक्षम करण्यासाठी तसेच आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या महिलांना सक्षम करण्याकरिता देण्यात येणाऱ्या सोई-सवलती इ. योजनांबात माहिती देण्यात यावी ? उक्त योजनांवर २०१२-२०१३, २०१३- २०१४ व २०१४-२०१५ या तीन वर्षात व वर्षनिहाय व योजना निहाय एकूण किती खर्च झाला ? महानगरपालिकेच्या एकूण उत्पन्नाच्या किती टक्के रक्कम महिलांसाठी कल्याणकारी योजना राबविण्याबाबत खर्च करण्यात येते ? महिला उद्योजकांसाठी विशेषत: आर्थिकदृष्ट्या मागास महिला उद्योजकांसाठी उद्योगधंदे उभारण्याकरिता महानगरपालिकेमार्फत विशेष सोई सवलती देण्यात येतात काय, असल्यास त्याबबत सविस्तर माहिती देण्यात यावी. महानगरपालिका क्षेत्रात महापालिकेच्या मालकीचे मंडई/बाजार (मार्केट्स) यांची संख्या किती आहे ? त्याप्रत्येक ठिकाणी एकूण किती गाळे आहेत. गाळ्यांचे प्रकार कोणकोणते आहेत ? (मासळी विक्री कापड दुकान इ.) सदर मार्केट / मंडई बाजार इ.मधील गाळे वाटपाचे निकष काय आहेत, सदर मार्कटस मधील काही गाळे महिलांकरिता राखून ठेवले जातात काय, असल्यास, किती प्रमाणात आणि गाळे वाट्यात महिलांना काही सवलती देण्यात येतात काय ? महानगरपालिकेमार्फत राबविणेत येणाऱ्या महिलांच्या कल्याणकारी योजना व सोई-सवलती इ.बाबतची माहिती गरजू महिलांमार्फत पोहचविण्याचे व त्यांनी या योजनांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा यासाठी त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी स्वतंत्र अशी यंत्रणा महानगरपालिकेकडे आहे काय, असल्यास तीचे स्वरूप काय आहे व या यंत्रणेने आतापर्यंत कशा प्रकारे कार्य केले आहे ? महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तू विक्रीचे कोणते धोरण आहे, उक्त धोरणानुसार सदर वस्तू विकल्या जातात काय ? महानगरपालिकेमध्ये महिला नगरसेविकांसाठी व महिला कर्मचाऱ्यांसाठी वेगळा कक्ष आहे काय ? महानगरपालिकेत महिला व बाल कल्याण अधिकारी हे पद आहे काय ? असल्यास त्यांची कार्यकक्षा काय आहे ? महानगरपालिकेच्या अखत्यारित किती प्राथमिक आणि माध्यमिक शाळा आहेत, या शाळांमध्ये एकूण किती शिक्षक व शिक्षकेतर

कर्मचारी आहेत, या कर्मचाऱ्यांपैकी ३० टक्के महिला आरक्षणानुसार सध्या भरती करण्यात आली आहे काय ? अशी विचारण्यात आली.

**उपरोक्त प्रकरणी सांगली महानगरपालिकेकडून खालील प्रमाणे माहिती प्राप्त झाली :—**

महानगरपालिकेचे गत ३ वर्षाचे वार्षिक अंदाजपत्रक

(अ) सन २०१२-१३ - रू.३०५.१८ कोटी

सन २०१३-१४ - रू.४०५.३५ कोटी

सन २०१४-१५ -रू.४७२.२५ कोटी

महिला व बालकल्याण समितीसाठी खालीलप्रमाणे खर्च केली आहे.

सन २०१२-१३ मंजूर निधी रू.६९,५०,०००/- व खर्च झालेला निधी रू.१२,१३,५०३/-

| अ. क्र. | समितीकडील उपक्रम व योजना | खर्च रक्कम |
|---|---|---|
| १ | सभापतींसाठी वाहन व्यवस्था | १०९०१६ |
| २ | जाहिर प्रसिध्दी | १६२० |
| ३ | माता व बाल संगोपन व लोकशिक्षक जनजागृतीसाठी आरोग्य शिबीर | १००००० |
| ४ | प्रसुती गृहातील महिलांना सकस आहार | १५४२३० |
| ५ | संगणक प्रशिक्षण | २९९००० |
| ६ | समाजामध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिलांचा गौरव सभारंभ | २४९४५ |
| ७ | प्रसिध्दी | ४९९२ |
| ८ | बालवाडी सेविकेंना मानधन वाटप | ५१९५०० |
| | **एकूण ...** | **१२१३५०३** |

सन २०१३-१४ मंजूर निधी रू.४५,७५,०००/- व खर्च झालेला निधी रू. १६,४५,८३४/-

| अ. क्र. | समितीकडील उपक्रम व योजना | खर्च रक्कम |
|---|---|---|
| १ | सभापतींसाठी वाहन व्यवस्था | ४०९९९ |
| २ | जाहिर प्रसिध्दी | ९५० |

| | | |
|---|---|---|
| ३ | महिलांचा आर्थिक विकास प्रशिक्षण (ब्युटी पार्लर) | २९९५०० |
| ४ | प्रसुती गृहातील महिलांना सकस आहार | २२६३८५ |
| ५ | हळी कुंकू सभारंभ व व्याख्यान व पाक कला स्पर्धेचे आयोजन | २५००० |
| ६ | मुलींना व महिलांना स्वरक्षणासाठी ज्युडो कराटे प्रशिक्षण | २७०००० |
| ७ | बालवाडी सेविकेंना मानधन वाटप | ७८३००० |
| | **एकूण ...** | **१६४५८३४** |

सन २०१४-१५ मंजूर निधी रू.३६,३०,०००/- व खर्च झालेला निधी रू.१,६८,४४८/-

| अ. क्र. | समितीकडील उपक्रम व योजना | खर्च रक्कम |
|---|---|---|
| १ | सभापतींसाठी वाहन व्यवस्था | ११३१८८ |
| २ | माता व बाल संगोपन व लोकशिक्षक जनजागृतीसाठी आरोग्य शिबीर | १००००० |
| ३ | प्रसुती गृहातील महिलांना सकस आहार | १४०१५ |
| ४ | हळदी कुंकू सभारंभ व व्याख्यान व पाक कला स्पर्धेचे आयोजन | १९७४५ |
| ५ | बालवाडी सेविकेंना मानधन वाटप | ७९४५०० |
| | **एकूण ...** | **१६८४४८** |

महिला व बालकल्याण समितीतर्फे

१. आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या युवतींनं संगणक प्रशिक्षण देणे तसेच कॅटरिंग, कुंकींग चे प्रशिक्षण देणे.

२. माता बाल संगोपन व लोकशिक्षण जनजागृती करणे.

३. विधवा व घटस्फोटीत महिलांना व अंतर जातीय विवाह करणे प्रोत्साहनपर अर्थसहाय्य.

४. प्रसुतीगृहातील प्रसुतीपूर्व व प्रसुती पश्चात महिलांना सकर आहार पुरवठा.

५. घटस्फोटीत परिवक्त्या व गरजू महिलांसाठी स्वयंरोजगार प्रशिक्षण.

६. मनपा क्षेत्रातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिला सामाजिक कार्यकर्त्यांचा गौरव, महिलं मंडळामार्फत प्रौढ शिक्षण शिबीर, समुपदेशन केंद्रामार्फत सल्ला देण्याचे कार्य. इत्यादी योजना राबविल्या आहेत.

महिला व बाल कल्याण समितीकडे महिलांच्या योजनांसाठी अंदाजपत्रकाच्या एकूण ५ टक्के तरतूद केली जाते व महिला व बाल कल्याण समितीच्या मान्यतेप्रमाणे योजनांवर खर्च केला जातो.

सदर कामी मनपाचे धोरण ठरलेले नाही. तथापि, आवश्यक ती कार्यवाही ठेवत आहोत.

महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिकेच्या मालकीचे असलेल्या गाळयांची संख्या एकूण ४११ त्यापैकी ४०३ भाड्याने दिलेले आहेत व ८ गाळे शिल्लक आहेत.

| अ. क्र. | लेखाशिर्ष | गाळयांची संख्या | दिलेले गाळे | शिल्लक गाळे |
|---|---|---|---|---|
| १ | सिंधी मार्केट सांगली | ५१ | ५१ | निरंक |
| २ | पेठभाग भाजी मंडई गाळे | ६४ | ६४ | निरंक |
| ३ | छ.शिवाजी मंडई गाळे | ८६ | ८६ | निरंक |
| ४ | राजवाडा शॉपिंग सेंटर गाळे | १८ | १८ | निरंक |
| ५ | मंगलधाम शॉपिंग सेंटर गाळे | २१ | २१ | निरंक |
| ६ | मक्तेबाब इतर इमारत भाडे | १२ | १२ | निरंक |
| ७ | शिराळकर दवाखाना गाळे | ११ | ११ | निरंक |
| ८ | प्राथमिक शाळा क्र.१ गाळे | १५ | ११ | ४ गाळे |
| ९ | बालक्रिडा उद्यान गाळे | ५ | ५ | निरंक |
| १० | मंडई दुकान गाळे | ३ | ३ | निरंक |
| ११ | बापटबाल मंदीर गाळे | १० | १० | निरंक |
| १२ | अतिथीगृह दुकान गाळे | ३ | ३ | निरंक |
| १३ | धान्य बाजार पत्रा शेड | ३२ | ३२ | निरंक |
| १४ | रेवणी रोड पत्रा शेड | १५ | १५ | निरंक |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५ | जयश्री चित्र पत्रा शेड | १७ | १७ | निरंक |
| १६ | मटण मार्केट पत्रा शेड | १७ | १७ | निरंक |
| १७ | बीफ मार्केट | १५ | १४ | १ मनपाच्या ताब्यात |
| १८ | महात्मा फुले मंडई | १३ | १० | ३ शिल्लक |
| | **एकूण ...** | **४११** | **४०३** | **८ शिल्लक** |

सदर मार्केट / मंडई / बाजार इ. मधील गाळे लिलाव पध्दतीने देण्यात येतात. त्यामध्ये पुरूष व महिला हे भाग घेऊ शकतात.

तसेच महिलांकरिता गाळे राखून ठेवले जात नाहीत. व सवलती ही दिली जात नाही. परंतु महिलांच्या करीता तसेच मागासवर्गीय महिलांसाठी गाळे राखीव ठेवणेबाबत आवश्यक ते धोरण ठरविणेची तजवीज ठेवत आहे.

महानगरपालिकेच्या मालकीच्या मार्केटमधील गाळे सध्या महिलांना वितरीत करण्यात आलेले नाहीत. आहे, महापालिकेतर्फे योजलेल्या योजनांची माहिती जास्तीत जास्त महिलांना व्हावी याकरिता त्याबाबत माहितीपत्रके काढली जातात. व महिला सदस्यांमार्फत शहरातील सर्व प्रभागामध्ये वितरीत केली जातात. वृत्तपत्रात बातमी प्रसिध्दी केली जाते. तसेच स्वयंसेवी संघटना इत्यादींना माहिती दिली जाते. बहुसंख्य महिलांनी लाभ घेतला आहे.

महापालिकेच्या महिला बाल कल्याण समितीमार्फत ज्या वेगवेगळया योजना राबविल्या जाणाऱ्या प्रशिक्षणांचे सर्टीफिकेट देऊन त्यांनी घेतलेल्या प्रशिक्षणाचा उपयोग करून त्यांना स्वतंत्र प्रशिक्षण व्यवसाय सुरू करता येतो. काही महिलांनी स्वत:चा व्यवसाय सुरू केला आहे. उदा.फॅशन डिझाईनिंग, ब्युटी पार्लर इत्यादी.

याकामी महापालिकेला केंद्र व राज्य शासनाकडून कोणतेच अनुदान प्राप्त होत नाही.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये दारिद्र्य देषेखालील सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत महिला बचत गटांना अनुदान (रिव्हॉलव्हींग फंड) व बँकेकडून अर्थ साह्य देण्यात येते त्याचे विवरण पत्र.

| सन | बचत गटांना अनुदान | | वचत गटांना कर्ज उपलब्ध/अनुदान | |
|---|---|---|---|---|
| २०१२-१३ | १६३ | १४००००/- | ९४ | २०८५०००/- |
| २०१३-१४ | ८५ | १४१२०००/- | १८१ | ३६१८०००/- |
| २०१४-१५ | ११ | ११००००/- | ३ | निरंक |

महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तु विक्रीसाठी सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रामध्ये दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्या करीता आधार केंद्र सुरु करण्याबाबत महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. जीई एन/सुजयो/-२००८/प्र.स.६९/ नवि- १६, मंत्रालय मुंबई ०३२ दि. ८ ऑक्टोंबर २००८ रोजी आधार केंद्र स्थापन करण्यासाठी महासभेची धोरणात्मक मान्यता मिळाली आहे.

आधार केंद्र चालविण्याकरिता जनशिक्षण संस्था (श्रमीक विद्यापीठ) लोकशिक्षण प्रसारक मंडळ, औरगांबाद या स्वयंसेवी संस्थेची निवड, निवड प्रक्रियेत दि.५/१२/२००९ रोजी करण्यात आली आहे.

महानगरपालिकेने सुवर्ण जसंती शहरी रोजगार योजनेतर्गत महिला बचत गटासाठी महिलांनी उत्पादित केलेल्या मालाची विक्री करण्यासाठी आधार केद्र सुरु करण्यात आले आहे. या आधार केद्रामध्ये महिला बचत गटांनी तयोर केलेले वस्तु व मटेरियल विक्री साठी ठेवण्यात आलेले आहे. सदर आधार केंद्रमध्ये वैयक्तिक स्वयंरोजगार केलेले लाभार्थी व महिला बचत गटांची साहित्य वस्तु विक्रीसाठी ठेवण्यात आले आहे. उदा. कोल्हापुरी चप्पल, फिनेल, शेवया, कुराडया, बेन्टेक्सची दागिणे, भडंग, लोणचे, शोभेच्या वस्तु, कापडी साहित्य, पर्स असे वेगवेगळे साहित्य वस्तु विक्रीसाठी ठेवण्यात आले होते.

आधार सेवा सुविधा केंद्रामार्फत दारिद्रर येषेखालील सुशिक्षीत बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करुन दिले जातात. शहरी भागातील नागरीकांच्या समस्या सोडविण्यासाठी आधार केंद्रामार्फत घरगुती वयरिंग, सुतार काम, प्लंबिग, ड्रेनेज चोकप काढणे, गवंडी काम अशा प्रकरची कामे दिली आहेत.

सबब सुवर्ण जयंती शहरी रोजना नगर विकास विभाग शासन निर्ण क्र. NULM-२०१४ प्र.क्रं.१०४/नवी-३३ दि. २८ ऑगस्ट २०१४ अन्वये संपुष्ठात येवून संपुष्ठा येवून केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानांची अंमलबजावणी करण्यास मान्यता दिली असल्याने सदरची आधार केंद्रे पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत बंद आहेत.

महानगरपालिकेमध्ये महिला नगरसेविकांसाठी व महिला कर्मचाऱ्यांसाठी वेगळा कक्ष राखून ठेवण्यात आला आहे.

मनपाच्या आस्थपनेवर महिला व बाल कल्याण अधिकारी हे पद नाही. परंतु या समितीचे कामाज पाहणेसाठी १ समन्वय अधिकारी, १ लिपीक व २ सेविका दिले आहेत.

महिलांच्या आरोग्यासाठी व्याख्यानाचे आयोजन केले जाते.

२) **प्राथमिक शाळा :—**

महापालिकेच्या अखत्यारित एकूण ५० प्राथमिक शाळा आहेत. या ५० प्राथमिक शाळांमध्ये १८० शिक्षक कार्यरत आहेत, शाळेमध्ये शिक्षकेतर कर्मचारी नाहीत. सध्या भारती करणेत आलेली नाही. मात्र कार्यरत १८० शिक्षकांपैकी महिला शिकक्षका ११५ आहेत.

**१)** कनपा महिला व बालकल्याण समिती मार्फत वेळोवेळी आरोग्य शिबीराचे आयोजन करणात येते.

**२)** RCH मार्फत महिलांकरीता आरोग्य शिबीराचे आयोजन केले जाते.

**३)** गरोदर मातेच्या घरोघरी फिरुन नोंदणी करुन त्यांना धनुर्वात इंजेक्शन, टॉनिक व गोळया दिल्या जातात.

**सांगली महानगरपालिकेच्या आयुक्त यांची साक्ष : —**

सांगली महानगरपालिकेला गुरुवार, दिनांक १९ नोव्हेंबर, २०१५ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी आयुक्त यांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने ३ वर्षाच्या अंदाजपत्रकाची लेखी माहिती समितीला सादर केली आहे. सन २०१२-१३ मध्ये रु ३०५.१८कोटी, सन २०१३-१४ मध्ये ४०५.३५ कोटी व सन २०१४-१५ मध्ये ४७२.२५ कोटी एवढे बजेट आहे. प्रत्येक महानगरपालिकेने एकूण अंदाजपत्रकाच्या ५ टक्के निधी महिलांच्या कल्याणकारी योजनांसाठी राखून ठेवायाचा असतो. या प्रमाणे आपण प्रत्येक वर्षी निधी राखून ठेवला आहे का, तो खर्च केला का,याबाबतची तपशिलवार माहिती समितीला द्यावी अशी विचारणा केली.

त्यावर आयुक्त यांनी सन २०१२-१३ या वर्षाचे एकूण बजेट ३०५.१८ कोटी असून महिला व बाल कल्याण समितीसाठी रु ६९.५०.०००/- एवढी तरतुदी करण्यात आली होती. असे समितीस सांगितले.

समितीने रु.६९.५०.०००/- एवढी तरतुदी करण्यात आली असली तरी केवळ रु.१२.१३.५०३/-एवढा खर्च केला आहे त्यामधील मोठा खर्च रु.१.०९.०१६/- सभापतींच्या वाहन व्यवस्थेसाठी आणि रु.५.१९.५००/-एवढा खर्च बालवाडी सेविकेंच्या मानधन वाटपासाठी केलेला आहे. वास्तविक पाहता बालवाडी सेविकांच्या मानधनावरील खर्च शिक्षण विभागाकडून केला जातो. तो महिला व बाल विकास शीर्षामधून का केला ? प्रसिध्दीसाठी १६२०/- एवढा खर्च केला आहे. ही प्रसिध्दी देखील या शीर्षामधून करावयाचा नसतो. चुकीच्या पध्दतीने खर्च केला आहे. शासन निर्णय दिनांक ८ नोव्हेंबर, २०१० चे उल्लंघन केले आहे, हे खरे आहे का ?

अंदाजपत्रके कोणत्याही काळातील असली तरी आपण ही सर्व माहिती घेऊन समितीला सादर करावयास हवी होती. आपण सर्व प्रश्नांबाबत अभ्यास केला आहे का ? विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर समितीला मिळालेले नाही. आपण समितीचा वेळ घेत आहात, आपण सध्या आयुक्त म्हणून येथे कार्यरत आहात व महानगरपालिकेचे प्रमुख म्हणून समितीने आपल्याला प्रश्नावली पाठविली होती व आपणच लेखी माहिती समितीला सादर केली आहे, त्या संदर्भातच समिती आपल्याला उपप्रश्न विचारीत आहे. सकस आहार,बालवाडी सेविकांचे मानधन, वाहन व्यवस्था यासाठी आपल्याला या शीर्षामधून खर्च करता येतो का ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी बालवाडी सेविकांच्या मानधनाचा प्रश्न अनेक वर्षे प्रलंबित होता. त्यावेळी आमसभेने असा निर्णय घेतला की, बालवाडी सेविकेंचे मानधन या शीर्षामधून देण्यात यावे व त्यानूसार आमसभेने ठराव केला. असे समितीस सांगितले.

समितीने सन २०१२-१३, सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या वर्षात केलेल्या तरतुदीएवढा खर्च आपण केलेला नाही. उर्वरित निधी कोठे खर्च केला ? अशी विचारणा केली.

त्यावर आयुक्त यांनी या वर्षी महिला व बाल कल्याणसाठी जेवढी तरतूद करण्यात आली आहे तेवढे उपक्रम हाती घेण्यात आले आहेत व अंमलबजावणी केली आहे. असे समितीस सांगितले.

समितीने गत तीन वर्षातील खर्चाची माहिती आपल्याला विचारलेली आहे. तरतुदी एवढा खर्च आपण केलेला नाही आणि या शीर्षातून चुकीच्या बाबींवर खर्च केलेला आहे. प्रत्येक वर्षी तेच झाले आहे. सन २०१३-१४,सन २०१४-१५ मध्ये देखील तेच झाले आहे. तसेच दिनांक ३० डिसेंबर, २००६ व दिनांक ०८नोव्हेंबर, २०१० चा शासन निर्णय पालन झालेला नाही. सन २०१४-१५ ला प्रशिक्षणासाठी काहीही खर्च केलेला नाही. अशी विचारणा केली.

त्यावर आयुक्त यांनी राहिलेला निधी कुठेही न वळविता तसाच शिल्लक आहे. असे समितीस सांगितले.

समितीने महिला व बाल कल्याण समितीचा राहिलेला निधी खात्यावर शिल्लक आहे असे म्हणणे आहे का ? चुकीचे उत्तर देऊ नये. सन २०१२-१३,सन २०१३-१४, सन २०१४-१५ ला राहिलेला शिल्लक निधी कॅरि-फारवर्ड केला का, असे कसे उत्तर देत आहात ? तो पैसा इतरत्र वळविलेला नाही, मग त्याला प्रशासकीय मंजुरी कशी काय दिली, बालवाडी सेविकांचा पगार यातून देता येतो का, वाहनावर खर्च करता येतो का, मग का केला, कोणी केला ? संबंधितावर या संदर्भात कारवाई केली पाहिजे. या संदर्भातील सविस्तर अहवाल पाठवावा, समिती त्यानंतर त्या विषयावर निर्णय घेईल. अशी विचारणा केली.

त्यावर आयुक्त यांनी समितीला सांगतो की, हा अहवाल समितीला उपलब्ध करुन देण्यात येईल. मी ग्वाही देतो की, हा निधी इतरत्र खर्च केलेला नाही, खर्चच झालेला नाही.  बजेट तरतूद केल्यानंतर संबंधित विभाग खर्च करतो. असे समितीस सांगितले.

समितीने निधी कॅरि-फारवर्ड होता का ? मग तो निधी गेला कुठे ? अशी विचारणा केली.

त्यावर लेखाधिकारी यांनी नाही. पण तो निधी खर्च केलेला नाही. त्या वर्षात खर्च केला होता, बाकीचा निधी खर्ची पडलेला नाही. असे समितीस सांगितले.

समितीने महिलांच्या कल्याणकारी योजनांसाठी अंदाजपत्रकाच्या एकूण ५ टक्के तरतूद केली जाते, समितीच्या मान्यतेप्रमाणे योजनांवर खर्च केला जातो. मग माहिती चुकीची का दिली, संबंधितांवर कारवाई का करु नये ? अशी विचारणा केली.

त्यावर लेखाधिकारी यांनी सन २०१५ -१६ ला ५ टक्के तरतूद केली आहे. मागे केली नव्हती . असे समितीस सांगितले.

समितीने ८ गाळे शिल्लक आहेत. दिनांक १२ नोव्हेंबर ,२०११ चा शासन निर्णय असा आहे. की, एकुण गाळयामंधील ३० टक्के गाळे माहिलांच्या बचत गटासाठी किंवा स्वयंसहिय्त गटांसाठी राखून ठेवले पाहिजेत . परंतू ही बाब महानगरपाहिलकेमधुन दिसून येत नाही. हे योग्य नाही. सदर बाबीचे कारण काय आहे. सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी का केली नाही. अशी विचारणा केली.

त्यावर आयुक्त यांनी आस्थापना विषयक अडचण होती. गाळे नगरपालिकांच्या काळात बांधले आहेत आणि तेव्हा ते वितरित करण्यात आले आहेत. महानगरपालिका स्थापन झाल्यानंतर किंवा शासनाचे धोरण ठरल्यानंतर हे गाळे बांधण्यात आलेले नाहीत. जुने गाळे आहेत. फक्त त्याचे रिन्युअल होत आहे. त्यामुळे असे दिसत आहे. येथून पुढे महानगरपालिकेचे गाळे बांधले जातील तेव्हा महिलांसाठी ३० टक्क्यांची तरतूद ठेवण्यात येईल.असे समितीस सांगितले.

समितीने गाळे भाडयाने देताना आरक्षणाप्रमाणे दिले पाहिजे होते. ना नफा ना तोटा या तत्वावर कार्यवाही करण्यात यावी असा निर्णय झाला आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केली पाहिजे. हा निर्णय सन २००१ चा आहे. गाळे सन २०११ च्या पूर्वी बांधले असतील. येथून पुढे हा निर्णय अंमलात आणला पाहिजे होता. अशी विचारणा केली.

त्यावर आयुक्त यांनी करार संपतील त्याप्रमाणे शासन निर्णयाप्रमाणे महिलांना ३० टक्के आरक्षणानुसार गाळे वितरित करण्यात येतील. असे समितीस सांगितले.

समितीने शासनाच्या नियमाप्रमाणे असे देता येते का ? पण शासन निर्णयाप्रमाणे देऊ शकत नाही. आपण याची चौकशी करावी. गाळे वितरणाच्या बाबतीत खुलासा मागवून अहवाल सादर करण्यात यावा. अशी विचारणा केली.

त्यावर आयुक्त यांनी नगरपालिका असताना सर्व दिले आहेत. असे समितीस सांगितले.

समितीने आता काही गाळे वितरित करण्याचे शिल्लक आहेत का ? असतील मग ते गाळे तरी महिलांना देण्यात यावेत. अशी विचारणा केली.

त्यावर आयुक्त यांनी होय. काही गाळे वितरित करण्याचे शिल्लक आहेत.

समितीने महानगरपालिकेची अर्थिक परिस्थिती बरोबर नाही असे म्हणता. मग कुपवाड एमआयडीसी महानगरपालिकेमध्ये समाविष्ट करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला का ?अशी विचारणा केली.

त्यावर आयुक्त यांनी प्रस्ताव पाठविलेला नाही. प्रत्यक्ष एमआयडीसीला सुविधा देण्यात येत नाहीत. एमआयडीसीच्या विरोधी बाजूला वस्ती आहे, तेथे राहतात. ती पूर्वीची कुपवाड नगरपालिका आहे, त्यांना इन्फ्रास्ट्रक्चर द्यावे लागते. एमआयडीसीला सुविधा देण्यात येत नाहीत. असे समितीस सांगितले.

समितीने म्हणण्याप्रमाणे रस्त्याच्या एका बाजूला एमआयडीसी आहे आणि दुसऱ्या बाजूला लोक राहतात. त्यांना वीज, पाणी, आरोग्य, रस्ते यांची व्यवस्था देतो, त्यामुळे आर्थिक येणेही गरजेचे आहे. तशा प्रकारचा प्रस्ताव पाठविणे गरजेचे आहे. नगरसेविकांना योग्य सन्मान दिला जात नाही ही देखील गंभीर बाब आहे. महापौरांनी रुलिंग दिले तरी देखील अधिकाऱ्यांनी महिला नगरसेविकांनी बोलण्यास हात वर केला तर त्यांना बोलण्याची संधी देणे गरजेचे आहे. नगरसेविका म्हणतात की, अधिकारी दूरध्वनी घेत नाहीत. ही देखील गंभीर बाब आहे. अधिकाऱ्यांवर का कारवाई करण्यात येऊ नये ? अशी विचारणा केली.

त्यावर आयुक्त यांनी सर्वसाधारण सभेमध्ये देखील हा इश्यू आला होता. महिलांना प्रश्न विचारायचे होते. परंतु अजेंडयावर नसलेल्या विषयावर त्यांना प्रश्न विचारायचे होते आणि त्यासाठी त्या हात वर करत होत्या. पॉईंट ऑफ आँडर न घेता चर्चा करु द्या, महिन्यातून एकदा येतो, बोलू द्या असे महापौरांना सांगितले, त्यावेळी महापौरांनी सांगितले की, विषयपत्रिकेत हा विषय नाही. विषयपत्रिकेत विषय नसताना तत्संबंधी बोलता येत नाही, विषय असल्यावर बोला.असे समितीस सांगितले.

समितीने म्हणणे बरोबर आहे. परंतु एखाद्या वॉर्डमध्ये गंभीर घटना घडली असेल आणि ती सांगण्यासाठी नगरसेविकेने हात वर केला तर बोलू दिले पाहिजे. त्यावेळी त्या बोलू शकत नाहीत असे कुठे म्हटले आहे ? नगरसेविकांना अशा वेळी बोलू दिले जाऊ नये हे योग्य नाही. अशी विचारणा केली.

त्यावर प्रशासन अधिकारी यांनी आम्हाला बोलू देत नाहीत असा विष्जय उपस्थित झाला होता. ३० ऑक्टोंबरला झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये अचानक नगरसेविकांनी हात वर केला. मिरजेच्या ड्रेनेजच्या संदर्भातील प्रश्न विचारायचा होता. महापौरांनी त्यांना परवानगी दिली होती,

सभागृहात त्या संदर्भात चर्चाही झाली होती. प्रत्येक वेळी असे होत नाही की, नगरसेविकांना बोलू दिले जात नाही. महापौर हे पीठासीन अधिकारी आहेत, त्यांचा सभागृहात सर्वाधिकार असतो. महापौरांनी परवानगी दिल्यावर नगरसेवक व नगरसेवाकांनी बोलायचे असतो. जरी असलो तरी पीठासीन अधिकारी म्हणून त्यांचा अंतिम निर्णय असतो. महापौरांच्या निर्णयापुढे काहीही करता येत नाहीत. असे समितीस सांगितले.

समितीने अधिकारी फोन उचलत नाहीत, कामे करत नाहीत याचे काय करणार आहात, महिलांना दुय्यम दर्जा का दिला जातो ? अशी विचारणा केली.

त्यावर आयुक्त यांनी अनौपचारीक बैठकीत बोलताना काही नगरसेविकांनी सांगितले होते की, आयुक्तांकडून रिस्पॉन्स मिळतो. सर्वसाधारण सभेमध्ये बोलू दिले जात नाही असे सांगून येथे उद्रेक झाला. परंतु तो विषय विषयपत्रिकेवर नव्हता. असे समितीस सांगितले.

समितीने नगरसेविकांना प्रशिक्षण दिले नसल्यामुळे विषय कसा कोणत्या वेळी मांडायचा हे त्यांना माहिती नाही. त्यांना प्रशिक्षण दिले पाहिजे. कोणता विषय पॉईट ऑफ आर्डर म्हणून मांडायचा कोणता विषय ६६ ग किंवा ६६ क म्हणून मांडायचा हे त्यांयना माहिती नाही. महिला व बाल कल्याण समितीकडून प्रशिक्षण का दिले जात नाही ? अशी विचारणा केली.

त्यावर प्रशासन अधिकारी यांनी नगरसेविकांना प्रशिक्षण देण्यात आले होते. खंडाळा येथे प्रशिक्षण ठेवले होते. नवीन बॉडीच्या सर्व नगरसेवक, नगरसेविकांना प्रशिक्षण देण्यात आले होते. २/३ वेळा प्रशिक्षण दिले आहे. प्रशिक्षणामध्ये सर्व गोष्टी त्यांनी शिकून घ्यायचा असतात. असे समितीस सांगितले.

समितीने गायनॅक डॉक्टर नाहीत, सिजेरीन होत नाही, सोनोग्राफी फिल्म बरोबर नाही, या गंभीर बाबी आहेत. अशी विचारणा केली.

त्यावर आयुक्त यांनी नगरसेविकांना तक्रारीबदल बोलत आहोत. सर्वसाधारण सभेमध्ये घटना घडली.त्यावेळी संबंधित नगरसेविकांनी सांगितले. त्यावेळी दसरा होता, घटस्थापना झाली होती. सुट्टी असताना मी कार्यक्रम अटेंड केला होता.

तसेच प्रसुतीगृहात २ गायनॅक डॉक्टर आहेत. सोनोग्राफीचा मुद्दा होता. स्पेशल सोनोग्राफीसाठी रेडिओलॉजिस्टकडे पाठविले जाते. स्पेशल ओपिनिअनसाठी ते गरजेचे आहे. परंतु रेडिओलॉजिस्ट हे पद नाही. गायनॅक आहेत. एक सोनोग्राफी अनॅमलीसाठी बाहेर करावी लागते. असे समितीस सांगितले.

समितीने सोनोग्राफीच्या संदर्भातील पीसीपीएनडीटी ॲक्ट माहिती असेल. सरसकट सोनोग्राफीसाठी बाहेर पाठविता हे योग्य नाही. हे सर्व माहिती घेऊन करता का ? अशी विचारणा केली.

त्यावर तत्कालीन आरोग्य अधिकारी यांनी होय, बाळात जन्मजात व्यंग आहे का हे पाहण्यासाठी पाठविले जाते. डॉक्टरांच्या मार्फत सोनोग्राफी सेंटरची तपासणी केली जाते. सदर सोनोग्राफीसाठी रेडिओलॉजिस्ट लागतात. मात्र ते पद आपल्याकडे नाही. आपल्याला ३ डी ची देखील मशिन लागते, मात्र ती व्यवस्था देखील आपल्याकडे नाही.

समितीने अनौपचारीक चर्चेत एक महिला रिक्षामध्ये प्रसुत झाली असे सांगण्यात आले ही बाब गंभीर आहे. अशी विचारणा केली.

त्यावर तत्कालीन आरोग्य अधिकारी यांनी महिला दुसऱ्या प्रसुतीसाठी रुग्णालयात आली होती. पहिली प्रसुती नॉर्मल झाली होती. त्या ठिकाणी कार्यरत असलेल्या स्टाफने महिला आल्यानंतर डॉक्टरांना फोन केला व महिलेचे हार्टबिट बरोबर नसल्याचे तिच्या लक्षात आले. यांनतर स्टाफने ईसीजी काढून आणण्यासाठी महिलेला पाठविले व त्यासाठी रिक्षा मागविली. परंतु त्या महिलेची रिक्षातच डिलिव्हरी झाली. असे समितीस सांगितले.

समितीने महिलांच्या कल्याणकारी योजनांची माहिती महिलांना मिळावी यासाठी महिती पुस्तिका काढण्यात आली आहे का, वृत्तपत्रात प्रसिध्दी देण्यात आली आहे का व किती महिलांनी या योजनांचा लाभ घेतला आहे ? ही माहिती पुस्तिका केवळ बचत गटांसदर्भातील आहे. महापालिकेतर्फे राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनांबाबतची माहिती पुस्तिका आहे का, आपण त्या संदर्भात वर्तमानपत्रातून प्रसिध्दी दिली आहे का ? अशी विचारणा केली.

समितीने सकाळच्या अनौपचासरीक बैठकीमध्ये महिला नगरसेविकांनी महिलांच्या स्वच्छतागृहांचा प्रश्न उपस्थित केला होता. महिलांसाठी सार्वजनिक स्वच्छतागृहे उपलब्ध नसल्यामुळे महिलांना शाळेतील स्वच्छतागृहांमध्ये जावे लागते. असे त्यांचे म्हणणे होते. याबाबत नेमकी परिस्थिती काय आहे ? प्रत्येक शाळेमध्ये मुलींच्या संख्येनुसार स्वच्छतागृहे आहेत का ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी शाळांमध्ये मुलींसाठी स्वच्छतागृहे उपलब्ध आहेत. शिक्षण हक्क अधिनियमाप्रमाणे सर्व शाळांमध्ये मुलींसाठी व मुलांसाठी स्वंतत्र स्वच्छतागृहे आहेत. असे समितीस सांगितले.

समितीने समितीकडे या संदर्भात तक्रार प्राप्त झाली आहे. एका शाळेतील मुलींना दुसऱ्या शाळेतील स्वच्छतागृहांचा उपयोग करावा लागतो कारण त्यांच्या शाळेत मुलींसाठी स्वच्छतागृहे नाहीत. समिती काही शाळांना भेटी देणार आहे. त्यावेळी नियाप्रमाणे स्वच्छतागृह सुविधा उपलब्ध नाही, असे समितीच्या असे लक्षात आले तर मात्र अडचणीत याल आणि अशा परिस्थितीत समितीला आपल्याविरुध्द कारवाई प्रस्तावित करावी लागेल. सी.एस.आर.फंडातून ही बांधकामे करुन घेऊ शकता. अशी विचारणा केली.

त्यावर आयुक्त यांनी मिरज येथील शाळेत स्वच्छतागृहाची अपुरी व्यवस्था होती. जिल्हाधिकारी आणि मिळून काही एन.जी.ओंची बैठक घेतली. सी.एस.आर. अंतर्गत कामे करण्यासाठी अनेक लोक तयार झाले आहेत. प्रसुतीगृहाच्या इमारतीबाबत व बाजार भागामध्ये नसलेल्या व्यवस्थेबाबत काम सुरु केले आहे. महिला व बाल कल्याण समितीकडे आम्ही प्रस्ताव दिला होता व जागा अंतिम करुन देण्याची विनंती केली होती. ८ एन.जी.ओ. तयार आहेत. ही मोहिम आता सुरु केली आहे. असे समितीस सांगितले.

समितीने आयुक्त म्हणून आपण नगरसेविकांना वेळ देत नाही का ? प्रत्येक प्रभागामध्ये नगरसेविकांना आपण वेळ दिला तर त्यांच्या अडचणी त्याच स्तरावर सुटतील आणि विषय महासभेपर्यंत येणार नाहीत. अशी विचारणा केली.

त्यावर आयुक्त यांनी नगरसेविकांना पूर्ण वेळ देतो. त्यांच्यासाठी राखीव वेळ ठेवला आहे. त्यांच्यासाठी उपलब्ध नाही असे होत नाही. काही महिला नगरसेविकांनी त्यांचे फोन स्विकारले जात नाहीत, अशी तक्रार केली होती. या संदर्भात सर्व अधिकाऱ्यांनी ओदश दिले आहेत.अधिकाऱ्यांनी कार्यालयीन सुटीच्या दिवशी देखील फोन सुरु ठेवावयाचे आहेत. भविष्यात लोकप्रतिनिधींकडून तक्रार आल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल. अशाही सूचना सर्व अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. असे समितीस सांगितले.

समितीने नगरसेविकांना निवडून येऊन तीन वर्षे झाली आहेत. त्यांनी सुचविलेली विकास कामे होत नाहीत. कचार गोळा करण्यासाठी डबे पुरविले जात नाहीत, अशा प्रकारच्या तक्रारी नगरसेविकांनी केल्या आहेत. याबाबत आयुक्तांनी खुलासा करावा. अशी विचारणा केली.

त्यावर आयुक्त यांनी याबाबत अनेक दिवसांपासून गोंधळ सुरु होता. नगरसेविकांनी सुचविलेल्या कामांसाठी निधी उपलब्ध करुन दिला गेला, टेंडर काढण्यात आले, वर्क ऑर्डर देण्यात आली. परंतु कामे होत नव्हती. सन २०१३-२०१४ ते आजतागात पर्यंत प्रभाग समितीने जी कामे घेतली आहेत त्याची यादी मी मागविली. प्रत्येक नगरसेविकनिहाय सार्वजनिक बांधकाम विभागाची किती कामे आहेत, किती रकमेची कामे झालेली आहेत, पाणी पुरवठयाची किती कामे झाली आहेत, ही सर्व माहिती मी घेतली. माझ्याकडे ३८ प्रभाग आहेत व प्रत्येक प्रभागात २ नगरसेवक आहेत. आजपर्यंत सर्व प्रभाग मिळून एकूण ९१२ कामे करण्यात आली आहेत. असे समितीस सांगितले.

समितीने महिला नगरसेविकांच्या प्रभागागत कामे होत नाहीत. निधी आपल्याला मार्चअखेरीस संपवायाचा आहे. ई टेंडरिंगमध्ये दोन महिन्यांचा कालावधी जातो. मग आपण कामे कधी पूर्ण करणार आहात. अशी विचारणा केली.

त्यावर आयुक्त यांनी चौदाव्या वित्त आयोगामधून खर्च झालेला नाही. त्यासंदर्भात महासभेचा अद्याप ठराव झालेला नाही. असे समितीस सांगितले. नगरसेविकांनी हा मुद्दा मांडला

होता त्यावेळी त्यांनी स्पष्टपणे सांगितले होते की, आयुक्तांकडे गेल्यावर कामे होतात. इतर अधिकाऱ्याकडून पाठपुरावा होत नाही असे त्या म्हणाल्या होत्या. ३८ वॉर्डमध्ये व्दिसदस्यीय पध्दत असल्यामुळे त्या वॉर्डमधील कामे ही पुरुष नगरसेवकांच्या वॉर्डमध्ये झाली आणि महिला नगरसेविकांच्या वॉर्डमध्ये झाली नाही असे म्हणता येणार नाही. म्हणून ३८ प्रभागांमध्ये ९१८ कामे झाली आहेत. असे समितीस सांगितले.

समितीने संबंधितांच्या विरुध्द शिस्तभंगाची कारवाई करावी. तसेच महिला व बाल कल्याणासाठी ठेवण्यात येणारी तरतुद दुसरीकडे वळवू नका एवढेच सांगावेसे वाटते. अशी सूचना समितीने केली.

**विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी आयुक्त सांगली महानगरपालिका यांनी खालीलप्रमाणे लेखी माहिती दिली :—**

शासन धोरणानुसार सांगली, मिरज, कुपवाड महानगरपालिकेत महसूल व आस्थापना कक्ष वगळून एकूण अंदाज पत्रकांच्या ५ टक्के निधी महिला बाल विभागासाठी राखून ठेवण्यात आलेला आहे. सभापती यांच्या वाहनासाठी व अंगणवाडी सेवकांच्या मानधनासाठी खर्च केलेला आहे. कारण मा. महासभा क्र. ५ ठराव क्र.११२ विषयपत्र - ऐन वेळी दि. १५/१०/२०१६ व मा. महासभा क्रमांक ठराव क्रमांक ६९ विषय ४ दि. १९/११/२००८ सदरचा विषय हा सामान्य प्राथमिक शिक्षण मंडळ यांचे दि. २२/०९/२००८ चे विषयपत्र अवलोकनी घेवून केलेला आहे. त्यानुसार अंगणवाडी सेवक यांना मानधन देणेत येत होते. तसेच महासभा क्रमांक ७ ठराव क्रमांक १८९ विषय क्रमांक १० दि. २०/०२/२०१० नुसार महिला बाल कल्याण समिती सभापती यांना वाहनाचा वाहनभत्ता देणेबाबत ठराव पारित करण्यात आलेला होता.

यापूर्वी करणेत आलेला खर्च खालील तक्त्यानुसार करणेत आलेला आहे.

| **अ. क्र.** | **लेखाशिर्षाचे नाव** | **सन** | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **२०१४-१५** | **२०१५-१६** | **२०१६-१७** | **२०१७-१८** | **२०१८-१९** |
| १ | बालवाडी सेविकांना मानधन (B २२३२) | ७,९४,५०० | ६,०७,००० | १२,५१,००० | २२,४७,००० | १३,२८,००० |
| २ | प्रसूतिगृहामधील प्रसुतीपुर्व व प्रसुतीपश्चात स्त्रीयांना सकस आहार पुरवठा | १,७५,२९४ | १३,४६१ | २,५२,०२० | ६७,९०० | ६३,१७५ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | (B २२११) | | | | | |
| ३. | वाहन व्यवस्था (B २२०५) | १,१३,१८८ | ९०,००० | १,०५,४७२ | १,१९,९१३ | निरंक |

टिप: अनुक्रमांक १ मधील बालवाडी सेविकेंच्या मानधनामध्ये वाढ झालेने खर्चाच्या रक्कमेत वाढ झाली आहे.

**१)** वर नमूद लेखाशिर्षामधील झालेला खर्च हा महानगरपालिकेच्या जनरल फंडातून टाकणेत आलेला आहे.त्याप्रमाणे त्याचे रिकन्सलेशन करणेत आलेले आहे.

**२)** उपरोक्त खर्च हा सद्य:स्थितीत जनरल फंडातूनच करणेत येतो.

सांगली मनपा सार्वत्रिक निवडणूक २०१३ आदर्श आचारसंहिता लागू झाल्यामुळे सन २०१३-१४ सालामध्ये स्थायी समिती, महिला बाल कल्याण समितीचे कामकाज होऊ शकले नाही. त्यामुळे महिला बाल कल्याण समितीकडील योजनेच्या अंमलबजावणीसाठी मंजूरी घेणे आवश्यक होते. त्याची मान्यता घेता आलेली नाही. तसेच तात्कालीन महानगरपालिकेकडे जकात रद्द होवून एल.बी.टी सुरु झाल्यामुळे उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत असलेली जकातीचे उत्पन्न कमी झाल्यामुळे तसेच शासनाकडून बाधील खर्चासाठी अनुदान प्राप्त होत असल्यामुळे सदरचा निधी महिला बाल कल्याण समितीसाठी खर्च करणे अपुरा स्वरुपात झालेला आहे.

सन २०१४-१५ पासून ५ टक्के तरतूद केली जाते. त्याचप्रमाणे अखर्चित निधी पुढील आर्थिक वर्षात धरणेत आलेला आहे. सध्या उपलब्ध प्रस्तावानुसार खर्च करणेत येत आहे.

सन २०१४-१५ ते आजअखेर एकूण ९६,४२,२९१/- (शहान्नव लाख बेचाळीस हजार दोनशे ऐक्यान्नव मात्र) इतका खर्च करणेत आलेला आहे.

| अ. क्र. | सन | योजनेचे नाव | तरतूद | खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | १५-१६ | १) घटस्फोटीत परितक्या व गरजू महिलांसाठी स्वयंरोजगार प्रशिक्षण<br>२) मुलींच्यासाठी ज्युडो कराटे प्रशिक्षण | २,२२,७०,०००/- | ५,२९,५८६/- |
| | | १) महिलांसाठी संगणक प्रशिक्षण<br>२) महिलांसाठी केटरिंग कुकींग<br>३) वारांगगा महिलांसाठी ब्युटी पार्लर प्रशिक्षण | २,१९,६०,०००/- | ४,१७,८५०/- |
| | | १) ई लर्निग<br>२) मनपा शाळेतील मुलींसाठी | ४,४६,६०,०००/- | ३,९४,८५५/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | अक्षर सुधारणा प्रशिक्षण | | |
| | | महिला व मुलीसाठी ओपन जिम व खेळणी बसविणे | ४,०५,००,०००/- | ८३,००,०००/- |
| **आजअखेर एकूण खर्च** | | | | **९६,४२,२९१/-** |

सन २०१८-१९ अखेर व बालकल्याण समिती यांचेकडील जेंडर बजेटमध्ये ५ टक्के प्रमाणे निधी ३,२२,००,०००/- (तीन कोटी बावीस लाख मात्र) इतका शिल्लक आहे.

तत्कालीन नगरपालिका आणि सध्याची महानगरपालिका अस्तित्वात आल्यानंतर २००२ मध्ये एकूण ४११ गाळे बाधण्यात आले. सदर गाळे हे लिलाव पध्दतीने लाभार्थी यांना वाटप करण्यात आले. त्यावेळी महानगरपालिका क्षेत्रातील राजवाडा चौक येथील असणारे गाळेमध्ये १) शालीनी पांडुरुग कांबळे २) मधुकांता प्रेमचंद मोदी या महिला लाभार्थीना गाळे देण्यात आलेली आहेत.

तत्कालीन महानगरपालिका अस्तित्वात असताना महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये गाळे धारकांची वाटप प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर शासनाचे ३० टक्के राखीव ठेवणेबाबतचे परिपत्रक महानगरपालिकेस प्राप्त झालेले आहे. त्यानुसार नव्याने गाळे बांधण्यात आल्यानंतर ३० टक्के महिलांसाठी आरक्षित ठेवण्याची तजविज इकडून करण्यात येईल. सध्या नवीन गाळे बांधकाम प्रस्ताव नाही.

गाळे वाटप करताना महिलांना कोणतीही सवलत देणेत येत नाही.

महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या महिलांच्या कल्याणकारी योजना व सवलती इ.बाबतची माहिती गरजु महिलांना पोहचविण्याचे काम महानगरपालिकेने खालीलप्रमाणे करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | सन | योजनेचे नाव | तरतूद | खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | १५-१६ | १) घटस्फोटीत परितक्त्या व गरजू महिलांसाठी स्वयंरोजगार प्रशिक्षण २) मुलींच्यासाठी ज्युडो कराटे प्रशिक्षण (एकूण ५५० मुली व महिला लाभार्थी) | २,२२,७०,००० | ५,२९,५८६ |
| २ | १६-१७ | १) महिलांसाठी संगणक प्रशिक्षण<br>२) महिलांसाठी केटरिंग कुकींग<br>३) वारांगणा महिलासाठी ब्युटी | २,१९,६०,००० | ४,१७,८५० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | पार्लर प्रशिक्षण (एकूण १८६ मुली व महिला लाभार्थी) | | |
| ३ | १७-१८ | १) ई लर्निंग<br>२) मनपा शाळेतील मुलीसाठी अक्षर सुधारणा प्रशिक्षण | ४,४६,४१,००० | ३,९४,८५५ |
| ४ | १८-१९ | महिला व मुलीसाठी ओपन जिम व खेळणी बसविणे | ४,०५,००,००० | ८७,००,००० |
| | | | **आज अखेर एकूण खर्च ...** | **९६,४२,२९१** |

महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या महिलांच्या कल्याणकारी योजना व सवलती इ.बाबतची माहिती गरजू महिलांच्या पोहचविण्याचे काम महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेले आहे. तसेच त्या संदर्भात प्रसार माध्यम, वर्तमानपत्रातून जाहिरात दिलेल्या आहेत.

शाळांमध्ये मुलभूत सुविधाबाबतचे निकष ठरविणेबाबत दिनांक २९ जून, २०१३ चे मा.शासन परिपत्रक लगत केले आहे. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई या कार्यालयाकडून शासन निर्णयामध्ये नमूद निकषानुसार शाळांना सन २०१२-१३ पासून आजअखेर एकूण १० स्वच्छतागृह शाळा निहाय बांधकामे मंजुर करणेत आलेली आहेत. तसेच महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ५० शाळांमध्ये मुला मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह उपलब्ध आहेत याबाबतची सद्यस्थिती खालीलप्रमाणे तपशिलानुसार सादर केलेली आहे.

महानगरपालिका आयुक्तसो. यांचे अधिपत्याखालील खातेप्रमुख यांना मनपा शाळा दत्तक देवून सदर शाळेमध्ये मुलांची पटसंख्या वाढविणे त्याचप्रमाणे आवारामध्ये मुताऱ्या शौचालय यांची व्यवस्था करणेत आलेली आहेत. सदर मुताऱ्यावर व शौचालय बांधणेबाबत सि.एस.आर.निधीमधून खर्च करणेत आलेला आहे. त्याचप्रमाणे शाळेच्या आवारामध्ये सुभोभिकरण करणेच्या दृष्टीकोणातून फुलझाडे लावणेची मोहिम राबिवणेत आलेली आहे व ती कार्यरत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष :—**

सांगली महानगरपालिकेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक ५ सप्टेंबर,२०१८ व दिनांक ८ जानेवारी,२०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात

आली. साक्षीच्या वेळी समितीने शासन धोरणानुसार प्रत्येक महानगरपालिकेत महसूली आणि आस्थापना खर्च वगळून अंदाजपत्रकाच्या ५ टक्के निधी महिला बाल विभागासाठी राखून ठेवण्यात येतो. सदर निधी सभापतींच्या वाहनांसाठी व अंगणवाडी सेविकांच्या मानधनासाठी खर्च करण्याची काय कारणे आहेत ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी हा खर्च पूर्वी झालेला आहे. २०१६ च्या जीआर प्रमाणे खर्च व्हायला पाहिजे होता परंतु तो खर्च या निधीतून झालेला आहे. ही त्रुटी आहे, त्या त्रुटीची दुरुस्ती करीत आहोत. महासभेने ठराव केले होते. ठराव पूर्वी केले होते. असे समितीस सांगितले.

समितीने महासभेने ठराव केले असतील तर त्यांना अडविले पाहिजे होते. मात्र त्यावेळी जे चुकीचे झाले आहे, त्याची जबाबदारी कोणावर ठरवली आहे ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी आता थांबविले आहे. तत्संदर्भात ठरविले आहे.

ज्याप्रकारे खर्च झाला आहे, त्या खर्चाची शहानिशा करुन जबाबदारी निश्चित करीत आहोत.

समितीने दिनांक १९ नोव्हेंबर, २०१५ ला समितीची भेट झाली होती. आता सन २०१८ सुरु आहे. अजुनपर्यंत तत्संदर्भात कार्यवाही का झाली नाही ? कार्यवाही करीत आहोत असेच फक्त उत्तर देत आहात. याचा अर्थ काय समजायचा ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी कार्यवाही करीत आहोत. ठराव रद्द करुन घेत आहोत, लूपहोल राहिले आहेत, असे यापुढे होणार नाही, याची पूर्ण काळजी घ्यायची आहे. असे समितीस सांगितले.

समितीने महासभेचे धोरण असेल, या सर्व बाबी मान्य आहेत. मात्र जर अंदाजपत्रकाप्रमाणे महिलांसाठीची ५ टक्क्यांची तरतूद ठेवली नसेल तर ते योग्य नाही. बाकीच्या सर्व बाबींसाठी शासन निर्णय असतात, अनेक वेळा शासन निर्णयावर बोट ठेवून काम करता, मग महिलांसाठी ५ टक्के निधी ठेवण्याची अट असतानाही त्याप्रमाणे का कार्यवाही करीत नाही, तेथे का पळवाटा शोधता ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी या महिन्यात कार्यवाही करतो.

समितीने मुलांसाठी व मुलींसाठी स्वच्छतागृहे बांधणे बंधनकारक आहे. तत्संदर्भात माहिती देण्यात यावी. शिक्षण हक्क अधिनियमाप्रमाणे सर्व शाळांमध्ये मुलींसाठी आणि मुलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे बांधणे बंधनकारक असताना महानगरपालिकेच्या शाळांमध्ये मुलां-मुलींसाठी स्वच्छतागृहे नाहीत. तसेच पाण्याची कोणतीही सोय नसण्याचे कारण काय आहे ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी स्वच्छ भारत अभियानामध्ये याची पूर्ण काळजी घेतली

आहे. निकष आहे की, ६० विद्यार्थ्यांमागे २ युरिनल आणि १ लॅटरिन असावे. त्याप्रमाणे तेथे बांधलेले आहे. सध्या असलेल्या संख्येप्रमाणे मुलींसाठी ७५ स्वच्छतागृहे आहेत आणि मुलांसाठी ६८ स्वच्छतागृहे आहेत. असे समितीस सांगितले.

समितीने शाळा किती आहेत ? प्रत्येक शाळेमध्ये स्वच्छतागृह आहे का ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी शाळा ५० आहेत. शाळेमध्ये स्वच्छतागृह आहेत.

समितीने मनपाच्या ५० शाळा आहेत. प्रत्येक शाळेत किती सीट आहेत, मुलींसाठी स्वतंत्र आहेत का की एकत्र आहेत ? प्रत्येक शाळेत किती आहेत ?अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी मुलींसाठी स्वतंत्र आहेत. मुलांसाठी ६८ आहेत तर मुलींसाठी ७५ आहेत आणि त्या वेगवेगळ्या ठिकाणी आहेत. पुस्तिकेत लिहिले आहे की, मनपा शाळा क्रमांक १, सांगली येथे मुलांसाठी २ व मुलींसाठी ३ आहेत. मनपा शाळा क्रमांक २, सांगली येथे मुलांसाठी २ व मुलींसाठी १ आहे. शाळानिहाय यादी दिली आहे.

समितीने महिला व बालविकास विभागाच्या निधीच्या तरतुदीप्रमाणे ५ टक्के निधी खर्च करणे आवश्यक असताना २०१३-१४ व २०१४-१५ या वर्षांत निधी खर्च न करण्याची कारणे काय आहेत ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी २०१३-१४ व २०१४-१५ ला महानगरपालिकेत जकात बंद होऊन, एलबीटी सुरु झाल्यामुळे आर्थिक अडचण निर्माण झाली होती. त्यामुळे २०१४-१५ मध्ये खर्च निरंक आहे. त्यानंतर सुध्दा ५ टक्के प्रमाणे खर्च झालेला नाही. कारण त्यावेळी महिला व बालकल्याण समितीमध्ये कोणत्या बाबींवर किती खर्च करावा या बाबतचे धोरण ठरलेले नव्हते. असे समितीस सांगितले.

समितीने जर एक-दोन बॅचेसना प्रशिक्षण दिले असेल तर रुपये ५,६९,५००/-इतका खर्च कसा होऊ शकतो ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी केवळ ज्युडो कराटे प्रशिक्षणाच्या बॅचेस घेतल्या नाही तर ई-लर्निंगच्या काही बॅचेस होत्या, मुलींसाठी अक्षर सुधार कार्यक्रम इत्यादी प्रशिक्षण कार्यक्रम राबविले होते. असे समितीस सांगितले.

समितीने परंतु सादर केलेल्या लेखी माहितीमध्ये ज्युडो कराटे प्रशिक्षण कार्यक्रमावर रु.५,६९,५००/- इतका खर्च झाल्याचे स्पष्टपणे नमूद केले आहे. किती मुलींना ज्युडो कराटेचे प्रशिक्षण दिले ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी सध्या प्रशिक्षण दिलेल्या मुलींची संख्या माझ्याकडे नाही. परंतु विविध प्रशिक्षणाच्या बॅचेस झालेल्या आहेत. क्राफ्ट प्रशिक्षण, पर्स मेकींग, ब्युटी पार्लर कोर्सेस असे अनेक कोर्सेस घेतलेले आहेत. असे समितीस सांगितले.

समितीने महिलांच्या प्रसुतीगृहाची दयनीय अवस्था होती, सध्या त्या रुग्णालयाची काय स्थिती आहे ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी पूर्वी त्या ठिकाणी प्रसुतीगृहामध्ये बऱ्याचशा सुविधा अजिबात नव्हत्या. उदाहरणार्थ लाईटची सुविधा, इन्व्हर्टर, फोन इत्यादी सुविधा नव्हत्या. मी दीड वर्षापूर्वी त्या ठिकाणी रुजू झाले. त्या ठिकाणी इन्व्हर्टर, फोन इत्यादी बेसिक सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. परंतु या व्यतिरिक्त इमारतीमध्ये ज्या सुधारणा आवश्यक आहे किंवा ज्या पध्दतीने रुम्स, हॉल किंवा दोन-तीन दिवस राहण्याची व्यवस्था झालेली नाही. परंतु बऱ्याचशा बेसिक गोष्टी पूर्ण करुन घेतलेल्या आहेत. असे समितीस सांगितले.

समितीने त्या रुग्णालयात आता तरी स्त्री रोग तज्ज्ञ डॉक्टर आहेत काय ? त्या महापालिकेच्या नगरसेविकांनी आणि स्थानिक लोकांनी समितीकडे तक्रार केली होती की, त्या प्रसुतीगृहात महिला डॉक्टरची सोय नाही. महिलांवर शस्त्रक्रिया करावयाची असेल तर दुसरीकडे पाठवावे लागते. एवढेच नव्हे तर त्या दवाखान्यात आलेल्या गरोदर महिलेला प्रसुतीच्या कळा आल्यानंतर तिला रिक्षातून जवळच्या रुग्णालयात पाठविण्यात येते. अनेकदा त्या महिलेची रिक्षामध्येच प्रसुती होते. ही बाब नगर विकास विभागाला माहीत आहे काय ? त्या ठिकाणी स्त्री रोग तज्ज्ञ डॉक्टर नसल्यामुळे नर्सेसला प्रसुती करण्यास सांगितले जाते. अनेकदा सिझरीन करताना महिला मृत्यू पावतात. कारण नर्सेसला सिझरीन येतच नाही. अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी त्या रुग्णालयात सिझरीन होत नाही. असे समितीस सांगितले.

समितीने स्त्री रोग तज्ज्ञ डॉक्टरचे पद भरण्यासाठी महानगरपालिकेने नगर विकास विभागाकडे प्रस्ताव सादर केला आहे काय ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी अजूनपर्यंत प्रस्ताव पाठविलेला नाही. असे समितीस सांगितले.

समितीने स्वच्छ सर्वेक्षणामध्ये बंधनकारक आहे म्हणून या गोष्टी पूर्ण केल्या आहेत काय ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी तसे नाही. परंतु शाळांमध्ये आता बऱ्याच सुधारणा केल्या आहेत.असे समितीस सांगितले.

समितीने सांगली महापालिकेमध्ये कचऱ्याचा प्रश्न सुध्दा गंभीर आहे. या प्रश्नातून मार्ग काढण्यासाठी काय कार्यवाही केली आहे ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी काही बचत गटांना सॅग्रीगेशनचे काम देण्याच्या बाबतीत कार्यवाही केली आहे. यासाठी आवश्यक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करीत आहोत. तसेच उद्योजकता प्रशिक्षणावर जास्त भर देत आहोत. कारण केवळ प्रशिक्षण देऊन महिलांना

पुढे काहीच करता येत नाही. डीपीआरमध्ये पायाभूत सुविधा उदाहरणार्थ रुग्णालयात बेसिक सुविधा नाहीत. निधीची तरतूद आहे परंतु तो निधी कशाप्रकारे खर्च करावा हे ठरलेले नव्हते. त्यामुळे हा निधी खर्च करण्याच्या संदर्भात नियोजन केले आहे. असे समितीस सांगितले.

समितीने महिला बचत गटांना गाळे मिळण्यासाठी काय केले ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी फार पूर्वी दुकान गाळे होते, त्यापैकी फक्त दोन महिलांना गाळे दिले होते. हे गाळे रिझर्व्हेशन ठेवून दिले नव्हते. त्या महिलांनी निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेतला होता त्यामध्ये त्यांना ते मिळाले होते. त्यानंतर गाळे बांधलेले नाहीत. त्यामुळे वाटप झालेले नाही. असे समितीस सांगितले.

समितीने सांगली महानगरपालिका क्षेत्रात किती शौचालये आहेत ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी ६१ आहेत. असे समितीस सांगितले.

समितीने शासन धोरणानुसार प्रत्येक महानगरपालिकेत महसूल व आस्थापना कक्ष वगळून एकूण अंदाजपत्रकांच्या ५ टक्के निधी महिला बाल विभागासाठी राखून ठेवण्यात आलेला निधी अन्य ठिकाणी वापरण्यात आला. शासन निर्णयानुसार खर्च का करण्यात आला नाही ? अशी विचारणा केली.

त्यावर आयुक्त यांनी अर्थसंकल्पामध्ये २२३५, २२३२, २२११ आणि २२०५ असे एकूण चार शीर्ष आहेत. त्यापैकी २२३२, २२११ आणि २२०५ या तीन शीर्षामधील निधी खर्च करण्यात आला होता. त्या संदर्भात आक्षेप घेतल्यानंतर ती कामे रद्द केली होती. हा महानगरपालिकेचा निधी असून शासनाचा काहीही निधी नाही. हा सर्वसाधारण फंडामधील निधी आहे. त्यामुळे ते शीर्ष रद्द केले. २२३५ या सर्वसाधारण शीर्षामधून निधी खर्च करीत आहोत. आता महानगरपालिका स्तरावर हे सर्व रद्द केलेले आहे. पूर्वी जो ठराव झाला होता त्या आधारावर हा निधी खर्च करण्यात येत होता तो ठराव रद्द करण्याबाबत नोट पाठवित आहोत. जो निधी खर्च झाला तो रिॲप्रॉप्रिएशन करुन हा विषय संपविलेला आहे. असे समितीस सांगितले.

समितीने महिलांसाठी असलेल्या कोणकोणत्या योजनांवर खर्च केलेला आहे ? अशी विचारणा केली.

त्यावर उपायुक्त यांनी महिलांसाठी संगणक प्रशिक्षण, केटरिंग, कुकींग, ब्युटी पार्लर, महानगरपालिका शाळांमध्ये ई-लर्निंग संच दिलेले आहेत. जेथे व्यायामाची काहीही सोय नाही तेथे ओपन जिम दिलेली आहे. लहान मुलांसाठी खेळणी दिलेली आहे. या भागात एमआयडीसी आहे. तसेच सांगली शहरात खादीचा व्यवसाय मोठ्या प्रमाणात आहे. तसेच काही टेक्स्टाईल युनिटस आहेत त्यांच्याशी टाय-अप करुन महिलांना प्रशिक्षण देऊन त्यांना तेथे काम कसे मिळेल याचे नियोजन करुन महिलांना रोजगार उपलब्ध करुन दिलेला आहे. त्याशिवाय ब्रॅन्डींग कसे करावे याचे प्रशिक्षण दिलेले आहे. आमच्या येथे स्टार नावाची कंपनी आहे. राज्यात

प्लास्टीक बंदी करण्यात आल्यामुळे महिला बचत गटामार्फत मोठ्या प्रमाणात कापडी पिशव्या बनविण्याचे काम सुरु आहे.

इचलकरंजी येथे कापडाचे प्रोडक्शन होते तेथून वेगवेगळ्या किंमतीचे कापड घेऊन बचत गटामार्फत कापडी पिशव्या बनविण्यात येतात. या कापडी पिशव्यांची किंमत चार रुपयांपासून दीडशे ते दोनशे रुपयांपर्यंत आहे. भाजी ठेवण्यासाठी मोठ्या कप्प्याच्या पिशवीची किंमत १५० ते २०० रुपये आहे. तर डिझाईन पिशवीची किंमत ४० ते ५० रुपये आहे. महिला बचत गटांना कोठून कापड घ्यायचे हे सांगितलेले आहे. महिलांना ४० ते ५० रुपये मिळतात. असे समितीस सांगितले

समितीने महिला बचत गटांनी बनविलेल्या कापडी पिशव्यांच्या विक्रीसाठी त्यांना जागा उपलब्ध करुन देण्यात येते काय ? अशी विचारणा केली.

त्यावर उपायुक्त यांनी तीन शहरांमध्ये स्टॉल्स उपलब्ध करुन दिलेले आहेत. स्टार कंपनीचे प्रॉडक्शन आमच्या भागात मोठया प्रमाणात सुरु आहे. त्या कंपनीची उलाढाल जवळपास एक हजार कोटी रुपयांपर्यंत आहे. त्यांच्याकडून पिशव्या तयार करण्यासाठी खादीचा तागा खरेदी करुन दिला जातो. तसेच त्या पिशव्या तयार करीत असताना त्यावर स्टार कंपनीचे ब्रँडींग टाकून त्यांच्याकडूनच त्या पिशव्या विकत घेतल्या जातात. त्यामुळे त्यांना डायरेक्ट मार्केट मिळाले आहे. तसेच समितीने सांगितल्याप्रमाणे मॉलसमवेत बैठक सुध्दा घेतली होती. महिला तेथे स्वत: जाऊन पिशव्या विकत असतात. परंतु त्याकरिता त्यांना कमी मार्जीन मिळते. आता प्लॅस्टीकबंदीमुळे आता त्यांना अतिशय चांगला प्रतिसाद मिळत आहे. डी मार्ट मॉलचे स्वत:चे प्रॉडक्शन असल्यामुळे ते महिला बचतगटांकडून अशा प्रकारचे प्रॉडक्ट कमी प्रमाणात खरेदी करीत असतात. तसेच ते प्रॉडक्ट विकत घेत असताना त्यावर ते स्वत:चा सिंबॉल टाकून विकत घेत असतात. या संदर्भात समितीने केलेल्या सूचनेप्रमाणे आम्ही कार्यवाही करतो. असे समितीस सांगितले.

समितीने त्यावर दबाव असल्याशिवाय महिला बचत गटांना कंत्राट मिळू शकणार नाही. महिला बचत गटातील महिला जास्त शिक्षित नसल्यामुळे त्यांना अशा प्रकारचे कंत्राट मिळण्यासाठी कोणाच्या तरी सपोर्टची गरज पडणार आहे. अशी विचारणा केली.

त्यावर उपायुक्त यांनी महिला बचत गटांकडून लहान मुलांकरिता आवश्यक असलेली दुपटी तयार केली जातात. तसेच स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत सांगलीमध्ये घरगुती कंपोस्टची कामे सुरु केली आहेत. गाईचे गोमुत्र आणि शेणापासून कल्चर तयार केले जाते. त्याकरिता एका ड्रममध्ये विशिष्ट रेशोमध्ये माती तसेच घरातील कचरा बारीक करुन टाकल्यास त्याचे खत तयार केले जाते. या संदर्भात महिलांना प्रशिक्षण दिले व त्यानंतर बचत गटाच्या महिलांनी त्याचे ब्रँडींग केले आहे. एका संचाकरिता ३०० रुपये खर्च येतो. तसेच ते त्यांच्याकडून साडेतीनशे ते तीनशे पंच्यात्तर रुपयांना विकले जाते. असे समितीस सांगितले.

समितीने बचत गटांना किती अनुदान देत आहात ? अशी विचारणा केली.

त्यावर उपायुक्त यांनी राष्ट्रीय शहरी रोजगार अभियानाअंतर्गत महिला बचत गटांकरिता अनुदान मिळत असते. त्या अंतर्गत एक महिला बचतगट स्थापन केल्यानंतर त्यांना १० हजार रुपये दिले जातात. महिला बचत गटांना एएलएफ अंतर्गत ५० हजार रुपयांचे अनुदान दिले जाते. असे समितीस सांगितले.

समितीने सांगलीमध्ये मोठया प्रमाणात हळदीचे उत्पादन होत असल्यामुळे त्याकरिता महिला बचत गटांना काही कामे दिली आहेत का ? अशी विचारणा केली.

त्यावर आयुक्त यांनी हळदीकरिता आवश्यक असलेल्या कापडी पिशव्या महिला बचत गटांमार्फत दिल्या जातात. त्याकरिता प्री रिक्वीसाईट याचा अर्थ त्यात ब्रँडींग आहेत. त्यांचे लायसेन्सी आहेत. असे समितीस सांगितले.

समितीने महिला बचतगटामार्फत सुध्दा त्याचे ब्रँडींग होऊ शकते. महिला बचतगट चांगली कामे करीत असतात. तसेच ज्या ठिकाणी उत्पादन होते तेथे ते विकले जात नसल्यामुळे सांगलीमधील हळद बाहेर विकता यावी याकरिता आपण त्या महिला बचतगटांना इतरत्र महिला बचत गटांशी टायअप सुध्दा करु शकतात. अशाप्रकारे कार्यवाही केल्यास आम्हाला सुध्दा मुंबईमध्ये सांगलीतील हळद मिळू शकेल. या संदर्भात योग्य ती कार्यवाही करावी अशा प्रकारच्या सूचना केल्या.

त्यावर आयुक्त यांनी समितीच्या निदेशानुसार यासंबंधी कार्यवाही केली जाईल. असे समितीस सांगितले.

समितीने शिक्षक हक्क अधिनियमाप्रमाणे सर्व शाळांमध्ये मुली आणि मुलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे बांधणे बंधनकारक असताना सुध्दा महानगरपालिकेच्या शाळांमध्ये मुला व मुलींसाठी स्वच्छतागृहे नाहीत. तसेच पाण्याची कोणतीही सोय नसण्याची कारणे काय आहेत व त्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे ? समितीने सांगली महानगरपालिकेला २०१५ मध्ये भेट दिली होती. त्यानंतर समितीने अनेक महानगरपालिका व जिल्हा परिषदांना भेटी दिलेल्या आहेत. परंतु सांगली येथील महानगरपालिकांच्या शाळांमध्ये स्वच्छतागृहे उपलब्ध नसल्याची बाब समितीकरिता आश्यर्चकारक होती. समितीने तेथे भेट दिल्यानंतर त्या शाळांमध्ये स्वच्छतागृहे नसल्याची बाब समितीच्या निदर्शनास आली होती. या संदर्भात सद्य:स्थिती काय आहे ? अशी विचारणा केली.

त्यावर आयुक्त यांनी सांगली महानगरपालिकेच्या एकूण ५० शाळा असून त्यावेळी काही शाळांमध्ये स्वच्छतागृहे नव्हती ही वस्तुस्थिती होती. सन २०१६ मध्ये स्वच्छता सर्व्हे सुरु झाल्यानंतर त्यात असे पॅरामिटर होते की, स्वच्छ शाळा कोणत्या आहेत व त्या शाळांमध्ये पाणी पुरवठयासमवेत मुले आणि मुलींसाठी शौचालये उपलब्ध आहेत का ? त्यामुळे सन २०१६ ते

२०१७ या काळात शाळांमध्ये मोठया प्रमाणात शौचालये बांधण्यात आली. ५० शाळांमध्ये मुलांकरिता ६८ आणि मुलींकरिता ७५ शौचालये उपलब्ध आहेत. तसेच सध्या ५० शाळांमध्ये मुले आणि मुलांसाठी स्वतंत्रपणे स्वच्छतागृहे उपलब्ध आहेत. तसेच तेथे पाणी सुध्दा उपलब्ध आहे. असे समितीस सांगितले.

सन २०१६ मध्ये मी आयुक्त पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर महानगरपालिकेच्या ५० शाळांचा विकास करण्याकरिता प्रत्येक अधिकाऱ्यांकडे शाळा दत्तक देण्यात आल्या. त्याकरिता लोकांकडून वर्गणी घेण्यासंबंधी सूचना देण्यात आल्या होत्या. दोन वर्षांच्या काळात सदर कामाकरिता लोकांकडून ८० लाख रुपये मिळाले. त्यातून अनेक शाळांना रंग देण्यात आला. तसेच त्यात शाळांमधील शौचालये तयार करणे हे मुख्य काम होते. त्यानुसार प्रत्येक शाळांमध्ये मुले आणि मुलींसाठी स्वतंत्र शौचालये बांधण्यात आली आहेत.

समितीने सॅनेटरी पॅड, सॅनेटरी डिस्पोझल मशीन, व्हेडींग मशीन बाबत शाळांमध्ये कशाप्रकारची सोय करण्यात आली आहे ? आणि सॅनेटरी पॅडचे रिफिलिंग कोणाकडून केले जाते ? अशी विचारणा केली.

त्यावर उपायुक्त यांनी शाळांमध्ये सॅनेटरी व्हेडींग मशीन बसविण्याची कार्यवाही सुरु आहे. लुल्ला फाऊंडेशन यांनी ३ हजार रुपयांमध्ये इन्सीलेटर तयार केलेले आहे. प्रत्येक शाळांमध्ये इन्सीलेटर बसविण्याची कार्यवाही सुरु आहे. शाळांमध्ये तेथील महिला शिक्षिकांकडून पॅडचे रिफिलिंग केले जाते. असे समितीस सांगितले.

समितीने शाळांमधील व्हेडींग मशीनमधील पॅड संपल्यानंतर त्याचे कोणाकडून तरी रिफिलिंग करणे आवश्यक आहे. अन्यथा फक्त व्हेडींग मशीन बसवून उद्देश साध्य होणार नाही. त्यासंबंधीचे कंत्राट कोणाला देण्यात आले आहे ? अशी विचारणा केली.

त्यावर उपायुक्त यांनी या संदर्भात कोणाकडेही कंत्राट देण्यात आलेले नाही. सध्या शाळांमध्ये पॅड रिफिलिंगची व्यवस्था नसल्यामुळे समितीने दिलेल्या निदेशानुसार त्यासंबंधी कार्यवाही केली जाईल. असे समितीस सांगितले.

समितीने महिला व बालविकास विभागासाठी राखीव ठेवण्यात आलेला ५ टक्के निधी सभापती यांच्या वाहनांसाठी व अंगणवाडी सेविकांच्या मानधनासाठी खर्च केला जात होता. याबाबतची सद्यस्थिती काय आहे ? अशी विचारणा केली.

त्यावर उपायुक्त यांनी मघाशी आयुक्त साहेबांनी समितीला दिलेल्या माहितीनुसार सदर निधी ३ हेडमध्ये खर्च केला जात होता. त्याकरिता महासभेने ठराव केले होते. आता ते रद्द करण्यात आले आहेत. तसेच त्यावेळी ३ हेडवरील झालेला खर्च रिकन्साईल करुन जनरल निधीमध्ये टाकलेला आहे. तसेच त्या पध्दतीने आता निधी खर्च करणे बंद करण्यात आले आहे. असे समितीस सांगितले.

समितीने काही नगरसेविकांनी त्यांच्या वॉर्डमध्ये कचऱ्याची विल्हेवाट योग्यप्रकारे

लावली जात नसल्यासंबंधी समितीकडे तक्रारी केल्या होत्या. त्या बाबतची सद्यस्थिती काय आहे ? अशी विचारणा केली.

त्यावर आयुक्त यांनी सांगली महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात साधारणत: २२० मे.टन कचरा तयार होत असतो. तसेच आता आम्ही सेल्फ कन्टेंट कम्पोस्टींग युनिट तयार करुन त्याचे ५ हजार घरांमध्ये वाटप केलेले आहे. त्यामुळे आता २२० मे.टन कचऱ्याच्या तुलनेत १९० मे.टनच्या दरम्यान कचरात जमा होत आहे. सेल्फ कम्पोस्टींग युनिटमुळे कचऱ्याचा कोणताही वास न येता चांगल्या प्रकारे खत तयार केले जाते. सदर युनिट माझ्या घरात सुध्दा बसविण्यात आले आहे. तसेच त्यातून तयार झालेले खत २० हजार रुपये टन दराने विकले जाते. ती रक्कम महानगरपालिकेकडे जमा आहे. आता आम्ही नव्याने ४० रिक्षा घंटा गाडी घेत आहोत. त्यामुळे फेब्रुवारी महिन्यापूर्वी सांगली महानगरपालिकेमध्ये ८० रिक्षा घंटा गाडी कार्यरत राहू शकतील. त्यामुळे शहरांमधील कचरा रिक्षा घंटा गाडयांमार्फत डंम्पींग ग्राऊंडमध्ये पाठविला जाईल. तेथे आम्ही कचऱ्याकरिता प्रोसेसिंग युनिट टाकलेले आहे. मिरज येथे २ सेग्रीगेशन प्लांट टाकण्यात आलेले आहेत. त्याची एका दिवसाला १०० मे.टन इतकी क्षमता आहे. त्यातून जवळपास एक हजार टनाची खत विक्री केली आहे. त्यामुळे कचरा विल्हेवाटच्या संदर्भात मोठया तक्रारी किंवा प्रश्न निर्माण होत नाहीत. समितीने भेट दिली त्यावेळी स्थानिक नागरिकांनी कचऱ्याची विल्हेवाट योग्यप्रकारे होत नसल्यामुळे एनजीपीमध्ये महानगरपालिकेच्या विरोधात तक्रार दाखल केली होती. त्यावेळी एनजीपीने महानगरपालिकेचा जवळपास ४२ कोटी रुपयांचा निधी ब्लॉक करुन ठेवला होता. एनजीपीने महानगरपालिकेला दिलेल्या डायरेक्शननुसार सन २०१७ मध्ये डिसेंबर, २०१७ मध्ये सर्वसाधारण सभेने मंजुरी दिली. तेव्हा महानगरपालिकेकडे वाहनांची संख्या कमी असल्यामुळे वाहने खरेदी करण्यास सुरुवात केली. सन २०१८ मध्ये महानगरपालिकेकडे बऱ्यापैकी वाहने उपलब्ध झालेली आहेत. महानगरपालिकेकडे सध्या सॉलिड वेस्ट मॅनेजमेंटकरिता ५७ कोटी रुपयांचा निधी शिल्लक आहे. असे समितीस सांगितले.

समितीने एक गर्भवती महिला प्रसुतीकरिता आल्यानंतर तिचे हार्ट बीट वाढल्यामुळे व्यवस्था नसल्यामुळे त्या महिलेला रिक्षामध्ये दुसऱ्या रुग्णालयात पाठविण्याची व्यवस्था करण्यात आली. परंतु त्या महिलेची रिक्षामध्ये प्रसुती झाली. त्या घटनेबाबत समितीकडे अहवाल पाठविला जाईल असे समितीला आश्वासन देण्यात आले होते. परंतु अद्याप त्याबाबतचा अहवाल समितीकडे सादर केलेला नाही. ही घटना हलगर्जीपणामुळे घडली होती. आज सदर अहवाल सादर केला आहे का ? व त्यासंबंधी चौकशी करण्यात आली आहे का ? अशी विचारणा केली.

त्यावर आयुक्त यांनी नाही. सदर घटना रुजू होण्यापूर्वी घडली होती. आम्ही २ दिवसांमध्ये यासंबंधी कार्यवाही करतो.

समितीने या संदर्भात तेथील रुग्णालयातील स्टाफ कार्यवाही करीत नसल्यास आपण ऑननरी स्त्री रोग तज्ज्ञ ठेवावेत. अशा सुचना केल्या.

त्यावर आयुक्त यांनी येथे २ स्त्री रोग तज्ज्ञ कार्यरत आहेत. तसेच आतापर्यंत येथे

महिलांचे सीझरिंग होत नव्हते. महानगरनगपालिकेसमोर प्रसुतीगृह उपलब्ध आहे. अनेक वेळा स्त्री रुग्णांच्या बाबतीत काही प्रश्न निर्माण झाल्यास तेथून जिल्हा रुग्णालय एक कि.मी. अंतरावर आहे. त्यामुळे तशी कार्यवाही केली जात होती. सदर प्रकरणाची सविस्तर चौकशी करतो व त्याचा अहवाल समितीस सादर करतो. असे समितीस सांगितले.

समितीने शाळांच्या स्वच्छतागृहांचा प्रश्न निकाली काढल्याबाबत माहिती दिली, परंतु महानगरपालिकेतील स्वच्छतागृहांची काय परिस्थिती आहे ? तेथे आलो त्यावेळी दिसून आले की, स्वच्छतागृहे व्यवस्थित नाहीत. अशी विचारणा केली.

त्यावर उपायुक्त यांनी आता स्वच्छतागृहे व्यवस्थित आहेत. मिरज कार्यालयामध्ये देखील चांगली व्यवस्था आहे. असे समितीस सांगितले.

**अभिप्राय व शिफारशी :—**

समितीने सांगली महानगरपालिकेला भेट देवून शासन धोरणानुसार महानगरपालिकेत ३ वर्षाचे वार्षिक अंदाजपत्रक सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ या वर्षातील अंदाजत्रकाबाबत विचारणा केली असता त्याबाबत प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने आणि दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ व दिनांक ०८ जानेवारी, २०१९ रोजी साक्षीच्या वेळी सादर करण्यात आलेल्या माहितीच्या अनुषंगाने तरतुद करण्यात आलेल्या निधीच्या केलेल्या खर्चाबाबत विचारणा केली असता, सांगली महानगरपालिका आयुक्त यांनी महानगरपालिकेचे गत ३ वर्षाचे अंदाजपत्रकामध्ये सन २०१२-१३ मध्ये रुपये ३०५.१८ कोटी, सन २०१३-१४ मध्ये रुपये ४०५.३५ कोटी, सन २०१४-१५ मध्ये ४७२.२५ कोटीची तरतुद करण्यात आली होती. त्यामध्ये सन २०१२-१३ मध्ये मंजुर निधी रु.६९,५०,०००/- असून खर्च झालेला निधी हा रु.१२,१३,५०३/- , सन २०१३-१४ मध्ये मंजुर निधी ४५,७५,००/- खर्च झालेला निधी १६,४५,८४३/- सन २०१४-१५ मंजुर निधी रु. ३६,३०००/- खर्च झालेला निधी १,६८,४४८/- एवढा आहे.

महिलांच्या कल्याणकारी योजनांसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकाच्या एकूण ५ टक्के निधीची राखून ठेवला जातो तो खर्च केला का याबाबतची माहिती द्यावी अशी विचारणा समितीने केली असता, त्यावर आयुक्त यांनी सन २०१२-१३ या वर्षाचे एकूण बजेट ३०५.१८ कोटी असून महिला व बालकल्याण समितीसाठी रु.६९,५०,०००/- एवढी तरतुदी करण्यात आली होती. असे समितीस सांगितले. त्यावर समितीने ही तरतुद करण्यात आली असली तरी केवळ रु.१२,१३,५०३/- एवढा खर्च केला आहे. त्यामधील मोठा खर्च रु.१,०९,१६/- मा.सभापतींच्या वाहन खरेदीसाठी आणि रु.५,१९,५००/- एवढा खर्च बालवाडी सेविकेंच्या मानधन वाटपासाठी केलेला आहे. वास्तविक पाहता बालवाडी सेविकांच्या मानधनावरील खर्च शिक्षण विभागाकडून केला जातो. तो महिला व बाल विकास शीर्षामिधून का केला ? प्रसिध्दीसाठी १६२०/- एवढा खर्च केला आहे. ही प्रसिध्दी देखील या शीर्षामधून करावयाचा

नसतो. चुकीच्या पध्दतीने खर्च केला आहे. शासन निर्णय दिनांक ८ नोव्हेंबर, २०१० चे उल्लंघन केले आहे, हे खरे आहे का ? विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर समितीला मिळालेले नाही.

विभागीय अधिकारी यांनी बालवाडी सेविकांच्या मानधनाचा प्रश्न अनेक वर्षे प्रलंबित होता. त्यावेळी आमसभेने असा निर्णय घेतला की, बालवाडी सेविकेंचे मानधन या शीर्षामधून देण्यात यावे व त्यानुसार आमसभेने ठराव केला. उर्वरीत निधी कुठेही न वळविता तसाच शिल्लक आहे. हा निधी इतरत्र खर्च केलेला नाही, खर्चच झालेला नाही. बजेट तरतूद केल्यानंतर संबंधित विभाग खर्च करतो. निधी खर्च केलेला नाही. त्या वर्षात खर्च केला होता, बाकीचा निधी खर्ची पडलेला नाही. असे समितीस सांगितले.

तथापि, सदरचा खर्च शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे केलेला नसुन अन्य योजनांवर केला असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. सांगली महानगरपालिकेने शासन निर्णयानुसार सदरहू ५% निधी खर्च दिनांक ०८ नोव्हेंबर, २०१० रोजीच्या शासन निर्णयानुसार केलेला दिसून येत नाही. याचाच अर्थ महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची देखील प्रभावीपणे अंमलबजावणी सांगली महानगरपालिकेकडून करण्यात आलेली नाही.

**सबब, याप्रकरणी सांगली महानगरपालिकेकडून शासनाच्या निर्णयाचे पालन झाले नसल्यामुळे याबाबतची चौकशी करुन संबंधित अधिकारी दोषी असल्याचे आढळल्यास त्यांच्याविरुध्द नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी.तसेच यापुढे सांगली महानगरपालिकेने शासन निर्णयाचे उल्लंघन न करता महिलांच्या कल्याणकारी योजनांवरच हा ५% निधी खर्च करावा. अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

समितीने दिनांक १२ नोव्हेंबर, २०११ चा शासन निर्णयानुसार एकुण गाळयामंधील ३० टक्के गाळे महिलांच्या बचत गटासाठी किंवा स्वयंसहाय्यित गटांसाठी राखून ठेवले पाहिजेत असे असताना बाब महानगरपालिकेमधे दिसून आली नाही, हे योग्य नाही. सदर बाबीचे कारण काय आहे. सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी का केली नाही.

आयुक्त यांनी आस्थापना विषयक अडचण होती. गाळे नगरपालिकांच्या काळात बांधले आहेत आणि तेव्हा ते वितरित करण्यात आले आहेत. महानगरपालिका स्थापन झाल्यानंतर किंवा शासनाचे धोरण ठरल्यानंतर हे गाळे बांधण्यात आलेले नाहीत. जुने गाळे आहेत. फक्त त्याचे रिन्युअल होत आहे. त्यामुळे असे दिसत आहे. येथून पुढे महानगरपालिकेचे गाळे बांधले जातील तेव्हा महिलांसाठी ३० टक्क्यांची तरतूद ठेवण्यात येईल.असे समितीस सांगितले.

**याप्रकरणी दिनांक १२ नोव्हेंबर,२०११ चा शासन निर्णय असा आहे. की, एकुण गाळयामंधील ३० टक्के गाळे माहिलांच्या बचत गटासाठी किंवा स्वयंसहिय्त गटांसाठी राखून ठेवले पाहिजेत. महिलांकरीता आरक्षणाचे पालन न करता महिलांना महानगरपालिकेकडून गाळे दिले जात नाहीत. ही गंभीर बाब असून समिती यावर तीव्र**

**नाराजी व्यक्त करीत आहे. महिलांच्या स्वयं-सहाय्यता गटांची स्थापना करुन महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करण्यावर विशेष भर देण्यात यावा. महानगरपालिकेमधील निर्माण करण्यात येणाऱ्या एकूण गाळयांपैकी ३०% गाळे महिलांच्या स्वयं-सहाय्यता गटांसाठी राखून ठेवण्यात यावेत. अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

समितीने सांगली महानगरपालिकेने महिला व बाल कल्याण अधिकारी हे पदे आहे काय अशी विचारणा केली असता, आयुक्त यांनी सांगली महानगरपालिकेत महिला व बालकल्याण अधिकारी हे पद नाही. असे समितीस सांगितले. **याबाबत सांगली महानगरपालिकेमध्ये महिला व बालकल्याण अधिकारी हे पद रिक्त असून उक्त पद भरण्यासाठी महानगरपालिकेने शासनाकडे प्रस्ताव पाठवून सदरहू प्रस्तावास शासनाने मंजुरी देवून हे पद तात्काळ भरण्याबाबत निर्णय घेण्यात यावा. अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

समितीने सॅनेटरी पॅड, सॅनेटरी डिस्पोझल मशीन, व्हेडींग मशीन बाबत शाळांमध्ये कशा प्रकारची सोय करण्यात आली आहे ? आणि सॅनेटरी पॅडचे रिफिलिंग कोणाकडून केले जाते ? शाळांमधील व्हेडींग मशीनमधील पॅड संपल्यानंतर त्याचे कोणाकडून तरी रिफिलिंग करणे आवश्यक आहे. अन्यथा फक्त व्हेडींग मशीन बसवून उद्देश साध्य होणार नाही. त्यासंबंधीचे कंत्राट कोणाला देण्यात आले आहे काय ? अशी विचारणा केली असता, त्यावर उपायुक्त यांनी शाळांमध्ये सॅनेटरी व्हेडींग मशीन बसविण्याची कार्यवाही सुरु आहे. लुल्ला फाऊंडेशन यांनी ३ हजार रुपयांमध्ये इन्सीलेटर तयार केलेले आहे. प्रत्येक शाळांमध्ये इन्सीलेटर बसविण्याची कार्यवाही सुरु आहे. शाळांमध्ये तेथील महिला शिक्षिकांकडून पॅडचे रिफिलिंग केले जाते. या संदर्भात कोणाकडेही कंत्राट देण्यात आलेले नाही. सध्या शाळांमध्ये पॅड रिफिलिंगची व्यवस्था नसल्यामुळे समितीने दिलेल्या निदेशानुसार त्यासंबंधी कार्यवाही केली जाईल.असे समितीस सांगण्यात आले.

**याबाबत शासनाने महानगरपालिकेच्या शाळांमध्ये सॅनेटरी व्हेडींग मशीन बसवून त्याबाबतचे कंत्राट ई-टेंडरिंग करुन संबंधितांना देण्यात यावे. प्रत्येक शाळांमध्ये इन्सीलेटर बसविण्याची कार्यवाही देखील करण्यात यावी तसेच शाळांमध्ये तेथील महिला शिक्षिकांकडूनच पॅडचे रिफिलिंग करण्यात येते, याबाबत समिती तीव्र नाराजी व्यक्त करते. सध्या शाळांमध्ये पॅड रिफिलिंगची व्यवस्था नसल्यामुळे महानगरपालिकेने पॅड रिफिलिंगची व्यवस्था तात्काळ उपलब्ध करुन देण्यात यावी व महानगरपालिकेने केलेल्या कार्यवाहीचा व शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला २ महिन्यात पाठविण्यात यावी.**

## ४. सांगली जिल्हापरिषद

### ४.१ सांगली जिल्हा परिषदेतील रिक्त पदांचा अनुशेष भरण्याबाबत : —

शुक्रवार, दिनांक २० नोव्हेंबर, २०१५ रोजी महिलांचे हक्क व कल्याण समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी सांगली जिल्हा परिषद यांच्याकडून खालील प्रमाणे लेखी माहिती मागविण्यात आली होती.

समितीने शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानित सेवामधील भरतीसाठी महिलांकरीता ३० टक्के जागा आरक्षित ठेवण्याच्या धोरणाची अंमलबजावणी जिल्हा परिषदेच्या सेवा मधील भरती करताना करण्यात येते काय, असल्यास त्याबाबतचे निकष, भरतीची पध्दत, इत्यादीबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी. जिल्हा परिषदेतील वर्ग १ ते ४ मधील तांत्रिक व अतांत्रिक अधिकारी व कर्मचारी यांची मंजूर संख्या किती आहे ? त्यापैकी सन २०१४-२०१५ अखेर एकूण किती पदे भरण्यात आली आहेत व त्यामध्ये वर्गनिहाय महिला अधिकारी / कर्मचारी यांची संख्या किती आहे ? उक्त मंजूर पदापैकी १ ते ४ मधील किती व कोणती पदे महिलांकरीता आरक्षित करणेत आली आहेत ? महिला उमेदवारासाठी राखीव ठेवण्यात आलेल्या वर्ग १ ते ४ मधील पदापैकी सन २०१४ -२०१५ अखेर किती पदे भरण्यात आली आहेत व किती व कोणकोणती पदे रिक्त आहेत ? तसेच सदरची पदे रिक्त राहण्याची कारणे काय आहेत ? महिला उमेदवारासाठी राखीव असलेली वर्ग १ ते ४ मधील पदे भरण्यासाठी कोणती कार्यपध्दती अवलंबली जाते ? जिल्हा परिषदेकडे प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांची प्रत्येकी किती पदे मंजूर आहेत ? त्यापैकी महिला शिक्षकांची संख्या किती आहे ? शिक्षकांची पदे भरतांना महिलांसाठी ३० टक्के जागा आरक्षित ठेवण्यात आलेल्या आहेत काय ? नसल्यास त्याची कारणे काय आहेत ? बढती देत असताना महिलांचा आरक्षित कोटा ठेवण्यात येतो काय ? तशा प्रकारच्या सेवा शर्ती आणि नियमावली मध्ये बदल करण्यात आला आहे काय ? महिला उमेदवारासाठी असलेली खातेनिहाय पदे भरण्यासाठी गत ३ वर्षात (सन २०१२-१३, १३-१४ व २०१४-१५) किती वेळा व कोणकोणत्या तारखांना वर्तमानपत्रात कोणकोणती पदे भरण्यासाठी जाहिराती देण्यात आल्या आहेत ? उक्त जाहिरातीनुसार वर्षनिहाय महिला उमेदवारासाठी कोणती व किती पदे भरण्यात आली आहेत ? महिला उमेदवारासाठी राखून ठेवण्यात आलेल्या पदांसाठी स्वतंत्र नोंदवही (रोष्टर) ठेवण्यात आली आहे काय ? असल्यास केव्हापासून ? तसेच ती अद्यावत स्वरुपात आहे काय ? नसल्यास त्याची कारणे काय आहेत ? महिला कर्मचारी, अधिकारी यांची भरती व सेवा विषयक माहिती हाताळण्यासाठी जिल्हा परिषदेने विशेष कक्ष स्वतंत्र रित्या स्थापन केला आहे काय ? असल्यास केंव्हापासून तसेच त्यासाठी किती अधिकारी व कर्मचारी उपलब्ध करुन दिले आहेत ? विशेष कक्ष स्थापन केला नसल्याबद्दल त्याची कारणे काय आहेत ? अशी विचारणा केली.

**उपरोक्त प्रकरणी सांगली जिल्हा परिषदेकडून खालील माहिती प्राप्त झाली आहे :—**

सांगली जिल्हयामध्ये एकूण १० तालुके असून सांगली जिल्हयाची सन २०११ जनगनणेप्रमाणे एकूण लोकसंख्या २८,२२,१४३ इतकी आहे. त्यापैकी पुरुष संख्या १४,३५,७२८ व स्त्रिया १३,८६,४१२५ इतक्या आहेत.

सांगली जिल्हा परिषदेची स्थापना दिनांक १/५/१९६२ रोजी झालेली आहे. महिला कर्मचाऱ्यांची माहिती सन १९६८ मधील दस्तऐवजावरुन देण्यात येत आहे.

| **मंजूर पदे** | **पुरुष कार्यरत पदे** | **महिला कार्यरत पदे** | **एकूण पदे** | **रिक्त पदे** |
|---|---|---|---|---|
| ६९७२ | ५७७६ | १०२४ | ६८०० | ९७२ |

महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.८३/२००२/मसैया/२०००/प्र.क्र.४१५/का.२ दि.२५/०५/२००१ अन्वये सरळ सेवा प्रवेशाने भरती करताना ३०% प्रमाणे आरक्षण उपलब्ध करुन देण्यात येते व त्याची पडताळणी जिल्हा निवड समिती मार्फत केली जाते. शासन परिपत्रक दिनांक १९/३/१९९९ प्रमाणे महिलांसाठी ३०% पदे राखून जाहिरात देण्यात येते.

जिल्हा परिषदेतील वर्ग १ ते ४ मधील तांत्रिक व अतांत्रिक अधिकारी व कर्मचारी यांची मंजूर संख्या सदरची माहिती **परिशिष्ठ अ** मध्ये जोडली आहे.

१) वर्ग १ व वर्ग २ ची पदे भरणेची कार्यवाही शासन स्तरावरुन केली जाते.

२) वर्ग ३ व वर्ग ४ च्या मंजूर पदांच्या भरतीच्या वेळी रिक्त असणाऱ्या पदसंख्येच्या ३०% प्रमाणात महिलांची पदे भरणेत येतात व सदर राखीव पदी गुणवत्तेनुसार पात्र महिला उमेदवारांची निवड करणेत येते. पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास महिला आरक्षण हे समांतर आरक्षण असल्याने व्यपगत होते.

३) वर्ग ३ मधील अंगणवाडी पर्यवेक्षिका, आरोग्य सहाय्यक (महिला) व आरोग्य सेवक (महिला) यांची पदे १००% महिलांकरीता आरक्षित आहेत.

सरळ सेवा भरती वेळी रिक्त असणाऱ्या पदांच्या सवर्गनिहाय ३०% प्रमाणात महिलांची राखीव पदे ठेवण्यात येतात व सदर राखीव पदी गुणवत्तेनुसार पात्र महिलांची निवड करण्यात येते. पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर महिला आरक्षण हे समांतर आरक्षण असल्याने ते व्यपगत होते.

| बाब | वर्ग-१ | वर्ग-२ | वर्ग-३ | वर्ग-४ |
|---|---|---|---|---|
| मंजूर पदे | २७ | ३१३ | ९००६ | ७४१ |
| भरलेली पदे | २७ | १९७ | ८३३५ | ६७० |
| रिक्त पदे | ० | ११६ | ६७१ | ७१ |

तसेच वर्ग ३ व वर्ग ४ पदांपैकी सन २०१४-१५ मध्ये मंजूर पदे, भरलेली पदे व रिक्त पदांची माहिती सोबत सादर केली आहे. **परिशिष्ठ - ब**

जिल्हा परिषदेकडील वर्ग क व ड मधील रिक्त पदे भरणेसाठी जाहिरात देते वेळी सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र.एसआरव्ही /१०९७/प्र.क्र.३१/९८/१६अ दिनांक १६ मार्च १९९९ प्रमाणे शासन सेवेत सरळ सेवा भरतीसाठी समांतर आरक्षणासाठी सुचित केल्याप्रमाणे ३०% प्रमाणे महिलांसाठी जागा निश्चित करुन जाहिरात देऊन त्याच्या लेखी परिक्षा घेऊन गुणानुक्रमे निवड केली जाते.

जिल्हा परिषदेकडील सेवा भरतीसाठी असे नियम करण्याची बाब शासनाच्या अखत्यारितील असल्याने जिल्हा परिषद स्तरावर वेगळे सेवा प्रवेश नियम तयार केलेले नाहीत. महाराष्ट्र जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम १९६७ मधील तरतुदीनुसार वर्ग क व वर्ग ड मध्ये सुचित केल्याप्रमाणे शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेनुसार पदे भरण्यात येतात.

सांगली जिल्हा परिषदकडे प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांची एकूण ६२४० पदे मंजूर आहेत. त्यापैकी पुरुष शिक्षक ३४७० व महिला शिक्षक २७७० आहेत. शिक्षकांची पदे भरताना महिलांसाठी ३०% जागा आरक्षित ठेवल्या आहेत. बढती मध्ये महिला आरक्षित कोटा ठेवणेत येत नाही व याबाबत सेवा शर्ती व नियमावलीमध्ये बदल करणेत आलेला नाही.

१) सन २०१२-१३ मध्ये दि. ११/३/२०१२ व दि. २६/४/२०१२ रोजी जाहिरात दिलेली आहे.

२) सन २०१३-१४ मध्ये दि. १९/४/२०१३ रोजी जाहिरात दिलेली आहे.

३) सन २०१४-१५ मध्ये जि.प.सांगली कडील रिक्त पदे भरणेसाठी दै.पुढारी, सकाळ, पश्चिम महाराष्ट्र व जे.के.टाइम्स मिरज साप्ताहिक मध्ये दिनांक १८/८/२०१४ रोजी जाहिरात प्रसिध्द करणेत आलेली आहे.

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.बीसीसी १०९७/प्र.क्र.२/९७/१६ब दिनांक २९/३/१९९७ व क्र.बीसीसी१०९७/प्र.क्र*६३/९७/१६ब दि.१८/१०/१९९७ नुसार बिंदूनामावली नोंदवही ठेवणेत येते. सदरची बिंदू नामावली नोंदवही ही संवर्ग निहाय ठेवणेत येते. महिला आरक्षण हे सरळसेवा भरतीसाठी समांतर आरक्षण

असल्याने यासाठी स्वतंत्र बिंदूनामावली नोंदवही ठेवण्याची तरतूद नाही. तथापि १०० टक्के महिला आरक्षण असणाऱ्या संवर्गासाठी स्वतंत्र बिंदू नामावली नोंदवही ठेवणेत आलेली आहे.

जिल्हा परिषदेमध्ये महिलासाठी राखीव असलेली पदे भरताना मुलाखतीच्या वेळी महिला व बाल कल्याण विभागाच्या जिल्हा स्तरीय अधिकाऱ्यांना निमंत्रीत करण्यात येते. तथापि महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग निर्णय क्रमांक एपीटी-२०११/प्र.क्र.१२९/आस्था-८ दिनांक ५ जून, २०११ राज्यातील जिल्हा परिषदेअंतर्गत वर्ग ३ व वर्ग ४ च्या भरती प्रक्रियेमध्ये मुलाखत न घेणेबाबत सूचित केलेले आहे. त्यामुळे लेखी परिक्षेमधील गुणवत्तेनुसारच निवड सूची तयार करुन त्याआधारे भरती करण्यात येते.

सर्व संवर्गाची मंजूर पदे/भरलेली पदे/रिक्त पदे यांचा मासिक अहवाल दरमहा दिनांक १ ते ५ तारखेपर्यंत मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचेकडे सादर करणेत येतो. तसेच वर्ग १ व २ च्या पदांची माहिती त्रैमोसिक अहवाल दिनांक १ ते ५ या तारखेपर्यंत शासनाकडे सादर करणेत येतो.

महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्र.एपीटी/२००७/प्र.क्र./१५१/आस्था ८ दिनांक १९ मे २००७ अन्वये प्रत्येक भरती वर्षामध्ये भरती कक्ष स्थापन करणेत येतो. त्यामध्ये महिला कर्मचारी नियुक्त करणेत येतो व त्या कक्षामार्फत इतर संवर्गाची पदे व महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र प्रानिमं/२००७/प्र.क्र.४६/०७/१३ अ दिनांक १९ ऑक्टोंबर, २००७ नुसार देण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार सरळसेवा भरती कामी मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समिती मार्फत भरती विषयक कामकाज केले जाते.

सांगली जिल्ह्यामध्ये एकात्मिक बाल विकास सेवा योजनांचे १३ प्रकल्प कार्यरत आहेत. त्यासाठी बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांची १३ पदे मंजूर आहेत. सदर १३ ही पदे रिक्त असून १३ बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांचा कार्यभार सहा गट विकास अधिकारी व १ गट शिक्षणाधिकारी यांचे कडे अतिरिक्त कार्यभार म्हणून देणेत आलेला आहे.

**सांगली जिल्हापरिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष : —**

सांगली जिल्हा परिषदेला शुक्रवार, दिनांक २० नोव्हेंबर, २०१५ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने जिल्हा परिषदेत ६९७२ पदे मंजूर आहेत, त्यापैकी पुरुष कार्यरत पदे ५७७६ आहेत, महिला कार्यरत पदे १०२४ आहेत. शासन निर्णयानुसार ३० टक्के पदे भरायची म्हटली तर १०२४ पदे होतात का, शासन निर्णयाचे उल्लंघन झाले आहे का याची माहिती द्यावी.अशी विचारणा केली.

त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदरची कामे सन १९६८ मधील आहे. ३० टक्यांपेक्षा जास्त पदे भरली आहेत. असे समितीस सांगितले. समितीस उत्तर दिले आहे की, परिशिष्ट अ १६ ते १९ वर माहिती दिली आहे. जिल्हा परिषेदत वर्ग ३ व ४ मध्ये संवर्गनिहाय ३० टक्के आरक्षण दिले आहे का, रेश्यो फॉलो झाला आहे का ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संवर्गनिहाय माहिती दिली आहे त्याप्रमाणे काही संवर्गातील काही पदे रिक्त आहेत, ती पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. जिल्हा परिषदेने यावर्षी जाहिरात दिली आहे. असे समितीस सांगितले.

समितीने राज्य स्तरावर प्रक्रिया सुरु आहे. रिक्त पदे घेणार आहात, त्यामध्ये महिलांना ३० टक्के आरक्षण असेल का ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी होय राज्य स्तरावर प्रक्रिया सुरु आहे. त्यामध्ये महिलांना ३० टक्के आरक्षण आहे.

समितीने रोस्टरप्रामणे किती पदे आहेत ? तक्ता दिलेला नाही ३० टक्के पदे भरली आहेत का ? अशी विचारणा केली.

त्यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सन २०१४-२०१५ अखेर वर्ग ३ मध्ये महिलांसाठी मंजूर पदे २७३८ असून, ३२२३ पदे भरलेली आहेत. महिलांच्या ३० टक्के आरक्षणापेक्षा ४८५ पदे जास्त भरलेली आहेत. सन १९९९ चा शासन निर्णय आला. त्यानंतर महिलांचे आरक्षण हे समांतर आरक्षण असल्यामुळे रिक्त पदांच्या ३० टक्के पदे भरण्याच्या सूचना सन १९९९ आणि सन २००१ च्या शासन निर्णयाप्रमाणे दिल्या नाहीत. त्या त्या वर्षात रिक्त पदे ३० टक्कयांप्रमाणे भरतो. असे समितीस सांगितले.

समितीने सर्व रिक्त पदे येणाऱ्या भरती प्रक्रियेमध्ये भरली जातील का ? शासनाने भरतीबाबतचे वेळापत्रक तयार करुन दिलेले आहे, महिलांचे ३० टक्के आरक्षण पूर्ण भरले जाईल का ? अशी विचारणा केली.

त्यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी येणाऱ्या भरती प्रक्रियेत ही सर्व पदे भरली जातील.असे समितीस सांगितले.

समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे पद का रिक्त आहे ? अशी विचारणा केली.

त्यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची बदली झाल्यामुळे हे पद रिक्त आहे.त्या पदावर ज्यांची नियुक्ती शासनाने केली होती ते रुजु झाले नाहीत. येणाऱ्या काही दिवसात ते रजू होतील, अशी अपेक्षा आहे. असे समितीस सांगितले.

समितीने रोस्टर तयार केले आहे का व ते तपासून घेण्यात आले आहे का ? अशी विचारणा केली.

त्यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संवर्गनिहाय रोस्टर तयार केलेले आहे व ते सन २०१४ मध्ये तपासण्यात आले आहे. असे समितीस सांगितले.

समितीने गत तीन वर्षात महिला अधिकारी, कर्मचारी यांच्याकडून अन्यायाच्या संदर्भात निवेदने प्राप्त झाली आहेत का त्यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात अली आहे, असा लेखी प्रश्न विचारण्यात आला होता व त्याबाबत असा खुलासा केला आहे की, महिलांकडून तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत. समिती स्थापन झालेली नाही. अशी विचारणा केली.

त्यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सन २०१०-११ पासून समिती कार्यरत आहे. सन २०१४ मध्ये सुधारीत मार्गदर्शक सूचनानूसार सुधारणा करुन समिती गठीत करण्यात आली होती व त्या समितीच्या बैठकाही झाल्या आहेत. बैठकाचे इतिवृत्त विभागीय आयुक्तांना पाठविण्यात आले आहे. डॉ.भारती दळवी या समितीच्या अध्यक्षा आहेत. असे समितीस सांगितले.

समितीने विशाखा समितीचा फलक लावला आहे का ? जिल्हा परिषद सदस्यांना या समितीबाबत कोणतीही माहिती नव्हती. समितीचा प्रसार व प्रचार केलेला नाही. त्यामुळे महिला अधिकारी, महिला कर्मचारी एवढेच नव्हे तर जिल्हा परिषद सदस्यां यांना या समिती बाबत कोणतीही माहिती नाही. तक्रार कोठे करायची हे त्यांना माहित नसल्यामुळे आपल्याकडे तक्रारी प्राप्त झाल्या नाहीत.

तसेच एखाद्या महिलेवर अन्याय होत असेल तर महिला लोकप्रतिनिधींकडे जातात. परंतु त्यांनाच जर या समितीची माहिती नसेल तर त्या महिलांना कसा न्याय मिळेल ? आपण बोर्ड लावलेला नाही , वर्तमानपत्रात जाहिरात दिलेली नाही, हे आक्षेपार्ह आहे, अशी विचारणा केली.

त्यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समिती अस्तित्वात आहे , परंतु आपण सांगितल्याप्रमाणे समितीचा बोर्ड सर्व कार्यालयामध्ये लावून घेऊ.

समितीने विशाखा समितीमध्ये एनजीओ प्रतिनिधींचा समावेश केलेला आहे का, समिती सदस्यांची यादी समितीला सादर करावी. विशाखा समितीच्या संदर्भात कार्यालयामध्ये फलक लावून घेणे, प्रसिध्दी करणे, जनजागृती करणे, या सर्व त्रुटींचे निराकरण मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी करुन घ्यावे व पुर्तता अहवाल समितीला सादर करावा. अशी सूचना केल्या.

**विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी, सांगली जिल्हा परिषद यांनी खालीलप्रमाणे लेखी माहिती दिली : —**

जिल्हा परिषदेमध्ये सरळसेवेने भरावयाची वर्ग ३ ची ८६६४ मंजूर पदे असून ७५६३ कार्यरत असून ११०१ पदे रिक्त आहेत व सरळसेवेने भरावयाची वर्ग ४ ची ७४१ मंजूर पदे असून ५८१ कार्यरत असून १६० पदे रिक्त आहेत. सरळसेवा प्रक्रियेव्दारा भरती :-

**१)** नियत वयोमनानुसार सेवानिवृत्त, स्वेच्छा सेवानिवृत्ती, राजीनामा पदोन्नती व मयत इत्यादी कारणांनी वर्ग ३ व वर्ग ४ ची पदे रिक्त झालेली आहेत.

**२)** जिल्हा परिषदेकडून गट क व गट ड वर्गाची तांत्रिक/अतांत्रिक पदे महाराष्ट्र जिल्हा परिषद (सेवाप्रवेश) नियम १९६७ मधील तरतुदी व त्यामध्ये वेळोवळी झालेल्या दुरुस्त्या तसेच शासन निर्णय, दिनांक १९ ऑक्टोबर २००७ व दिनांक २७ जून २००८ मधील तरतुदीनुसार बिंदू नामावलीनुसार प्रवर्गनिहाय रिक्त पदे विचारात घेऊन शासनाकडून प्राप्त होणाऱ्या विहित वेळापत्रकानुसार प्रवर्गनिहाय भरावयाची रिक्त पदांची सामाजिक व समांतर आरक्षानुसार सविस्तर जाहिरात, जादा खप असलेल्या वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येते. तद्नंतर विहित मुदतीत आलेले उमेदवारांचे अर्ज, छाननी करुन, पात्र उमेदवारांची जिल्हा निवड समितीमार्फत लेखी परीक्षा घेऊन, उमेदवारांना मिळालेल्या गुणांच्या आधारे, गुणवत्ता यादी अंतिम करुन पात्र उमेदवारांना नियुक्त्या देऊन रिक्त पदे भरणेत येतात. सदरची पदे भरणेसाठी भरती लेखी परीक्षेचे नियोजित वेळापत्रकानुसार लेखी परीक्षा घेऊन पदे भरणेत येतात. तथापि सन २०१५ नंतर भरती लेखी परीक्षेबाबत शासनाकडून वेळापत्रक अगर सुचना प्राप्त झालेल्या नाहीत.त्यामुळे सदरची पदे रिक्त दिसतात.

**३)** ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक संकीर्ण ५०१७/प्र.क्र.३२१/आस्था-८, दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ अन्वये जिल्हा निवड समित्या बरखास्त करुन राज्यातील सर्व जिल्हा परिषदांतर्गत सरळसेवेच्या कोटयातील गट क संवर्गातील रिक्त पदे ऑनलाईन पध्दतीने परीक्षा घेऊन शासन स्तरावरुन राबविण्याबाबत आदेश देणेत आलेले होते. त्याप्रमाणे इकडील दिनांक १७ एप्रिल, २०१८ अन्वये ४५० रिक्त पदे भरण्यासाठी शासनाकडे कळविण्यात आलेले आहे.

**४)**प्राथमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद सांगलीकडील उपशिक्षक या संवर्गातील रिक्त पदे शिक्षण संचालक, (प्राथ) महाराष्ट्र राज्य पुणे यांचेमार्फत भरण्यात येतात. सन २०१० मध्ये CET परीक्षा घेऊन उपशिक्षकांची रिक्त पदे भरण्यात आलेली आहेत. तद्नंतर उपशिक्षकांची रिक्त पदे भरणेत आलेली नाहीत.

**१)** जिल्हा परिषदेकडील वर्ग क व ड मधील रिक्त पदे भरणेसाठी जाहिरात देतेवेळी सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र.एसआरव्ही/ १०९७/प्र.क्र.३१/९८/१६ अ दिनांक १६ मार्च, १९९९ प्रमाणे शासन सेवेत सरळसेवा भरतीसाठी समांतर आरक्षासाठी सूचित केल्याप्रमाणे ३०% प्रमाणे महिलांसाठी जागा निश्चित करुन जाहिरात देऊन, त्याच्या लेखी परिक्षा घेऊन गुणानुक्रमे निवड केली जाते.

**२)** महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.बीसीसी १०९७/प्र.क्र.२/९७/१६ ब दिनांक २९/३/१९९७ व क्र.बीसीसी १०९७/ प्र.क्र.६३/९७/१६ ब

दिनांक १८/१०/१९९७ नुसार बिंदूनामावली नोंदवही ठेवणेत येते. सदरची बिंदू नामावली नोंदवही ही संवर्ग निहाय ठेवणेत येते. महिला आरक्षण हे सरळसेवा भरतीसाठी समांतर आरक्षण असल्याने यासाठी स्वंतत्र बिंदूनामावली नोंदवही ठेवण्याची तरतुद नाही. तथापि, मा.सहाय्क आयुक्त (मागास कक्ष) विभागीय आयुक्त कार्यालय पुणे यांचेकडून जिल्हा परिषदेकडील सर्व विभागाकडील गट क व गट ड संवर्गाची बिंदू नामावली नोंदवही तपासणी करताना महिला कर्मचाऱ्यांची माहिती घेऊनच बिंदूनामावली (रोस्टर) पडताळणी करुन देण्यात येते. सद्य:स्थितीत सर्व बिंदूनामावली नोंदवहया अद्यावत केलेल्या आहेत.

**अभिप्राय व शिफारशी : —**

समितीने सांगली जिल्हापरिषदेला दिनांक २० नोव्हेंबर, २०१५ रोजी दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने आणि दिनांक २० जून, २०१८ रोजी घेतलेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी समितीने शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानित सेवामधील भरतीसाठी महिलांकरीता ३० टक्के जागा आरक्षित ठेवण्याच्या धोरणाची अंमलबजावणी जिल्हा परिषदेच्या सेवा मधील भरती करताना करण्यात येते काय, असल्यास त्याबाबतचे निकष, भरतीची पध्दत, इत्यादीबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी. महिला उमेदवारासाठी राखीव ठेवण्यात आलेल्या वर्ग १ ते ४ मधील पदापैकी सन २०१४ -२०१५ अखेर किती पदे भरण्यात आली आहेत व किती व कोणकोणती पदे रिक्त आहेत ? तसेच सदरची पदे रिक्त राहण्याची कारणे काय आहेत ? अशी विचारणा केली असता सांगली जिल्हापरिषद स्थापन झाल्यापासून आजपर्यंत सेवेत एकूण पदे ६९७२ असून पुरुष उमेदवार पदे ५७७६ असून त्यापैकी महिला उमेदवारांची संख्या १०२४ एवढी आहे. सांगली जिल्हापरिषदेमध्ये एकूण पदे ही ६८०० असून त्यापैकी रिक्त पदांची संख्या ही ९७२ आहेत.

जिल्हा परिषदेमध्ये सरळसेवेने भरावयाची वर्ग ३ ची ८६६४ मंजूर पदे असून ७५६३ कार्यरत असून ११०१ पदे रिक्त आहेत व सरळसेवेने भरावयाची वर्ग ४ ची ७४१ मंजूर पदे असून ५८१ कार्यरत असून १६० पदे रिक्त आहेत. वर्ग ३ व वर्ग ४ च्या मंजूर पदांच्या भरतीच्या वेळी रिक्त असणाऱ्या पदसंख्येच्या ३०% प्रमाणात महिलांची पदे भरणेत येतात व सदर राखीव पदी गुणवत्तेनुसार पात्र महिला उमेदवारांची निवड करणेत येते. पात्र उमेदवार उपलब्ध न झालेसे महिला आरक्षण हे समांतर आरक्षण असल्याने व्यपगत होते. जिल्हा परिषदेकडील सेवा भरतीसाठी असे नियम करण्याची बाब शासनाच्या अखत्यारितील असल्याने जिल्हा परिषद स्तरावर वेगळे सेवा प्रवेश नियम तयार केलेले नाहीत. महाराष्ट्र जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम १९६७ मधील तरतुदीनुसार वर्ग क व वर्ग ड मध्ये सुचित केल्याप्रमाणे शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेनुसार पदे भरण्यात येतात.

सांगली जिल्हा परिषदकडे प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांची एकूण ६२४० पदे मंजूर आहेत. त्यापैकी पुरुष शिक्षक ३४७० व महिला शिक्षक २७७० आहेत. शिक्षकांची पदे भरताना महिलांसाठी ३०% जागा आरक्षित ठेवल्या आहेत. बढती मध्ये महिला आरक्षित कोटा ठेवणेत येत नाही व याबाबत सेवा शर्ती व नियमावलीमध्ये बदल करणेत आलेला नाही.

साक्षीच्या वेळी समितीने जिल्हा परिषदेत ६९७२ पदे मंजूर आहेत, त्यापैकी पुरुष कार्यरत पदे ५७७६ आहेत, महिला कार्यरत पदे १०२४ आहेत. शासन निर्णयानुसार ३० टक्के पदे भरायची म्हटली तर १०२४ पदे होतात का, शासन निर्णयाचे उल्लंघन झाले आहे का याची माहिती द्यावी.अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदरची कामे सन १९६८ मधील आहे. ३० टक्यांपेक्षा जास्त पदे भरली आहेत. सन २०१४-२०१५ अखेर वर्ग ३ मध्ये महिलांसाठी मंजूर पदे २७३८ असून, ३२२३ पदे भरलेली आहेत. महिलांच्या ३० टक्के आरक्षणापेक्षा ४८५ पदे जास्त भरलेली आहेत. सन १९९९ चा शासन निर्णय आला. त्यानंतर महिलांचे आरक्षण हे समांतर आरक्षण असल्यामुळे रिक्त पदांच्या ३० टक्के पदे भरण्याच्या सूचना सन १९९९ आणि सन २००१ च्या शासन निर्णयाप्रमाणे दिल्या नाहीत. त्या त्या वर्षात रिक्त पदे ३० टक्कयांप्रमाणे भरतो. असे समितीस सांगितले.

**याबाबत समितीने दिनांक २५ मे, २००१ च्या शासन निर्णयानुसार महिलांना ३०% आरक्षण लागू झाले असले तरी महिलांचे आरक्षण हे समांतर आरक्षण असल्यामुळे रिक्त पदांच्या ३० टक्के पदे भरण्या**बाबत**ची कार्यवाही झाली नसल्याचे दिसून येते. याबाबत समिती ३०% आरक्षणानुसार महिलांची पदे भरताना जर महिला उपलब्ध झाल्या नाहीत तर ते आरक्षण तसेच पुढे ठेवून महिलांच्या रिक्त जागांवर महिलांचीच भरती करण्यात यावी. या रिक्त पदांची भरती करण्यासाठी जिल्हापरिषदेने शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावाला शासनाने लवकरात लवकर मंजुरी देवून महिलांची रिक्त पदे ही महिला संवर्गातूनच तात्काळ भरण्यात यावी व महिलांकरीता आरक्षित असलेल्या ३०% जागांची सांगली जिल्हा परिषदेने काटेकोरपणे अंमलबजावणी करावी अशी शिफारस समिती करीत असून याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल २ महिन्यात समितीला सादर करण्यात यावा.**

### ४.२ सांगली जिल्हा परिषदेचे गत ३ वर्षातील वर्षनिहाय अंदाजपत्रक : —

समितीने जिल्हा परिषदेचे गत तीन वर्षातील (सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५) वर्षनिहाय अंदाजपत्रक किती रक्कमेचे आहे ? उक्त अंदाजपत्रकातील रक्कमेपैकी एकूण किती रक्कम जिल्हा परिषद क्षेत्रातील महिलांच्या कल्याणकारी योजनांसाठी राखून ठेवण्यात आली आहे ? जिल्हा परिषदेमार्फत महिलांचे बलशालीकरण करण्याकरिता तसेच आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या महिलांना सक्षम करण्याकरिता राबविण्यात येणाऱ्या योजना तसेच महिलांकरिता देण्यात येणाऱ्या सोयी-सवलती इत्यादी योजनांबाबत माहिती देण्यात यावी. उक्त योजनांवर गत तीन वर्षात (सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५) वर्षनिहाय व योजनानिहाय एकूण किती खर्च झाला ? महिला उद्योगजकांसाठी विशेषत: आर्थिकदृष्ट्या मागास महिला उद्योजकांसाठी उद्योगधंदे उभारण्याकरिता जिल्हा परिषदेमार्फत विशेष सोयी सवलती देण्यात येतात काय ? जिल्हा परिषदेमार्फत महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजना व त्यांना देण्यात येणाऱ्या सोयी सवलती इ.बाबतची माहिती देण्यात यावी. या योजनांची माहिती गरजू महिलांपर्यंत पोहचविण्यासाठी व त्यांना या योजनांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा यासाठी त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी स्वतंत्र अशी योजना जिल्हा परिषदेकडे आहे काय ? महिलांच्या कल्याणाकरिता राबविण्यात येणाऱ्या योजना व त्यांना देण्यात येणाऱ्या सोयी सवलती बाबत जिल्हा परिषदेला राज्य शासनाकडून वेगळे अनुदान मिळते काय ? असल्यास मागील तीन वर्षात वर्षनिहाय किती रक्कम प्राप्त झाली आहे व त्याचा विनियोग कोणकोणत्या बाबीवर करण्यात आला आहे ? जिल्हा परिषदेने आपल्या स्वत:च्या उत्पन्नातून महिलांच्या विकासासाठी स्वतंत्र योजना राबविल्या आहेत काय ? असल्यास, अशा योजनांची माहिती देण्यात यावी ? गत तीन वर्षात (सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५) वर्षनिहाय किती रक्कमेची तरतूद करण्यात आली होती व प्रत्यक्षात किती रक्कम खर्च करण्यात आली ? उक्त तरतूदीनुसार वैयक्तिक व सामुहिक विकासाच्या योजना राबविण्यात आल्या आहेत काय ? योजना व योजनानिहाय यांचे लाभार्थी किती आहेत ? जिल्हा परिषदांच्या अखत्यारित असलेल्या महिला व बाल कल्याण समितीला शासनाच्या तरतूदीनुसार १०% निधी उपलब्ध करुन दिली आहे काय ? त्या निधीच्या विनियोगासाठी कोणत्या मार्गदर्शक सूचना करण्यात आलेल्या आहेत व महिला व बालकल्याण समितीसाठी स्वतंत्र व सक्षम अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली आहे काय ? पंचायत समित्यांच्या कार्यालयात महिलासाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे आहेत काय ? महिलासांठी तक्रार निवारण कक्ष सुरु करण्यात आला आहे काय ? अशी विचारणा केली.

**उपरोक्त प्रकरणी सांगली जिल्हा परिषदेकडून खालील प्रमाणे माहिती प्राप्त झाली : —**

सांगली जिल्हा परिषदेचे वर्षनिहाय अंदाजपत्रक खालीलप्रमाणे आहे.

सन २०१२-१३ मध्ये ४३,२४,५०००/-

सन २०१३-१४ मध्ये ५८,१९,४५००/-

सन २०१४-१५ मध्ये ७६,१०,००००/-

उपरोक्त अंदाजपत्रकापैकी महिला व बालकल्याणकरिता खालीलप्रमाणे तरतूद करण्यात आली आहे.

सन २०१२-१३ मध्ये ६५,०८,५००/-

सन २०१३-१४ मध्ये ५९,९९,८००/-

सन २०१४-१५ मध्ये ७९,०८,९००/-

महिला व बाल कल्याण विभाग स्वत:च्या खर्चाचे प्रारुप तयार करते व शासन निर्णय दि. २४ जानेवारी, २०१४ नुसार महिला व बाल कल्याण समितीने निवडलेल्या योजना राबवून योजनेवरील तरतूद त्या आर्थिक वर्षात खर्च करण्याची कार्यवाही करण्यात येते.

समाज कल्याण विभागाकडून महिलांना सक्षम करण्याकरीता इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये व इयत्ता ८ वी ते १० वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय मुलींना शिष्यवृत्ती देण्यात येते. जिल्हा परिषदेमार्फत महिलांचे बलशालीकरण वाढविणेकरीता तसेच आर्थिकदृष्टया मागास असलेल्या महिलांना सक्षम करण्यासाठी महिला व बाल कल्याण विभागामार्फत योजना राबविण्यात आलेल्या आहेत.

१) लांब पल्ल्याच्या अंतरावर इयत्ता ५ वी ते १० वीतील शाळेत जाणाऱ्या मुलींना सायकल पुरविणे.

२) महिला व मुलींना संगणक प्रशिक्षण, ब्युटी पार्लर, केटरींग, कुकींग, शिवणकाम फॅशन डिझायनिंग, ज्युडो कराटे प्रशिक्षण देण्यात येते.

आर्थिकदृष्टया मागास महिला उद्योजकांसाठी शिवण यंत्र पुरविणे तसेच विविध प्रकारचे प्रशिक्षणाच्या योजना राबविण्यात आल्या आहेत.

जिल्हा परिषदेकडील महिला व बाल कल्याण विभागामार्फत महिलांना स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण देण्यात येते. योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी ग्रामसेवकांच्या मार्फत ग्रामपातळीवर प्रसिध्दी देण्यात येते. जिल्हा परिषद बैठकीत सर्व जिल्हा परिषद सदस्यांना माहिती देण्यात येते. तसेच पंचायत समिती मासिक सभेत पंचायत समिती सदस्यांना योजनांची माहिती देण्यात येते. ग्रामपंचायत स्तरावर अंगणवाडी पर्यवेक्षिका मार्फत अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतीस तर्फे प्रचार व प्रसिध्दी करण्यात येते.

जिल्हा परिषदेमार्फत महिलांसाठी राबविणेत येणाऱ्या योजनांचे मूल्यमापन करण्यात आले आहे. ज्या लाभार्थ्यांना योजनेचा लाभ दिला आहे, त्या लाभार्थ्यांची भेट घेऊन त्यांना लाभ झाला असलेबाबतची माहिती घेण्याबाबत बाल विकास प्रकल्प अधिकारी व क्षेत्रीय कर्मचारी (पर्यवेक्षिका) यांना सुचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच ग्रामसभेत चावडी वाचन करणेत आले आहे.

जिल्हा परिषदेला शासनाकडून विशेष घटक योजनेअंतर्गत अनुदान प्राप्त झाले आहे. वर्षनिहाय प्राप्त अनुदान व खर्चाचा अहवाल सोबत जोडला आहे - परिशिष्ठ इ

महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत लोकसंस्था उभारणी करणे म्हणजेच स्वंयसहाय्यता बचत गट स्थापन करणे, ग्राम स्तरावर गाव विकास समिती स्थापन करणे. लघुपतपुरवठा महिला स्वंयसहाय्यता बचत गटांना उपलब्ध करुन देणे व त्यांमधून सूक्ष्म उपेजिविका आराखडा तयार करणे. महिला सक्षमीकरण व सामाजिक समानता या घटकावर काम करणे त्याचबरोबर लोकसंचालित साधन केंद्र यामध्ये legal help desk सुरु करणे हे उपक्रम राबविले जातात. २५० ते २७५ बचत गटामधील २१,००० महिला सहभागी होत्या.

महिलांकरीता समुपदेशन केंद्रे सुरु करण्यात आलेली आहेत. चार तालुक्याच्या ठिकाणी (विटा, वाळावा, कडेगाव व मिरज) समुपदेशन केंद्रे राज्य महिला आयोगाच्या मान्यतेने सुरु करण्यात आली आहेत. त्या ठिकाणी संबंधित संस्थेकडून २ समुपदेशक व १ विधी सल्लागार नेमण्यात आले आहेत. त्यांच्या मार्फत पिडीत महिलांना समुपदेश व कायदेशीर सल्ला सहाय्य करणेत येते.

शासनाच्या हस्तांतरीत योजनेतून जिल्हा परिषदेमार्फत सन २०१२-१३ ते २०१४-१५ अखेर निराधार, निराश्रित, विधवा महिलेच्या मुलीच्या विवाहासाठी विवाह भत्ता म्हणून प्रति महिलेस रु. २०००/- प्रमाणे लाभ देणेत येतो. सन २०१४-१५ पासून सदर योजना जिल्हा नियोजन समिती मार्फत राबविणेत येत आहे. तसेच तालुक्यातील अंगणवाडी प्रकल्पातील भरती करताना विधवा, परित्यक्ता यांना सेवेत प्राधान्य दिले जाते.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती अभियाना अंतर्गत सांगली जिल्ह्याच्या ग्रामीण भागामध्ये SHG Inventory नुसार एकूण १०,२४४ स्वयंसहाय्यता बचत गट आहेत. त्यापैकी द्रारिद्रय रेषेखालील २०२८ व द्रारिद्रय रेषेवरील ८२१६ असे गट आहेत. लघु उद्योगासाठी या बचत गटांना मंजूरी दिली जात नाही तर गटाची कर्ज प्रकरणे बँकाकडून मंजूर केली जातात.

शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग दिनांक १२ ऑगस्ट, १९९४ नुसार जिल्हा परिषद निधीतून महिला संबंधीत कार्यक्रमासाठी १०% रक्कम खर्च करण्यात येते. १०% रक्कम महिला व बाल कल्याण विभागासाठी राखून ठेवण्यात येते. गत तीन वर्षात (सन २०१२-१३, २०१३-१४, २०१४-१५) सदर निधी खर्च करणेत आला आहे. योजनानिहाय व वर्षनिहाय खर्चाचे विवरण पत्र सोबत जोडले आहे. -परिशिष्ठ ड

गणवेश शिलाई बाबतची योजना घेतलेली नसल्यामुळे महिला मंडळांना काम देण्यात आले नाही.

इंदिरा आवास योजने अंतर्गत घरांचे वाटप करीत असताना सन २००२ च्या सर्वेक्षणानुसार प्रतिक्षा यादीमधील पात्र लाभार्थ्यांची निवड केली जाते त्यामध्ये विधवा व परित्यक्ता महिलांची यादी उपलब्ध नाही. सन २०१६ - १७ पासून अशा प्रकारची माहिती एकत्रित करणेची दक्षता घेण्यात येत आहे.

जिल्हा परिषद सांगली यांचे अखत्यारीतील असलेल्या महिला व बाल कल्याण समितीला शासनाच्या तरतूदीनुसार १०% निधी उपलब्ध करुन दिला जातो. सदर निधीच्या विनियोगासाठी शासन निर्णय क्र. झेडपीए २०१३/प्र.क्र.७६/पंरा - १ दि. २४ जानेवारी, २०१४ अन्वये मार्गदर्शक सूचना प्राप्त आहेत. सदर शासन निर्णयानुसार योजनांची निवड महिला व बाल कल्याण समिती मार्फत करुन अनुदान खर्च करण्यात येते. महिला व बाल कल्याण समितीसाठी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.) यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

सांगली जिल्ह्यामध्ये १० पंचायत समित्या कार्यरत आहेत. त्या सर्व ठिकाणी महिलासाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे आहेत.

महिलांसाठी तक्रार निवारण कक्ष सुरु करण्यात आला आहे.

आरोग्य विभाग जिल्हा परिषद सांगली मार्फत खालील योजना राबविल्या जातात.

१) जननी सुरक्षा योजना

२) जननी - शिशु सुरक्षा कार्यक्रम

३) आशा सामाजिक आरोग्य कार्यकर्ती

४) कन्या कल्याण योजना.

**सांगली जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :—**

सांगली जिल्हा परिदेला शुक्रवार, दिनांक २० नोव्हेंबर, २०१५ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने अंदाजपत्रकातील रकमेपैकी एकूण किती रक्कम जिल्हा परिषद क्षेत्रातील माहिलांच्या कल्याणकारी योजनांसाठी राखुन ठेवण्यात आली आहे. ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्य लेखा अधिकारी यांनी सन २०१२-१३ मध्ये १० बाबीवरील उत्पन्न ४,३२,४५,०००/- होते. १० टक्के प्रमाणे ४३,२४,५००/- ऐवढी तरतुद करावयाची होती. सन २०११-१२ चा अनुषेश ५३,९४,०००/- होता. अनुशेष मिळुन ४३,७८.४२१/- एवढी तरतुद करणे अपेक्षित होते. त्यापेक्षा जास्ता तरतूद केलेली आहे. ६५,०८,५००/- एवढी तरतूद केली आहे. त्यापैकी ५२,६४,८७७/- एवढा खर्च करण्यात आलेला आहे. हा खर्च १० टक्केयांपेक्षा जास्त झालेला आहे. वर्षअखेर अनुशेष नाही .असे समितीस सांगितले.

समितीने सन २०१२-१३ मध्ये ६५,०८,५००/- एवढी तरतूद केली होती व ५२,६४,८७७/- एवढा खर्च केलेला आहे. तरतुदी पेक्षा कमी खर्च केला असताना अनुशेष नाही ,असे कसे म्हणू शकता. अशी विचारणा केली.

त्यावर मुख्य लेखा अधिकारी यांनी काही योजनांसाठी १३ लक्ष रुपये टोकन अमाऊंट दिलेली आहे. त्यामध्ये १०० टक्के खर्च झालेला नाही हा खर्च करीत असताना १४०००/- चे सेव्हिंग झाले आहे. महिलासांठी समुपदेशन केंद्र चालविणे यावर ७२०००/-खर्च झालेला आहेत. पात्र प्रस्ताव कमी आल्यामुळे जो खर्च झालेला नाही तो पुढील वर्षी केलेला आहे . असे समितीस सांगितले.

समितीने या योजनंचा खर्च पुढील वर्षी कॅरिफॉरवड होतो का ? पुस्तिका वेगळी आहेत. तुमच्याकडे असलेली पुस्तिका वेगळी आहे. कसे का केले आहे. अशी विचारणा केली.

त्यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शिल्लक राहिलेली रक्कम कॅरिफॉरवड केली आहे, सन २०१२-१३ ला ८२ टक्के खर्च झाला आहे. सन २०१२-१३ मध्ये दहावी व बारावी पास मुलींना संगणक प्रशिक्षण देणे या योजनेसाठी रु १-१०,७८,०००/- इतकी तरतूद होती व एकुण खर्च रु १०,७७,५००/- इतका होता, लाभार्थ्याची संख्या ४३१ होती. तसेच आदर्श अंगणवाडी /बालवाडी सेविकांना पुरस्कार या योजनासाठी रु १,००,०००/- इतकी तरतूद होती व एकुण खर्च ८६,४४५/- इतका होता. असे समितीस सांगितले.

समितीने सन २०१२-१३ मध्ये रु ६५,०८,५००/- इतकी तरतूद होती व रु ५२,६४,८७७/- इतका खर्च झाला आहे. हा खर्च कमी का झाला आहे. अशी विचारणा केली.

त्यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सायकल खरेदी करण्यसाठी दरपत्रक उपलब्ध नव्हते. निविदा प्रक्रिया राबविली. मात्र प्रतिसाद मिळाला नाही, पुन्हा फेरनिविदा प्रक्रिया राबविली, त्यामध्ये लोएस्ट ३११५ रुपयांची होती. असे समितीस सांगितले.

समितीने सन २०१३-१४ मध्ये सायकल योजना होती, तेव्हा त्यासाठी रु २०,५२,६००/- इतकी तरतूद होती आणि रु २०,५०,२००/- इतका खर्च होता, ६७० लाभार्थ्यांना लाभ मिळाला होता. अनौपचारिक चर्चाच्या वेळी महिला सदस्यांनी म्हटले की , सायकल मिळाल्या नाहित, सायकल वाटप झाले का ? जिल्हा परिषदेच्या सदस्या म्हणाल्या की, वार्डमध्ये फक्त ३ सायकल मिळाल्या. अशी विचारणा केली.

त्यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी होय सायकल वाटप झाले आहे. असे समितीस सांगितले. याबाबत निदर्शनास आणत की, जिल्हा परिषदेच्या सर्व सदस्यांच्या कायक्षेत्रात त्या अनुषंगाने वाटप केले जाते. मघाशी महिला व बाल कल्याण समितीच्या सदस्यांनी म्हटले की, सायकल कमी प्रमाणात मिळाल्या. मुळात तरतूदीच्या अनुषंगाने सायकल

दिल्या जातात. ३१ जिल्हा परिषद सदस्या आहेत, त्या अनुषंगानं प्रमाण कमी येणार आहे . असे समितीस सांगितले.

समितीने १० टक्क्याप्रमाणे निधी वापरला पाहिजे, तो वापरलेला नाही. प्रत्येक प्रभागाला किती सायकल वाटप झाले ? अशी विचारणा केली.

त्यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यावर्षी सायकल योजनेसाठी २० लाख ५२ हजार तरतूद होती. त्यामध्ये ६७० सायकल घेतल्या होत्या. १० सायकल एका प्रभागाला दिल्या. असे समितीस सांगितले.

समितीने या सायकल कोणाकडुन घेतल्या होत्या, सायकल दर कराराप्रमाणे की निविदा प्रकिया करुन घेतल्या. अशी विचारणा केली.

त्यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शासनाचा दरकरार होता. मे जोधंळे पाटील ॲण्ड कंपनी, नाशिक यांच्याकडुन सायकल खरेदी केल्या. असे समितीस सांगितले.

समितीने वजन काटे कोणत्या प्रकराचे आहेत आणि ते खरेदी करण्याची प्रक्रिया कशी आहे. सन २०१२-१३ सन २०१३-१४ व सन २०१४-१५ वजन काटे घेतले आहेत. सन २०१२-१३ मध्ये रु ७,७४,३९४/- रकमेचे वजन काटे घेतले आहेत. सन २०१३-१४ मध्ये रु ४,१३,०००/- रकमेचे वजन काटे घेतले आहेत. २ वर्षे वजन काटे घेतले आहेत. हे वजन काटे अंगणवाडी केंद्राना एवढया मोठया प्रमाणात दिले का ? एका वजन काटयाची किमंत काय आहे ? अशी विचारणा केली.

त्यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जवळपास ९३० अंगणवाडया आहेत. सन २०१२-१३ मध्ये २५८ अंगणवाडया वजन काटे दिले. इलेक्ट्रॉनिक वजन काटयाची किमंत रुपये ५१५० इतकी आहे. असे समितीस सांगितले.

समितीने शासन निर्णयप्रमाणे खरेदी केली आहे. शासन निर्णय तंतोतत पाळला आहे. समिती आपले कौतुक करते. हे कोणत्याही जिल्हा परिषदेमधुन दिसुन आले नाही . कोणत्याही जिल्हा परिषदेत तरतूद केली आणि ती खर्च केली हे दिसुन आले नाही. ७५ लाख रुपये तरतूद करायची आणि खर्च ३ लाख रुपये करायचा हे बऱ्याच ठिकाणी दिसून आले आहे. येथे तसे काहीही आढळून आलेले नाही. अशा प्रकारे समितीने समाधान व्यक्त केले.

समितीने माहिलांसाठी समुपदेश केंद्र चालविले यासाठी २ लाख १० हजार रुपये तरतुद केली आहे. आणि ७२ हजार रुपये खर्च केला आहे. परंतु लाभार्थ्याची संख्या लिहिलेली नाही. अशी विचारणा केली.

त्यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तालुका स्थरावर समुपदेशन केद्र असून ते एनजीओमार्फत चालविले जाते. १ समुपदेशक व १ विधी सल्लागार असतो.

समितीने लाभार्थ्यांची संख्या लिहिली पाहिजे होती, याची नोंद का केली नाही. माहिलांसाठी समुपदेशन केंद्र चालविणे यासाठी तरतूद दाखविली आहे, खर्च दाखविलेला आहे, परंतू लाभार्थ्यांची संख्या दाखविलेली नाही. अशी विचारणा केली.

त्यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सन २०१२-१३ मध्ये लाभार्थी संख्या १४१ आहे. ४८ प्रकरणे तडजोडीने मिटविली आहेत. २५ प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत. ७८ प्रकरणांचा न्यायलयात पाठपुरवठा करुन निकाली निघाली आहेत. असे समितीस सांगितले.

समितीने समुपदेशन केंद्राची प्रकिया कशी आहे ? अशी विचारणा केली.

त्यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समुपदेशकाला ९ हजार रुपये महिना मानधन दिले जाते. जेथे काम कमी आहे तेथे पैसे कमी आहेत. १ हजार रुपये महिन्याला स्टेशनरीसाठी द्यावे लागतात. असे समितीस सांगितले.

समितीने प्रशिक्षणासाठी जास्त तरतूद केली पाहिजे. महिला सदस्यांना योजनांची माहिती नसेल तर ते कसे काम करणार. माहिला सदस्यांचे म्हणणे आहे की, फक्त लाभार्थी निवड होते, ब्युटी पार्लर एमएससीआयटी यांचे प्रशिक्षण दिले जाते का, ते प्रशिक्षण कोणाला देता, प्रशिक्षणाची प्रक्रिया काय आहे. अशी विचारणा केली.

त्यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ब्युटी पार्लरसाठी ई-निविदा ब्युटीशिअनचे कोर्सेस घेणाऱ्या संस्थाची निवड करतो, अकाऊंटमध्ये प्रशिक्षण संस्थेमार्फत सुरु केले होते. सन २०१५-१६ ची प्रशिक्षण प्रक्रिया अंतिम झाली आहे. प्रशिक्षण अक्च्युल दिले जाते. उपस्थितांचे फोटो आहेत. उपस्थित असणाऱ्या महिला देखील आहेत. असे समितीस सांगितले.

समितीने अखर्चित निधी पुढील वर्षी खर्च केला आहे. माहिलासांठी १० टक्के निधी आहे. परंतू सामितीचे म्हणणे आहे की, तो वर्षनिहाय खर्च झालेला नाही. परिणामी योजना राबविताना अडचणी आल्या आहेत. दरवर्षी १०-१५ लाख रुपयांचा अनुशेष आहे. आता एकुण अनुशेष किती आहे. अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी यावर्षी १४ लाख ३५ हजार रुपयाचा अनुशेष आहे.असे समितीस सांगितले.

समितीने मुख्यालयात महिलासाठी स्वच्छतागृहे नव्हती अशी तक्रार महिला सदस्यांनी केली. स्वच्छतागृहाचे काम २ महिन्यापुर्वी सुरु केले आहे. पुरुषांच्या स्वच्छतागृहांत महिलांना जावे लागत आहे असे समजले. ही बाब फार गंभीर आहे. अशी विचारणा केली.

त्यावर कार्यकारी अभियंता यांनी जिल्हा परिषदेची इमारत, पंचायत समितीच्या इमारती जुन्या आहेत, त्यामध्ये स्वतंत्र शौचालय बांधले जात नव्हते. नवीन इमारतीमध्ये महिलांसाठी स्वतंत्र शौचालय बांधली जातात नमुना नकाशास मान्यता मिळाली आहे. स्वच्छतागृह आहे, तेथे डिव्हाईड करुन घेतले आहे. असे समितीस सांगितले.

समितीने आता स्व्च्छतागृहे, शौचालय बांधणार आहोत ही गोष्ट बरोबर आहे. परंतु आता पर्यत का केले नाही कोणी तरी त्याकडे लक्ष दिले पाहिजे होते. स्थानिक स्वराज्य संस्थेत माहिलांना ५० टक्के आरक्षण आहे. तरीही त्यांना स्वच्छतागृह, शौचालय नसतील ही आतिशय गंभीर बाब आहे. स्वच्छ भारत योजना घोषित केली आहे आणि तरीही सांगली सारख्या जिल्हा परिषदेमध्ये माहिलांची अशी दुदर्शा होत असेल तर ही गंभीर बाब आहे.

त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मुलींच्या स्वच्छतागृह कमतरता होती, ही वस्तुस्थिती आहे. या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने मुलींची स्वच्छतागृहे दुरुस्त करण्याचा व नवीन स्वच्छतागृह बांधण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या वर्षअखेपर्यत ही कमतरता दूर करणार आहेत. महिलांसाठी स्वच्छतागृह नाहीत, असे नाही. या इमारतीत प्रत्येक मजल्यावर स्वच्छतागृह आहे. जुन्या इमारतीत स्वच्छतागृह नाही. परंतू त्या ठिकाणी ते बांधण्याचा प्रयत्न करीत आहोत. तळमजल्यावर माहिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह आहे. तसेच वरच्या मजल्यावर देखील आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालानाच्या बाजूला जॉईट स्वच्छतागृह तयार करीत आहोत. असे समितीस सांगितले.

समितीने महिलांसाठी स्वतंत्र कक्ष आहे का ? अशी विचारणा केली.

त्यावर कार्यकारी अभियंता यांनी महिला सदस्यांसाठी स्वतंत्र कक्ष आहे. तथापि, महिला अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी कक्ष नाही. त्याची देखील दखल घेत आहोत. असे समितीस सांगितले.

समितीने जिल्हा परिषदेची मुलींची वसतीगृहे किती आहेत ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषदेची मुर्लीसाठी ७ वसतीगृहे आहेत. समाजकल्याण विभागाची ८ वस्तीगृहे आहेत. असे समितीस सांगितले.

समितीने मुलींना सॅनिटरी नॅपकिस पुरविण्याची योजना जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येते का. अशी विचारणा केली.

त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ही योजना यापुर्वी कार्यान्वीत नव्हती, तथापि, ही योजना आता कार्यान्वीत करीत असून जिल्हा नियोजन समितीकडून त्यासाठी आर्थिक तरतूद करण्यात येणार आहे. असे समितीस सांगितले.

समितीने अनेक जिल्हांमध्ये सी एस.आर.च्या माध्यमातून ही योजना सुरु करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेने याबाबत खुप विलंब केला आहे. मुलींच्या आरोग्याच्या दृष्टीने ही योजना अतिशय चांगली आहे. ही योजना जिल्हा परिषदेने तातडीने सुरु करावी, अशा समितीच्या सूचना केल्या.

**विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खालील प्रमाणे लेखी माहिती दिली :—**

"बेटी बचाओ बेटी पढाओ" योजनेअंतर्गत जिल्हा स्तरावर मा. जिल्हाधिकारी, सांगली यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करणेत आली आहे. तसेच तालुकास्तरावरही सदर समिती स्थापन करणेत आली आहे. जनजागृती करण्यासाठी सर्व गावांमध्ये चित्ररथाद्वारे प्रसिध्दी करणेत आली आहे. तसेच मुलींचे प्रमाण वाढण्यासाठी गाव पातळीवर प्रबोधन करणारे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. रूग्णालय व सोनोग्राफी सेंटरवर धाडी टाकणेत आलेल्या आहेत. सदर धाडीमध्ये ७ सोनोग्राफी सेंटर्स सील केली आहेत व ४ डॉक्टरांचे रजिस्ट्रेशन रद्द केले आहे.

जिल्हा परिषद मुख्यालयात दर्शनी भागावर विशाखा समितीचे फलक लावणेत आले आहेत. तसेच तालुका स्तरावर फलक लावण्याबाबत या कार्यालयाचे पत्र क्र. १५६२/२१४२ दि. १/१२/२०१५ अन्वये कळविणेत आले होते. त्यास अनुसरून सर्व तालुका स्तरावर फलक लावण्यात आलेबाबत बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी लेखी अहवाल सादर केला आहे. तसेच जनजागृती करण्याबाबत या कार्यालयाचे पत्र दि. ४/२/२०१६ अन्वये सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी, गट विकास अधिकारी यांना तालुकास्तरावर कार्यशाळा घेण्यास कळविण्यात आले आहे. सदर कार्यशाळेस महिला लोकप्रतिनिधी व महिला तक्रार निवारण सदस्य यांना आमंत्रित करण्यास कळविले आहे.

जिल्हा परिषद मुख्यालयात माहिलांसाठी एकूण स्वच्छतागृह १४ युनिट व युरिनल्स ११ युनिट उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत.

सांगली जिल्हयामध्ये मुलींचे प्रमाण वाढविणेसाठी पुढील प्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

**१)** मा.लोकनेते राजारामबापू पाटील स्मृती आरोग्य कार्यक्रमांतर्गत सन २०१५-१६,२०१६-१७, २०१७-१८ या वर्षामध्ये प्रतिवर्षी ५९ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी रोगनिदान शिबीराचे आयोजन करुन शिबीरामध्ये स्त्री भ्रूण हत्या विषयी जनजागृती करण्यात आले.

**२)** सन २०१६-१७, व २०१८ मध्ये दिनांक ७ एप्रिल, या जागतिक आरोग्य दिनानिमित्त जिल्हा स्तरावर आरोग्य दिनाचे कार्यक्रम घेवून स्त्री भ्रूण हत्या या विषयी जनजागृती करण्यात आली आहे.

**३)** सन २०१६-१७, व २०१७-१८ मध्ये १० जुलै रोजी मातृ सुरक्षा दिन व ११ जुलै रोजी जागतिक लोकसंख्या दिन या निमित्त १ व २ मुलींवर शस्त्रक्रिया करुन घेतलेल्या लाभार्थींना बचत प्रमाणपत्र वाटप व जाहीर सत्कार करण्यात आला तसेच मुलींच्या जन्माचे (आबा) यांच्या

स्मृतीप्रित्यर्थ जिल्हास्तरीय आरोग्य मेळाव्यमध्ये बेटी बचाओ बेटी पढाओ च्या अनुषंगाने जनजागृती करण्यात आली.

**४**)स्वर्गीय आर.आर.पाटील (आबा) यांच्या स्मृतीप्रित्यर्थ जिल्हास्तरीय आरोग्य मेळाव्यामध्ये बेटी बचाओ बेटी पढाओ च्या जनजागृती करण्यात आली.

**५**)सन २०१५-१६ या वर्षापासून जन्माचे स्वागत कार्यक्रमांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये जन्मलेल्या मुलीचे स्वागत करण्यात येत आहे.

**६**) सन २०१६-१७ पासून कन्या कल्याण योजनेंतर्गत १ व २ मुलींवर शस्त्रक्रिया करुन घेतलेल्या लाभार्थ्यांना रुपये १०, ०००/- चे बचत प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

**७**)सन २०१६, २०१७ व २०१८ मध्ये १ मे रोजी महाराष्ट्र दिनामित्त स्त्री भ्रूण हत्या विरोधी चित्ररथाचे आयोजन करण्यात आले होते.

बेटी बचाओ बेटी पढाओ योजनेंतर्गत जिल्हा स्तरावर मा.जिल्हाधिकारी, सांगली यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करणेत आली आहे. तसेच तालुकास्तरावरही सदर समिती स्थापन करणेत आली आहे. सन २०१७-१८ मध्ये तालुकानिहाय सरपंचाची कार्यशाळा आयोजित करुन, प्रबोधन करणेत आलेले आहे. जिल्हयातील नोंदणीकृत सोनोग्राफी सेंटर्स व डॉक्टर्स यांची PCPNDT कायद्याबाबत कार्यशाळा घेण्यात आली आहे. जनजागृती करण्यासाठी सर्व गावांमध्ये चित्ररथाव्दारे प्रसिध्दी करणेत आली आहे. तसेच मुलींचे प्रमाण वाढण्यासाठी गाव पातळीवर प्रबोधन करणारे विविध कार्यक्रम अयोजित करण्यात आले आहेत. आरोग्य विभागामार्फत जिल्हयामध्ये १५ मार्च,२०१७ ते ३० एप्रिल, २०१७ दरम्यान रुग्णालय तपासणी धडक मोहिम राबविणेत आली . यामध्ये महानगरपालिका, शहरी, ग्रामीण भागातील २३३५ रुग्णालय तपासणी करणेत आली त्यापैकी ३३४ ठिकाणी त्रूटी आढळून आल्या होत्या. त्यापैकी ३२४ रुग्णालयांनी त्रूटी पुर्तता केली असून १० त्रूटीबाबत पाठपुरावा सुरु आहे. सोनोग्राफी सेंटरवर धाडी टाकण्यात आलेल्या आहेत. सदर धाडीमध्ये ७ सोनोग्राफी सेंटर्स सील केले आहेत व ४ डॉक्टरांचे रजिस्ट्रेशन रद्द केले आहे. सद्य:स्थितीत PCPNDT कायद्यातर्गत ४ केसेस प्रलंबित असून पाठपुरावा सुरु आहे. जिल्हायामध्ये मोफत जिल्हास्तरीय आरोग्य महाशिबीरामध्ये स्त्रीभ्रूण हत्या रोखण्याकरीता आरोग्य शिक्षण साहित्य वाटप करणेत आले आहे.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय दिनांक २४ जानेवारी, २०१४ मधील तरतूदीनुसार, जिल्हा परिषदेमध्ये स्थापन करणेत आलेल्या महिला व बाल कल्याण समिती मार्फत जिल्हा परिषदेच्या बजेट पैकी १० टक्के निधी महिलांसाठी विविध योजनावर खर्च करणेत येतो. जिल्हा परिषद सांगली कडील सन २०१५-१६, सन २०१६-१७, व सन २०१७-१८ मध्ये अनुक्रमे रु.११४.०० लक्ष, रु.१६०.९८ लक्ष, रु.१३२.४७ लक्ष इतकी तरतूद जिल्हा परिषद स्वीय

निधीच्या १० टक्के प्रमाणे करणेत येवून, अनुक्रमे रु.६१.४८ लक्ष, रु.१२८.९५लक्ष, रु.७४.०० लक्ष इतका खर्च करणेत आलेला आहे. त्यापैकी ५० टक्के निधी किशोरवयीन मुली व महिलांसाठी साठी प्रशिक्षणे, समुपदेशन केंद्राना अनुदाने, अंगणवाडी सेविका, मदतनीस यांना पुरस्कार इत्यादी बाबींवर तसेच उर्वरीत ५० टक्के निधी मुली व महिलांना विविध साहित्य पुरविणे, अंगणवाडयांना विविध साहित्य पुरविणे, अंगणवाडी केंद्र इमारत दुरुस्ती करणे इत्यादी बाबींवर योग्य त्या कारणांसाठी खर्च करणेत आलेला आहे.

जिल्हा परिषद सांगली कडील १० टक्के महिला व बाल कल्याण स्वीय निधीमधून सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये, महिलांचे सबलीकरण करण्याकरीता व आर्थिकदृष्टया मागास असलेल्या महिलांना सक्षम करण्याकरीता एकूण ७०५ शिलाई मशीन उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये एकूण ११७० महिलांना शिवणकाम व फॅशन डिझायनिंगचे प्रशिक्षण देणेत आलेले आहे.

तसेच पशुसंवर्धान विभाग, जिल्हा परिषद सांगली मार्फत, अनुसूचित जाती/नवबौध्द लाभार्थीना दुधाळ जनावर गट वाटप योजना तसेच शेळी गट वाटप योजनाअंतर्गत प्राप्त अर्जामध्ये निवडीचेवेळी विचार करुन प्रत्येक वर्षी प्राधान्यक्रमाने येणाऱ्या ३० टक्के महिलांना जिल्हा निवड समिती कडून निवड करणेत येवून खालीलप्रमाणे वर्षनिहाय लाभ देण्यात आला आहे.

| अ.क्र | सन | एकूण लाभार्थी दुधाळ (गाय व म्हैस) गट | एकुण लाभार्थी शेळी गट | ३ पैकी महिला | ४ पैकी महिला |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| २ | २०१५-१६ | १०९ | ५२ | १८ | १२ |
| ३ | २०१६-१७ | १०९ | ५२ | १९ | १४ |
| ४ | २०१७-१८ | १०९ | ५२ | १५ | ३ |

**विभागीय सचिवांची साक्ष :—**

सांगली जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक २० जून,२०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने सांगली जिल्हामध्ये सेक्स रेशिओमध्ये मुलींचे प्रमाण कमी असल्याचे कारण काय ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी सांगली जिल्ह्यामध्ये समितीने असे नोटिस केले आहे की, सेक्स रेशिओमध्ये मुलींचे प्रमाण कमी आहे. यासाठी जनजागृती, प्रबोधन करणे गरजेचे

आहे. जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सभापती यांनी गावात कार्यक्रम किंवा प्रबोधन करणे गरजेचे आहे. पी.सी.-पी.एन.डी.टी ॲक्ट अंतर्गत काही रुग्णालय व सोनोग्राफी सेंटर यांच्यावर धाड टाकणे गरजेचे आहे.

या अनुषंगाने हे सांगू इच्छिते की, सांगली जिल्हा बेटी बचाओ, बेटी पढाओ योजनेंतर्गत आलेला आहे. त्याच्या बाबत गर्व्हनमेंट ऑफ इंडियाकडून जिल्हाधिकारी कार्यालयाला डायरेक्ट निधी प्राप्त झालेला आहे. त्या अंतर्गत एक समिती आहे. त्या समितीमध्ये महिला बालकल्याण अधिकारी, जिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक, जिल्हा परिषदेचे डी.एच.ओ. यांचा समावेश आहे. त्यांनी एक वर्षभराचा आराखडा तयार केलेला आहे. बेटी बचाओ, बेटी पढाओ अंतर्गत ७० टक्के कंपोनंट प्रबोधन व लोकांचे विचार परिवर्तन करण्याशी निगडित आहे. त्यामध्ये प्रभातफेरी, जिल्हास्तरावर, तालुकास्तरावर कार्यक्रमाचे नियोजन, पर्टीक्युलरली महिलांचे प्रबोधन आणि फॅमेलीचे महत्वाचे घटक सासु-सासरे व पुरुषांची मानसिकता बदलण्याचे भरपूर कार्यक्रम आहेत. त्यामध्ये माहिती रथ फिरविणे या सर्व गोष्टी कलेक्टरने केलेल्या आहेत त्याबाबतचा उल्लेख केलेला आहे.

पी.सी.-पी.एन.डी.टी ॲक्ट अंतर्गत सांगलीमध्ये एक प्रकरण घडले होते. त्याची नोंद घेतलेली आहे. त्या अनुषंगाने पी.सी.-पी.एन.डी.टी ॲक्ट अंतर्गत तेथील सोनोग्राफी सेंटर्सचे पूर्णपणे इन्स्पेक्शन व त्याची सर्व नोंद आता कायद्याप्रमाणे सिव्हील सर्जनकडे आहे आणि ते कारवाई करीत आहेत. रुटीन प्रमाणे ते सेंटर व तेथील रेकॉर्डही इन्स्पेक्ट करीत आहेत. असे समितीस सांगितले.

समितीने डी.एच.ओ. यांनी पी.सी.-पी.एन.डी.टी ॲक्टच्या कारवाईबाबत सांगावे. कारण बेटी बचाओ, बेटी पढाओचा ३० टक्के कंपोनंट हा पी.सी.-पी.एन.डी.टी ॲक्टवर आहे. आता मुलींची संख्या किती आहे ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी साधारणत: ९०० आहेत.

समितीने ॲक्चुअल आकडेवारी सांगावी. सन २०१५ मध्ये आलो होतो. सन २०११ च्या जनगणनेनुसार तेथे मुलींचे प्रमाण कमी असल्याचे जाणवले होते. त्यानंतरही कमी जाणवले होते. पी.सी.-पी.एन.डी.टी ॲक्टच्या केसेस तेथे निघालेल्या होत्या. तेथे धाडी टाकलेल्या होत्या व ७ जणांवर काही तरी कारवाई केली होती. अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी टोटल ४ केसेस झालेल्या आहेत.असे समितीस सांगितले.

समितीने सांगली जिल्ह्यामध्ये सन २०१५ मध्ये आलो होतो. आता तेथे मुलींची संख्या किती आहे ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी पूर्वी सांगली जिल्ह्यामध्ये गुणोत्तरामध्ये निराशाजनक परिस्थिती होती. त्यामध्ये आता फार इम्प्रुव्हमेंट झालेली आहे. साधारणत: ९४७ च्या रेंजमध्ये

होतो ते आता ९७० च्या आसपास गेलो आहोत. सन २०११ मध्ये चाईल्ड सेक्स रेशिओ हा पर थाऊजंड ९८० होता. आता सन २०१७ तो ९२६ असा आहे. त्यामध्ये अंशत: इम्प्रुव्हमेंट आहे. महाराष्ट्राचाही ॲव्हरेज आता ९३० पेक्षा पुढे गेलेला आहे. महाराष्ट्राच्या ॲव्हरेजपेक्षा पर थाऊजंड ४ ने कमी आहोत परंतु प्रयत्न असा आहे की, २०१९ पर्यंत हे महाराष्ट्र स्टेट ॲव्हरेज पर्यंत आणायचे. असे समितीस सांगितले.

समितीने पी.सी.-पी.एन.डी.टी. ॲक्टच्या अंतर्गत धाडी टाकल्या जातात. त्या ठिकाणी सिरियस गोष्टी आढळल्या होत्या. त्यावेळेस घटनाही घडली होती. त्या ठिकाणी असे आढळून आले होते की, ॲबॉर्शन मोठ्या प्रमाणावर होत आहेत. अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी पीसीपीएनडीटी ॲक्ट अंतर्गत दोन कंपोनंट आहेत. मेडीकली अप्रुव्ह्ड ॲबॉर्शन्स. गर्भपाताची ३ प्रमुख कारणे आहेत. कमी वयाच्या मुली गर्भवती असल्यास, गर्भ २४ आठवड्यापर्यंत असल्यास त्यांच्या पालकांचे कन्सेन्ट घेऊन गर्भपात करता येतो. सेक्स डिटरमिनेशन करिता जे गर्भपात केले जातात, त्यासाठी पीसीपीएनडीटी ॲक्ट आहे. सांगली जिल्ह्यामध्ये सोनाग्राफी मशीन सिल करणे किंवा सेंटरवर कारवाई करणे असे काही झालेले नाही. सिव्हील सर्जनच्या पातळीवर रेकॉर्ड व्हेरीफिकेशन करण्याची कारवाई केलेली आहे. तसेच ॲडमिट झालेल्या काही स्वतंत्र केसेसची तपासणी केली आहे. कोणतेही सेंटर बंद करण्याची कारवाई झाल्याची माहिती नाही. ४ केसेस पूर्वीच्याच होत्या. शिराळा तालुका, इस्लामपूर तालुक्यातील २ व विटा येथील ४ प्रकरणे सेशन्स कोर्टामध्ये जाऊन ॲक्विट झालेल्या आहेत.

जिल्हा परिषदेमध्ये दर्शनीय भागात विशाखा समितीचा फलक लावलेला आहे. तसेच तालुका स्तरावर फलक लावण्याबाबत कार्यवाही करण्यात आली आहे. सर्व तालुक्यांमध्ये फलक लावण्याबाबत प्रकल्प अधिकारी यांना सूचना दिलेल्या आहेत. तालुका स्तरावर महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण मिळवण्याकरिता तसेच नियमांची जनजागृती करण्याकरिता कार्यशाळा सर्व ठिकाणी घेण्यात आलेली आहे. आज जिल्ह्यात सुरुळीत काम सुरु असून कोणतीही तक्रार नोंदवली गेली नाही. दर महिन्याला बैठक घेतली पाहिजे. तेथे तक्रार निवारण होत नसल्यास जिल्हा स्तरावर व नंतर शासन स्तरावर महिला बाल विकास सचिव यांच्याकडे तक्रार नोंदवली जाते. सध्या कोणतीही तक्रार नाही.

दर महिन्याला १० ते १५ तक्रारी येतात. तसेच सुनावणीसाठी देखील प्रकरणे येतात. शासकीय कार्यालयामध्ये त्याबाबत जागरुकता आहे.

महिलांसाठी स्वच्छतागृह स्वतंत्रपणे उपलब्ध करुन देणे व त्याबाबतच्या कार्यवाहीचा अहवाल समितीला द्यावा असा विषय होता. जिल्हा परिषद मुख्यालय येथे महिलांकरिता १४ स्वच्छतागृह व ११ युरिनल्स उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. त्याचा अहवाल सादर केलेला आहे. असे समितीस सांगितले.

**अभिप्राय व शिफारशी : —**

सांगली जिल्हापरिषदेला भेट देवून शासन धोरणानुसार प्रत्येक जिल्हापरिषदेत महसुलीत व आस्थापना खर्च वगळून एकूण अंदाजपत्रकाच्या ५% निधी महिला व बालकल्याण विभागासाठी राखून ठेवण्यात येतो. त्या अनुषंगाने समितीने जिल्हा परिषदेचे गत तीन वर्षातील (सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५) वर्षनिहाय अंदाजपत्रक किती रक्कमेचे आहे ? त्या अनुषंगाने मागील ३ वर्षात सदरहू ५% निधी कसा खर्च करण्यात आला किंवा कसे ? याबाबत माहिती घेतली असता, समितीला सन २०१२-१३ मध्ये ४३,२४,५०००/- सन २०१३-१४ मध्ये ५८,१९,४५००/- तसेच सन २०१४-१५ मध्ये ७६,१०,००००/- इतके अंदाजपत्रक सांगली जिल्हापरिषदेचे आहे. तसेच उक्त अंदाजपकापैकी महिला व बालकल्याणाकरीता सन २०१२-१३ मध्ये ६५,०८,५००/-, सन २०१३-१४ मध्ये ५९,९९,८००/- तसेच सन २०१४-१५ मध्ये ७९,०८,९००/- इतकी तरतूद करण्यात आली आहे. असे समितीस सांगितले.

शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग दिनांक १२ ऑगस्ट, १९९४ नुसार जिल्हा परिषद निधीतून महिला संबंधीत कार्यक्रमासाठी १०% रक्कम खर्च करण्यात येते. १०% रक्कम महिला व बाल कल्याण विभागासाठी राखून ठेवण्यात येते. गत तीन वर्षात (सन २०१२-१३, २०१३-१४, २०१४-१५) सदर निधी खर्च करणेत आला आहे.

शासनाच्या हस्तांतरीत योजनेतून जिल्हा परिषदेमार्फत सन २०१२-१३ ते २०१४-१५ अखेर निराधार, निराश्रित, विधवा महिलेच्या मुलीच्या विवाहासाठी विवाह भत्ता म्हणून प्रति महिलेस रु. २०००/- प्रमाणे लाभ देणेत येतो. सन २०१४-१५ पासून सदर योजना जिल्हा नियोजन समिती मार्फत राबविणेत येत आहे. तसेच तालुक्यातील अंगणवाडी प्रकल्पातील भरती करताना विधवा, परित्यक्ता यांना सेवेत प्राधान्य दिले जाते.

साक्षीच्या वेळी समितीने अंदाजपत्रकातील रकमेपैकी एकुण किती रक्कम जिल्हा परिषद क्षेत्रातील माहलिांच्या कल्याणकारी योजनांसाठी राखुन ठेवण्यात आली आहे. ? अशी विचारणा केली असता, त्यावर मुख्य लेखा अधिकारी यांनी सन २०१२-१३ मध्ये १० बाबीवरील उत्पन्न ४,३२,४५,०००/- होते. १० टक्के प्रमाणे ४३,२४,५००/- ऐवढी तरतुद करावयाची होती. सन २०११-१२ चा अनुषेश ५३,९४,०००/- होता. अनुशेष मिळुन ४३,७८.४२१/- एवढी तरतुद करणे अपेक्षित होते. त्यापेक्षा जास्ता तरतूद केलेली आहे. ६५,०८,५००/- एवढी तरतूद केली आहे.

त्यापैकी ५२,६४,८७७/- एवढा खर्च करण्यात आलेला आहे. हा खर्च १० टक्केयांपेक्षा जास्त झालेला आहे. वर्षअखेर अनुशेष नाही. असे समितीस सांगितले. समितीने सन २०१२-१३ मध्ये ६५,०८,५००/- एवढी तरतूद केली होती व ५२,६४,८७७/- एवढा खर्च केलेला आहे. तरतुदी पेक्षा कमी खर्च केला असताना अनुशेष नाही ,अशी विचारणा केली असता, त्यावर मुख्य लेखा अधिकारी यांनी काही योजनांसाठी १३ लक्ष रुपये टोकन अमाऊंट दिलेली आहे. त्यामध्ये १०० टक्के खर्च झालेला नाही हा खर्च करीत असताना १४०००/- चे सेव्हिंग झाले आहे. महिलासांठी समुपदेशन केंद्र चालविणे यावर ७२०००/-खर्च झालेला आहेत. पात्र प्रस्ताव कमी आल्यामुळे जो खर्च झालेला नाही तो पुढील वर्षी केलेला आहे. असे समितीस सांगितले.

समितीने सन २०१२-१३ मध्ये रु ६५,०८,५००/- इतकी तरतूद होती व रु ५२,६४,८७७/- इतका खर्च झाला आहे. हा खर्च कमी का झाला आहे. समितीने १० टक्क्याप्रमाणे निधी वापरला पाहिजे, तो वापरलेला नाही. प्रत्येक प्रभागाला किती सायकल वाटप झाले.? अशी विचारणा केली. अशी विचारणा केली असता त्यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सायकल खरेदी करण्यसाठी दरपत्रक उपलब्ध नव्हते. निविदा प्रक्रिया राबविली. मात्र प्रतिसाद मिळाला नाही, पुन्हा फेरनिविदा प्रक्रिया राबविली, त्यामध्ये लोएस्ट ३११५ रुपयांची होती. सायकल योजनेसाठी २० लाख ५२ हजार तरतूद होती. त्यामध्ये ६७० सायकल घेतल्या होत्या. १० सायकल एका प्रभागाला दिल्या. असे समितीस सांगितले.

समितीने शासन निर्णयप्रमाणे खरेदी केली आहे. शासन निर्णय तंतोतत पाळला आहे. समिती आपले कौतुक करते. हे कोणत्याही जिल्हा परिषदेमधुन दिसुन आले नाही . कोणत्याही जिल्हा परिषदेत तरतूद केली आणि ती खर्च केली हे दिसुन आले नाही. ७५ लाख रुपये तरतूद करायची आणि खर्च ३ लाख रुपये करायचा हे बऱ्याच ठिकाणी दिसून आले आहे. येथे तसे काहीही आढळून आलेले नाही. अशा प्रकारे समितीने समाधान व्यक्त केले.

समितीने अखर्चित निधी पुढील वर्षी खर्च केला आहे. महिलासांठी १० टक्के निधी आहे. परंतू सामितीचे म्हणणे आहे की, तो वर्षनिहाय खर्च झालेला नाही. परिणामी योजना राबविताना अडचणी आल्या आहेत. दरवर्षी १०-१५ लाख रुपयांचा अनुशेष आहे. आता एकुण अनुशेष किती आहे. अशी विचारणा केली असता, त्यावर विभागीय अधिकारी यांनी यावर्षी १४ लाख ३५ हजार रुपयाचा अनुशेष आहे.असे समितीस सांगितले.

**सबब, याप्रकरणी समिती सांगली जिल्हापरिषदेने महिलांसाठी १०% निधी प्रमाणे खर्च केलेला आहे. तो सदरहू खर्च गत ३ वर्षनिहाय केलेला नाही. परिणामी सांगली जिल्हापरिषदेला महिलांसाठी योजना राबविताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. असे समितीच्या निदर्शनास आले आहे, याबाबत समिती तीव्र नाराजी व्यक्त करीत असून उक्त प्रकरणी सांगली जिल्हा परिषेदेने महिलांसाठी १०% प्रमाणे खर्च करावयाचा निधी हा वर्षनिहाय खर्च करण्यात येवून महिलांच्या कल्याणकारी योजनांवर व महिलांच्या सबलीकरणांवर खर्च करणे आवश्यक असताना तो खर्च न करणे ही बाब गंभीर असून या प्रकरणी चौकशी करून संबंधीतावर जबाबदारी निश्चित करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला 2 महिन्यात सादर करण्यात यावी. अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

समितीने मुलींना सॅनिटरी नॅपकिन पुरविण्याची योजना जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येते का अशी विचारणा केली असता, त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ही योजना यापुर्वी कार्यान्वीत नव्हती, तथापि, ही योजना आता कार्यान्वीत करीत असून जिल्हा नियोजन समितीकडून त्यासाठी आर्थिक तरतूद करण्यात येणार आहे. असे समितीस सांगितले.

त्यावर समितीने अनेक जिल्हांमध्ये सी एस.आर.च्या माध्यमातून ही योजना सुरु करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेने याबाबत खुप विलंब केला आहे. मुलींच्या आरोग्याच्या दृष्टीने ही योजना अतिशय चांगली आहे. ही योजना जिल्हा परिषदेने तातडीने सुरु करावी, अशा समितीने सूचना केल्या.

**सबब, याप्रकरणी मुलींना सॅनिटरी नॅपकिन पुरविण्याची योजना सांगली जिल्हा परिषदेमार्फत कार्यान्वित केली नव्हती परंतू सदरहू ही योजना आता कार्यान्वित केली असली तरी जिल्हा नियोजन समितीकडून त्यासाठी आर्थिक तरतूद करण्यात आली असूनही उक्त योजना राबविण्यासाठी सांगली जिल्हापरिषदेने विलंब केलेला आहे. मुलींच्या आरोग्याच्या दृष्टीने ही योजना अतिशय चांगली असल्याने सांगली जिल्हापरिषदेने मुलींना सॅनिटरी नॅपकिन्स पुरविण्याची योजना ही लवकरात लवकर राबवावी. अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे. तसेच समितीने भेटीच्या वेळी दिलेल्या सूचनांचे सांगली जिल्हा परिषदेने पालन करुन त्याप्रमाणे तात्काळ अंमलबजावणी केली असल्यामुळे समिती समाधानही व्यक्त करते. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला २ महिन्यात पाठविण्यात यावा.**

## ५. डहाणू नगरपरिषद

### ५.१ डहाणू नगरपरिषदेतील रिक्त पदांचा अनुशेष भरण्याबाबत.

दिनांक २५ एप्रिल, २०१७ रोजी महिलांचे हक्क आणि कल्याण समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी डहाणू नगरपरिषद, यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती मागविण्यात आली होती.

डहाणू नगरपरिषदेतील शासकीय निमशासकीय व शासन अनुदानित संस्थामधील सेवेतील भरतीसाठी महिलांकरीता ३०% जागा आरक्षित ठेवण्याच्या धोरणाची अंमलबजावणी महानगरपालिकांच्या सेवेमध्ये भरती करतांना करण्यात येते काय ? नगरपरिषदेतील वर्ग १ ते ४ तांत्रिक व अतांत्रिक अधिकारी व कर्मचारी यांची मंजूर पद संख्या किती आहे ? त्यापैकी सन २०१४-१५ अखेर किती पदे भरण्यात आली आहेत ? उक्त मंजूर पदांपैकी वर्ग १ ते ४ मधील किती व कोणती पदे महिलांकरीता आरक्षित ठेवण्यात आली आहेत ? महिला उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या वर्ग १ ते ४ मधील पदांपैकी सन २०१४-१५ अखेर एकूण किती पदे रिक्त आहेत, तसेच सदरची पदे रिक्त राहण्याची कारणे आहेत काय ? महानगरपालिकेतील विविध पदांवर महिला उमेदवारांच्या नियुक्त्या करण्याबाबत महानगरपालिकेने सेवाप्रवेश नियमावली तयार केली आहे काय ? महिला उमेदवारांसाठी राखीव असलेली पदे भरण्यासाठी गत तीन वर्षात (सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५) किती वेळा व कोणकोणत्या तारखांना वर्तमानपत्रात कोणकोणती पदे भरण्यासाठी जाहिराती देण्यात आल्या होत्या. महिला उमेदवारांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या पदांसाठी स्वतंत्र नोंदवही (रोस्टर) ठेवण्यात आली आहे काय, असल्यास केव्हापासून ? तसेच ती अद्ययावत स्वरुपात आहे काय, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ? महिला अधिकारी/कर्मचारी यांची भरती व सेवाविषयक बाबी हाताळण्यासाठी नगरपरिषदेमध्ये विशेष कक्ष स्वतंत्ररित्या स्थापन करण्यात आला आहे काय ? असल्यास केंव्हापासून विशेष कक्ष स्थापन केला नसल्यास त्याची कारणे काय आहेत ? अशी समितीने विचारणा केली.

**उपरोक्त प्रकरणी डहाणू नगरपरिषदेकडून खालील प्रमाणे माहिती प्राप्त झाली आहे.**

डहाणू नगरपरिषद, डहाणू, जि.पालघर ची स्थापना ३१ मे, १९८५ रोजी झालेली आहे. त्याप्रमाणे डहाणू नगरपरिषदेच्या हद्दीतील ग्रामपंचायतीमधील कर्मचारी डहाणू नगरपरिषदेमध्ये वर्ग करण्यात आलेले आहेत. त्यानंतर मा.संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे आदेश क्र.नपप्रस २००५/१/१ टीएच/४/प्रलंबित पदनि/प्र.क्र.८०४/२००५/क २४ दिनांक ३० डिसेंबर, २००५ आणि आदेश क्र.नपप्रस/अग्निशमन पदनिर्मिती/२०११/का-६ दिनांक २५.१०.२०११ अन्वये डहाणू नगरपरिषदेसाठी मंजूर केलेल्या आकृती बंधानुसार खालीलप्रमाणे पदे मंजूर झालेली आहे.

| गट | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| गट क | २८ | १४ | १४ |
| गट ड | ५८ | ५४ | ०४ |
| **एकूण** | **८६** | **६८** | **१८** |

१.राज्यस्तरीय संवर्गीय पदे २७ आहेत. त्यापैकी उपमुख्याधिकारी, करनिरीक्षक, सहाय्यक अंतर्गत लेखापरिक्षक या तीन पदावर नगरपरिषद डहाणू कर्मचारी कार्यरत आहेत तसेच लेखापाल व अभियंता हे राज्यसंवर्गीय कर्मचारी कार्यरत आहेत.

**कार्यरत (भरलेली पदे) महिला अधिकारी/कर्मचारी**

| गट | मंजूर पदे | भरलेली पदे | महिला आरक्षण मंजूर पदांच्या ३०% | प्रत्यक्ष कार्यरत महिला | शिल्लक अनुशेष |
|---|---|---|---|---|---|
| गट क | २८ | १४ | ०८ | ०१ | ०७ |
| गट ड | ५८ | ५४ | १७ | १५ | ०२ |
| **एकूण** | **८६** | **६८** | **२५** | **१६** | **०९** |

गट क १. श्रीमती नलिनी भरत मच्छी, कर निरीक्षक, यांचे पद राज्यस्तरीय संवर्गीय मध्ये कार्यरत आहेत. २.दोन महिला कर्मचारी यापूर्वी सेवानिवृत्त झालेल्या आहेत.

शासन निर्णय, महिला व बालकल्याण विभाग क्र.संकिर्ण १०९६/प्र.क्र.३०/ का-२, दि.०१ऑगस्ट, १९९७, मा.आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई यांचेकडील मंजूर आकृतीबंध आदेश क्रमांक नपप्रसं २००५/१/१/टी एच/४/प्रलंबित पदनि/प्र.क्र.८०४/२००५/का- २४, दि. ३० डिसेंबर, २००५ अन्वये रिक्त पदे सरळसेवेने भरती करण्यात येते. डहाणू नगरपरिषद या कार्यालयाची मागासवर्गीय आरक्षणानुसार १०० बिंदूनामावली नोंदवहया दि.२७ जून २०१६ रोजी मा.सहाय्यक आयुक्त, मागासवर्गीय कक्ष, नवी मुंबई यांचेकडून तपासणी करुन घेण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे सामाजिक आरक्षणानुसार सरळसेवा भरतीने पदे भरण्यासाठी तरतूद या कार्यालयाने केलेली आहे.

**मंजूर पद संख्या व भरण्यात आलेल्या पदांची संख्या**

| **पदनाम** | **मंजूर पदे** | **भरण्यात आलेली पदे (सन २०१५-१६ पर्यत)** |
|---|---|---|
| गट अ | ०० | ०० |
| गट ब | ०० | ०० |
| गट क | ३५ | १४ |
| गट ड | ६१ | ५६ |
| **एकूण** | **९६** | **७०** |

टिप : पदोन्नतीची पदे विचारात घेण्यात आलेली आहे.

**महिलांकरीता आरक्षित ठेवण्यात आलेल्या पदांची संख्या**

| **गट** | **पदनाम** | **बिंदुनामावली करीता सादर केलेली माहिती** |
|---|---|---|
| गट अ | ० | ०० |
| गट ब | ० | ०० |
| गट क | लिपीक/स्वच्छता निरिक्षक पंप ऑपरेटर/विजतंत्री/ जोडारी | ०५<br>०१<br>०१ |
| | | ०७ |
| गट ड | शिपाई वॉलमन लाईन | ०१<br>०१ |
| | | ०२ |
| **एकूण** | | **०९** |

मा. आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई यांचेकडील मंजूर आकृतीबंध आदेश क्रमांक नपप्रसं २००५/१/१/टीएच/४/प्रलंबित पदनि/प्र.क्र.८०४/२००५/का-२४, दि.३० डिसेंबर, २००५ अन्वये मंजूर आकृतीबंधानुसार अंतर्गत भरती करुन शिल्लक रिक्त पदे राहिल्यास सरळसेवा भरतीने रिक्त पदे भरण्यात येतात. त्यामध्ये प्रामुख्याने मागासवर्गीयांच्या आरक्षणानुसार शिल्लक अनुशेष आणि समांतर आरक्षणानुसार प्राधान्याने उमेदवारांची भरती

करण्यात येते. त्यामध्ये भरती करताना ३०% महिला समांतर आरक्षणानुसार शिल्लक अनुशेष भरुन काढण्यात येईल.

मा.आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन मुंबई यांचेकडील मंजूर आकृतीबंध आदेश क्रमांक नपप्रंस २००५/१/१/टीएच/४/प्रलंबित पदनि/प्र.क्र.८०४/२००५ अन्वये आकृतीबंध मंजूर करण्यात आलेला आहे. सरळसेवेने पद भरती करण्यात आलेली नाही.

सन २०१३-१४, २०१४-१५, व २०१५-१६ या तीन वर्षात सरळसेवा भरती केलेली नाही. होय, मा.सहाय्यक आयुक्त, मागासवर्गीय कक्ष, कोकण विभागीय आयुक्तालय, कोकण भवन, नवी मुंबई यांना दिनांक २७/०६/२०१६ रोजी महिला समांतर आरक्षणाबाबत महिती दिलेली आहे.

मंजूर पदे, भरलेली पदे व रिक्त पदे याबाबतचा अहवाल वरीष्ट कार्यालये

**१)** मा. जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर (नगरपालिका शाखा)

**२)** मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई (नगरपालिका शाखा)

**३)** मा.संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, मुंबई यांना वेळोवेळी अहवाल सादर करणेत येतो.

महिला अधिकारी/कर्मचारी यांची सरळसेवा भरती बाबत किंवा सेवाविषयक कोणत्याही प्रकारची तक्रार प्रलंबित नाही. याबाबत काही तक्रारी प्राप्त झाल्यास वरिष्ठ कार्यालयास तक्रार प्रकरणे सादर करणेत येतात. त्याबाबत मार्गदर्शन तथा आदेश मागविणेत येतात. महिलांसाठी दिनांक ०५/०२/२००९ अन्वये स्वतंत्र विशेष कक्ष स्थापन केलेला आहे.

**डहाणू नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी यांची साक्ष : —**

मंगळवार, दिनांक २५ एप्रिल, २०१७ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी मुख्याधिकारी यांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने गट "क" व "ड" मध्ये एकंदर १८ पदे रिक्त असून महिलांची एकंदर ९ पदांचा अनुशेष आहे. त्यामुळे महिलांचा अनुशेष भरण्यासाठी कोणते प्रयत्न केले आहेत ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्याधिकारी यांनी सुधारित आकृतीबंध मंजूर झाला असून दि.२७ जून २०१६ रोजी बिंदू नामावली तपासली गेली आहे. गट "क" मध्ये ७ चा अनुशेष दिसून येतो आहे परंतु दोन महिला कर्मचारी सेवानिवृत्त झाल्या असून त्या अगोदर हा अनुशेष ५ चा होता. अंतर्गत भरतीच्या संदर्भातील प्रस्ताव माननीय जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवलेला आहे. रोस्टरचे पूर्णपणे पालन केले जाते. त्यावर समितीने कम्पलायन्स करुन महिलांची भरती प्रक्रिया त्वरित सुरु करण्यात यावी. अशी सूचना केल्या. समितीने डहाणू नगरपालिकेत विशाखा समिती आहे काय ? अशी विचारणा केली.

त्यावर कर निरीक्षक यांनी डहाणू नगरपालिकेत विशाखा समिती असून या समितीमध्ये कार्यालयीन दोन कर्मचारी असून उर्वरित नगरसेविका आहेत. असे समितीस सांगितले.

समितीने विशाखा समितीमध्ये लोकप्रतिनिधी नसतात. कर्मचाऱ्यांवर होणाऱ्या अत्याचाराच्या संदर्भात ही समिती असते. विशाखा समितीमध्ये महिला कर्मचारी, एनजीओ, हॉस्पिटलमधील डॉक्टर, शिक्षिका, वकील इत्यादींचा विशाखा समितीमध्ये समावेश असतो. मुध्याधिकाऱ्यांच्या कार्यालयाच्या बाजूला विशाखा समितीचा बोर्ड लावला गेला पाहिजे, समितीमध्ये मेंबर्सची नावे, पद व मोबाईल नंबर द्यावा. अशा प्रकारच्या सूचना डहाणू नगरपरिषदेला केल्या.

समितीने विशाखा समितीमध्ये आतापर्यंत किती तक्रारी आलेल्या आहेत ? अशी विचारणा केली.

त्यावर कर निरीक्षक यांनी विशाखा समितीमध्ये आतापर्यंत एकही तक्रार आलेली नाही.

त्यावर समितीने विशाखा समिती पुनर्गठित करण्यात यावी. असे निर्देश दिले.

**विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी मुख्याधिकारी, डहाणू नगरपरिषद यांनी खालील प्रमाणे लेखी माहिती दिली :**

१) सुधारीत आकृतीबंध मंजूर झाला असून दिनांक २७ जून,२००६ रोजी बिंदुनामावली तपासली गेली आहे.

२) गट "क" मधील ७ चा अनुशेष दिसून येत आहे, परंतू २ महिला कर्मचारी आताच सेवानिवृत्त झाल्या असून त्या अगोदर हा अनुशेष ५ चा होता.

३) अंतर्गत भरतीच्या संदर्भातील प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर केला आहे. रोस्टरचे पुर्णपणे पालन केले जाते.

डहाणू नगरपरिषदेमध्ये सरळ सेवा भरती बाबतची प्रक्रिया सुरु असून याबाबत महिलांच्या आरक्षणानुसार भरती करण्याबाबतची तजविज नगरपरिषदेने ठेवलेली आहे.

डहाणू नगरपालिकेत विशाखा समिती असून या समितीमध्ये कार्यालयीन ३ कर्मचारी व उर्वरीत १ वकील १ समाजसेविका १ वैद्यकिय अधिकारी आहेत. याप्रकारे विशाखा समिती पुनर्गठीत करण्यात आली आहे.

विशाखा समिती संदर्भात परिपत्रक उपलब्ध केले असून, मा.समिती प्रमुख व उप सचिव यांचे निर्देशाप्रमाणे विशाखा समिती पुर्नगठित करण्यात येत असून त्याप्रमाणे समितीचा बोर्ड तयार करण्यासाठी व सदरील बोर्ड मुख्याधिकारी यांच्या कार्यालयाच्या बाजुला लावण्याची तजविज करण्यात आली आहे.

मा. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे आदेश क्र.नपप्रस २००५/१/१ टिएच/ प्रलंबित पदनि/प्र.क्र.८०४/२००५ आणि आदेश क्र.नपप्रस/अग्निशमन पदनिर्मित/२०११/का-६ दि.२५.१०.२०११ अन्वये डहाणू नगर परिषदेसाठी मंजूर पद संख्या

| **गट** | **मंजूर पदे** | **भरलेली पदे** |
|---|---|---|
| गट-क | २८ | १२ |
| गट-ड | १४ | १० |
| **एकूण** | **४२** | **२२** |

वरिल गट क मधील मंजूर पदांपैकी ७ पदे ही एकाकी पदे असल्याने त्यावर काढता येत नाही. त्याचप्रमाणे फायरम या पदावर देखील समांतर काढण्यात आलेले नाही. उर्वरीत पदांवर दि. २४/०४/२०१८ अखेर महिलांचे समांतर शिल्लक आरक्षण अनुशेष खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | दि.२५.०४.२०१८ अखेरची मंजूर,भरलेली व रिक्त पदांची माहिती | | | | | महिलांचे समांतर आरक्षणबाबत | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पदनाम | गट | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | महिला आरक्षण ३०% | प्रत्यक्ष महिलांची भरती | शिल्लक अनुशेष | शेरा |
| १ | लिपीक टंकलेखक | क | १७ | १२ | ५ | ५ | १ | ४ | पदे रिक्त आहेत. अनु-कंपावर १ पद भरले आहे. |
| २ | स्वच्छता निरिक्षक | क | २ | ० | २ | १ | ० | १ | पदे रिक्त आहेत. |
| ३ | पंप ऑपरेटर | क | २ | ० | २ | १ | ० | १ | पदे रिक्त आहेत. |
| ४ | तारतंत्री, उद्यान पर्यवेशक, सहा, ग्रंथपाल, लघुलेखक गाळणीचाल | क | ७ | ० | ७ | ० | ० | १ | एकाकी पद अस-ल्याने समांरत आरक्षण लागू होत नाही. |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | क,जोडारी. (प्रत्येकी एक पद) | | | | | | | | |
| ५ | फायरमन | ड | ४ | ० | ४ | ० | ० | ० | लागू नाही. |
| ६ | शिपाई | ड | ८ | ८ | ० | २ | १ | १ | पदे रिक्त नाही. |
| ७ | व्हॉलमन/लाईनमन | ड | २ | २ | ० | १ | ० | १ | पदे रिक्त नाही. |
| | **एकूण** | | **४२** | **२२** | **२०** | **१०** | **२** | **८** | |

भरती प्रक्रीया करतांना वरील प्रमाणे महिलांच्या समांतर आरक्षानूसार भरती करण्याबाबतची तजविज नगरपरिषदेने ठेवलेली आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष :—**

डहाणू नगरपरिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने गुरुवार, दिनांक ३ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने डहाणू नगरपरिषदेला भेट दिली त्यावेळी विशाखा समितीचा बोर्ड नव्हता, विशाखा समितीचे काम कसे सुरु आहे काय त्याबाबत माहिती देण्यात यावी. अशी विचारणा केली.

त्यावर कर निरीक्षक तथा (विशाखा समिती अध्यक्ष) यांनी कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. दरमहा आमच्या समितीची बैठक होते. विशाखा समितीचा बोर्ड दर्शनी भागात लावण्यात आलेला आहे.

समितीने विशाखा समितीचे एकूण सदस्य किती आहेत ? अशी विचारणा केली.

त्यावर कर निरीक्षक तथा (विशाखा समिती अध्यक्ष) यांनी विशाखा समिती स्थापन करण्यात आली असून त्यांचे सहा सदस्य आहेत. यामध्ये एक डॉक्टर, एक ॲडव्होकेट व एक समाजसेविका आहेत, तसेच नगरपरिषदेचे तीन कर्मचारी आहेत. अद्यापपर्यंत एकही तक्रार प्राप्त झालेली नाही. असे समितीस सांगितले.

समितीने एनजीओचे सदस्य आहेत काय ? कोणीही तक्रार दाखल केलेली नाही इतके छान काम समितीचे सुरु आहे. अशी विचारणा केली.

त्यावर कर निरीक्षक तथा (विशाखा समिती अध्यक्ष) यांनी एनजीओ सदस्य आहेत. दर्शनी भागात बोर्ड लावण्यात आलेला आहे.

समितीने डहाणू नगरपरिषदेमध्ये रिक्त पदे भरपूर आहेत, ती केव्हापर्यंत भरण्यात येतील. अशी विचारणा केली. त्यावर मुख्याधिकारी यांनी महिलांची १० पदे रिक्त होती त्यापैकी

एक पद भरण्यात आले आहे. इतर पदांच्या भरतीसंदर्भातील प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. असे समितीस सांगितले. समितीने शासन स्तरावरावरुन रिक्त पदे भरणे प्रलंबित आहे याबाबत काय कार्यवाही करण्यात येत आहे. सर्व कार्यवाही किती दिवसात पूर्ण होईल. अशी विचारणा केली. त्यावर प्रधान सचिव यांनी राज्यातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही डीएमएकडून त्यांच्यास्तरावर सुरु आहे. मार्च महिन्यापर्यंत ती कार्यवाही अंतिम टप्प्यात येईल. महिलांची रिक्त पदे पुढील भरती प्रक्रियेत घेण्यात येतील. त्यांनी जाहिरात प्रसिध्द केलेली असल्यामुळे मार्चपर्यंत ही कार्यवाही पूर्ण होईल. असे समितीस सांगितले.

**अभिप्राय व शिफारशी : —**

समितीने डहाणू नगरपरिषदेला मंगळवार, दिनांक २५ एप्रिल, २०१७ रोजी भेटीच्या अनुषंगाने आणि दिनांक ३ जानेवारी, २०१९ रोजी घेतलेल्या सचिवांच्या साक्षीच्या वेळी डहाणू नगरपरिषदेतील शासकीय निमशासकीय व शासन अनुदानित संस्थामधील सेवेतील भरतीसाठी महिलांकरीता ३०% जागा आरक्षित ठेवण्याच्या धोरणाची अंमलबजावणी महानगरपालिकांच्या सेवेमध्ये भरती करतांना करण्यात येते काय ? नगरपरिषदेतील वर्ग १ ते ४ तांत्रिक व अतांत्रिक अधिकारी व कर्मचारी यांची मंजूर पद संख्या किती आहे ? त्यापैकी सन २०१४-१५ अखेर किती पदे भरण्यात आली आहेत ? उक्त मंजूर पदांपैकी वर्ग १ ते ४ मधील किती व कोणती पदे महिलांकरीता आरक्षित ठेवण्यात आली आहेत ? महिला उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या वर्ग १ ते ४ मधील पदांपैकी सन २०१४-१५ अखेर एकूण किती पदे रिक्त आहेत, अशी विचारणा केली असता, डहाणू नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांनी अशी माहिती दिली की, डहाणू नगरपरिषद, पालघर ची स्थापना झाल्यापासून नगरपरिषदेसाठी एकूण पदापैकी मंजूर पदे ८६, भरलेली पदे ६८, तसेच रिक्त पदे १८ असून राज्य स्तरीय संवर्गीय पदे २७ आहेत. त्यापैकी उप मुख्याधिकारी, करनिरीक्षक, सहायक, अंतर्गत लेखापरिक्षक या तीन पदांवर नगरपरिषद डहाणू कर्मचारी कार्यरत आहेत. तसेच लेखापाल व अभियंता हे राज्यसंवर्गीय कर्मचारी कार्यरत आहेत.

शासन निर्णय, महिला व बालकल्याण विभाग क्र.संकिर्ण १०९६/प्र.क्र.३०/ का-२, दि.०१ऑगस्ट, १९९७, मा.आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई यांचेकडील मंजूर आकृतीबंध आदेश क्रमांक नपप्रसं २००५/१/१/टी एच/४/प्रलंबित पदनि/प्र.क्र.८०४/ २००५/का- २४, दि. ३० डिसेंबर, २००५ अन्वये रिक्त पदे सरळसेवेने भरती करण्यात येते. डहाणू नगरपरिषद या कार्यालयाची मागासवर्गीय आरक्षणानुसार १०० बिंदूनामावली नोंदवहया दि.२७ जून २०१६ रोजी मा.सहाय्यक आयुक्त, मागासवर्गीय कक्ष, नवी मुंबई यांचेकडून तपासणी करुन घेण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे सामाजिक आरक्षणानुसार सरळसेवा भरतीने पदे भरण्यासाठी तरतूद या कार्यालयाने केलेली आहे.

डहाणू नगरपरिषदेमध्ये सन २०१५-१६ पर्यंत भरण्यात आलेल्या पदांपैकी मंजूर पद संख्या ९६ आहे. तसेच भरण्यात आलेली पदे ही ७० आहेत. महिलांकरीता आरक्षित ठेवण्यात आलेल्या पदांची संख्या ही बिंदूनामावलीनुसार ०९ आहेत.

साक्षीच्या वेळी समितीने गट “क” व “ड” मध्ये एकंदर १८ पदे रिक्त असून महिलांची एकंदर ९ पदांचा अनुशेष आहे. त्यामुळे महिलांचा अनुशेष भरण्यासाठी कोणते प्रयत्न केले आहेत ? अशी विचारणा केली असता, मुख्याधिकारी यांनी सुधारित आकृतीबंध मंजूर झाला असून दि.२७ जून २०१६ रोजी बिंदू नामावली तपासली गेली आहे. गट “क” मध्ये ७ चा अनुशेष दिसून येतो आहे परंतु दोन महिला कर्मचारी सेवानिवृत्त झाल्या असून त्या अगोदर हा अनुशेष ५ चा होता. अंतर्गत भरतीच्या संदर्भातील प्रस्ताव माननीय जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवलेला आहे. रोस्टरचे पूर्णपणे पालन केले जाते.

समितीने डहाणू नगरपरिषदेमध्ये रिक्त पदे केव्हापर्यंत भरण्यात येतील तसेच शासन स्तरावरावरुन रिक्त पदे भरणे प्रलंबित आहे याबाबत काय कार्यवाही करण्यात येत आहे. सर्व कार्यवाही किती दिवसात पूर्ण होईल. अशी विचारणा केली असता, त्यावर मुख्याधिकारी यांनी महिलांची १० पदे रिक्त होती त्यापैकी एक पद भरण्यात आले आहे. इतर पदांच्या भरतीसंदर्भातील प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. प्रधान सचिव यांनी राज्यातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही डीएमएकडून त्यांच्यास्तरावर सुरु आहे. मार्च महिन्यापर्यंत ती कार्यवाही अंतिम टप्प्यात येईल. महिलांची रिक्त पदे पुढील भरती प्रक्रियेत घेण्यात येतील. त्यांनी जाहिरात प्रसिद्ध केलेली असल्यामुळे मार्चपर्यंत ही कार्यवाही पूर्ण होईल. असे समितीस सांगितले.

**सबब, डहाणू नगरपरिषदेमध्ये रिक्त जागांची परिस्थिती पहाता, मोठया प्रमाणावर अनेक रिक्त पदे असल्याने तिचा प्रशासकीय क्षमतेवर तसेच अस्तित्वात असलेल्या कर्मचारी अधिकाऱ्यांवर ताण पडतो ही वास्तविकता आहे. ही बाब विचारात घेता मंजूर पदे तातडीने भरण्याची कार्यवाही नगरपरिषदेने प्रस्तावाव्दारे विभागाकडे पाठविली असल्याने विभागाने या प्रस्तावावर तातडीने निर्णय घेवून डहाणू नगरपरिषदेतील भरती प्रक्रिया तात्काळ राबवून महिलांची रिक्त पदे तातडीने भरण्यासंदर्भात कार्यवाही करावी अशी समितीची आग्रहाची शिफारस असून शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला २ महिन्यात पाठविण्यात यावी.**

### ५.२ डहाणू नगरपालिकेचे गत ३ वर्षातील वर्षनिहाय अंदाजपत्रक

समितीने गत तीन वर्षातील वर्षनिहाय सन २०१२-२०१३, २०१३-२०१४ व २०१४-२०१५ मधील वार्षिक अंदाजपत्रक किती रक्कमेचे आहे ? शासन धोरणानुसार प्रत्येक नगरपरिषदेत महसूली व आस्थापना खर्च वगळून एकूण अंदाजपत्रकाच्या ५० टक्के निधी महिला व बालकल्याण विभागासाठी राखून ठेवण्यात येतो. त्या अनुषंगाने नगरपरिषदेतील मागील ३ वर्षात सदरहू ५ टक्के निधी कसा खर्च करण्यात आला आहे ? महिला अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी नगरपरिषदेकडून कोणकोणत्या कल्याणकारी योजना/उपक्रम राबविले जातात ? नगरपरिषदेमार्फत महिलांचे सबलीकरण करण्याकरिता तसेच आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या महिलांना सक्षम करण्यासाठी तसेच आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या महिलांना सक्षम करण्याकरिता देण्यात येणाऱ्या सोई-सवलती इ.योजनांबात माहिती देण्यात यावी ? उक्त योजनांवर २०१२-२०१३, २०१३-२०१४ व २०१४-२०१५ या तीन वर्षात व वर्षनिहाय व योजनानिहाय एकूण किती खर्च झाला ? नगरपरिषदेच्या एकूण उत्पन्नाच्या किती टक्के रक्कम महिलांसाठी कल्याणकारी योजना राबविण्याबाबत खर्च करण्यात येते ? नगरपरिषदेमार्फत राबविणेत येणाऱ्या महिलांच्या कल्याणकारी योजना व सोई-सवलती इ.बाबतची माहिती गरजू महिलांमार्फत पोहचविण्याचे व त्यांनी या योजनांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा यासाठी त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी स्वतंत्र अशी यंत्रणा नगरपरिषदेकडे आहे काय, असल्यास तिचे स्वरूप काय आहे व या यंत्रणेने आतापर्यंत कशा प्रकारे कार्य केले आहे ? महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तू विक्रीचे कोणते धोरण आहे, उक्त धोरणानुसार सदर वस्तू विकल्या जातात काय ? नगरपरिषदेमध्ये महिला नगरसेविकांसाठी व महिला कर्मचाऱ्यांसाठी वेगळा कक्ष आहे काय ? नगरपरिषदेत महिला व बाल कल्याण अधिकारी हे पद आहे काय ? अशी विचारणा करण्यात आली.

**उपरोक्त प्रकरणी मुख्याधिकारी, डहाणू नगरपरिषदेकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली :—**

नगरपरिषदेचे गत ३ वर्षातील वर्षनिहाय वार्षिक अंदाजपत्रक खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | अंदाजपत्रक |
|---|---|
| सन २०१२-१३ | २,८४,११,२१७/- |
| सन २०१४-१५ | ३,६१,५८,३७५/- |
| सन २०१५-१६ | ५,१०,३८,१५३/- |

महिला व बालकल्याण विभागासाठी ५% राखीव निधी

| **वर्ष** | **राखीव निधी** |
| --- | --- |
| सन २०१२-१३ | १४,२१,०००/- |
| सन २०१४-१५ | १८,०८,०००/- |
| सन २०१५-१६ | २५,५२,०००/- |

महिला व बालकल्याण विभागासाठी झालेला खर्च

| **वर्ष** | **झालेला खर्च** |
| --- | --- |
| सन २०१२-१३ | ९३,०००/- |
| सन २०१४-१५ | १०,९१,१४३/- |
| सन २०१५-१६ | २,१०,३५०/- |

सन २०१३-१४ मध्ये महिलांसाठी प्रशिक्षण दिले.

**१)** बेसिक सुईंग ऑपरेटर

**२)** कॉम्प्युटर फंडमेंटल-इंटरनेट

सन २०१४-१५ मध्ये महिलांसाठी प्रशिक्षण दिले.

**१)** पार्लर — १३८

**२)** टेलरींग — १५३

**३)** फुड प्रोसेंसिग -१२०

**४)**फॅशन डिझायनर — १६

**५)**महिला मेळावा

याप्रमाणे महिलांना प्रशिक्षण देण्यात आले.

महिलांना सबलीकरण करण्याकरीता व्यावसायाभिमुख प्रशिक्षण दिलेले आहे. फुड प्रोसेंसिग, टेलरींग, पार्लर, फॅशन डिझायनर चे प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.

**१)** पार्लर — १३८

**२)** टेलरींग — १५३

**३)** फुड प्रोसेंसिग -१२०

**४)**फॅशन डिझायनर — १६

याप्रमाणे महिलांना प्रशिक्षण देण्यात आले.

प्रशिक्षणाकरीता खालीलप्रमाणे खर्च झालेला आहे.

| **वर्ष** | **योजनेचे नांव** | **योजनानिहाय खर्च** |
|---|---|---|
| सन २०१२-१३ | प्रशिक्षण | ९३,०००/- |
| सन २०१४-१५ | प्रशिक्षण व महिला मेळावा | १०,९१,१४३/- |
| सन २०१५-१६ | महिला मेळावा | २,१०,३५०/- |

नगरपालिकेच्या एकूण उत्पनाच्या ५% रक्कम महिलांसाठी कल्याणकारी योजना राबविण्यासाठी खर्च करण्यात येतो.

**अ)** व्यवसायाभिमुख प्रशिक्षण दिले जाते.

**आ)** मल्याण येथे महात्मा गांधी मार्केट आहे. एकच मार्केट आहे.त्यामध्ये एकूण ७५ गाळे आहेत. भाजी मार्केट आहे.

मार्केटमधील गाळे खुल्या पद्धतीने लिलाव करणेत आलेले आहेत. त्यामध्ये श्रीमती ज्योती राजू उमर यांना देणेत आलेला आहे. अपंगाकरीता ३% गाळे राखीव ठेवले आहेत. त्याप्रमाणे अपंगास १ गाळा दिलेला आहे. यापुढे लिलाव करताना महिलांना देखील काही गाळे राखीव ठेवणेत येतील.

महिलांकरीता स्टॉल ठेवले होते. परंतू त्यास प्रतिसाद मिळालेला नाही . बचतगटांना स्टॉल दिले होते, परंतू त्यांनी स्टॉल चालू केले नाहीत.

महिलांच्या कल्याणकारी योजनांबाबत नगरपरिषदेतील महिला व बालकल्याण विभागामार्फत असलेल्या महिला कर्मचारी यांचेमार्फत माहिती दिली जाते. तसेच नगरपरिषद कार्यालयात माहिती दिली जाते.

महिलांना व्यवसायाभिमुख प्रशिक्षण देणेसाठी नगरपरिषदेचे कर्मचारी स्वत: घरोघरी फिरुन माहिती देवून प्रशिक्षणाचे फॉर्म भरुन घेत असतात.

महिलांसाठी नगरपरिषदेच्या अंदाजपत्रकात खालीलप्रमाणे तरतुद केली आहे.

| **वर्ष** | **झालेला खर्च** |
|---|---|
| सन २०१२-१३ | ९३,०००/- |
| सन २०१४-१५ | १०,९१,१४३/- |
| सन २०१५-१६ | २,१०,३५०/- |

महिला बचत गटांना अर्थसहाय्य देणेत येते. मागील ३ वर्षात दिलेले अर्थसहाय्य खालीलप्रमाणे आहे.

| **वर्ष** | **अनुदान** | **व्यवसाय** |
|---|---|---|
| सन २०१२-१३ | २,१०,०००/- | साडी विक्री, बुरुड काम, मंडप डेकोरेशन |
| सन २०१४-१५ | ७०,०००/- | किराणा दुकान |
| सन २०१५-१६ | ० | -- |

महिला बचत गट स्वत:च्या व्यवसाय करीत असतात. राष्ट्रीयकृत बँकेमार्फत गटाचे व्यवसायास कर्ज देतात.

नगरपालिकेत महिला व बालकल्याण अधिकारी हे पद नाही. नगरपरिषदेने महिला व बालकल्याण विभागातील कामकाज पाहणेसाठी निरीक्षक कर्मचारी ठेवले आहेत. त्यांची कार्यकक्षा महिला व बालकल्याण विषयक योजना राबविणे.

महिलांच्या आरोग्याबाबत नगरपालिकेमार्फत पुढीलप्रमाणे कल्याणकारी योजना राबविण्यात येतात :—

**१)** २९ फेब्रुवारी, २०१६ महिलांचे मधुमेह (डायबेटीज), रक्तदाब (ब्लड प्रेशर) तपासणी करण्यात आली.

**२)** २ मार्च, २०१६ रोजी स्त्रीरोग तज्ञकडून कर्करोग तपासणी करण्यात आली.

**३)** ५ मार्च, २०१६ रोजी नेत्र तपासणी करण्यात आली.

**४)** ८ मार्च, २०१६ रोजी रक्तक्षय (शरीरात रक्ताची कमी) तसेच Bone Density तपासणी करण्यात आली.

**डहाणू नगरपरिषद मुख्याधिकारी यांची साक्ष : —**

गुरुवार, दिनांक २५ एप्रिल, २०१५ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी आयुक्त यांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने डहाणू नगर परिषदेची स्थापना दिनांक ३१ मे, १९१५ रोजी झाली आहे. असे असले तरी अजूनही नगरपरिषदेला इमारत नाही. इमारत बांधण्यासाठीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे काय ? त्यावर शासनाने विचार केला आहे किंवा नाही यासंबंधातील माहिती सांगावी. अशी विचारणा केली.

त्यावर मुख्याधिकारी यांनी डहाणू नगर परिषदेची स्थापना ३१ मे १९२५ रोजी झालेली आहे. ७ ग्रामपंचायती मिळून नगरपरिषदेची स्थापना झालेली आहे. त्यावेळी ७ ग्रामपंचायती कार्यालयापैकी एका कार्यालयाचे नगर परिषदेच्या कार्यालयामध्ये रूपांतरीत करण्यात आले

आहे. सुरुवातीला डेव्हलपमेंट प्लॅन झाल्याशिवाय, त्यात आरक्षित जागा असल्याशिवाय जागा मिळणे अवघड होते. दरम्यान १९९१ मध्ये डहाणू ऑथोरिटी स्थापन झाली. त्यामुळे काही बंधने आली. सन २०१२ मध्ये नगर परिषदेचा डी.पी.पार्ट प्लॅनमध्ये मंजूर झालेला आहे. संपूर्ण शहरासाठी अजूनही डी.पी.मंजूर व्हायचा आहे. अंतिम डी.पी.झाल्यानंतर नगर परिषदेला जागा उपलब्ध होईल. सध्या शासकीय जागा फार कमी आहे.

समितीने नगरपरिषद ही १९८५ रोजी अस्तित्त्वात आली आहे. ३२ वर्ष झाली तरी देखील नगरपरिषदेची स्वत:ची इमारत नाही. सदर बाब शासनाने विचारात घेतली नाही काय ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्याधिकारी यांनी यासाठी जागा उपलब्ध करून घ्यायची आहे. इमारत बांधण्यासाठी निधी उपलब्ध होईल. परंतु जागा पाहिजे ती उपलब्ध होत नाही. असे समितीस सांगितले.

समितीने शासनाकडे जागेची मागणी केली आहे काय ?अशी विचारणा केली.

त्यावर मुख्याधिकारी यांनी आरक्षण फायनल झाल्याशिवाय जागा मिळणे शक्य नाही. असे समितीस सांगितले. नगर परिषदेचा प्रॉब्लेम जरा वेगळा आहे. येथे रिलायन्चा प्लांट आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार १९९१ पासून जस्टीस धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती घटित करण्यात आली आहे. या समिती समोर जाऊन आम्ही २५.कि.मी.चा बफर झोन उठविला. आता फक्त ५ कि.मी.एवढे क्षेत्र नो मोर इंडस्ट्री म्हणून ठेवले आहे. आज या नगर परिषदेच्या कार्यालयासाठी जागा उपलबध नाही. ज्यावेळी डी.पी.फायनल होईल तेव्हाच या नगर परिषदेला जागा उपलब्ध होईल. पाणी पुरवठा योजनेतील रूपये ३.८५ कोटी इतका निधी विभागीय सचिव देण्यास तयार होत्या. असे मत मांडले होते.

त्यावर मुख्याधिकारी यांनी १९९१ पासूनचा डी.पी. आहे. सन २०१२ मध्ये पार्टली डी.पी.मंजूर झालेला आहे.अद्याप पर्यंत पूर्ण डी.पी.शासनस्तरावर मंजूर झालेला नाही. असे समितीस सांगितले.

समितीने कार्यालयाची इमारत व्हावी यासाठी कोणते प्रयत्न केले आहेत ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्याधिकारी यांनी आरक्षण निश्चित झाल्याशिवाय जागा मिळणार नाही.

समितीने विकास आराखडा हा किती कालावधीत मंजूर होणे आवश्यक आहे ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्याधिकारी यांनी दोन वर्षाची मुदत असते. पण येथे एक क्रीटीकल प्रॉब्लेम आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार धर्माधिकारी समिती घटित करण्यात आली आहे. ही पर्यावरण समिती आहे. त्यामुळे शासनाला देखील या समितीचे मत घ्यावे लागते. सध्या २०१६

मधील नोटिफिकेशन शासनाकडे पाठविले आहे. त्यांची शिफारस आल्यानंतर हा डी.पी.फायनल होणार आहे. दरम्यानच्या काळामध्ये नगर परिषदेने स्वत:चा हब शिफ्ट केला होता. पण ते शेवटचे टोक पडते त्यामुळे लोकांचा त्यास विरोध झाला. मधल्या काळात तेथे पूर आल्यामुळे सर्व रेकॉर्ड अस्ताव्यस्त झाला. तो रेकॉर्ड खराब झाला. त्यामुळे ते ऑफिस शिफ्ट करावे लागले. जागा, हॉल उपलब्ध आहे. पण तेथे पुराचे पाणी शिरते. ती जागा लोकांच्या दृष्टीने सोयीची नव्हती. त्यामुळे आम्हाला मूळ ठिकाणी शिफ्ट व्हावे लागले. आता महिन्याला रूपये ८००००/- इतके भाडे देतो. सध्याचे कार्यालय हे भाड्याच्याच इमारतीत आहे.

समितीने डहाणू नगरपरिषदेचा कार्यालयाचा विषय १९८५ पासून प्रलंबित आहे. १९९१ चे जे नोटिफिकेशन आहे ते रद्द केले पाहिजे. गेल्या ३१ वर्षांपासून ही समिती आहे. त्या समितीवर शासनाने किती खर्च केला हे सांगितले पाहिजे. या समितीने डहाणूच्या विकासासाठी कोणत्या उपाययोजना सुचविल्या आहेत. ही समिती ३७ जणांची आहे. त्यांचा विमानाचा, राहण्याचा खर्च राज्य सरकार करते. तेवढा विकासाचा निधी डहाणू नगर परिषदेला दिला असता तर डहाणूचा विकास झाला असता. अशा सूचना केल्या.

समितीने डहाणू ऑथोरिटीला समितीसमोर बोलावू शकतो ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय सचिवांनी यासंदर्भात जे कोणी जबाबदार असतील त्यांना नोटीस काढू असे समितीस सांगितले.

सध्या पोलीस डिपार्टमेंटचाच प्रॉब्लेम सुरू आहे. पोलिसांची एक जागा रस्त्यामध्ये गेली आहे. दुसरी जागा सीआरझेडमध्ये गेल्याने तेथे टुरिश्रमची व्यवस्था करण्यात आली आहे.

समितीने स्मशानाच्या बाजूला जागा आहे त्याचे काय झाले ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्याधिकारी यांनी त्या जागेचे आरक्षण अजून निश्चित झालेले नाही. तेथे पाण्याची टाकी बांधली आहे. ही प्रायव्हेट जागा आह. त्यामुळे आरक्षण देता येणार नाही. येथे दुसरी अडचण सीआरझेडची देखील आहे.

समितीने मग हॉटेलना परवानगी कशी मिळते ? जिल्हाधिकाऱ्यांची देखील जागा आहे. सागरी मार्गाच्या बाजूला देखील जागा आहे. तामोरे यांची जागी जिल्हाधिकारी यांची आहे. ती व्हेकेट करून घ्यावी व तेथे नगर परिषदेचे कार्यालय बांधावे. तामोरेने किती अतिक्रमण केले आहे. ती जागा इंडस्ट्रीसाठी होती. तेथे इंडस्ट्री होती. ती नंतर बंद केली. त्यानंतर तेथे निवासी बांधकाम कसे काय होऊ शकते ? अगोदर त्या ठिकाणी लक्ष्मी नावाची एक छोटीसी इंडस्ट्रीज होती. नगरपालिकेच्या कार्यालयासाठी आपण जागा उपलब्ध केली तर समिती नगरपालिकेच्या कार्यालयासाठी आपल्याला मदत करु शकेल. गावठाणातील घरे एका बाजूला बांधून दिली तरी सुद्धा आपल्याला नगरपालिकेच्या कार्यालयासाठी जागा तयार होऊ शकते. अशी विचारणा केली.

त्यावर मुख्याधिकारी यांनी स्मशानभूमीची एकंदर जागा ४० गुंठयाची असून या ठिकाणच्या जागेची मोजणी देखील झालेली आहे. पूर्वीची पाण्याची जी टाकी होती त्या ठिकाणी आपली ६ गुंठे जागा आहे. परंतु या ठिकाणी लायब्ररीचे रिझर्व्हेशन आहे. लोकांना सोईची होणारी जागा कार्यालयासाठी बघावी लागणार आहे. काही जागा आहे परंतु त्या जनतेच्या दृष्टीने सोईस्कर नाहीत. कार्यालयासाठी स्माशानभूमीच्या बाजूला जागा निघू शकते. या ठिकाणी रिझर्व्हेशन केलेले आहे परंतु ते अद्याप फायनल झालेले नाही. १५४ डायरेक्टीव्ह नुसार ॲकोमोडेशनसाठी रिझर्व्हेशन करता येते. मुळ आरक्षण फायनल झाले पाहिजे हा महत्त्वाचा मुद्दा आहे. असे समितीस सांगितले.

समितीने डिपीसाठी वेळ लागणार आहे. गावठाणाच्या जागेचा नगरपालिकेच्या वतीने सर्व्हे करुन घ्या. एका बाजूला २५-३० झोपडया असतील तर प्लॅन करुन एका बाजूला करा. शासनाच्या नियमाप्रमाणे झोपडी धारकांना ३६९ चौरस फूट जागा दिली तरच जागा व्हॅकंट होईल व अशा व्हॅकंट जागेमध्ये आपण नगरपालिकेचे कार्यालय बांधू शकता. ढाचे येथे जी शाळा आहे त्या शाळेच्या बाजूच्या लोकांना तयार करा, त्यांना एका इमारतीमध्ये घरे दिली तरी सुद्धा प्रश्न सुटू शकतो. अशा सूचना केल्या.

त्यावर मुख्याधिकारी यांनी ओंकार सिटीकडे जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूला पाण्याची टाकी असून त्या ठिकाणी जवळपास ३ गुंठे जागा आहे. या ठिकाणचे लोकेशन सुद्धा चांगले आहे. या जागेच्या सर्व्हेला सुरुवात केलेली आहे. असे समितीस सांगितले.

समितीने सन २०१३-२०१४ मध्ये नगरपालिकेचे एकूण उत्पन्न २,८४,११,२१७/-रुपये होते. अस्थापना व भांडवली खर्च वजा जाता महिला व बालकल्याण विभागासाठी ५ टक्के राखीव निधी १४.२१ लक्ष होता. यापैकी आपण २०१३ मध्ये ९३ हजार रुपये खर्च केले असून सदर वर्षात २८ लक्ष रुपये अखर्चित राहिलेले आहेत. सन २०१४-२०१५ मध्ये नगरपालिकेचे उत्पन्न ३,६१,५८,३७५/- रुपये होते. आस्थापना व भांडवली खर्च वजा जाता महिला व बालकल्याण विभागासाठी ५ टक्के राखीव निधी १८.८ लक्ष रुपये होता. यापैकी आपण १०.९१ लक्ष रुपये खर्च केले असून ८ लाख रुपये अखर्चित राहिलेले आहेत. सन २०१५-२०१६ मध्ये नगरपालिकेचे एकूण उत्पन्न ५,१०,३८,१५३/- रुपये होते. अस्थापना व भांडवली खर्च वजा जाता महिला व बालकल्याण विभागासाठी ५ टक्के राखीव निधी २५.५२ लक्ष रुपये होता. यापैकी आपण २.१० लक्ष रुपये खर्च केला आहे. महिला बालकल्याण विभागाचे जवळपास ४४ लक्ष रुपये अखर्चित राहिले असून ही रक्कम आपण कोठे वळती केलेली आहे ? महिलांसाठी योजना न राबवल्यामुळे आपण शासन निर्णयाचे उल्लंघण केले असा ठपका आपल्यावर का ठेवला जाऊ नये ? महिलांच्या प्रशिक्षणासाठी ९३ हजार रुपये खर्च केले असून सन २०१४-२०१५ मध्ये प्रशिक्षणासाठी १०.९१ लक्ष रुपये खर्च केले असून सन २०१५-२०१६ मध्ये महिला मेळाव्यासाठी २.१० लक्ष रुपये खर्च केलेले आहेत. केवळ प्रशिक्षण आणि महिला मेळाव्यासाठीच रक्कम खर्च केलेली आहे. अशी विचारणा केली.

त्यावर मुख्याधिकारी यांनी गाईडलाईन्स नुसार नगरपालिकेला वैयक्तिक लाभाच्या योजना राबवता येत नाहीत. असे समितीस सांगितले.

समितीने नगरपालिकेला वैयक्तिक लाभाच्या योजना राबवता येत नाहीत यासंदर्भात लिखित गाईडलाईन्स असतील तर त्या दाखवण्यात याव्यात ? महिला व बालकल्याण विभागाचा निधी अखर्चित का राहिला ? अशी विचारणा केली.

त्यावर लेखापाल यांनी अर्थसंकल्पात सर्व बाबी ठेवलेल्या आहेत. सन २०१५-२०१६ मध्ये महिला व बालकल्याण विभागाच्या योजनांवर २.१० लक्ष रुपये खर्च करण्यात आलेला आहे. परंतु अक्च्यूअली खर्च ६ लाखाच्या आसपास झालेला आहे. परंतु हा खर्च मार्च नंतर झालेला आहे. यामध्ये हळदीकुंकवासाठी महिलांना डबे देण्यासाठी २.९४ लक्ष रुपये खर्च केलेला आहे. परंतु हा खर्च मार्चनंतर झालेला असल्यामुळे हा खर्च सन २०१५-२०१६ मध्ये अंतर्भूत करता आलेला नाही. आतापर्यंत जो पैसा खर्च झालेला नाही तो पैसा शिल्लक आहे. शिल्लक पैसा इतरत्र वळवण्यात आलेला नाही. अखर्चित निधी जवळपास ३० लाख रुपये आहे. असे समितीस सांगितले.

समितीने महिला बालकल्याणचा ३० लाख रुपये निधी शिल्लक असून तो खर्च करण्यासाठी सर्वांनी एकत्र बसून निर्णय करावा. असे समितीने सुचविले.

त्यावर लेखापाल यांनी श्रीमती किर्ती मेहता या महिला व बालकल्याण सभापती असताना त्यांना मी शासनाचे परिपत्रक, योजना, तरतूद याबद्दलची सर्व माहिती दिलेली आहे. या अगोदर बजेटमध्ये एकच हेड होता परंतु मी आता बजेटमध्ये एकंदर सहा हेड ठेवलेले आहेत. यामध्ये शिष्यवृत्ती, गरोदरपणातील आजार अशा सर्व बाबी अंतर्भूत केलेल्या असून लेखा विभागाला ही रक्कम खर्च करणे बंधनकारक आहे. असे समितीस सांगितले. समितीने १४ लक्ष रुपये कोणत्या कारणासाठी खर्च केले आहेत त्याची सविस्तर माहिती समितीला पाठविण्यात यावी. तसेच शिल्लक निधी चांगल्या कामासाठी अलर्ट राहून खर्च केला पाहिजे.असे सांगितले.

त्यावर मुख्याधिकारी यांनी वैयक्तिक लाभाच्या योजना राबवता येतील काय ? असे विचारले

त्यावर दि. ८ नोव्हेंबर,२०१० च्या शासन निर्णयानुसार योजना राबवता येतील. या शिवाय आपल्याला नवीन योजना राबवावयाच्या असतील तर शासनाची परवानगी घेऊन योजना राबवू शकता. केवळ महिला व बालकल्याण समितीच्या सदस्यांनी त्यांच्याच वॉर्डातील लाभार्थ्यांना ही योजना राबवू नये तर सर्व नगरसेवकांच्या वॉर्डामध्ये फॉर्म भरुन लॉटरी सिस्टीमच्या माध्यमातून योजना राबवली गेली पाहिजे. असे सांगितले.

समितीने गाळयांची काय स्थिती आहे ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्याधिकारी यांनी सन १९९५ मध्ये गाळे बांधलेले आहेत. त्यानंतर नगर परिषदेने स्वत:ची जागा नसल्यामुळे गाळे बांधलेले नाहीत. असे समितीस सांगितले.

समितीने ही संकल्पना आहे. १० ते १५ गुंठे जागा मिळाली तर कार्यालय होऊ शकते असे म्हणावे. तसा प्रस्ताव तयार करावा. एस.टी.डेपोची जागा खूप मोठी आहे. त्या मानाने एस.टी.बसगाड्या येत नाहीत. एस.टी.महामंडळाने १० ते १५ गुंठे जागा दिली तर चांगले कार्यालय देखील होऊ शकेल. असे समितीने सूचविले.

त्यावर मुख्याधिकारी यांनी बसस्थानकाची जागा पीपीपी बेसिसवर देण्यात आली आहे. त्यानी ती जागा विकत दिली तरी काम भागू शकते. त्यांनी समजा जागा दिली नाही आणि मजला जरी दिला तरी काम भागते. आता त्यांचे कच्चे बांधकाम आहे. पत्रा शेडमध्ये त्यांचे कार्यालय आहे. पण मधल्या काळात एस.टी.महामंडळाने ही संकल्पना बंद केली. असे समितीस सांगितले.

समितीने ही जागा एस.टी. महामंडळाच्या मालकीची असल्यामुळे मला एक पत्र द्यावे. यासंबंधात माननीय परिवहन राज्य मंत्री श्री.विजय देशमुख यांच्याकडे बैठक आयोजित करते व त्यांना सांगते की, नगरपालिका हे डेव्हलप करून देईल आणि वरचा मजला नगरपालिका स्वत:साठी घेईल. येथे पावसाळ्यात फार अवघडीचे जाते. ४-५ तास पाऊस पडला तरी नगर पालिकेचे कार्यालय बंद पडते. तसे होणे बरोबर नाही. ढाच्यामध्ये पाणी भरत नाही. त्यावर मुख्याधिकारी यांनी यावेळी जवळ जवळ ३५० मि.मी.पाऊस झाला. त्यामुळे काही बंधारे फुटले होते. असे समितीस सांगितले.

समितीने महिलांकरिता स्टॉल ठेवले होते. परंतु, त्यास प्रतिसाद मिळाला नाही. बचतगटांना स्टॉल दिले होते. परंतु, त्यानी स्टॉल सुरू केले नाही असे लेखी उत्तरात नमूद केले आहे. हे स्टॉल कधी दिले आहेत ? अशी विचारणा केली.

त्यावर उपमुख्याधिकारी यांनी हे गाळे २ ते ३ वर्षापूर्वी दिले होते. पण त्यांनी स्टॉल सुरू केले नाही. ही जागा वन विभागाची होती. ती दिली होती. वन विभागाकडे बचत गटांना स्टॉलसाठी जागा द्यावी अशा प्रकारचा प्रस्ताव दिला होता. त्यानुसार त्यांनी जागा दिली. ही समुद्र किनाऱ्याची जागा आहे. पर्यटक येतात म्हणून तेथे विक्री करण्याच्या उद्देशाने वन विभागाकडून जागा घेऊन नगर पालिकेने सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत १८ स्टॉल उभे केले होते. त्यांना हे स्टॉल महिला बचत गटांना देऊ असे त्यांना सांगितले होते. त्याप्रमाणे प्रयत्न केला. ज्यांनी अर्ज केला होता त्यांनी स्टॉल सुरू करण्यास होकार दिला होता. पण त्यांनी ते स्टॉल सुरू केले नाहीत. गेल्यावर्षी देखील ६ जणांनी प्रतिसाद दिला. त्यांना स्टॉल ताब्यात घ्यावे अशा आशयाचे पत्र दिले. त्यांनी देखील त्यात प्रतिसाद दिला नाही. त्यावेळी फक्त बीपीएल बचत गटांनाच संधी द्यावी असा नियम होता. पण आता एबीपीएल महिला बचत गटांना संधी देण्यात येते. सध्या हे स्टॉल कोणीही ताब्यात घेतलेले नाहीत. यात पारदर्शकता यावी म्हणून टेंडर देखील काढले होते. यासाठी ६ जणांनी प्रतिसाद दिला. त्यांना हे स्टॉल ताब्यात घेऊन सुरू करावे अशा आशयाचे पत्र देऊन देखील ते पुढे आलेच नाहीत. असे समितीस सांगितले.

समितीने NUHM अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. तेथील १० पदे रिक्त असण्याचे कारण काय आहे ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्याधिकारी यांनी ही केंद्र शासनाची योजना आहे. त्यामुळे सिव्हील सर्जनच्या माध्यमातून भरती प्रक्रिया होते. ३१ मार्च पर्यंत पुढची प्रक्रिया थांबवून ठेवावी असे सांगितले होते. पण पुढचे निदेश आले नाहीत. त्यानंतर सांगण्यात आले की, यांनाच कन्टीन्यू करावे. या सर्व पुर्ननियुक्त्या असतात. त्यांची मूळ नियुक्ती सन २०१४-१५ मध्ये झालेल्या आहेत. त्यांनी एम.बी.बी.एस.डॉक्टरचे नाव प्रस्तावित केले असून त्यांचा अर्ज देखील भरलेला आहे. त्यांची भरती नगर पालिकेच्या माध्यमातून करण्यात येईल. असे समितीस सांगितले.

समितीने जी वैद्यकीय तपासणी केली आहे त्यात कर्करोग व अन्य आजार असलेल्या महिला आढळल्या आहेत काय ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी तपासणी कार्यक्रम आयोजित केला होता. पण किती रूग्ण आढळले ही माहिती उपलब्ध नाही. यासंबंधातील सविस्तर माहिती समितीला नंतर पाठवून देण्यात येईल.

समितीने पुण्यातील डॉक्टर शैलेश पुणतांबेकर यांचा कॅन्सरवर कॅम्प आयोजित केला होता. रोबॉटद्वारे ते कॅन्सरचे ऑपरेशन करतात. कॅन्सर होऊ नये यासाठी कोणती काळजी घेतली पाहिजे याचे त्यांनी मार्गदर्शन केले. या डॉक्टरांची ८ ते १० महिने अपॉईंटमेंट मिळत नाही. १५ हजार, ५० हजार, १ लाख रूपयात गर्भाशयाचे ऑपरेशन करतो असे काही डॉक्टर्स म्हणतात. रवाच्या कणा एवढा कॅन्सर राहिला तरी तो कॅन्सर पुन्हा होऊ शकतो. जगात युट्रस ट्रान्सप्लांट हे डॉ.शैलेश पुणतांबेकर यांनी केले आहे. त्यांना विनंती करून एका दिवसासाठी त्यांच्या कॅम्पचे आयोजन करावे. कोणाला कॅन्सर आहे असे निष्पन्न झाले आणि येथील रूग्णालय त्यांना उपलब्ध करून दिले तर ते स्वत: रोबॉटच्या सहाय्याने ऑपरेशन करतात. त्यांच्याकडे असलेल्या रोबॉटची किंमत ८० कोटी रूपये इतकी आहे. त्या रोबॉटच्या सहाय्याने ते ऑपरेशन करतात. त्यांचा कार्यक्रम घ्यावा. तसेच जे.जे. रूग्णालयाच्या मदतीने महिला व बालकल्याणाच्या माध्यमातून महिलांची मेमोग्राफी आपण करू शकता. यातून पहिल्या टप्प्यातील कॅन्सर रूग्ण आढळला तर त्या जगू शकतात. येथील पाण्याचा हार्डनेस १४०० पीपीएम आहे. एक आदर्श गाव म्हणून दत्तक घेतले आहे. तेथे ओएनजीसीच्या सहाय्याने ए.टी.एम.स्थापित केले आहे. एक रूपयात एक हंडा फिल्टर पाणी मिळते. असे येथे करता येईल. रिलायन्स, कॅप्सूल यांच्या CSR मधून हे काम पूर्ण करून घ्यावे. अशा समितीने सूचना केल्या.

त्यावर मुख्याधिकारी यांनी कॅप्सूल कंपनीने एक वर्ष CSR दिलेला आहे. त्यानंतर निधी दिलेला नाही. तसेच दुसऱ्या एका कंपनीकडून फ्लाय अ‍ॅशचा विटा मागत आहोत. पण त्या त्यांनी दिलेल्या नाहीत. असे समितीस सांगितले

**विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी मुख्याधिकारी, डहाणू नगरपरिषद यांनी खालीलप्रमाणे लेखी माहिती दिली :—**

डहाणू नगरपरिषद हद्दीत नगरपरिषदेच्या मालकीची जागा नाहीत. तसेच शासकीय जागा उपलब्ध नाहीत. काही भाग हा हरीत पटयाने (Green Zone) तसेच बागायत क्षेत्र (Horticulture Zone) ने बाधित होत आहे. तसेच काही भाग CRZ ने बाधित होत आहे. या कारणामुळे नगरपरिषदेची कार्यालयीन इमारत बांधण्यात आली नाही. कार्यालयीन इमारत बांधण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविलेला नसल्याने प्रलंबित नाही.

महाराष्ट्र शासनाने डहाणू शहराची विकास योजना दिनांक ०४ ०४ २०१२ रोजी काही भाग वगळून (E.P) मंजूर करण्यात आली आहे. त्यात एकूण १९३ ep(Excluding Part) दर्शविण्यात आले आहेत. सदरचा (E.P) महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने PS/२१५/८४२/प्र.क्र.११५/नवि-१२, दिनांक २१.१०.२०१६ च्या नोटिफीकेशन ने पर्यावरण व वन विभाग (MOEF) मंत्रालय दिल्ली यांचे कार्यालयाकडे अंतिम मंजूरी करीता पाठविण्यात आला आहे. सदर प्रस्तावात नगरपरिषद कार्यालयासाठी Site no.२९ मोजे मसोली येथील गट क्र.१७९ पै.क्षेत्र १ हेक्टर ३६ आर जागा आरक्षित ठेवण्यात आली आहे. मात्र सदर प्रस्तावास केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन विभाग (MOEF) मंत्रालय दिल्ली यांचे कार्यालयाकडून अंतिम मंजुरी अद्याप प्राप्त झालेली नाही. सदर बाबत जा.क्र.डनप/२८९३/दिनांक १/१/२०१८ अन्वये पर्यावरण सचिव. नवि दिल्ली यांना पत्रव्यवहार करुन डहाणू शहराची विकास योजना लवकरात मंजूर करणेबाबत विनंती केली आहे. तसेच जा.क्र.४७८० दिनांक २२/११/२०१८ अन्वये सदर कामी स्मरणपत्र सुध्दा दिले आहे.

केंद्र शासनाच्या पर्यावरण एवम वन मंत्रालयाने दिनांक १९/१२/१९९६ च्या नोटीफिकेशन नुसार डहाणू तालुका पर्यावरण संरक्षण प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. सदर प्राधिकरणाने अध्यक्ष मा.श्री.चंद्रशेखर धर्माधिकारी, सेवानिवृत्त न्यायाधिश, उच्च न्यायालय, मुंबई हे आहेत. त्यामुळे त्यांचेवर कार्यवाही करणे ही बाब शासनाच्या कार्यकक्षे बाहेरील आहे. तसेच शासनाकडे बाब प्रलंबित नाही.

डहाणू नगरपरिषदेच्या स्वत:च्या कार्यालय इमारतीचा प्रस्ताव मा.समितीने सुचविल्याप्रमाणे एस.टी.महामंडळाकडे जागा अधिग्रहण करणे करीता प्रस्ताव या कार्यालयाकडील जा.क्र.डनप/२५९८/दिनांक ०७/०९/२०१८ अन्वये प्रस्ताव केलेला आहे व जा.क्र.डनप/४७६३/दिनांक २०/११/२०१८ अन्वये स्मरणपत्र सुध्दा दिले आहे. शासकीय जागा मिळण्याबाबत व्यवहाराची कार्यवाही सुरु आहे.

नगरपरिषदेचे एकूण उत्पन्न :—

| अ. क्र. | सन | नगरपरिषदेचे उत्पन्न | ५% तरतूद | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | सन २०१२-१३ | २,८४,११,२१४/- | १४,२१,०००/- | ९३,०००/- |
| २ | सन २०१४-१५ | ३,६१,५८,३७५/- | १८,०८,०००/- | १०,९१,१४३/- |
| ३ | सन २०१५-१६ | ५,१०,३८,१५३/- | २५,५२,०००/- | ६,००,०००/- |

- डहाणू नगरपरिषद ही ब वर्ग नगरपरिषद असून त्याच्या उत्पन्न स्त्रोत्रातून महिला व बालकल्याण विभागासाठी ५%राखीव निधी ठेवला जातो.
- दर वर्षी महिलांसाठी जागतीक महिला दिन राबविण्यात येतो. आर्थिक दुर्बल घरकालीन महिलांना शिलाई मशिन देणे, शिवणकाम प्रशिक्षण देणे इत्यादी कामे केली आहेत.
- अर्थ संकल्पात सर्व बाबी अंतर्भुत करण्यात आलेला आहेत. यापैकी सन २०१५-१६ मध्ये महिला व बालकल्याण विभागाच्या योजनेवर ६.०० लक्ष रुपये खर्च करण्यात आलेला आहे. यापैकी मार्च, २०१६ पुर्वी २.१० लक्ष खर्ची झाले व उर्वरित देयक मार्च, २०१६ नंतर अदा करण्यात आली.
- सन २०१३-१४,२०१४-१५,२०१५-१६ या तीन वर्षाचा शिल्लक निधी इतरत्र वळविणेत आलेला नसून तीन वर्षाचा अखर्चित निधी जवळपास रु.३९,०० लाख आहे.
- परंतू डहाणू नगरपरिषदेची सार्वत्रिक निवडणूक २०१७ जाहिर झाल्याने आचार संहिता कालावधित कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण व इतर लाभ देता आलेले नाहीत.
- नगरपरिषदेने सर्वसाधारण सभा दि.३०/०८/२०१८ ठराव क्र.४८ अन्वये महिला व बालकल्याण समिती अन्तर्गत नगरपरिषद हद्दीतील महिला व मुली यांना प्रशिक्षण देणे कामी मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार नगरपरिषदेने दि. १५/०९/२०१८ रोजी निविदा नोटीस प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या आहे.

आपल्या सूचनेप्रमाणे नगरपरिषदेने सर्वसाधारण सभा दि.३०/०८/२०१८ ठराव क्र.४८ अन्वये महिला व बालकल्याण समिती अन्तर्गत नगरपरिषद हद्दीतील महिला व मुली यांना प्रशिक्षण देणे कामी मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार नगरपरिषदेने दि. १५/०९/२०१८ रोजी निविदा नोटीस प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या आहे.

खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे :—

- अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था पुर्ण यांच्या मार्फत महिला बालकल्याण मार्फत शिवणकाम, भरतकाम,पाककला, प्रशिक्षण इत्यादी प्रशिषणासाठी = रु .९,०० लक्ष.
- प्लास्टिक, मुक्तीसाठी कापडी पिशवी वाटप = रु .१.२० लक्ष.
- जागतिक महिला दिनानिमित्त विविध कार्यक्रमासाठी = रु .३.८० लक्ष.

एकूण = रु .१४.०० लक्ष.

सन १९९५ मध्ये महात्मा गांधी भाजीमार्केट गाळे बांधलेले आहेत त्यानंतर नगरपरिषदेने स्वत:ची जागा नसल्यामुळे व विकास आराखडा मंजुर नसल्यामुळे गाळे बांधलेले नाहीत. मल्याणची जिल्हापरिषद शाळेची जागा जिल्हापरिषदेची आहे.

महाराष्ट्र शासनाने डहाणू शहराची विकास योजना दि. २१.०१.२०१२ रोजी काही भाग वगळून (E.P) मंजूर करण्यात आली आहे. उर्वरीत आराखडा महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने TPS/२१५/८४२/ प्र.क्र.११५/१५/नवि-१२, दि.२१.०१.२०१६ च्या नोटिफिकेशन पर्यावरण व वन विभाग (MOEF) मंत्रालय दिल्ली यांचे कार्यालयाकडे अंतीम मंजुरी करिता पाठविण्यात आला आहे. सदर प्रस्तावात नगरपरिषद कार्यालयासाठी site no.२९ गट क्र. १७९ पै. मसोली १.३६ आर जागा आरक्षित करण्यात आली आहे. सदर प्रस्तावास अद्याप अंतिम मंजूरी प्राप्त झाली नाही.

नगर परिषद प्रशासन संचनालय यांचेकडील परिपत्रक क्र.न.प.प्र.स/१३/ म. गव्या. जा /२००४/प्र.क. १०८७ दि. १८.१२.२००४ अन्वये दारिद्य रेषेखालील कुटूंबातील महिला गटाना स्वंय रोजगार देण्याच्या द्दष्टीने नगर पालिकेने स्वताची जागा नसल्याने वन विभागाशी संपर्क साधून दि. २६.०४.२०१३ रोजी जागेबाबत करारनामे करुन जागे ताब्यात करुन महाराष्ट्र जिवन प्राधिकरण यांचेकडिल तांत्रिक मंजूरी जावक क्र,मा. जि.प्र. विरार ४६८/१५.०३.२०१६ अन्वये प्राप्त झालेली तांत्रिक मंजूरीनुसार २१ गाळयांची (स्टॉल) उभारणी केली. त्यापैकी ३ गाळे संयुक्त वन व्यवस्थापन समिती, वन विभाग, सरावली, डहाणू यांना देण्यात आले होते.

दि. १६.०५.२०१३ रोजी कार्यालयाकडिल डनप/जा.प्र ७७३/२०१३-१४ अन्वये दारिद्र्य रेषेखालील महिलांना गाळे वाटप बाबत जाहिर आवाहन करुन गाळे मागणिसाठी रितसर अर्ज करण्यासाठी प्रसिध्द देण्यात आली होती.

या अनुषगाने महिलांनी केलेल्या मागणीनुसार १८ गाळयांचे वाटप करण्यात आले होते परंतू महिलांना गाळे ताब्यात दिल्यानंतर त्यांनी ते गाळे चालवले नाहीत. नंतर पुन्हा नगरपरिषदेने प्रसिध्दी देऊन महिला बचत गटाकंडून अर्ज मागविण्यात आले होते. त्या अनुषगाने गाळे वाटप करण्यात आले परंतु बचत गटाने ते गाळे न चालविल्यामुळे बंद पडून राहिले. या सर्व बाबी विचारात घेता उभारण्यात आलेले गाळे लोखंडी फ्रेमचे असल्यामुळे व तेथील समुद्र किनाऱ्यावर खारट वातावरणामुळे गाळे ना दुरुस्त होऊन गेले आहेत.

खालील तक्त्याप्रमाणे महिलांचे आरोग्य विषयक वैद्यकिय तपासणी शिबीर घेण्यात आले.

| अ.क्र. | दिनांक | शिबीर | तपासणी केलेल्या महिलांची संख्या | आढळलेल्या रुग्ण महिलांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | २९/०२/२०१६ | मधुमेह व रक्तदाब तपासणी. | ४६ | मधुमेह-९<br>रक्तदाब-६ |
| २ | ०२/०३/२०१६ | कर्करोग तपासणी | २५ | निरंक |
| ३ | ०५/०३/२०१६ | नेत्र तपासणी | १०० | ५२ |
| ४ | ०८/०३/२०१६ | रक्तक्षय व Bone density तपासणी | ५५ | ३७ |

**विभागीय सचिवांची साक्ष :—**

डहाणू नगरपरिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक ३ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने डहाणू नगरपरिषद अस्तित्वात येऊन ३२ वर्षे होऊनही त्यांची स्वतंत्र इमारत नसल्याची कारणे काय आहेत ? इमारत बांधकामा संदर्भातील प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित असण्याची काय कारणे आहेत ? याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे. अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय सचिवांनी इमारत बांधकामाचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आलेला आहे. डीपीमध्ये इमारतीच्या जागेचे आरक्षण दर्शविण्यात आले आहे. केंद्र शासनाने डहाणू तालुका इको सेंसेटीव्ह झोन जाहीर केला आहे. त्या अनुषंगाने डहाणू नगरपरिषदेचा डेव्हलपमेंट प्लॅन सन २०१६ मध्ये तयार करण्यात आलेला आहे. डहाणू नगरपरिषद इको सेसेंटीव्ह झोन असल्यामुळे त्यात अशी अट होती की, यासाठी केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाची मंजुरी घेणे गरजेचे आहे. त्यासाठी जानेवारी, २०१७ मध्ये संपूर्ण डेव्हलपमेंट प्लॅन मान्यतेसाठी सादर केलेला आहे. असे समितीस सांगितले.

समितीने जानेवारी, २०१७ मध्ये डेव्हलपमेंट प्लॅन सादर केला तो अद्यापर्यंत मंजूर होऊन आला नाही त्यामुळे त्यांच्याकडे पाठपुरावा केला आहे काय ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय सचिवांनी नगरपरिषदेतर्फे पाठपुरावा करण्यात आला आहे. नगरपरिषदेकडून त्यांनी काही माहिती मागविली होती. ती माहिती जून, २०१७ मध्ये सादर करण्यात आली आहे. तसेच दूरध्वनीवरुन काही माहिती मागविली होती ती देखील माहिती सादर करण्यात आली आहे. असे समितीस सांगितले.

समितीने डेव्हलपमेंट प्लॅन मंजूर करण्याबाबत त्यांची सकारात्मक भूमिका दिसून येते काय ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय सचिवांनी त्यांची भूमिका सकारात्मक दिसून येत आहे, पर्यावरण विभागाने सदर प्लॅन तीन महिन्यात मंजूर करावा असे आदेश कोर्टाने जुलै २०१८ मध्ये दिले आहेत. त्यांना पुन्हा स्मरणपत्र देत आहोत. असे समितीस सांगितले.

शासनाला याबाबत शिफारस करण्यात येईल. ही इमारत अतिशय जीर्ण झालेली आहे ती कधीही पडू शकते, त्यामुळे यासंदर्भातील प्रस्ताव जास्त काळ प्रलंबित ठेवणे योग्य होणार नाही. याबाबत तातडीने कार्यवाही करुन केंद्र शासनाने या प्रस्तावास मंजूरी द्यावी अशी शिफारस राज्य शासनाला करण्यात येईल. राज्य शासनाकडून केंद्र शासनास तसे कळवावे. असे समितीने मत व्यक्त केले.

समितीने या संदर्भात जो पत्र व्यवहार व प्रस्ताव सादर केलेला आहे, त्याची प्रत समितीला सादर करण्यात यावी. त्यांच्याकडून जे उत्तर आले ते देखील समितीकडे सादर करण्यात यावे. अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय सचिवांनी यासंदर्भातील सविस्तर माहिती समितीला लेखी सादर करतो. असे समितीस सांगितले.

समितीने दुसरा प्रश्न असा आहे की, डहाणू तालुका पर्यावरण समिती अस्तित्त्वात येऊन ३१ वर्षे झाली असताना सुध्दा सदरहू समिती निर्णय घेण्यास असक्षम असल्याचे समितीला वारंवार दिसून आले आहे त्याबाबत शासनाचे काय मत आहे, त्या अनुषंगाने शासनाने त्यांचेवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय सचिवांनी हा विषय जागेसंदर्भात आहे त्याबाबत चर्चा झाली आहे. असे समितीस सांगितले.

समितीने एसटी महामंडळाकडील जागा इमारतीसाठी मागण्याची आवश्यकता आहे काय ? परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांची उच्चस्तरीय बैठक बोलविण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे. त्यासंदर्भात काही चर्चा झाली आहे काय ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय सचिवांनी समितीने त्यावेळी मुद्दा उपस्थित केला होता, म्हणून तो विषय आलेला आहे. जागा मिळण्याबाबत दोन पत्राद्वारे त्यांना विनंती करण्यात आलेली आहे. त्यांच्याकडून कोणतेही उत्तर आलेले नाही. असे समितीस सांगितले.

समितीने जी पत्रे दिली त्याच्या प्रती समितीला सादर कराव्यात. ते उत्तर कसे देत नाही. त्यांना स्मरण पत्र पाठविले आहे काय ? त्यामध्ये समितीचा संदर्भ देण्यात आलेला आहे काय ? या प्रस्तावात कोणती जागा प्रस्तावित करण्यात आली आहे. अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय सचिवांनी समितीचा संदर्भ देऊन स्मरण पत्र पाठविण्यात आले आहे. नगरपालिकेच्या डीपीमधील जागा प्रस्तावित करण्यात आलेली आहे, १ हेक्टर ३६ आर जागा इमारतीसाठी आरक्षित आहे. असे समितीस सांगितले.

समितीने ही जागा प्रस्तावित करण्यात आली असल्यामुळे यांनी दिलेल्या पत्राचा काही संबंध येत नाही, त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांना साक्षीला बोलविण्याची गरज नसावी. जागेचा प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे त्यामुळे समितीकडून सरकारला शिफारस करण्यात येईल. राज्य सरकार त्यानुसार केंद्र सरकारकडे विनंती करेल. जेणेकरुन इमारतीचे बांधकाम लवकरात लवकर सुरु करता येईल. अशी सूचना करण्यात आली.

त्यावर विभागीय सचिवांनी डीपी प्लॅनमध्ये नगरपालिका इमारतीचे आरक्षण त्या जागेवर दर्शविण्यात आले आहे. असे समितीस सांगितले.

समितीने डहाणू नगरपरिषदेला वैयक्तिक लाभाच्या योजना राबविता आलेल्या नाहीत. यासंदर्भातील गाईडलाईन्स दाखविण्यात याव्यात. त्याचप्रमाणे महिला व बालकल्याण विभागाचा निधी अखर्चित का राहिला आहे ? सन २०१३-१४ मध्ये २ कोटी ८४ लक्ष रुपये उत्पन्न होते, ५ टक्के तरतूदीप्रमाणे १४ लक्ष २१ हजार रुपये होत असून आपण फक्त ९३ हजार रुपये खर्च केले आहेत. त्याचप्रमणे सन २०१४-१५ मध्ये ८ लक्ष रुपये कमी खर्च केले आहेत. सन २०१५-१६ मध्ये १९ लक्ष रुपये कमी खर्च केले आहेत. शासन निर्णयानुसार ही रक्कम महिलांच्या योजनांसाठी का खर्च करण्यात आली नाही. अशी विचारणा केली.

त्यावर मुख्याधिकारी यांनी यासंदर्भातील मी नियोजन केलेले आहे त्याबाबत कार्यवाही सुरु केलेली आहे. ही रक्कम मार्चपर्यंत खर्च करण्यात येईल. असे समितीस सांगितले.

समितीने हा निधी कोणत्या बाबींवर खर्च करण्यात येतो ते तपासण्यात यावे. अशी विचारणा केली.

त्यावर मुख्याधिकारी यांनी हा निधी अनुज्ञेय बाबींवर खर्च करण्यात येत आहे. ऑलरेडी आम्ही प्रशिक्षणाची प्रोसीजर सुरु केलेली आहे. १२ विषयांचे प्रशिक्षण महिलांना देण्यात येणार आहे. महिला नगरसेवकांसाठी अभ्यास दौऱ्याचे आयोजन या महिन्यात करण्यात येत आहे. असे समितीस सांगितले.

समितीने महिलांना अभ्यास दौऱ्यासाठी कोठे नेणार आहात. अशी विचारणा केली.

त्यावर मुख्याधिकारी यांनी सावंतवाडी येथील महिला व बाल कल्याण समितीचे कामकाज चांगले आहे. त्या कामाचा अभ्यास करण्यासाठी हा दौरा करण्यात येत आहे. यशदा पुणे येथे संपर्क करुन एक ते दोन दिवस प्रशिक्षण देण्याचे नियोजन करण्यात येत आहे. असे समितीस सांगितले.

समितीने सन २०१३ ते २०१६ या तीन वर्षात नगरपरिषदेतील उत्पन्नाच्या ५ टक्के

रक्कमेतील ३९ लक्ष रुपये अखर्चित आहेत. महिलांसाठी जो निधी खर्च करण्यात आलेला आहे तो शासन निर्णयानुसार केला आहे काय ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्याधिकारी यांनी शासन निर्णयाप्रमाणे खर्च करण्यात आलेला आहे. असे समितीस सांगितले.

समितीने अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था पुणे यांच्यामार्फत शिवणकाम, भरतकाम, पाककला, प्रशिक्षणासाठी ९ लक्ष रुपये खर्च करण्यात आले आहे. त्यानंतर प्लॉस्टिक मुक्तीसाठी कापडी पिशवी वाटप करण्यासाठी १ लक्ष २० हजार रुपये खर्च करण्यात आले आहेत. प्लॉस्टिक मुक्तीसाठी कापडी पिशवी वाटप करणे याचा उल्लेख शासन निर्णयात आहे काय ? अशी विचारणा केली.

समितीने शासन निर्णयाच्या बाहेरील एखादी योजना राबवायची असेल तर त्यासाठी जिल्हाधिकाऱ्यामार्फत शासनाकडे प्रस्ताव सादर करुन मान्यता घ्यावी लागते. तशी कार्यवाही करण्यात आलेली आहे काय ? त्यासंदर्भात मंजूरी घेण्यात आली आहे काय ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्याधिकारी यांनी प्लॉस्टिक मुक्तीसाठी कापडी पिशवी वाटणे गरजेचे आहे. ही बाब शासन निर्णयात नाही. असे समितीस सांगितले.

समितीने या शासन निर्णयात दुरुस्ती करुन त्यामध्ये प्लॉस्टिक मुक्तीसाठी कापडी पिशवी वाटप करणे, सॅनेटरी नॅपकीन वाटप करणे व डिस्पोजल करणे, मुली व महिलांसाठी या योजना अतिशय महत्वाच्या आहेत. या बाबींचा समावेश शासन निर्णयात करण्यात यावा. अशी सूचना केली.

त्यावर विभागीय सचिवांनी या प्रमाणे शासन निर्णयात दुरुस्ती करण्यात येईल. असे समितीस सांगितले.

समितीने जागतिक महिला दिनानिमित्त विविध कार्यक्रमांसाठी ३ लक्ष ८० हजार रुपये खर्च केले आहेत. यामध्ये कोणते कार्यक्रम घेण्यात आले होते.अशी विचारणा केली.

त्यावर मुख्याधिकारी यांनी महिलांचा मेळावा घेण्यात आला होता. प्रशिक्षणाच्या अनुषंगाने त्यांना माहिती देण्यात आली होती. आरोग्य शिबीर आयोजित केले होते. असे समितीस सांगितले.

समितीने १८ गाळ्यांचे वाटप करण्यात आले आहे. जागा नाही तर गाळे कोठे बांधले आहेत.अशी विचारणा केली.

त्यावर मुख्याधिकारी यांनी वनहक्क समिती आहे, महसूल व वन विभागामार्फत वन हक्क समितीसोबत करारनामा करुन वन विभागाच्या जागेवर गाळे बांधण्यात आले आहेत. हे गाळे बचत गटांना द्यावयाचे आहेत. गाळे तयार आहेत परंतु सदर गाळे भाड्याने घेण्यास कोणी पुढे येत नाही. असे समितीस सांगितले.

समितीने गाळे भाड्याने घेण्यास कोणी का येत नाही, जागा बरोबर नाही, भाडे जास्त आहे काय ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्याधिकारी यांनी जागा अतिशय चांगली आहे, बीचवर हे गाळे बांधण्यात आले आहेत. भाडे देखील जास्त नाही. तेथे रिस्पॉन्स मिळत नाही. असे समितीस सांगितले.

समितीने गाळे भाड्याने देण्यासाठी जाहिरात देण्यात आली आहे काय ? कोणत्या वर्तमानपत्रात देण्यात आली आहे. अशी विचारणा केली.

त्यावर मुख्याधिकारी यांनी राजतंत्र या स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आलेली आहे. या जाहिरातीद्वारे ज्यांना गाळे हवे आहेत त्यांनी नगरपरिषदेशी संपर्क साधावा असे आवाहन केलेले आहे. असे समितीस सांगितले.

समितीने जाहिरातीचा संपूर्ण पॅटर्न बदली करुन टाकावा. मासिक भाडे १५० रुपये, फक्त बचत गटांसाठी, ११ महिन्याच्या करार पध्दतीने भाडयाने देणे आहे. अशा बाबी जाहिरातीमध्ये नमूद करुन जाहिरात देणे अपेक्षित आहे. थोडे जास्तभाडे ठेवावे, जाहिरातीचा पैसा निघाला पाहिजे किती बचत गटांची नोंदणी आपणाकडे करण्यात आलेली आहे. अशी समितीने विचारणा केली.

त्यावर मुख्याधिकारी यांनी ७० ते ७५ बचत गटांची नोंदणी करण्यात आलेली आहे. असे समितीस सांगितले.

समितीने वैद्यकीय तपासणी करण्यासाठी कोणत्या डॉक्टरांना बोलविण्यात आलेले होते ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्याधिकारी यांनी खासगी डॉक्टर बोलविले होते. त्यांनी मोफत तपासणी केली होती. दिनांक ९ डिसेंबर, २०१८ रोजी एक शिबिर घेण्यात आले होते. असे समितीस सांगितले.

**अभिप्राय व शिफारशी : —**

समितीने डहाणू नगरपरिषदेला भेट देवून शासन धोरणानुसार डहाणू नगरपरिषदेचे गत तीन वर्षातील वर्षनिहाय सन २०१२-२०१३, २०१३-२०१४ व २०१४-२०१५ मधील वार्षिक अंदाजपत्रक किती रक्कमेचे आहे ? शासन धोरणानुसार प्रत्येक नगरपरिषदेत महसूली व आस्थापना खर्च वगळून एकूण अंदाजपत्रकाच्या ५० टक्के निधी महिला व बालकल्याण विभागासाठी राखून ठेवण्यात येतो. त्या अनुषंगाने नगरपरिषदेतील मागील ३ वर्षात सदरहू ५ टक्के निधी कसा खर्च करण्यात आला आहे ? अशी समितीने विचारणा केली असता, तीन वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये सन २०१२-१३ मध्ये २,८४,११,२१७/- सन २०१४-१५ मध्ये ३,६१,५८,३७५/- तसेच सन २०१५-१६ मध्ये ५,१०,३८,१५३/- कोटीची तरतूद करण्यात आली होती. त्यामध्ये महिला व बालकल्याण विभागासाठी ५% राखीव निधी असून महिला व बालकल्याण विभागासाठी सन २०१२-१३ मध्ये रुपये १४,२१,०००/- सन २०१४-१५ मध्ये

रुपये १८,०८,०००/- तसेच सन २०१५-१६ मध्ये रुपये २५,५२,०००/- राखून ठेवण्यात आला आहे. तसेच महिला व बालकल्याण विभागासाठी सन २०१२-१३ मध्ये रुपये ९३,०००/- सन २०१४-१५ मध्ये रुपये १०,९१,१४३/- तसेच सन २०१५-१६ मध्ये २,१०,३५०/- इतका खर्च झालेला आहे.

समितीने आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या महिलांना सक्षम करण्याकरिता देण्यात येणाऱ्या सोई-सवलती इ.योजनांबात माहिती देण्यात यावी ? उक्त योजनांवर २०१२-२०१३, २०१३- २०१४ व २०१४-२०१५ या तीन वर्षात व वर्षनिहाय व योजना निहाय एकूण किती खर्च झाला ? नगरपरिषदेच्या एकूण उत्पन्नाच्या किती टक्के रक्कम महिलांसाठी कल्याणकारी योजना राबविण्याबाबत खर्च करण्यात येते ? अशी विचारणा केली असता, त्यावर मुख्याधिकारी यांनी सन २०१२-१३ मध्ये प्रशिक्षणासाठी रुपये ९३,०००/- इतका खर्च झालेला असून सन २०१४-१५ मध्ये प्रशिक्षण व महिला मेळावा साठी रुपये १०, ९१,१४३/- तसेच सन २०१५-१६ मध्ये महिला मेळाव्यासाठी रुपये २,१०,३५०/- इतका खर्च झाला असून नगरपालिकेच्या एकूण उत्पन्नाच्या ५% रक्कम महिलांसाठी कल्याणकारी योजना राबविण्यासाठी खर्च करण्यात येतो.

नगरपालिकेत महिला व बालकल्याण अधिकारी हे पद नाही. नगरपरिषदेने महिला व बाल कल्याण विभागातील कामकाज पाहणेसाठी निरीक्षक कर्मचारी ठेवले आहेत.

साक्षीच्या वेळी समितीने डहाणू नगर परिषदेची स्थापना दिनांक ३१ मे १९९५ रोजी झाली आहे. असे असले तरी अजूनही नगरपरिषदेला इमारत नाही. इमारत बांधण्यासाठीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे काय ? विकास आराखडा हा किती कालावधीत मंजूर होणे आवश्यक आहे ? त्यावर शासनाने विचार केला आहे किंवा नाही यासंबंधातील माहिती सांगावी. अशी विचारणा केली असता, त्यावर मुख्याधिकारी यांनी डहाणू नगर परिषदेची स्थापना ३१ मे, १९९५ रोजी झालेली आहे. ७ ग्रामपंचायती मिळून नगरपरिषदेची स्थापना झालेली आहे. त्यावेळी ७ ग्रामपंचायती कार्यालयापैकी एका कार्यालयाचे नगर परिषदेच्या कार्यालयामध्ये रूपांतरीत करण्यात आले आहे. सुरुवातीला डेव्हलपमेंट प्लॅन झाल्याशिवाय, त्यात आरक्षित जागा असल्याशिवाय जागा मिळणे अवघड होते. दरम्यान १९९१ मध्ये डहाणू ऑथोरिटी स्थापन झाली. त्यामुळे काही बंधने आली. सन २०१२ मध्ये नगर परिषदेचा डी.पी.पार्ट प्लॅनमध्ये मंजूर झालेला आहे. संपूर्ण शहरासाठी अजूनही डी.पी.मंजूर व्हायचा आहे. अंतिम डी.पी.झाल्यानंतर नगर परिषदेला जागा उपलब्ध होईल. सध्या शासकीय जागा फार कमी आहे. जागा उपलब्ध करून घ्यायची आहे. इमारत बांधण्यासाठी निधी उपलब्ध होईल. परंतु जागा पाहिजे ती उपलब्ध होत नाही.

महाराष्ट्र शासनाने डहाणू शहराची विकास योजना दि. २१.०१.२०१२ रोजी काही भाग वगळून (E.P) मंजूर करण्यात आली आहे. उर्वरीत आराखडा महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने TPS/२१५/८४२/ प्र.क्र.११५/१५/नवि-१२, दि.२१.०१.२०१६ च्या नोटिफिकेशन

पर्यावरण व वन विभाग (MOEF) मंत्रालय दिल्ली यांचे कार्यालयाकडे अंतीम मंजुरी करिता पाठविण्यात आला आहे. सदर प्रस्तावात नगरपरिषद कार्यालयासाठी site no.२९ गट क्र. १७९ पै. मसोली १.३६ आर जागा आरक्षित करण्यात आली आहे. सदर प्रस्तावास अद्याप अंतिम मंजूरी प्राप्त झाली नाही.

**सबब, उपरोक्त प्रकरणी डहाणू नगरपरिषदेची इमारत ही अतिशय जीर्ण झालेली आहे. ती कधीही पडू शकते, त्यामुळे यासंदर्भातील केंद्र शासनाकडे असलेला प्रस्ताव जास्त काळ प्रलंबित ठेवणे योग्य होणार नाही. याबाबत राज्य शासनाने तातडीने पाठपुरावा करुन केंद्र शासनाकडून उक्त प्रस्तावास मंजूरी मिळण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी व डहाणू नगरपरिषदेच्या इमारतीचे बांधकाम लवकरात लवकर सुरु करण्यात यावे. अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

सन २०१५-२०१६ मध्ये महिला व बालकल्याण विभागाच्या योजनांवर २.१० लक्ष रुपये खर्च करण्यात आलेला आहे. परंतु अक्च्यूअली खर्च ६ लाखाच्या आसपास झालेला आहे. परंतु हा खर्च मार्च नंतर झालेला आहे. यामध्ये हळदीकुंकवासाठी महिलांना डबे देण्यासाठी २.९४ लक्ष रुपये खर्च केलेला आहे. परंतु हा खर्च मार्चनंतर झालेला असल्यामुळे हा खर्च सन २०१५-२०१६ मध्ये अंतर्भूत करता आलेला नाही. आतापर्यंत जो पैसा खर्च झालेला नाही तो पैसा शिल्लक आहे. शिल्लक पैसा इतरत्र वळवण्यात आलेला नाही. अशी समितीस माहिती दिली. महिला व बालकल्याण विभागाचा निधी अखर्चित का राहिला आहे ? सन २०१३-१४ मध्ये २ कोटी ८४ लक्ष रुपये उत्पन्न होते, ५ टक्के तरतूदीप्रमाणे १४ लक्ष २१ हजार रुपये होत असून फक्त ९३ हजार रुपये खर्च केले आहेत. त्याचप्रमणे सन २०१४-१५ मध्ये ८ लक्ष रुपये कमी खर्च केले आहेत. सन २०१५-१६ मध्ये १९ लक्ष रुपये कमी खर्च केले आहेत. शासन निर्णयानुसार ही रक्कम महिलांच्या योजनांसाठी का खर्च करण्यात आली नाही. अशी विचारणा केली असता, त्यावर मुख्याधिकारी यांनी यासंदर्भातील मी नियोजन केलेले आहे त्याबाबत कार्यवाही सुरु केलेली आहे. ही रक्कम मार्चपर्यंत खर्च करण्यात येईल. असे समितीस सांगितले.

**सबब, उपरोक्त प्रकरणी समिती डहाणू नगरपरिषद सन २०१२-१३, २०१३-१४ तसेच २०१४-१५ या वर्षातील महिलांच्या कल्याणकारी योजनांवर खर्च करावयाचा निधी महिलांच्या सबलीकरणासाठी खर्च न केल्यामुळे ज्या अधिकाऱ्यांने हा निधी खर्च केला नाही त्या संबंधित अधिकाऱ्याची चौकशी करुन त्यांच्याविरुध्द कठोर कारवाई करण्यात यावी. तसेच महिलांच्या कल्याणकारी योजनांवर खर्च करावयाचा निधी हा महिलांना हळदीकुंकु देण्यावर खर्च न करता त्यांना नवीन व्यवसायाभिमुख प्रशिक्षण देण्यावर खर्च करावा. अशी समितीची आग्रहाची शिफारस असून शासनाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला २ महिन्यात पाठविण्यात यावा.**

# परिशिष्ट - "अ"

## विभागाची माहिती

मालमत्ता विभाग, न.मुं.म.पा.

विषय - महिलांचे हक्क व कल्याण समितीने दि. 27 व 28 ऑक्टोंबर 2015 च्या कालावधीत नवी मुंबई महानगरपालिका येथे दिलेल्या भेट व बैठकीसंदर्भात विभागीय सचिवांची साक्ष.....(श्रीम. तृप्ता अरोरा यांच्या उत्पन्नाच्या दाखल्याबाबत.)

सादर-

1. मा.महाराष्ट्र विधानमंडळ महिलांचे हक्क व कल्याण समितीच्या दि.28/10/2015 रोजीच्या बैठकीमध्ये लाभार्थ्यांनी उत्पनाचा दाखला सादर करणे बंधनकारक आहे, परंतु श्रीम. तृप्ता अरोरा यांच्या उत्पनाचा दाखला नाही असा मुद्दा उपस्थित करण्यात आलेला आहे . त्याअनुषंगाने पुढीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

मा. महापालिका सर्वसाधारण सभेने ठराव क्र.535, दि.17 डिसेंबर, 2008 अन्वये सीबीडी, सेक्टर 3, राजीव गांधी मैदानात बांधलेल्या स्टेडिअम मधील दुकान गाळे भाडेपट्टयाने देणेबाबत मंजूरी देण्यात आलेली आहे. सदर ठरावानुसार राजीव गांधी स्टेडीयममधील दुकान/गाळे भाडेपट्टयाने देणेसाठी दि.07/02/2009 रोजीच्या दैनिक लोकमत या वृत्तपत्रात जाहीर सूचना प्रसिध्द करुन महानगरपालिकेने विकसित केलेल्या स्टेडियमधील 28 दुकान गाळयापैकी 08 दुकान गाळे भाडेतत्वावर देण्यासाठी निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्याअनुसार 08 दुकान गाळयांपैकी 04 दुकान गाळे आरक्षित करण्यात आलेले होते व 04 खुल्या प्रवर्गात ठेवण्यात आलेले होते. ते पुढील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | दुकान गाळे क्रमांक | एकुण गाळे | दुकान क्षेत्रफळ चौ.फुट | पायाभुत सुरक्षा अनामत रक्कम (रुपये) | प्रत्येक दुकान भाडे प्रतिमाह (रुपये) |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 2, 3 , 4, 6, 18, 20, 26 व 27 | 8 | 121 | 35,000/- | 3,000/- |

आरक्षण : 1) अ.जा 02 गाळे . (गाळा क्र.2 व 18)
2) अ.ज. 01 गाळा, (गाळा क्र.26)
3) अपंग - 01 गाळा (गाळा क्र.27) महिलांसाठी 30% समांतर अरक्षण महिला बचत गट व दारिद्रय रेषेखालील व्यक्तींना प्राधान्य देण्यात येईल.
तसेच 03, 04, 06 व 20 गाळे खुल्या प्रवर्गासाठी ठेवण्यात आलेले होते.

सदर निविदेतील अटी व शर्तीनुसार नुसार उपरोक्त गाळयांसाठी निविदेद्वारे देकार मागविण्यात आलेले होते. त्यामध्ये महानगरपालिकेने निश्चित केलेल्या पायाभूत सुरक्षा अनामत रक्कमेपेक्षा जास्तीत-जास्त देकार देतील अशा पात्र निविदाधारकास दुकान/गाळे लिव्ह ॲण्ड लायसन तत्वावर देण्याचे प्रस्तावित होते.

- <u>दुकान गाळे भाडेपट्टयाने मिळण्यासाठी निविदाकाराने खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करणे आवश्यक होते.</u>

अ) कंपनी कायदयाखालील नोंदणी कंपनी असल्यास,

1. मेमोरंडम आणि अर्टीकल ऑफ असोसिएशन
2. नोंदणीचे प्रमाणपत्र
3. निविदा प्रपत्रावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत केल्यासंबंधीच्या संचालक मंडळाच्या ठरावाची सत्यप्रत.

ब) अर्जदार भागीदारी संस्था असल्यास, पार्टनरशिप डीड आणि नोंदणीचे प्रमाणपत्राच्या सत्यप्रती.

क) अर्जदार पब्लिक ट्रस्ट असल्यास ट्रस्ट नोंदणीचे प्रमाणपत्र, ट्रस्ट डीड आणि निविदा प्रपत्रावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत केल्यासंबंधीच्या ट्रस्टच्या ठरावाची सत्यप्रत.

ड) अर्जदार अपंग, अनुसुचित जाती/जमाती, स्त्री असल्यास त्या त्या प्रवर्गासाठी आवश्यक असलेले कागदपत्र.

1. अपंग व्यक्तीसाठी अखिल भारतीय शारिरीक अपंग पुनर्वसन संस्थेचे 40% पेक्षा जास्त अपंग असलेबाबतचे प्रमाणपत्राची सत्यप्रत.
2. अनुसूचित जाती/जमातीसाठी सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्राची सत्यप्रत.
3. निवासाच्या पुराव्यासाठी शिधापत्रिका, दुरध्वनी देयक, विद्युत देयक, मतदार ओळखपत्र मालमत्ता कर देयकाची सत्यप्रत.
4. महाराष्ट्र 15 वर्ष वास्तव्य असलेबाबतचा पुरावा.
5. निविदेतील अटी/शर्तीची पुर्तता करणाऱ्या व स्पर्धात्मक देकार समान असणाऱ्या निविदाधारका मधील महापालिका मालमता कर भरणाऱ्या निविदाधारकास प्राधान्य देण्यात येईल.

सदर निविदा अटी व शर्तीमध्ये उत्पनाच्या दाखला सादर करण्या-या अटीचा समावेश नव्हता.
खुल्या गटातील गाळा क्र.04 साठी 03 निविदा प्राप्त झालेल्या होत्या. त्या पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नांव | पायाभुत सुरक्षा अनामत रक्कमेपक्षा स्पर्धात्मक नमुद केलेली सुरक्षा अनामत रक्कम. | सादर केलेली कागदपत्रे |
|---|---|---|---|
| 01 | श्रीम.तृप्ता श्रीकुमार अरोरा | 1,00,000/- | 1. देकारपत्र व मुळ निविदा<br>2. शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र.<br>3. माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र<br>4. रेशनकार्ड<br>5. पॅनकार्ड<br>6. बृहन्मुबई महापालिकेने दिले जन्म दाखला. |
| 02 | श्रीम.पुजा जितेंद्र रोंदळे | 40,000/- | 1. देकारपत्र<br>2. पॅनकार्ड<br>3. रेशनकार्ड |
| 03 | श्रीम.प्रिती अरुण जाधव | 1,00,000/- | 1. देकारपत्र<br>2. निवडणुक ओळखपत्र<br>3. रेशनकार्ड |

यावे व त्याचे वाटप संबंधित गटात होईल याची दक्षता घेण्यात यावी. असे गाळे वाटप करताना गाळे बांधण्यासाठी आलेल्या खर्चाची रक्कम मोबदला स्वरुपात ना-नफा-ना-तोटा या तत्वात घेऊन गाळे हस्तांतरण करण्याची कार्यवाही करण्यात यावी." अशा सूचना आहेत.

उक्त परिपत्राकाद्वारे **वैयक्तिक महिलांसाठी आरक्षण ठेवण्याची तरतूद नाही.** मात्र, बचत गटासमवेतच अपंग व महिला-सक्षमिकरण व्हावे म्हणून महापालिकेने निर्माण केलेल्या 142 दुकान गाळयापैकी 42 दुकान गाळे स्थानिक महिला/बचत गट महिला व अपंग महिला यांना "लिव्ह ॲण्ड लायसन" तत्वावर भाडेपट्टयाने देणेसाठी खालीलप्रमाणे ऑनलाई. अभिव्यक्ती सूचना (Expression of interest) मागविण्यात आलेल्या आहेत.

| अ.क्र. | जाहीरात दिनांक | प्रसिध्द केलेल्या वृतपत्राचे नांव |
|---|---|---|
| 1 | दि.24/11/2016 प्रथम जाहिरात | दै.आपले महानगर व दै.मुंबई लक्षदिप |
| 2 | दि.8/12/2016 (शुद्धीपत्रक) | दै.आपले महानगर व दै.मुंबई लक्षदिप |
| 3 | दि.5/1/2017 दुसरी जाहीरात | दै.आपले महानगर व दै.पुण्यनगरी |
| 3.1 | दि.24/1/2017 दुस-या जाहिरातीस प्रथम मुदतवाढ | दै.आपले महानगर व दै.पुण्यनगरी |
| 3.2 | दि.3/2/2017 दुस-या जाहिरातीस दुसरी मुदतवाढ | दै.आपले महानगर व दै.पुण्यनगरी |
| 3.3 | दि.22/2/2017 दुस-या जाहिरातीस तृतीय मुदतवाढ | दै.आपले महानगर व दै.पुण्यनगरी |

उक्त जाहीरातीनुसार प्राप्त निविदांच्या अनुषंगाने, निविदा प्रक्रिया कार्यालयीन प्रणालित आहे.

तरी , 1) महिलांचे सक्षमिकरण व बालकल्याण यांस, नवी मुंबई महानगरपालिकेने नेहमीच प्राधान्य दिलेले आहे. शासनाचे महिला धोरण 2001 यास अनुसरुन नगरविकास विभागाचे शासन परिपत्रक दि. 22 नोव्हेंबर 2001 हे, महिलांच्या स्वयंसहाय्यक गटासाठी असल्याने व श्रीम. तृप्ता अरोरा यांना खुल्या प्रवर्गासाठीच्या सर्वसाधारण गटातून गाळा वितरित करण्यात आला असल्यामुळे, सदरचे परिपत्रक लागू होत नाही. सबब, दि.28/10/2015 रोजीच्या मा.महाराष्ट्र विधानमंडळ महिलांचे हक्क व कल्याण समितीच्या बैठकीतील " श्रीम. तृप्ता अरोरा यांना गाळेवाटप करताना उत्पन्नाचा दाखला घेतला नाही." या संदर्भातील मुद्दा वगळणेस विनंती आहे."

2) तसेच शासनाचे महिला धोरण 2001 यास अनुसरुन नगरविकास विभागाचे शासन परिपत्रक दि. 22 नोव्हेंबर 2001 नुसार महिलांच्या स्वयंसहाय्यक गटासाठी महापालिकेने केलेली कार्यवाही मा.महाराष्ट्र विधानमंडळ महिलांचे हक्क व कल्याण समितीच्या अवलोकनार्थ सविनय सादर.

14.6.17

आयुक्त
नवी मुंबई महानगरपालिका

***

स्वयंसहाय्यता गटामार्फत महिलांचा आर्थिक सक्षमीकरण [illegible]

महाराष्ट्र शासन,
नगर विकास विभाग,
शासन परिपत्रक क्र. संकीर्ण १०/२००१/६६/ प्र.क्र.२२/ नवि -२७
मंत्रालय -४०० ०३२. दिनांक २२ नोव्हेंबर २००१

शासन परिपत्रक

शासनाने महिला धोरण, २००१ जारी केले असून यामध्ये महिलांचा सहभाग, त्यांना संरक्षण, त्यांची आर्थिक उन्नती, त्यांच्या क्षमतेचे संवर्धन आणि या सर्वांसाठी अनुकूल वातावरण निर्मिती तसेच सन २००२-०३ या आर्थिक वर्षापासून महिलांना केंद्रीभूत मानून नियोजन केले जाईल या बाबींचा महिला धोरणात समावेश आहे. त्याच बरोबर विविध क्षेत्रात महिलांच्या स्वयंसहाय्यता गटांची स्थापना, तसेच त्यांची कार्यक्षमता, कौशल्य वाढविण्याच्या कार्यक्रमास प्राधान्य दिले जाईल, ही बाब समाविष्ट आहे.

०२. शासनाच्या महिला धोरणाच्या अनुषंगाने नगरपरिषदा/ महानगरपालिका यांना कळविण्यात येते की; नगरपरिषदांनी / महानगरपालिकांनी शहरी सुवर्ण जयंती रोजगार योजनेंतर्गत महिलांच्या स्वयंसहाय्यता गटांची स्थापना वाढविण्याच्या कार्यक्रमास प्राधान्य देण्यात यावे, यामध्ये आदिवासी महिला, मागासवर्गीय, आपद्ग्रस्त आणि शहरी महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करण्यावर विशेष भर देण्यात यावा. यासाठी महिला व त्यांच्या गटांसाठी नगरपरिषदा व महानगरपालिकामार्फत निर्माण करण्यात येत असलेल्या व्यापारी संकुलातील वितरीत होणाऱ्या गाळ्यापैकी ३०% गाळे महिलांच्या स्वयंसहाय्यीत गटांसाठी राखून ठेवण्यात यावे व त्यांचे वाटप संबंधित गटात होईल याची दक्षता घेण्यात यावी. असे गाळे वाटप करताना गाळे बांधण्यासाठी आलेल्या खर्चाची रक्कम मोबदला स्वरूपात ना नफा ना तोटा या तत्वात घेवून गाळे हस्तांतर करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

**३ (अ) (२) भारतीय नागरीकत्व आणि महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र** :—उमेदवार भारताचा नागरीक असावा आणि महाराष्ट्रात १५ वर्ष अधिवास (Domicile) करत असल्याबद्दल सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्र त्याने अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

**३ (अ) (३) संगणक हाताळणी/वापराबाबतच्या ज्ञानाची आवश्यकता** :—परिशिष्ट-२ मध्ये विहित केलेल्या अर्हतेव्यतिरिक्त वाहनचालक आणि श्रेणी-४ ची पदे वगळून इतर सर्व पदावरील नेमणूकीसाठी/पदोन्नतीसाठी शासन वेळोवेळी आदेश काढून निश्चित करेल असे संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान, एक अतिरिक्त आवश्यक अर्हता असेल.

**३ (ब) वयोमर्यादा** :—महानगरपालिकेतील कोणत्याही पदावर नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी किमान वयाची अट १८ वर्षे पूर्ण व कमाल वयोमर्यादा ' परिशिष्ट-२ ' मध्ये संबधित पदासमोर नमूद केल्यानुसार असेल. कमाल वयोमर्यादा विहित केली नसेल अशा पदांच्याबाबत ती प्रचलित शासन धोरणाप्रमाणे असेल. सामाजिक आरक्षण लागू असणा-या प्रवर्गाकरीता प्रचलित शासन निर्णयानुसार वयोमर्यादा शिथिलक्षम असेल. तसेच पदोन्नतीसाठी कमाल वयोमर्यादेची अट लागू राहणार नाही.

**४. पदोन्नती व नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नियुक्त्यांचे प्रमाण :—**

४.१ श्रेणी १ व श्रेणी २ पदांवरील नियुक्तीसाठी पदोन्नती व नामनिर्देशनाचे प्रमाण ५०:५० असे राहील.

४.२ श्रेणी-३ मधील कनिष्ठ संवर्गातून श्रेणी-३ मधील वरिष्ठ संवर्गात पदोन्नती देतांना वरिष्ठ संवर्गातील एकूण पदसंख्येच्या ५०% पदे पदोन्नतीने भरण्यात येतील व उर्वरीत ५०% पदे नामनिर्देशनाने भरण्यात येतील.

४.३ श्रेणी-४ मधून श्रेणी-३ मध्ये पदोन्नती देतांना संबधित संवर्गातील २५% पदे पदोन्नतीने व ७५% पदे नामनिर्देशनाने भरण्यात येतील.

४.४ श्रेणी-४ मधील कनिष्ठ संवर्गातून श्रेणी-४ मधील वरिष्ठ संवर्गात पदोन्नती देतांना वरिष्ठ संवर्गातील एकूण पदसंख्येच्या ७५% पदे पदोन्नतीने भरण्यात येतील व उर्वरीत २५% पदे नामनिर्देशनाने भरण्यात येतील.

४.५ श्रेणी-४ मधील ज्या पदांना पदोन्नती करिता निम्न दर्जाचे पद उपलब्ध नसेल अशी पदे १००% नामनिर्देशनाने भरण्यात येतील.

४.६ पदोन्नतीच्या साखळीतील एकाकी पद सामान्यतः पदोन्नतीने भरण्यात येईल. तथापि, विशिष्ट अर्हता आवश्यक असलेल्या एकाकी पदावर पदोन्नतीने नियुक्तीसाठी उमेदवार उपलब्ध नसल्यास ते पद प्रतिनियुक्ती किंवा नामनिर्देशनाने भरता येईल.

महाराष्ट्र शासन राजपत्र भाग दोन-संकीर्ण सूचना व जाहिराती, गुरुवार ते बुधवार,
डिसेंबर १६-२२, २०१०/अग्रहायण २५-पौष १, शके १९३२

969

## कल्याण-डोंबिवली शहर महानगरपालिका

क्रमांक कडोंमपा/सा. प्र. मुका/११०३

### परिशिष्ट १

### मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९

क्रमांक मसेप्र-२००७/नवि-२३.—मुंबई महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ४५६ (अ) व या अधिनियमातील लागू असलेल्या अन्य तरतुदीद्वारे मिळालेल्या शक्तींचा वापर करून तसेच कल्याण डोंबिवली शहर महानगरपालिकेमध्ये अंमलात असलेले सध्याचे सर्व सेवाप्रवेश नियम तसेच [illegible] दिनांक २ जुलै २००८ नुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ४५७ (३) नुसार कल्याण डोंबिवली शहर महानगरपालिकेने तयार केलेल्या सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१० यांस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ४५४, ४५५ अन्वये शासनास प्राप्त असलेल्या अधिकारानुसार कल्याण डोंबिवली शहर महानगरपालिकेस विविध पदांवर करावयाच्या नियुक्तीचे नियमन व सेवांचे वर्गीकरण करण्यांसाठी खालील नियम करीत आहे. महाराष्ट्र शासन याद्वारे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील तरतुदीनुसार, महानगरपालिकेमधील विविध पदांवर करावयाच्या नियुक्यांचे नियमन व सेवांचे वर्गीकरण करण्यासाठी खालीलप्रमाणे नियम करीत आहे :—

#### नियम

१. **संक्षिप्त नाव प्रारंभ व व्याप्ती.—**

१.१. या नियमांना "कल्याण डोंबिवली शहर महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१०" असे संबोधण्यात येईल.

१.२. हे नियम अंतिमरित्या **राजपत्रात** प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून अंमलात येतील.

१.३. हे नियम कल्याण डोंबिवली शहर महानगरपालिकेमधील सर्व पदांवरील नियुक्त्यांना लागू होतील ; मात्र अन्यथा नमूद केले नसल्यास अंशकालीक स्वरुपाच्या नियुक्त्या, कंत्राटी पध्दतीने किंवा रोजंदारी तत्वावरील नियुक्त्या तसेच मानसेवी स्वरुपाच्या नियुक्त्यांना लागू होणार नाहीत.

२. **(अ) व्याख्या.**—विषय किंवा संदर्भानुसार अन्य अर्थ अभिप्रेत नसल्यास या नियमांसाठी,–

२ (अ) (१) "अधिनियम" म्हणजे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९).

२ (अ) (२) "परिशिष्ट" म्हणजे या नियमांना जोडलेली परिशिष्टे.

२ (अ) (३) "नियुक्ती प्राधिकारी" म्हणजे अधिनियमाच्या कलम ५३ च्या पोट-कलमे (१) ते (३) च्या तरतुदीप्रमाणे नियुक्ती देण्यास सक्षम असलेला अधिकारी.

२ (अ) (४) "संवर्ग" म्हणजे एखाद्या सेवेतील किंवा एखाद्या सेवेच्या भागातील स्वतंत्र घटक म्हणून मंजूर केलेल्या "कायम, त्याचप्रमाणे हंगामी" शासनमान्य पदांचा समूह.

२ (अ) (५) "कर्मचारी" म्हणजे या नियमांच्या परिशिष्टात नमूद केलेले महानगरपालिका अधिकारी किंवा कर्मचारी.

२ (अ) (६) "शासन" म्हणजे महाराष्ट्र शासन.

२ (अ) (७) "एकीकृत संवर्ग" म्हणजे विविध पदांच्या कर्तव्याचे स्वरुप, ती पदे धारण करण्यासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव व वेतनश्रेणी यांचा सारासार विचार करुन सेवा नियमासाठी एकिकृत केलेला संवर्ग.

२ (अ) (८) "महानगरपालिका" म्हणजे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या तरतूदीअन्वये निर्माण केलेली "कल्याण डोंबिवली शहर महानगरपालिका".

२ (अ) (९) "अर्हताप्राप्त कर्मचारी" म्हणजे या नियमाच्या परिशिष्ट-२ मध्ये विहित केलेली अर्हता धारण करणारे कर्मचारी.

२. **(ब) सेवांचे वर्गीकरण—(Classification of Services)—**

२ (ब) (१) **प्रशासकीय संवर्ग आणि प्रशासकीय सेवा.—(अ) सामान्य प्रशासन व महसूल सेवा** :–अतिरिक्त आयुक्त, उप आयुक्त, सहा.आयुक्त, प्रभाग क्षेत्र अधिकारी, कामगार अधिकारी, अधीक्षक, वरिष्ठ लिपिक, लिपिक कर निर्धारक व संकलक, उप कर निर्धारक व संकलक, कर निरीक्षक, विधी अधिकारी, सुरक्षा अधिकारी, समाजकल्याण अधिकारी, समाज विकास अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, क्रिडा अधिकारी व तत्सम सेवांना प्रशासकीय सेवा संबोधण्यात येईल.

**(ब) महापालिका सचिवालय सेवा.**—सचिव, उप सचिव, लघुलेखक व तत्सम यांना महापालिका सचिवालय सेवा संबोधण्यात येईल.

**(ब) (२) वित्त -लेखा संवर्ग आणि लेखा सेवा.—(अ) लेखा व वित्त सेवा** :–मुख्य लेखा अधिकारी, लेखा अधिकारी, लेखापाल, उप लेखापाल, वरिष्ठ लिपिक (लेखा) व तत्सम अशा पदांना लेखा व वित्त सेवा संबोधण्यात येईल. यामध्ये महानगरपालिकेच्या आर्थिक व्यवस्थापनाशी संबधीत (अर्थसंकल्प, लेखा, खर्च व्यवस्थापन इ.) सेवा यांचा समावेश असेल.

dire recrutment class 1-4

## कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

### मागावर्गीयांचा सरळसेवा अनुशेष दि.१/१/२०१७ रोजीची स्थिती

| अ.क्र. | संवर्गाचे नांव | मंजूर पदे | भर लेली पदे | वर्ग | टक्केवारीने आवश्यक आरक्षण | | | | | | | | | | | दि.३१/१२/२०१६ पर्यंत भरलेला अनुशेष | | | | | | | | | | | वर्ग शिल्लक अनुशेष | | | | | | | | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | अनु. जा ती | अनु. ज मा ती | वि जा अ | भ ज ब | भ ज क | भ ज ड | अ.ब.क.ड एकूण | इमाव | विमाप्र | खुला | एकूण | अनु. जा ती | अनु. ज मा ती | विजा अ | भ ज ब | भ ज क | भ ज ड | अ.ब.क.ड एकूण | इमाव | विमाप्र | खुला | एकूण | अनु. जा ती | अनु. ज मा ती | विजा अ | भ ज ब | भ ज क | भज ड | अ.ब.क.ड एकूण | इमाव | विमाप्र | खुला | एकूण | |
| १ | वैद्यकीय अधिकारी | [redacted] | ५४ | २ | १५ | ८ | ४ | ३ | ४ | २ | १३ | २२ | २ | ५५ | [redacted] | ११ | ४ | ३ | २ | ० | २ | ७ | ७ | २ | २३ | [redacted] | ४ | ४ | १ | १ | ४ | ० | ६ | १५ | ० | ३२ | [redacted] | |
| २ | प्रभागक्षेत्र अधिकारी/सहा. आयुक्त समकक्ष | [redacted] | २ | २ | २ | १ | ० | ० | १ | ० | १ | ३ | ० | ७ | [redacted] | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | १ | १ | ० | ० | १ | ० | १ | ३ | ० | ६ | [redacted] | प्र.नि.५ |
| ३ | सहा.सार्व आरोग्य अधिकारी | [redacted] | १ | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | [redacted] | |
| ४ | नगररचनाकार | [redacted] | ० | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | [redacted] | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | |
| ५ | उप अभियंता | [redacted] | १ | २ | २ | १ | १ | ० | १ | ० | २ | ३ | ० | ८ | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | [redacted] | २ | १ | १ | ० | १ | ० | २ | २ | ० | ८ | [redacted] | |
| ६ | मुख्य उद्यान अधिक्षक | [redacted] | १ | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | [redacted] | |
| ७ | सिस्टीम ॲनालिस्ट | [redacted] | ० | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | |
| ८ | शिक्षणाधिकारी | [redacted] | ० | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | | ० | ० | १ | [redacted] | |
| | एकूण | १५१ | ५९ | २ | २० | १० | ५ | ३ | ६ | २ | १६ | २८ | २ | ७५ | १५१ | १२ | ४ | ३ | २ | ० | २ | ७ | ८ | २ | २६ | ५९ | ८ | ६ | २ | १ | ६ | ० | ९ | २० | ० | ४९ | ९२ | प्र.नि.५ |

{( ) अतिरिक्त पदे, (प्र.नि.) प्रति नियुक्ती}

सहा.आयुक्त – ५ पदे प्रतिनियुक्तीने कार्यरत

लिपिक
मागासवर्ग कक्ष

वरिष्ठ लिपिक
मागासवर्ग कक्ष

अधिक्षक(साप्र)
कल्याण डोंबिवली महानगरपालिका

सहा. आयुक्त(साप्र)
कल्याण डोंबिवली महानगरपालिका

अध्यक्ष
मागासवर्ग कक्ष

उप आयुक्त(साप्र)
कल्याण डोंबिवली महानगरपालिका

993

dire recrutment class 1-4

## कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

### मागासवर्गीयांचा सरळसेवा अनुशेष दि.१/१/२०१७ रोजीची स्थिती

| अ.क. | संवर्गाचे नांव | मंजूर पदे | भर लेली पदे | वर्ग | टक्केवारीने आवश्यक आरक्षण | | | | | | | | | | | दि.३१/१२/२०१६ पर्यंत भरलेला अनुशेष | | | | | | | | | | | वर्ग शिल्लक अनुशेष | | | | | | | | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | अनु. जाती | अनु. जमाती | विजा अ | भज ब | भज क | भज ड | अ.ब.क.ड.ए कूण | इमाव | विमाप्र | खुला | एकूण | अनु. जाती | अनु. ज माती | विजा अ | भज ब | भज क | भज ड | अ.ब.क.ड एकूण | इमाव | विमाप्र | खुला | एकूण | अनु. जाती | अनु. ज माती | विजा अ | भज ब | भज क | भज ड | अ.ब.क.ड एकूण | इमाव | विमाप्र | खुला | एकूण | |
| १ | [illegible] आरोग्य अधिकारी | [redacted] | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | |
| २ | [illegible] वैद्यकीय अधिकारी | [redacted] | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | |
| ३ | सहाय्यक संचालक नगररचना | [redacted] | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | प्र.नि.१ |
| ४ | कार्यकारी अभियंता | [redacted] | ० | १ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | [redacted] | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ | [redacted] | |
| ५ | उप आयुक्त | [redacted] | १ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | [redacted] | प्र.नि.३ |
| ६ | सिस्टीम मॅनेजर | [redacted] | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | |
| ७ | मुख्य लेखा परिक्षक | [redacted] | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | प्र.नि.१ |
| ८ | मुख्य लेखा अधिकारी | [redacted] | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | प्र.नि.१ |
| ९ | विशेष कार्य अधिकारी | [redacted] | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | |
| १० | कामगार अधिकारी | [redacted] | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | |
| ११ | प्रकल्प व्यवस्थापक तथा आर.सी.एच. ऑफिसर | [redacted] | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | |
| १२ | प्रशासन अधिकारी (शिक्षण विभाग) | [redacted] | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | |
| | एकूण | [redacted] | १ | १ | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १४ | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १३ | [redacted] | प्र.नि.६ |

(–)अतिरिक्त कार्यरत पद, (प्र.नि.) प्रति नियुक्ती

उप आयुक्त–३,मुख्य लेखा अधिकारी–१,मुख्य लेखा परीक्षक–१,सहा.संचालक नगररचना१एकूण ६ पदे प्रतिनियुक्तीने कार्यरत

लिपिक
मागासवर्ग कक्ष

वरिष्ठ लिपिक
मागासवर्ग कक्ष

अधिक्षक(साप्र)
कल्याण डोंबिवली महानगरपालिका

सहा. आयुक्त(साप्र)
कल्याण डोंबिवली महानगरपालिका

अधिक्षक
मागासवर्ग कक्ष

उप आयुक्त(साप्र)
कल्याण डोंबिवली महानगरपालिका

१०. **महानगरपालिका सेवेतील पदांवर आरक्षण.**—महानगरपालिका सेवतील पदांना शासनाच्या प्रचलित धोरणानुसार आरक्षण लागू असेल. यामध्ये मागासवर्गीयांसाठी आरक्षण (सामाजिक आरक्षण), विशेष/समांतर आरक्षण, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, अपंग, महिला खेळाडू इ.साठीच्या आरक्षणाचा समावेश असेल.

११. **शारीरिक पात्रता प्रमाणपत्र आणि चारित्र्य पडताळणी अहवाल.**—महापालिका सेवेतील कोणत्याही पदावरील नामनिर्देशनाने नियुक्ती:-

११.१ महापालिकेच्या सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्याचे विहित नमुन्यातील आरोग्यविषयक वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केल्यानंतर या आणि

११.२ उमेदवाराच्या पूर्वचारित्र्य पडताळणीबाबत (Verification of Anteecedents) सक्षम प्राधिकाऱ्याकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर केली जाईल.

१२. **प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष दबावतंत्राचा वापर.**—कोणत्याही उमेदवाराच्या नियुक्ती संदर्भात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रित्या दबाव आणण्याचा केलेला प्रयत्न हा त्या उमेदवाराला त्या पदावरील नियुक्तीसाठी अनर्ह करणारा ठरेल.

१३. हे नियम अस्तित्वात येण्यापूर्वी विहित मार्गाने झालेल्या सरळसेवा नियुक्त्यांना व पदोन्नत्यांना शासनाने अन्यथा वेगळे लेखी कारणे नमूद करुन निर्देश दिले नसतील तर या नियमातील तरतूदीमुळे बाधा येणार नाही.

१४. वेळोवेळी सेवाभरती/आरक्षण/वयोमर्यादा इ.बाबत निर्देश देणारे राज्यशासनाचे नियम, अधिनियम, निर्णय व न्यायनिर्णय यानुसार ह्या नियमात सुधारणा (Amendment) करण्यात येईपर्यंत शासन निर्णय/न्याय निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने

मनु कुमार श्रीवास्तव,
शासनाचे सचिव.

**४. (ब) पदोन्नतीने नेमणूक करणे** :—पदोन्नतीने करावयाची कोणतीही नियुक्ती, " जेष्ठता -नि- पात्रता " या तत्वावर, अर्हताप्राप्त कर्मचाऱ्यांमधून केली जाईल. मु.प्रा.मनपा अधिनियम, १९४९ मधील कलम ४५ अंतर्गत येणारी पदे पदोन्नतीने भरावयाची झाल्यास त्यास शासनाची पूर्व मंजुरी आवश्यक राहील. या व्यतिरिक्त (कलम ४५ व्यतिरिक्त) श्रेणी १ मधील कोणतेही पद पदोन्नतीने भरताना शासनाची पूर्व मंजुरी घेणे आवश्यक राहील.

**५. नामनिर्देशनाने/प्रतिनियुक्तीने नेमणूक.**— या नियमांमध्ये विहित केलेल्या अर्हतेनुसार नामनिर्देशनाने भरती करताना मुं.प्रा.म.न.पा. अधिनियम १९४९ मधील कलम ४५,५१,५३ व ५४ मधील कार्यपध्दती अवलंबीली जाईल. ज्या पदांवर प्रतिनियुक्तीद्वारे नेमणूक करण्याची तरतूद आहे अशी पदे केंद्र शासन, राज्य शासन, इतर स्थानिक स्वराज्य संस्था वा स्थानिक प्राधिकरणातील अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीने भरता येतील. **नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करावयाचे पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्याचा अधिकार राज्य शासनास राहील. शासनाच्या समकक्ष संवर्गातून प्रथमतः ३ वर्षाच्या कालावधीसाठी** प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येईल व अशी नियुक्ती महानगरपालिकेने केली असल्याचे समजण्यात येईल व ती महानगरपालिकेवर बंधनकारक राहील. प्रतिनियुक्तीने नियुक्ती केलेल्या अधिकाऱ्याची सेवा शासनास आवश्यक असल्यास त्यांची प्रतिनियुक्ती तीन वर्षाचा कालावधी संपण्यापूर्वी संपुष्टात आणण्यात येईल.

**६. अन्य महानगरपालिकेतून कल्याण-डोंबिवली शहर महानगरपालिकेत बदलीने नियुक्ती.**—या नियमात अन्यत्र काहीही नमूद केले असले तरी, अन्य महानगरपालिकेतील कर्मचाऱ्याने कल्याण डोंबिवली शहर महानगरपालिकेतील पदावर बदलीने नियुक्तीसाठी अर्ज सादर केल्यास, अधिनियमातील तरतुदीनुसार व दोन्ही महानगरपालिकांतील नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या परस्पर संमतीने मान्य होतील अशा अटी व शर्तींवर, खालील बाबींच्या अधीन राहून बदलीने नियुक्ती देता येईल.

६.१ पदोन्नतीने भरण्यात येणाऱ्या पदांवर बदलीने नियुक्ती करण्यात येणार नाही. फक्त नामनिर्देशनाने नियुक्तीकरीता राखून ठेवण्यात आलेल्या रिक्त पदांवर बदलीने नियुक्ती करण्यात यावी.

६.२ अशी नियुक्ती झाल्यानंतर त्या पदधारकाची ज्येष्ठता नियुक्तीच्या दिनांकास त्या पदाच्या संवर्गात सर्वात कनिष्ठ (Zero Seniority) राहील.

६.३ श्रेणी-१ व २ मधील अधिका-यांच्या बाबत एका महानगरपालिकेतून दुसऱ्या महानगरपालिकेत बदलीचा निर्णय दोन्ही महानगरपालिकांच्या परस्पर संमतीने निश्चित अटी व शर्तींवर शासन मान्यतेने घेतला जाईल.

**७. परिविक्षाधीन कालावधी.**- श्रेणी-१, श्रेणी-२ मध्ये नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांसाठी त्यांच्या नेमणूकीच्या मूळ दिनांकापासून दोन वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी असेल. अशा उमेदवाराचे परिविक्षाधीन कालावधीतील काम समाधानकारक नसल्यास अपवादात्मक बाब म्हणून आणि तत्संबंधी कारणे नमूद करुन परीक्षा कालावधी पुढील १ वर्षापर्यंत वाढविता येईल. तद्नंतरही या वाढीव कालावधीत काम समाधानकारक नसल्यास सदर व्यक्तीची सेवा समाप्त करण्यात येईल.

**८. भाषा परिक्षा, विभागीय परीक्षा व प्रशिक्षण.**—महापालिका सेवेतील पदांवर नेमणूक करण्यात आलेल्या किंवा त्यासाठी निवडण्यात आलेल्या उमेदवारांनी—

८.१ विहित करण्यात येतील अशा भाषा परिक्षा आणि/किंवा चाचण्या उत्तीर्ण होणे किंवा त्यांना विहीत नियमानुसार यापैकी कोणतीही परिक्षा पास होण्यापासून सूट मिळणे आवश्यक असेल.

८.२ **परिशिष्ट-३** अन्वये विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अथवा अशी परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळविणं आवश्यक असेल.

८.३ वेळोवेळी ठरवून देण्यात येईल असे सेवा प्रवेशपूर्व आणि/किंवा सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण घेणेसुध्दा आवश्यक असेल.

**९. महानगरपालिका सेवेतील पदावर नियुक्तीसाठी अनर्हता.**—एखाद्या व्यक्तीस :—

९.१ अधिनियमाच्या कलम ५९ च्या तरतुदीप्रमाणे अनर्ह ठरविण्यात आले असेल.

९.२ महापालिकेच्या सेवेतून किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या सेवेतून किंवा कोणत्याही सरकारी सेवेतून गैरवर्तणूकीबद्दल बडतर्फ करण्यात आले असेल, किंवा.

९.३ जर त्याच्या एकापेक्षा अधिक पत्नी हयात असतील आणि स्त्री उमेदवारांच्या बाबतीत जर तिने ज्याची पत्नी हयात आहे अशा व्यक्तीशी विवाह केला असेल, किंवा

९.४ जर त्यास/तीस विहीत दिनांक नंतर दोन पेक्षा अधिक हयात अपत्य असतील, किंवा

९.५ न्यायालयात ज्या गुन्ह्यासाठी कैदेची शिक्षा फर्मावता येते, अशा गुन्ह्यासाठी सहा महिन्याहून अधिक मुदतीची कैदेची शिक्षा झाली असेल व ती शिक्षा अपील वा पुनरीक्षणात रद्द झाली नसेल, अशी व्यक्ती किंवा

९.६ महापालिकेच्या सेवेत असतांना सिध्दापराध होऊन सहा महिन्यांपेक्षा अधिक मुदतीची कैदेची शिक्षा झाली असेल व ती शिक्षा अपील वा पुनरीक्षणात रद्द झाली नसेल, अशा व्यक्ती महापालिकेच्या सेवेत नेमणुक देण्यास वा नेमणूक चालू ठेवण्यास अपात्र समजली जाईल.

dire recrutment class 1-4

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९ | स्टाफ नर्स | | ६१ | ३ | ९ | ५ | २ | २ | ३ | १ | ६ | १४ | १ | ३५ | | १० | २ | ० | १ | २ | १ | ४ | ११ | १ | ३३ | | ४ | ३ | २ | १ | १ | ० | ४ | ३ | ० | २ |
| २० | प्रयोगशाळा चाचणी तंत्रज्ञ | | १३ | ३ | २ | १ | १ | ० | ० | ० | १ | २ | ० | ७ | | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ४ | ० | ७ | | १ | ० | १ | ० | ० | ० | १ | २ | ० | ० |
| २१ | नेत्र चिकीत्सक सहा. | | २ | ३ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ० | ० | | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ० | १ |
| २२ | लघुलेखक निम्मश्रेणी | | ९ | ३ | १ | १ | १ | ० | ० | ० | १ | २ | ० | ६ | | १ | २ | ० | ० | ० | ० | ० | २ | ० | ४ | | ० | १ | १ | ० | ० | ० | १ | ० | ० | २ |
| २३ | ड्राफस्मन कम ट्रेसर | | ० | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| २४ | पर्यवेक्षक | | ११ | ३ | ५ | ३ | १ | १ | १ | १ | ४ | ८ | १ | २१ | | २ | ० | ० | १ | ० | १ | २ | १ | ० | ६ | | ३ | ३ | १ | ० | १ | ० | २ | ७ | १ | १५ |
| २५ | आरोग्य निरिक्षक | | ११ | ३ | २ | १ | १ | १ | ० | ० | २ | ३ | ० | ८ | | १ | २ | १ | ० | ० | ० | १ | २ | ० | ५ | | १ | १ | ० | १ | ० | ० | १ | १ | ० | ३ |
| २६ | मार्केट इन्स्पेक्टर | | ० | ३ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| २७ | ग्रंथपाल | | २ | ३ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| २८ | ड्रायव्हर कम ऑपरेटर | | ५ | ३ | २ | १ | १ | ० | ० | ० | १ | ३ | ० | ८ | | २ | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | | ० | १ | १ | ० | ० | ० | १ | ३ | ० | ७ |
| २९ | हेल्थ व्हिजीटर कम लेप्रसी टेक्नीशियन | | १ | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३० | लिडिंग फायरमन | | ६ | ३ | २ | १ | १ | १ | ० | ० | २ | २ | ० | ८ | | १ | ३ | ० | ० | ० | ० | ० | २ | ० | ० | | १ | २ | १ | १ | ० | ० | २ | ० | ० | ८ |
| ३१ | इलेक्ट्रीशियन | | २ | ३ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| ३२ | कॉम्प्युटर ऑपरेटर | | १३ | ३ | १ | १ | १ | ० | ० | ० | १ | ० | ० | ४ | | १ | २ | १ | १ | ० | ० | २ | १ | ० | ७ | | ० | १ | ० | १ | ० | ० | १ | १ | ० | ३ |
| ३३ | सर्व्हेअर | | १४ | ३ | २ | १ | १ | १ | ० | ० | २ | ४ | ० | १० | | २ | ४ | १ | १ | ० | ० | २ | २ | १ | ३ | | ० | ३ | ० | ० | ० | ० | ० | २ | १ | ७ |
| ३४ | एम.पी.डब्ल्यु. | | ११ | ३ | १ | १ | ० | ० | १ | ० | २ | २ | ० | ५ | | १ | २ | ० | ० | १ | ० | १ | १ | ० | ६ | | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ |
| ३५ | औषध निर्माता | | १४ | ३ | २ | १ | १ | १ | ० | ० | २ | ४ | ० | १० | | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ५ | १ | ५ | | १ | १ | १ | १ | ० | ० | २ | १ | १ | ५ |
| ३६ | कनिष्ठ लिपिक/ टंक लेखक तथा संगणक चालक | | २७० | ३ | ५५ | ३० | १३ | १० | १५ | ८ | ४६ | ८० | ८ | २०४ | | ३५ | ५९ | ८ | ५ | ७ | १ | २१ | २४ | ४२ | ८९ | | २० | २९ | ५ | ५ | ८ | ७ | २५ | ४६ | ३४ | ११५ |
| ३७ | ट्रेसर (आरेखक) | | १० | ३ | १ | १ | १ | ० | ० | ० | १ | २ | ० | ६ | | १ | २ | १ | ० | ० | ० | १ | १ | १ | ४ | | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | २ |
| ३८ | मेकॅनिक (डिझेल/पेट्रोल) | | १ | ३ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ३९ | [illegible]गमन | | २१ | ३ | ५ | ३ | १ | १ | १ | १ | ४ | ७ | १ | २० | | १ | ७ | ० | १ | १ | १ | ३ | ० | ० | १० | | ४ | ४ | १ | ० | ० | ० | १ | ७ | १ | १० |
| ४० | [illegible]गमन | | ६० | ३ | १५ | ८ | ३ | ३ | ४ | २ | १२ | २१ | २ | ५४ | | ५ | १३ | २ | २ | ० | २ | ६ | १ | २ | ३३ | | १० | ५ | १ | १ | ४ | ० | ६ | २० | ० | २१ |
| ४१ | [illegible]फोन ऑपरेटर | | २ | ३ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ | | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| ४२ | सब सॅनिटरी इन्स्पेक्टर | | ० | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |

dire recrutment class 1-4

## कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

### मागासवर्गीयांचा सरळसेवा अनुशेष दि.१/१/२०१७ रोजीची स्थिती

| अ.क्र. | संवर्गाचे नांव | मंजूर पदे | भर लेली पदे | वर्ग | टक्केवारीने आवश्यक आरक्षण | | | | | | | | | | | दि.३१/१२/२०१६ पर्यंत भरलेला अनुशेष | | | | | | | | | | | वर्ग शिल्लक अनुशेष | | | | | | | | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | अनु. जा ती | अनु. ज मा ती | वि जा अ | भ ज ब | भ ज क | भ ज ड | अ.ब.क.ड एकूण | इमाव | विमाप्र | खुला | एकूण | अनु. जा ती | अनु. ज मा ती | विजा अ | भ ज ब | भ ज क | भ ज ड | अ.ब.क.ड एकूण | इमाव | विमाप्र | खुला | एकूण | अनु. जा ती | अनु. ज मा ती | विजा अ | भ ज ब | भ ज क | भज ड | अ.ब.क.ड एकूण | इमाव | विमाप्र | खुला | एकूण | |
| १ | सहा. नगररचनाकार | [redacted] | ० | ३ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | [redacted] | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | |
| २ | लेखापाल | [redacted] | १ | ३ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | [redacted] | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | [redacted] | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | [redacted] | |
| ३ | स्थानक अधिकारी | [redacted] | ० | ३ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | [redacted] | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | |
| ४ | उप नैसर्गिक अधिकारी | [redacted] | १ | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | [redacted] | |
| ५ | [illegible] | [redacted] | ० | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | |
| ६ | [illegible] लेखा परिक्षक [illegible] / कार्यालयीन अधिक्षक १ | [redacted] | ० | ३ | १ | १ | १ | ० | ० | ० | १ | ० | ० | ३ | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | [redacted] | १ | १ | १ | ० | ० | ० | १ | ० | ० | ३ | [redacted] | |
| ७ | लघुलेखक उच्चश्रेणी | [redacted] | ० | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | |
| ८ | अन्न निरिक्षक | [redacted] | १ | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | [redacted] | |
| ९ | सहा. जनसंपर्क अधिकारी | [redacted] | १ | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | [redacted] | |
| १० | सुरक्षा अधिकारी | [redacted] | ० | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | |
| ११ | कनिष्ठ अभियंता | [redacted] | ५२ | ३ | ६ | ३ | १ | १ | २ | १ | ५ | ८ | १ | २२ | [redacted] | २ | ६ | १ | १ | २ | १ | ५ | ४ | १ | ३४ | [redacted] | ४ | ३ | ० | ० | ० | ० | ० | ४ | ० | १२ | [redacted] | |
| १२ | कनिष्ठ विधी अधिकारी | [redacted] | ३ | ३ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | [redacted] | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | |
| १३ | प्रोग्रामर | [redacted] | २ | ३ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | [redacted] | |
| १४ | मुख्य आरोग्य निरिक्षक | [redacted] | ० | ३ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | [redacted] | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | |
| १५ | ड्राफ्समन | [redacted] | ३ | ३ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | [redacted] | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | [redacted] | |
| १६ | सहा.सुरक्षा अधिकारी | [redacted] | १ | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | [redacted] | |
| १७ | सब फायर ऑफिसर | [redacted] | ३ | ३ | १ | १ | ० | ० | १ | ० | १ | ० | ० | ३ | [redacted] | ० | १ | ० | ० | १ | ० | १ | ० | ० | १ | [redacted] | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | [redacted] | |
| १८ | क्ष किरण तंत्रज्ञ (एक्स रे टेक्निशिअन) | [redacted] | २ | ३ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | [redacted] | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | [redacted] | |

९०८

# परिशिष्ट २

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिका सेवा प्रवेश नियम

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ४५ व ५३ (१) चे तरतदीनुसार नेमणूक करावयाच्या अधिकाऱ्यांच्या पदांसाठीची कलम ४५ (३) व ४५७ (३) अन्वये विहीत शैक्षणिक व इतर अर्हता

[पहा (नियम ३)]

| अ.क्र. | श्रेणी व संवर्ग / सेवा. | पदनाम | नेमणुकीची पद्धत १. सरळसेवा/ नामनिर्देशन/ प्रतिनियुक्ती २.पदोन्नती | कमाल वयोमर्यादा | शासनाने अंतिमत मंजूर केलेले सेवाप्रवेश नियम |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | श्रेणी–१ प्रशासकीय सेवा | आयुक्त | --- | --- | राज्य शासनाकडून वेळोवेळी नेमणूक करण्यात येईल असा अधिकारी (मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ३६ प्रमाणे) |
| २ | श्रेणी–१ प्रशासकीय सेवा | अतिरिक्त आयुक्त | पदोन्नती | | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी किंवा समकक्ष अर्हता. आणि, ब) महापालिका उप आयुक्त या पदावरील किमान ५ वर्षांचा अनुभव. |
| | | | प्रतिनियुक्ती | | शासन सेवेतील / निमशासकीय सेवेतील /स्थानिक स्वराज्य सेवेतील समकक्ष पद ५ वर्षांपासून धारण करणारे अधिकारी. |

५. वरील ३ व ४ नुसार निवड समितीने केलेली शिफारस अधिनियमाच्या कलम ५३ (१), ५३ (२) व ५३ (३) नुसार संबंधित सक्षम नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे मान्यतेसाठी ठेवली जाईल.

६. तयार करणेत आलेली निवड सूची तयार केल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीपर्यंत वैध असेल.

७. समिती सचिव बैठकीचा कार्यवृत्तांत तयार करून त्यास समितीची मान्यता घेण्यास जबाबदार असेल. सदस्यांना सादर केलेली सर्व कागदपत्रे परत घेऊन ती एकत्रित जतन करण्याची जबाबदारी समिती सचिवाची असेल.

८. श्रेणी-३ व ४ मध्ये सेवा भरती करताना शासन परिपत्रक क्र. सामान्य प्रशासन विभाग क्र. न्याप्र-१००३/९९/प्रक्र.२/०३ (भाग-२) १६-अ, दि. २५ ऑक्टोबर २००५ अन्वये एकत्रित मार्गदर्शक तत्त्वे लागू असेल तिथे अवलंब करण्यात यावा. या मार्गदर्शक तत्त्वामध्ये वेळोवेळी होणारे बदलही अंमलात आणण्यात यावेत.

९. तांत्रिक पदांना अतांत्रिक कॅडरमध्ये पदोन्नती देता येणार नाही.

## परिशिष्ट - "ब"

## शासन निर्णय

**महानगरपालिका व नगरपालिका/ नगरपरिषदा/ नगरपंचायती यामध्ये महिला व बालकल्याण समितीने राबवावयाच्या योजना**

**महाराष्ट्र शासन**
नगर विकास विभाग.
शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २००५/प्र.क्र.२५५/०५/नवि-२०
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक ८ नोव्हेंबर, २०१०

**वाचा :** १) नगर विकास विभाग, शासन पत्र क्र. जीईएन- १०९३/३२५/प्र.क्र.२४/नवि-३२, दि. १७ एप्रिल, १९९३.
२) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. जीईएन-१०९३/११९८/नवि-१४, दिनांक १४ जुलै, १९९३.
३) नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २००५/प्र.क्र.१५६/०५/नवि-२०, दिनांक ३० डिसेंबर, २००६

**प्रस्तावना :-**

शासनाने महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ मधील कलम ६२, ६३, व ६५ मध्ये सन १९९२ मध्ये दुरुस्ती करण्यात आली. या दुरुस्तीमुळे प्रत्येक "अ" व "ब" वर्ग नगरपरिषदेने महिला व बालकल्याण समितीची स्थापना करावी, असे बंधन घालण्यात आले. तसेच "क" वर्ग नगरपरिषदांना या समितीची स्थापना करता येईल, अशी तरतूद कलम ६५ मध्ये करण्यात आली. या समितीने करावयाची कामे क्रमांक जीईएन /३२५/प्र.क्र.२४/३२,दिनांक १७ एप्रिल, १९९३ अन्वये परिपत्रकात प्रस्तुत करण्यात आली आहेत. सदर परिपत्रकीय पत्रातील कामाची यादी सूचक असून परिपूर्ण आहे असे म्हणता येणार नाही. त्यामध्ये कालमानानुसार बदललेली परिस्थिती, स्थानिक गरजा लक्षात घेवून यादीमध्ये बदल करणे, वाढ करणे, वगळणे आवश्यक ठरणार आहे आणि महिला व बालके यांच्या कल्याणासाठी योजना राबविणे हे मुख्य ध्येय व धोरण लक्षात घेऊन यादीत आवश्यक फेरबदल करण्यास नगरपालिका सक्षम असतील असे दिनांक १४ जुलै १९९३ च्या शासन निर्णयान्वये स्पष्ट करण्यात आले आहे. महिला व बालकल्याण कार्यक्रमामध्ये बदलत्या परिस्थितीनुसार बऱ्याच योजना/कार्यक्रमांमध्ये बदल/सुधारणा करणे आवश्यक आहे. त्यानुसार संकीर्ण २००५/प्र.क्र.१५६/०५/नवि-२०, दिनांक ३० डिसेंबर, २००६ या शासन निर्णयामध्ये आवश्यक त्या योजना /कार्यक्रमांमध्ये बदल / सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषद/ नगरपंचायती यामध्ये महिलांच्या विविध योजना राबविण्याकरिता महिला व बालकल्याण समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीने

राबवावयाचे कार्यक्रम संदर्भाधीन पत्र व शासन निर्णयान्वये सर्व महानगरपालिका/ नगरपरिषद / नगरपंचायती यांना कळविण्यात आले होते. तथापि, बदलत्या परिस्थितीनुसार बऱ्याच योजना/ कार्यक्रम कालबाहय झाल्यामुळे त्यामध्ये बदल / सुधारणा करणे आवश्यक आहे. तसेच बहुतेक महानगरपालिका/ नगरपरिषदा/ नगरपंचायती मध्ये अशा योजनांसाठी अत्यल्प तरतुद असल्याने महिलांच्या योजनांची योग्य रितीने अंमलबजावणी होत नाही. या सर्व बाबी लक्षात घेऊन महिलांना सर्व क्षेत्रात सक्षम करण्यासाठी महानगरपालिका/ नगरपरिषद / नगरपंचायती क्षेत्रात महिला व बालकल्याण समित्यांनी महिला व बालकल्याण यासाठी राखीव ५% तरतूदीतून खालील योजना राबविण्याबाबत शासनाचे आदेश आहेत.

**शासन निर्णय:-** महिला व बालकल्याण यासाठी राखीव असलेल्या ५% तरतुदीतून खालील बाबींवर खर्च करण्यात यावा:

१. ज्या ठिकाणी अंगणवाडी इमारती भाडयाने आहेत किंवा अयोग्य सार्वजनिक इमारतीमध्ये भरत आहे. त्यासाठी अंगणवाडी केंद्राची इमारत बांधून यामध्ये ICDS योजनेसाठी रु.१/- दरमहा नाममात्र भाडयावर उपलब्ध करुन देणे.

२. अंगणवाडी केंद्रातील मुलांकरिता आवश्यक शैक्षणिक/शैक्षणिक साहित्य खरेदी करणे.

३. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था निर्माण करणे व शौचालय बांधकाम करणे.

४. मुलांकरीता पोषक आहार पुरविणे.

५. ०-३ वर्षाच्या मुलांकरीता Creche किंवा Day care centre बांधणे व क्रियान्वित करणे तसेच पाळणाघर चालविणा-या अशासकीय संस्थांना अर्थसहाय्य करणे.

६. गरोदर महिलांसाठी तसेच शालेय विदयार्थी व अंगणवाडर विदयार्थी यांची वैदयकीय तपासणी व औषधोपचार करणे.

७. मुलींकरीता शिष्यवृत्ती योजना राबविणे.

८. महिलांसाठी प्रसुतीगृह बांधणे अथवा श्रेणीवाढ करणे अथवा विस्तारीकरण करणे.

९. मुलींना/महिलांना व्यावसायिक प्रशिक्षण देणे.

१०. काम करणा-या महिलांसाठी वसतिगृह बांधणे.

११. शिकणा-या मुलींसाठी वसतिगृह बांधणे.

१२. पोलीओग्रस्त किंवा अपंग मुलांना Prosthetic aids पुरविणे.

१३. महिलांसाठी समुपदेशक केंद्र चालविणे, helpline चालविणे, विधी सल्ला केंद्र चालविणे इ.

१४. BPL खालील मुलींची शाळा गळतीचे प्रमाणे थांबविण्याबाबत प्रोत्साहनपर दैनिक उपस्थितीत भत्ता देणे.

१५. मुलींच्या सार्वजनिक शाळेत विविध क्रीडा सुविधा निर्माण करणे.

शासनाने मान्य केलेल्या वरील योजना तसेच इतर उपयुक्त योजना तयार करुन राबविण्याचे पूर्ण अधिकार महानगरपालिकाच्या आयुक्तांना रहातील. तथापि नगरपरिषद/ नगरपंचायती यांचे मुख्याधिकाऱ्यांना वरील शासनमान्य योजनांपैकी फक्त रु. १० लाख प्रति योजना या आर्थिक मर्यादेपर्यंत योजनेस मान्यता देणे व योजना राबविण्याचे अधिकार रहातील. रु. १०

लाखाच्या वर एखादया योजनेची आर्थिक मर्यादा येत असल्यास त्यासाठी आयुक्त, महिला व बालविकास , पुणे यांची मान्यता घेण्यात यावी. मान्य योजनेपैकी कोणतीही रु.१० लाखाच्या आतील योजना राबविण्याचे अधिकार मुख्याधिकारी, नगरपरिषदा / नगरपंचायती यांना रहातील. मात्र वरील मान्य केलेल्या योजनांव्यतिरिक्त एखादी नवीन योजना घ्यावयाची असेल किंवा विद्यमान योजनेच्या नियम व अटींमध्ये बदल करावयाचे असल्यास त्यांनी आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांची तांत्रिक मान्यता घ्यावी. योजनेच्या अंमलबजावणी व नियत्रणासाठी आयुक्त, महिला व बालविकास, पुणे हे नियंत्रण अधिकारी असतील व जिल्हास्तरावर जिल्हा व महिला बालविकास अधिकारी नियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहतील.

आयुक्त, महानगरपालिका, मुख्याधिकारी, नगरपालिका/नगरपंचायती यांनी प्रत्येक वर्षाच्या सुरवातीपासूनच योजना राबविण्याचा कार्यक्रम तयार करण्याची दक्षता घ्यावी व या योजनांवर करण्यांत येणा-या खर्चाची माहिती महिला व बाल विकास विभागास सादर करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(र.शि.घाटगे )
कार्यासन अधिकारी ,महाराष्ट्र शासन

प्रति,
सचिव,महिला व बाल विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
आयुक्त तथा संचालक,नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी,मुंबई - २५
विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक,नगरपालिका प्रशासन (सर्व)
जिल्हाधिकारी (सर्व)
आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायती (सर्व)
विभागातील सर्व सहसचिव/उपसचिव,नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
निवडनस्ती, नवि-२०

--------

**जिल्हा परिषदांमध्ये स्थापन करण्यात आलेल्या महिला व बालकल्याण समितीने राबवावयाच्या योजना.**

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
**शासन निर्णय क्रमांक : झेडपीए २०१०/अनौसंक्र ३३/प्र.क्र.१६८/पंरा-१**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
**दिनांक : १० मार्च, २०११.**

**वाचा :- शासन निर्णय क्रमांक : झेडपीए १००७/४५४/प्र.क्र.५१/पंरा-१
दिनांक : १९ डिसेंबर, २००७.**

**शासन निर्णय :-**

महिला व बाल विकासाशी संबंधित विविध कार्यक्रम राबविण्यासाठी सर्व जिल्हा परिषदांमध्ये महिला व बालकल्याण समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. सदर समितीने राबवावयाचे कार्यक्रम संदर्भाधीन शासन निर्णयानुसार राबविण्यात येतात. तथापि, बदलत्या परिस्थितीनुसार बऱ्याच योजना / कार्यक्रम कालबाहय झाल्यामुळे त्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे असे शासनाच्या निदर्शनास आले आहे. ही बाब लक्षात घेऊन महिलांना सर्व क्षेत्रात सक्षम करण्यासाठी जिल्हा परिषद क्षेत्रात महिला व बाल कल्याण समित्यांनी खालील योजना सक्षमपणे राबविण्यासाठी पुढीलप्रमाणे शासन निर्णय घेण्यात येत आहे.

***गट"अ" - प्रशिक्षण व सक्षमीकरणाच्या योजना***

**१) मुलींना व महिलांना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देणे.**

शासकीय किंवा अशासकीय संस्थांमार्फत काही तांत्रिक / व्यावसायिक प्रशिक्षण वर्ग चालविले जातात. अशा संस्थांमधून खालील प्रकारच्या प्रशिक्षणासाठी योजना राबवाव्यात. उदा.व्यक्तिमत्व विकास, इंग्रजी संभाषण, गवंडी, सुतारकाम, प्लंबर प्रशिक्षण, घरगुती विद्युत उपकरणांची दुरुस्ती ( टी.व्ही., रेडिओ, म्युझिक सिस्टीम दुरुस्ती, मिक्सर, इस्त्री, टोस्टर, मोबाईल व संगणक दुरुस्ती,) वाहन दुरुस्ती, सौंदर्यप्रसाधनांचे प्रशिक्षण, केटरींग, बेकींग, विशिष्ट पध्दतीच्या स्वयंपाकाचे प्रशिक्षण, घरगुती कामकाजाचे प्रशिक्षण (Full time domestic help), शासकीय व ड्रायव्हर व कंडक्टर, रिसेप्शनिस्ट, लघुलेखन/ टंकलेखन, सेल्स गर्ल, विमा एजंट, परिचारिका (नर्स) प्रशिक्षण, वृध्दांची देखभाल, लहान मुलांची देखभाल, फिजिओथेरपी प्रशिक्षण, फुडप्रोसेसिंग, पॅकेजिंग, दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन, घनकचरा व्यवस्थापन व बायोगॅस (कचऱ्यापासून खतनिर्मिती गांडूळखत, कचऱ्याचे विभाजन व व्यवस्थापन), रोपवाटीका तसेच शोभिवंत फुलझाडांची व औषधी वनस्पतींची लागवड व विक्री, या योजनेखाली मान्यताप्राप्त संस्थेत प्रशिक्षण घेणाऱ्या महिलांना प्रति लाभार्थी रु.५०००/- पर्यंत प्रशिक्षणाचे शुल्क (Fees) भरण्याची तरतूद

राहील. प्रशिक्षण शुल्काच्या रकमेच्या दहा टक्के रक्कम लाभार्थ्यांने स्वत: भरावी. प्रशिक्षण कालावधी जास्तीत जास्त एक वर्षाचा असावा. शुल्क भरण्याचे नियम व प्रक्रिया संबंधित जिल्हा परिषदांनी ठरवावी.

२) **<u>मुलींना स्वसंरक्षणासाठी व त्यांच्या शारीरिक विकासासाठी प्रशिक्षण योजना :-</u>**

या योजनेमध्ये मुलींना कराटे, योगाचे प्रशिक्षण देण्यात यावे. कोणत्याही वयोगटातील परंतु आर्थिकदृष्टया मागासलेल्या कुटुंबातील मुलींना सदर प्रशिक्षण मोफत देण्यात यावे. सदर प्रशिक्षण किमान तीन महिन्यांचे असावे. ते शाळा व महाविद्यालये यांच्या समन्वयाने आयोजित करण्यात यावे. या योजनेतून प्रशिक्षकाच्या मानधनावर साधारणपणे प्रति लाभार्थी रु.३००/- प्रतिमहापर्यंत खर्च करण्यात यावा.

३) **<u>महिलांसाठी समुपदेशन केंद्र चालविणे :-</u>**

कुटुंबातील मारहाण, लैंगिक छळ व इतर तऱ्हेने त्रासलेल्या तसेच मानसिकदृष्टया असंतुलित महिलांच्या सामाजिक, मानसशास्त्रीय, कायदेशीर समुपदेशनासाठी सदर योजना राबवावी. यासाठी समुपदेशक व सल्लागार यांच्या मानधनावर खर्च करण्यात यावा. समुपदेशक व सल्लागाराची निवड मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा सरकारी वकील, सिनिअर जे.एफ.एम.सी. (ज्युडीसियल मॅजेस्ट्रेट) इ. अधिकाऱ्यांच्या समितीमार्फत करण्यात येईल. सदर योजना महाविद्यालय / तज्ज्ञांच्या संस्थांमार्फत राबवावी. उदा. ज्या संस्थांकडे यापूर्वीच अशा प्रकारच्या समुपदेशनासाठी आवश्यक मनुष्यबळ, जागा, अनुभव व सोईसुविधा उपलब्ध असतील. सध्या देण्यात आलेल्या सुविधा व समुपदेशन यांचा विस्तार करण्याची आवश्यकता असल्यास असे प्रस्तावही मंजूर करण्यात यावेत. मात्र यासाठी संस्थेकडे स्वत:ची जागा असणे आवश्यक आहे. तसेच त्यांनी स्वत: कार्यालयीन फर्निचर व इतर अनावर्ती खर्चाची व्यवस्था करावी. तालुका आणि जिल्हा पातळीवर काम करणाऱ्या समुपदेशकाला रु. ९०००/- इतके मानधन देण्यात यावे. काही जिल्हा परिषदांमध्ये व पंचायत समित्यांमध्ये यापूर्वीच समुपदेशन केन्द्र चालविण्यात येत आहेत. मात्र तेथे समुपदेशकाला अत्यल्प मानधन मिळत असल्यामुळे सदर केन्द्रे व्यवस्थितपणे चालत नाहीत. तर अशा समुपदेशन केन्द्रांचे बळकटीकरण करण्यात यावे व तेथे समुपदेशकाला वरीलप्रमाणे वाढीव मानधन देण्यात यावे.

४) **<u>तालुकास्तरावर शिकणा-या मुलींसाठी होस्टेल चालविणे :-</u>**

ग्रामीण भागात माध्यमिक शाळा नसल्यामुळे ८ वी ते १२ वी वर्गापर्यंत शिकणा-या मुलींना शिक्षण घेण्यासाठी स्वत:च्या गावांपासून लांब अंतरावर जाऊन रहावे लागते. तालुक्याच्या ठिकाणी जेथे माध्यमिक शाळा किंवा ज्युनिअर कॉलेज असतात, तेथे अशा मुलींना वसतीगृह उपलब्ध करुन दिल्यास मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढेल. यामुळे १८ वर्षांपूर्वी लग्न न करण्यासाठी त्यांच्या कुटुंबियांना प्रवृत्त करता येईल. या योजनेखाली वसतीगृह इमारतींचे बांधकाम न करता, भाडयावर इमारत/घर/फ्लॅट घेण्यात यावेत. सदर वसतीगृह स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात यावीत. फक्त भाडे व प्रशासकीय खर्चासाठी अर्थसहाय्य देण्यात यावे. जेवणाचा खर्च लाभार्थ्यांनी सोसावा. त्याशिवाय लाभार्थीकडून कोणतीही फी घेऊ नये. कमीतकमी १० मुलींसाठी एक वसतीगृह असावे. प्रशासकीय खर्चाची मर्यादा जिल्हा परिषदांनी निश्चित करावी, पण ती रु.५००/- प्रति लाभार्थी प्रति माह (भाडे वगळून) यापेक्षा जास्त नसावी.

५) **<u>दहावी व बारावी पास मुलींना संगणक प्रशिक्षण देणे :-</u>**

सध्या शासकीय/निमशासकीय नोकरीसाठी MS-CIT उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे.संगणकाबाबतचे ज्ञान तसेच संगणक चालविण्याचे कौशल्य प्राप्त करण्यासाठी १० वी व १२ वी पास मुलींना MS-CIT व समकक्ष अभ्यासक्रम उदा. डाटा एट्री ऑपरेटर प्रशिक्षण देण्याची योजना यामुळे

उपयुक्त राहील. त्याप्रमाणे एखाद्या मान्यताप्राप्त संस्थेला फी देऊन त्याबाबतचे प्रशिक्षण आयोजित करण्यात यावे.

६) **<u>आर्थिकदृष्ट्या गरीब स्त्रियांच्या मुलामुलींसाठी पाळणाघर :-</u>**

नोकरी करणाऱ्या किंवा शेतावर कामासाठी जाणाऱ्या स्त्रियांच्या लहान मुलांसाठी पाळणाघर (Day Care Centre) उपलब्ध करुन देण्यात यावे. पाळणाघर संध्याकाळी ६.०० वाजपर्यंत किंवा स्थानिक गरजेनुसार सुरु ठेवावे. सदर पाळणाघर चालविण्यासाठी जिल्हा परिषदेने योग्य महिला बचत गटाची किंवा स्वयंसेवी संस्थेची निवड करावी. लाभार्थ्यांची निवड माता समिती किंवा ग्रामपंचायतीने करावी. या योजनेखाली पाळणाघर चालविणा-या महिलांचे मासिक मानधन व इमारतीचे भाडे अशा बाबींवर खर्च करण्यात यावा.

७) **<u>किशोरवयीन मुलींना व महिलांना जेंडर बाबत तसेच आरोग्य व कुटुंब नियोजनाबाबत प्रशिक्षण देणे</u>** :-

किशोरवयीन मुलींना शाळेत सर्वसाधारण शिक्षण देण्यात येते. परंतु विशिष्ट किशोरवयीन समस्यांबद्दल शिक्षण देण्यात येत नाही. असे निदर्शनास आले आहे की, त्यामुळे त्यांना काही मानसिक व सामाजिक, मनोवैज्ञानिक अडचणींना तोंड द्यावे लागते. याबाबत अनुभवी व संवेदनशील तज्ज्ञ/स्वयंसेवी संस्थांमार्फत सदर प्रशिक्षण आयोजित करण्यात यावे. त्याचे स्वरुप स्थानिक आवश्यकतेनुसार ठरविण्यात यावे. उदा. शाळेत / महाविद्यालयात शिकणा-या मुलींसाठी किंवा गळती झालेल्या मुलींसाठी दर आठवडयाला एक वर्ग (तसेच मुलांसाठी स्वतंत्र वर्ग) भरविण्यात यावेत. प्रत्येक वर्ग १ ते २ तासांचा असावा. बाहेरील तज्ज्ञांना व डॉक्टरांना, मनोवैज्ञानिकांना सदर सत्र घेण्यासाठी निमंत्रित करण्यात यावे. त्यांना प्रत्येक सत्रासाठी साधारणपणे रु.२०० ते ४०० मानधन देण्यात यावे. लहान बालकांना विशेषतः मुलींना लैंगिक हिंसाचारापासून वाचविण्यासाठी समितीने विशेष प्रयत्न करावेत.

८) **<u>महिलांना कायदेशीर / विधिविषयक सल्ला देणे</u>** :-

बहुतेक मुलींना व महिलांना त्यांच्या कायदेशीर अधिकारांबद्दल माहिती नसते. विशेषतः हुंडाविषयक कायदे, स्त्रीधन, मालमत्ता अधिकार, वारसा हक्क, लग्न, घटस्फोट, पोटगीविषयक कायदे, बलात्कारविषयक कायद्यातील तरतूदी, लग्नानंतरचे अधिकार. त्यामुळे सदर विषयावर महाविद्यालय व इतर ठिकाणी मुली व महिलांसाठी लेक्चर ठेवण्यात यावे. महाराष्ट्र राज्य महिला आयोग तसेच UNFPA (United Nation Population Fund) मार्फत सदर प्रशिक्षण वर्ग आयोजित करता येतील, व प्रती प्रशिक्षण वर्ग प्रशिक्षकाला रु. ५००/- पर्यंत मानधन द्यावे. यासाठी तालुका स्तरावरील मोफत कायदेविषयक सल्लागार समिती किंवा विधी सेवा समिती यांचेही मार्गदर्शन घ्यावे.

महिलांना कायदेविषयक मार्गदर्शन करण्यासाठी शिबिरांचे आयोजन करावे. एका शिबिरासाठी रु. २०००/- पर्यंत खर्च करण्यात यावा.

**<u>९) अंगणवाडयांसाठी स्वतंत्र इमारत/ भाडे :-</u>**

ज्या ठिकाणी अंगणवाडीसाठी स्वतंत्र शासकीय इमारत नाही तेथे खाजगी इमारतीत अंगणवाड्या चालविण्यासाठी आवश्यकतेनुसार भाडयाची तरतुद करण्यात यावी. तसेच अंगणवाड्यामध्ये शौचालये बाधण्यासाठी निधीची तरतुद करण्यात.यावी.

नवीन अंगणवाडीचे बांधकाम करावयाचे असल्यास त्याची मर्यादा रु. ४ लक्ष ठेवावी.

**१०) महिला प्रतिनिधींची अभ्यास सहल :-**

समितीस स्वतःच्या निधीमधून ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदेमध्ये निवडून आलेल्या महिला लोकप्रतिनिधींचे जिल्हा व जिल्ह्याबाहेर पंचायत राज, आदर्श गाव, निर्मल ग्राम, महिला बळकटीकरण, महिला व बाल विकासाचे उपक्रम इत्यादी विषयांची माहिती घेण्यासाठी अभ्यास सहलीचे आयोजन करावे. प्रतिवर्षी अशा प्रकारे किती अभ्यास सहली आयोजित कराव्यात याबाबत जिल्हा परिषदेने निर्णय घ्यावयाचा आहे. यासाठी प्रतिवर्ष एकूण रु. ५.०० लक्षाची कमाल मर्यादा विहित करण्यात येत आहे.

**११) पंचायत राज संस्थामधील महिला लोकप्रतिनिधींना प्रशिक्षण**

पंचायत राज संस्थामधील तिन्ही स्तरातील महिला लोकप्रतिनिधींना कामकाजाचे प्रशिक्षण देण्यासाठी पंचायत महिला शक्ती अभियान २००७ सालापासून राबविण्यात येत आहे. या अभियानाअंतर्गत प्रशिक्षणासाठी तरतुद केलेल्या निधी व्यतिरिक्त जादा लागणारा निधी आवश्यकतेनुसार समितीकडून खर्च करण्यात यावा.

**१२) आदर्श अंगणवाडी / बालवाडी सेविकांना पुरस्कार :-**

अंगणवाडी व बालवाडीमध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या सेविकांना समितीस स्वतःच्या निधीमधून पुरस्कार देता येईल व उत्कृष्ट काम करणाऱ्या सेविकांची निवड तसेच पुरस्काराची रक्कम किती असावी, याबद्दल जिल्हा परिषदेने निर्णय घ्यावयाचा आहे. योजनेवर जास्तीत जास्त रु. २ लक्ष खर्च करण्यात यावा.

***गट "ब" च्या योजना (वस्तू खरेदीच्या योजना)***

**१३) कुपोषित मुलामुलींसाठी तसेच गरोदर महिला व स्तनदा मातांसाठी अतिरिक्त आहार :-**

राज्याच्या ग्रामीण / आदिवासी भागातील मुलांमध्ये कुपोषणाचे प्रमाण जास्त असल्याचे आढळून आले आहे. ते प्रमाण कमी करण्यासाठी कुपोषित मुलांना अंगणवाड्यांमार्फत दुप्पट आहार दिला जातो. तथापि कुपोषण कमी करण्यासाठी तो पुरेसा नसल्याने कुपोषित मुलांना अंगणवाडीत पुरविण्यात येणाऱ्या आहाराव्यतिरिक्त विशेष आहार म्हणून अंगणवाडीतील मुले व किशोरवयीन मुलांना Micronutrient Supplementation Syrup यांचा पुरवठा करण्यात यावा. तसेच स्थानिक उपलब्धतेनुसार दूध, सोयादूध (टेट्रापॅक), चिक्की, लाडू, अंडी, फळे (केळी), गूळ, शेंगदाणे, या वस्तूंचा पुरवठा करण्यात यावा. गरोदर व स्तनदा मातांना अतिरिक्त पौष्टीक व प्रथिनेयुक्त आहार द्यावा, जेणेकरुन त्यांच्यात रक्ताक्षयाचे प्रमाण कमी होईल, व जन्माचे वेळेला नवजात मुलाचे वजन किमान २.५ किलो राहील.

**१४) अंगणवाडी / बालवाडींना साहित्य पुरविणे :-**

एकात्मिक बाल विकास योजनेखाली अंगणवाडींना साहित्य मिळाले नसल्यास त्या साहित्याची बालकांच्या सर्वांगिण विकासासाठी गरज असल्यास साहित्याची खरेदी सदर समितीने करावी. तथापि, ज्या अंगणवाड्या / बालवाड्या समिती स्वतःच्या निधीमधून चालविल, त्यावरील खर्च समितीने स्वतःच्या निधीमधून करावा. सदर साहित्यामध्ये वजनकाटे व जलशुध्दीकरण यंत्र याचा समावेश करावा. तसेच वेगवेगळया प्रकारची खेळणी व शैक्षणिक तक्ते हे एकात्मिक बालविकास सेवेकडून पुरविण्यात येत असतात, म्हणून ते पुरवू नये.

**१५) महिलांना साहित्य पुरविणे :-**

ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील महिलांना स्वयंरोजगारासाठी तसेच इंधनाची बचत करण्यासाठी खालील साहित्यांचा पुरवठा करण्यात यावा. मसाला पल्वलायझर मशिन, पत्रावळी मशिन , शेवया मशिन, पिठाची गिरणी हे साहित्य पुरवावे. इंधनाची बचत होणेचे दृष्टीने तसेच महिलांना धुराचा त्रास होवू नये म्हणून सुधारित चुली /निर्धुर चुलीचा वापर ही काळाची गरज आहे म्हणून सुधारित चुली /निर्धुर चुली पुरविण्यासाठी तरतूद करण्यात यावी. ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील कुटूंबाना सौर कंदील आणि सोलर कुकर पुरविण्यासाठी तरतूद करण्यात यावी. वरील सर्व वस्तू वाटप करताना प्रति महिला जास्तीतजास्त रु. १०.०००/- खर्च करण्यात यावा तसेच प्रत्येक लाभार्थीचा १०% सहभाग घेण्यात यावा.

गट "ब" च्या वरील योजनांवर, म्हणजे वस्तु व साहित्य खरेदीवर एकुण खर्चाच्या ३० टक्के पेक्षा जास्त खर्च करु नये. म्हणजे गट "अ" च्या योजनांवर जास्त भर द्यावा, व त्यावर किमान ७०% खर्च करण्यात यावा. एकूण खर्चाच्या ३ टक्के रक्कम अपंग महिला आणि बालकांसाठी खर्च करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०११०३१५२०१४३९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(डॉ. मल्लीनाथ कलशेट्टी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व) ( मु. का.अ. यांचे मार्फत )
२) मा. विधान परिषद/ मा. विधान सभा सदस्य (सर्व)
१) प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई.
२) विभागीय आयुक्त (सर्व).
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
६) आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, ३ चर्च रोड, पुणे - ४११ ००१..
७) संचालक, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, कोकण भवन, नवी मुंबई.
९) मुख्यमंत्र्यांचे सचिवालय.
१०) मा. मंत्री (ग्रा. वि.) यांचे खाजगी सचिव.
११) मा. राज्यमंत्री (ग्रा. वि.) यांचे स्वीय सहाय्यक.
१२) निवड नस्ती, कार्यासन क्र.पंरा-१, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रत,**

१) सचिव, महिलांचे हक्क व कल्याण समिती, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
२) सचिव, पंचायत राज समिती, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई यांजकडे माहितीसाठी रवाना.

६.३

## स्वयंसहाय्यता गटामार्फत महिलांचा आर्थिक विकास व सक्षमीकरण

महाराष्ट्र शासन,
नगर विकास विभाग,
शासन परिपत्रक क्र. संकीर्ण १०/२००१/६६/ प्र.क्र.२२/ नवि - २७
मंत्रालय -४०० ०३२. दिनांक २२ नोव्हेंबर २००१

शासन परिपत्रक

शासनाने महिला धोरण,२००१ जारी केले असून यामध्ये महिलांचा सहभाग, त्यांना संरक्षण, त्यांची आर्थिक उन्नती, त्यांच्या क्षमतेचे संवर्धन आणि या सर्वांसाठी अनुकूल वातावरण निर्मिती तसेच सन २००२-०३ या आर्थिक वर्षापासून महिलांना केंद्रीभूत मानून नियोजन केले जाईल या बाबींचा महिला धोरणात समावेश आहे. त्याच बरोबर विविध क्षेत्रात महिलांच्या स्वयंसहाय्यता गटांची स्थापना, तसेच त्यांची कार्यक्षमता, कौशल्य वाढविण्याच्या कार्यक्रमास प्राधान्य दिले पाहिजे, ही बाब समाविष्ट आहे.

०२. शासनाच्या महिला धोरणाच्या अनुषंगाने नगरपरिषदा/ महानगरपालिका यांना कळविण्यात येते की, नगरपरिषदांनी / महानगरपालिकांनी शहरी सुवर्ण जयंती रोजगार योजनेंतर्गत महिलांच्या स्वयंसहाय्यता गटांची स्थापना वाढविण्याच्या कार्यक्रमास प्राधान्य देण्यात यावे, यामध्ये आदिवासी महिला, मागासवर्गीय, आपद्ग्रस्त आणि शहरी महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करण्यावर विशेष भर देण्यात यावा. यासाठी महिला व त्यांच्या गटांसाठी नगरपरिषदा व महानगरपालिकांमार्फत निर्माण करण्यात येत असलेल्या व्यापारी संकुलातील वितरीत होणाऱ्या गाळ्यांपैकी ३०% गाळे महिलांच्या स्वयंसहाय्यीत गटासाठी राखून ठेवण्यात यावे व त्यांचे वाटप संबंधित गटात होईल याची दक्षता घेण्यात यावी. असे गाळे वाटप करताना गाळे बांधण्यासाठी आलेल्या खर्चाची रक्कम मोबदला स्वरूपात ना नफा ना तोटा या तत्वात घेवून गाळे हस्तांतर करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

रामानंद तिवारी
प्रधान सचिव

**शासकीय,निमशासकीय व शासन अनुदानित संस्थांमधील सेवांमध्ये भरतीसाठी महिलांकरिता ३०% जागा आरक्षित ठेवणेबाबत..**

## महाराष्ट्र शासन

महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्र.८२/२००१/मसेआ-२०००/प्रक्र.४१५ /का-२
नविन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक- २५.५.२००१

**निर्णय** :- शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानीत संस्थांमधील सेवांमध्ये भरतीसाठी महिलांकरिता ३०% जागा दि.१ एप्रिल,१९९४ पासून राखीव ठेवण्यात आल्या आहेत. सदर ३०% आरक्षणाच्या अंमलबजावणीबाबत परिशीष्ठ-१ मध्ये नमूद केलेल्या शासन निर्णयाद्वारे वेळोवेळी सूचना निर्गमित केलेल्या आहेत. सदर सर्व शासन निर्णय अधिक्रमीत करण्यात येत असून महिलांच्या ३०% आरक्षणाच्या अंमलबजावणीबाबत खालीलप्रमाणे एकत्रित आदेश देण्यात येत आहेत. हा शासन निर्णय निर्गमित होण्यापूर्वी महिलांच्या ३०% आरक्षणासंदर्भात करण्यात आलेली कार्यवाही ही परिशिष्ट-२ मध्ये नमुद केलेल्या शासन निर्णयानुसार करण्यात आली आहे असे समजण्यात यावे.

### (एक) आरक्षणाची व्याप्ती, अटी व शर्ती

(१) शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानीत संस्था यांच्या सेवेत नियुक्तीसाठी महिलांकरीता ३०% जागा आरक्षित ठेवण्यात येत आहेत.

(२) महिलांच्या सदर आरक्षणाची अंमलबजावणी करतांना अनु.जाती, अनु.जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास प्रवर्ग आणि खुला प्रवर्ग यांचेसाठी जी पदे उपलब्ध होतील त्या पदापैकी त्या त्या प्रवर्गातील महिलांसाठी ३०% जागा राखीव ठेवण्यात याव्यात.

(३) महिलांचे आरक्षण हे समांतर आरक्षण राहिल व ते कार्यान्वित करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रक क्र.एसआरव्ही-१०९७/प्रक्र.३१/९८/१६-अ, दि.१६.३.९९ मधील मार्गदर्शक सूचनानुसार कार्यवाही करावी.( प्रत सोबत जोडली आहे) सदर मार्गदर्शक सूचनांमध्ये सामान्य प्रशासन विभागाकडून काही बदल केल्यास सदर बदल आपोआप लागू होतील.

(४) महिलांसाठी विहीत करण्यांत आलेले सदर ३०% आरक्षण हे फक्त सरळसेवा भरतीसाठी अनुज्ञेय राहील.

(५) महिला आरक्षण हे समांतर आरक्षण/विशेष आरक्षण असल्यामुळे ते आडवे आरक्षण आहे. समांतर आरक्षण हे कप्पीकृत आरक्षण असल्यामुळे पदे भरण्यापूर्वी, पदे निश्चित करताना तसेच भरतीची जाहिरात देताना त्या जाहिरातीत महिला आरक्षणानुसार येणाऱ्या राखीव पदांची संख्या, सामाजिक आरक्षण/उभे आरक्षण यांच्या (जसे अ.जा., अ.ज., वि.जा.(अ), भ.ज.(ब), (क) (ड), वि.मा.प्र., इमाव, आणि खुला प्रवर्ग ) प्रत्येक वर्गामध्ये निर्देशित करावी.

(६) महिलांसाठीचे सदर आरक्षण हे मागासवर्गीयांचे आरक्षण ज्या ज्या ठिकाणी लागू आहे त्या सर्व ठिकाणी लागू राहील.

(७) भरतीच्या वर्षात त्या त्या प्रवर्गातील महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाहीत तर सदर आरक्षण इतरत्र अदलाबदल न करता त्या त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारांमार्फत भरण्यात यावे.

(८) महिलांच्या आरक्षणाचा अनुशेष पुढे ओढण्यात येवू नये.

(९) खुल्या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती/कुटुंबातील (क्रिमीलेअर) महिला सदस्यांना महिलांसाठी असलेले ३०% आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. तसेच, मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागासवर्ग, भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गटातील महिला सदस्यांना महिलांचे ३० % आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

(१०) खुल्या प्रवर्गातील ज्या व्यक्तीचे /कुटुंबाचे सर्व मार्गांनी येणारे एकूण वार्षिक उत्पन्न सलगच्या मागील तीन वर्षामध्ये प्रत्येक वर्षी रु.दोन लाख किंवा त्यापेक्षा अधिक असेल ती व्यक्ती/कुटुंब उन्नत आणि प्रगत व्यक्ती/गट म्हणून समजण्यात येईल. या संदर्भातील कुटुंबाच्या व्याख्येमध्ये विवाहीत महिलेच्या बाबतीत पती,पत्नी व मुले यांचा समावेश राहील. आणि अविवाहीत मुलीच्या संदर्भात आई, वडील व अविवाहीत भावंडे यांचा समावेश राहील.

(११) इतर मागासवर्ग, भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) यांचेकरीता उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गट (क्रिमीलेअर) बाबत सामाजिक न्याय विभागाने वेळोवेळी निश्चित केलेल निकष व अटी लागू राहतील.

(१२) सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभागामार्फत इतर मागासवर्गासाठी उन्नत आणि प्रगत व्यक्ती/गट (क्रिमीलेअर) याबाबतची उत्पन्न मर्यादा वाढविल्यास सदर वाढीव उत्पन्न मर्यादा खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी आपोआप लागू राहील.

-२-

(१३) मागासवर्गीयांचे आरक्षित प्रवर्ग आणि खुला प्रवर्ग यांना सेवा भरतीसाठी जे सेवाभरती नियम, अटी व शर्ती लागू आहेत तेच सेवाभरती नियम, अटी व शर्ती त्या त्या प्रवर्गातील महिलांसाठीच्या आरक्षणाबाबतही लागू राहतील.

(१४) महिला आरक्षणाच्या अंमलबजावणीचे सनियंत्रण महिला व बाल विकास विभागामार्फत करण्यात यावे.

(१५) महिलांच्या आरक्षित पदांच्या लाभाकरिता उमेदवार महाराष्ट्र राज्याचा सर्वसाधारणपणे रहिवासी असावा.

## (दोन) प्रमाणपत्रे

### (अ) खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी क्रिमीलेअरचे प्रमाणपत्र व त्याची तपासणी

(१) खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यासाठी तहसिलदार व नायब तहसिलदार यांना सक्षम अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. याबाबतचा अर्जाचा नमुना व प्रमाणपत्राचा नमुना परिशीष्ट २ व ३ म्हणून सोबत जोडला आहे.

(२) वरील प्रमाणपत्राच्या आधारे ज्या महिलांना आरक्षणाचा लाभ देण्यात येईल त्यांची प्रमाणपत्रे तपासण्यास आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना सक्षम अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोग अथवा इतर सक्षम प्राधिकाऱ्याकडून महिलांच्या आरक्षित पदावर नेमणूकीकरिता ज्या महिलांची शिफारस होईल त्यांची प्रमाणपत्रे व त्यांनी आरक्षित पदांकरिता केलेला अर्ज संबंधित विभागांनी /कार्यालयांनी आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचेकडे तपासणीसाठी पाठवावा.

(४) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांनी सदर प्रमाणपत्र या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांनुसार आहे किंवा नाही हे तपासावे. तसेच, सदर प्रमाणपत्राच्या पृष्ठयर्थ संबंधित उमेदवाराने या शासन निर्णयातील परिशीष्ट-२ मधील अर्जान्वये प्रमाणपत्र मिळण्याकरिता जी माहिती सादर केली असेल ती माहिती मूळ कागदपत्रांवरुन तसेच आवश्यकता वाटल्यास गृहभेटी देवून तपासून घ्यावी. व सर्व माहीती योग्य असल्याचे आढळून आल्यास प्रमाणपत्र प्रमाणित करुन संबंधित कार्यालयांना परत पाठवावे.

(५) जर एखादया प्रमाणपत्राबाबत आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना शंका असल्यास त्यांनी याबाबतचा सविस्तर तपशील आपल्या अहवालात नमूद करावा.

(६) ज्या उमेदवारांची प्रमाणपत्रे आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांनी तपासून प्रमाणित केली असतील त्या उमेदवारांची महिलांच्या आरक्षित पदावर नेमणूक करण्यास हरकत नाही.

(७) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांनी प्रमाणपत्र तपासणीचा अहवाल एक महिन्यात संबंधित कार्यालयांना पाठवावा.

(८) आयुक्तांचा अहवाल एक महिन्यात प्राप्त झाला नाही तर संबंधित कार्यालयांनी प्रमाणपत्र पडताळणीच्या अधिनतेने संबंधित उमेदवारास तात्पुरती नेमणूक द्यावी.

(९) ज्या उमेदवारांच्या प्रमाणपत्रांबाबत शंका उपस्थित झाली असेल अशा उमेदवारांच्याबाबतीत आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांनी स्वतःच्या सहीने आपल्या शंका संबंधित जिल्हा दंडाधिकारी यांना अ.शा. गोपनीय पत्राद्वारे कळवाव्यात व त्यांचा अहवाल ठराविक कालमर्यादेत मागवावा.

(१०) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांनी उपस्थित केलेल्या शंका संबंधित जिल्हा दंडाधिकाऱ्यांना मान्य असल्यास त्यांनी संबंधित प्रमाणपत्र रद्द करावे.

### (ब) मागासवर्गीय उमेदवारांची प्रमाणपत्रे व त्यांची तपासणी

(१) अनु.जाती, अनु.जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग यामधील महिलांनी त्यांच्या प्रवर्गातील महिला आरक्षणाच्या लाभाकरिता त्या त्या प्रवर्गात मोडत असल्याचे प्रमाणपत्र आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग अथवा विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग यांनी वेळोवेळी दिलेल्या सूचनांनुसार सादर करणे आवश्यक राहील व सदर प्रमाणपत्रे तपासण्याबाबत आदिवासी विकास विभाग आणि सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग यांनी जी कार्यपध्दती विहीत केली आहे तीच कार्यपध्दती अंमलात राहील.

### (क) मागासवर्गीय उमेदवारांची खुल्या प्रवर्गातील महिलांच्या आरक्षित पदावर नियुक्ती झाल्यास त्याबाबतची प्रमाणपत्रे व त्याची तपासणी

(१) मागासवर्गीयांच्या प्रवर्गातील ज्या महिला उमेदवार खुल्या प्रवर्गातील जागांकरीता विकल्प देतील किंवा विकल्प न देताही मागासवर्गीयांच्या प्रवर्गातील ज्या महिला उमेदवारांची निवड खुल्या प्रवर्गातील महिलांच्या आरक्षित पदावर झाल्यास, अशा महिला उमेदवारांना प्रमाणपत्र सादर करण्याबाबत खालील दोन विकल्प राहतील.

(अ) अशा महिला उमेदवारांनी सामाजिक न्याय विभाग, आदिवासी विकास विभाग अथवा विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग यांनी विहीत केल्याप्रमाणे त्यांच्या

-३-

संबंधित जातीची प्रमाणपत्रे सादर करावीत व ती त्या विभागांनी विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार तपासून घेण्यात यावीत. अशा महिला उमेदवारांकडून खुल्या प्रवर्गातील महिलांकरीता विहित केलेले क्रिमीलेअरचे प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता राहणार नाही.

(ब) जर त्यां त्यांच्या संबंधित जातीचे प्रमाणपत्र सादर करु इच्छित नसतील किंवा सादर करु शकत नसतील तर अशा महिला उमेदवारांनी खुल्या प्रवर्गातील महिलांप्रमाणेच या शासन निर्णयाच्या परिशिष्ट ३ नुसार विहित केलेले उन्नत व्यक्ति/गट (क्रिमीलेअर) मध्ये मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.त्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

(१) या शासन निर्णयाच्या परीशिष्ट-२ नुसार संबंधित तहसिलदार/नायब तहसिलदार यांचेकडे क्रिमीलेअरच्या प्रमाणपत्रासाठी अर्ज करावा.

(२) वर नमूद केलेल्या उमेदवारांनी उन्नत व्यक्ती/गट (क्रिमीलेअर) मध्ये मोडत नसल्याबाबतच्या प्रमाणपत्रासाठी अर्ज केल्यास, तहसिलदार व नायब तहसिलदार यांनी अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गाप्रमाणेच उन्नत व्यक्ति/गट (क्रिमीलेअर) मध्ये मोडत नसल्याचे प्रमाणपत्र द्यावे.

(३) हे प्रमाणपत्र देण्यासाठी तहसिलदार व नायब तहसिलदार यांना सक्षम अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. याबाबतच्या अर्जाचा नमुना व प्रमाणपत्राचा नमुना या शासन निर्णयाच्या परिशिष्ठ २ व ३ प्रमाणे राहील.

(४) वरील प्रमाणपत्र तपासण्यासाठी या शासन निर्णयाच्या परिच्छेद (दोन) (अ) मध्ये नमूद केलेली कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

(तीन) हे आदेश तात्काळ अंमलात येतील.

(चार) हा शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक. २९/१६-अ, दि. ३.४.२००१ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(चंद्रसेन तुरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र राज्य

प्रति,

मा.राज्यपालांचे सचिव.
मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव.
मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव.
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव

- प्रबंधक, महाराष्ट्र न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
- प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
- सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
- सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१
सर्व विभागीय महिला व बाल विकास अधिकारी,
सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी
सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालये
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व महानगरपालिका
सर्व जिल्हाधिकारी
सर्व तहसिलदार/नायब तहसिलदार
सर्व जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी
सर्व शासन अनुदानित संस्था
निवड नस्ती-कक्ष-२

- ग्रंथी

मुद्रा-२०६३(अ)(९०२०-५-०९)-२

**जिल्हा परिषदांमध्ये स्थापन करण्यात आलेल्या महिला व बालकल्याण समितीने राबवावयाच्या योजना.**

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
शासन निर्णय क्रमांक : झेडपीए १००६/१२०७/प्र.क्र.०८/पंरा-१
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २९ जून, २००६.

**वाचा :-** १) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक :- झेडपीई-१०९२/ प्र.क्र.३१८/०५, दिनांक ३.१२.१९९३.
२) शासन पत्र क्रमांक झेडपीई-१०९३/सीआर-४३९/०५, दिनांक २.९.१९९३.
३) शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक :-झेडपीई-१०९४/ सीआर-९६६/०५, दिनांक १२.८.१९९४.
४) शासन पत्र ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक:- झेडपीई-१०९३/ सीआर-४३९/०५, दिनांक १२.१०.१९९३.
५) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक:- झेडपीई-१०/२००१/ प्र.क्र.२०६/०५, दिनांक ६.११.२००१.

**शासन निर्णय :-**

महिला व बाल विकासाशी संबंधित विविध कार्यक्रम राबविण्यासाठी सर्व जिल्हा परिषदांमध्ये महिला व बालकल्याण समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. सदर समितीने राबवावयाचे कार्यक्रम संदर्भाधीन अ.क्र.५ येथील शासन निर्णयान्वये सर्व जिल्हा परिषदांना सूचना दिलेल्या आहेत. तथापि, बदलत्या परिस्थितीनुसार बऱ्याच योजना / कार्यक्रम कालबाहय झाल्यामुळे त्यामध्ये बदल /सुधारणा करणे आवश्यक आहे. तसेच बहुतेक जिल्हा परिषदांमधील लोकप्रतिनिधींना अशा योजनांबाबत फारशी माहिती नसल्यामुळे अथवा योजनेसाठी अत्यल्प तरतूद असल्याने महिलांच्या योजनांची योग्य रीतीने अंमलबजावणी होत नाही. या सर्व बाबी लक्षात घेऊन महिलांना सर्व क्षेत्रात सक्षम करण्यासाठी जिल्हा परिषद क्षेत्रात महिला व बालकल्याण समित्यांनी खालील योजना राबविण्याबाबत शासन आदेश देत आहे.

**<u>१) मुलींना व महिलांना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण :-</u>** शासकीय किंवा अशासकीय संस्थांमार्फत काही तांत्रिक / व्यावसायिक प्रशिक्षण वर्ग चालविले जातात. अशा संस्थांमधून खालील प्रकारच्या प्रशिक्षणासाठी योजना राबवाव्यात. उदा.व्यक्तिमत्व विकास, इंग्रजी संभाषण, पब्लिक स्पिकिंग, आत्मविश्वास निर्माण, बालवाडी शिक्षिका, गवंडी, सुतारकाम, प्लंबर प्रशिक्षण, घरगुती विद्युत उपकरणांची दुरुस्ती ( टी.व्ही., रेडिओ, मिक्सर, इस्त्री, टोस्टर, इ. मोबाईल दुरुस्ती, संगणक दुरुस्ती, म्युझिक सिस्टीम दुरुस्ती) वाहन दुरुस्ती, सौंदर्यप्रसाधनांचे प्रशिक्षण, केटरींग, बेकींग, विशिष्ट पध्दतीच्या स्वयंपाकाचे प्रशिक्षण, घरगुती कामकाजाचे प्रशिक्षण (full time domestic help), शासकीय व अशासकीय नोकरीसाठी प्रशिक्षण उदा. महिला हवालदार, ड्रायव्हर व कंडक्टर, विमा एजंट, रिसेप्शनिस्ट, लघुलेखन/ टंकलेखन, सेल्स गर्ल, परिचारिका (नर्स) प्रशिक्षण, वृध्दांची देखभाल, लहान मुलांची देखभाल, फिजिओथेरपी प्रशिक्षण, पॅकेजिंग, फुडप्रोसेसिंग, दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन, कचऱ्यापासून खतनिर्मिती, गांडूळखत, कचऱ्याचे विभाजन व व्यवस्थापन, शोभिवंत फुलझाडांची लागवड व विक्री, औषधी वनस्पतीचे उत्पन्न, इ. १४ वर्षे वय किंवा त्यापेक्षा जास्त वयाच्या मुलींना व शाळेतून गळती झालेल्या मुलींना अशा व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देण्यासाठी सदर योजना प्रस्तावित करण्यात येत आहे. या योजनेखाली मान्यताप्राप्त संस्थेत प्रशिक्षण घेणाऱ्या मुलींना प्रति लाभार्थी रु.५०००/- पर्यंत प्रशिक्षणाचे शुल्क (Fees) भरण्याची तरतूद राहील. प्रशिक्षण शुल्काच्या रकमेच्या दहा टक्के रक्कम लाभार्थ्यांने स्वतः भरावी. प्रशिक्षण कालावधी जास्तीत जास्त एक वर्षाचा असावा. शुल्क भरण्याचे नियम व प्रक्रिया संबंधित जिल्हा परिषदांनी ठरवावी.

**<u>२) मुलींना स्वसंरक्षणासाठी व त्यांच्या शारीरिक विकासासाठी प्रशिक्षण योजना :-</u>** या योजनेमध्ये मुलींना कुंग्फू-कराटे, योगाचे प्रशिक्षण देण्यात यावे. कोणत्याही वयोगटातील परंतु आर्थिकदृष्टया मागासलेल्या कुटुंबातील मुलींना सदर प्रशिक्षण मोफत देण्यात यावे. सदर प्रशिक्षण किमान तीन महिन्यांचे असावे. ते शाळा व महाविद्यालये यांच्या समन्वयाने आयोजित करण्यात यावे. या योजनेतून प्रशिक्षकाच्या मानधनावर साधारणपणे प्रति लाभार्थी रु.३००/- प्रतिमहापर्यंत खर्च करण्यात यावा.

**३) शाळेत जाणा-या मुलींना सायकल वाटप** :- ज्या गावात शाळा नाही त्या गावातील मुलींना इतर गावातील माध्यमिक शाळेला जावे लागते. तसेच ज्या गावातून सदर माध्यमिक शाळेला जाण्यासाठी एसटी/बस सेवा उपलब्ध नाही, फक्त अशाच गावातील लाभार्थ्यांना सायकल वाटप करण्यात यावे. एसटी/बस सुविधेसंबंधी दाखला एसटी/बस डेपो व्यवस्थापकाकडून घेण्यात यावा. १०% लाभार्थीचा स्वहिस्सा असावा.

**४) महिला प्रतिनिधींची अभ्यास सहल** :- जिल्हा परिषद/पंचायत समिती व ग्रामपंचायत यामध्ये निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींना यशदा व इतर संस्थांमार्फत प्रशिक्षण देण्यात येते. म्हणून प्रशिक्षणासाठी स्वतंत्र योजनेची आवश्यकता नाही. मात्र चांगल्या योजनांची अंमलबजावणी पाहण्यासाठी अभ्यास सहल आयोजित करण्यास हरकत नाही. या योजनांवर प्रतिलाभार्थी दरवर्षी रु.२०००/- खर्च मर्यादा सुचविण्यात आली होती. याशिवाय एका वर्षात या योजनेवर एकूण खर्च रु.२०,०००/- पेक्षा अधिक करण्यात येऊ नये अशी अट जोडण्यात यावी.

**५) आर्थिकदृष्टया गरीब स्त्रियांच्या मुलांसाठी पाळणाघर** :- आर्थिकदृष्टया कमकुवत घटकातील नोकरी करणा-या किंवा शेतावर कामासाठी जाणा-या स्त्रियांच्या लहान मुलांसाठी या योजनेखाली पाळणाघर उपलब्ध करुन देता येईल. सदर पाळणाघर चालविण्यासाठी जिल्हा परिषदेने योग्य अश्या स्वयंसेवी संस्थेची निवड करावी. यासाठी लाभार्थ्यांची निवड व किती अनुदान द्यावे याबाबत जिल्हा परिषदेने (पंचायत समित्या व ग्रामपंचायत यांनी ) निर्णय घ्यावा. पाळणाघर चालविण्यासाठी अटी :- १) योजनेचा खर्च, आयांच्या मानधनावर व मुलांच्या आहारावर करण्यात यावा. २) एका आयाने किमान पाच मुलांचा सांभाळ करणे आवश्यक आहे. त्यासाठी तिला किमान रु.६००/- प्रति महिना मानधन देण्यात यावे. ३) प्रतिदिवस प्रतिमूल रु.२ ते ५/- पर्यंत आहार/दुधावर खर्च करावे. उर्वरित आहार/दुधावर खर्च करावे. उर्वरित आहार पालकांनी द्यावा. ४) पाळणाघर दररोज किमान ८ (आठ) तास सुरु असावे. ५) पाळणाघराच्याबरोबर संडास/बाथरुम तसेच पाण्याची सोय असावी. ६) पाळणाघरासाठी जागा ग्रामपंचायतीनी द्यावी. तसेच स्टोव्ह, गादी, भांडी इ.साहित्य महिला संस्थांनी उपलब्ध करुन द्यावे.

**६) महिलांना कायदेशीर/विधिविषयक सल्ला देणे** :- बहुतेक मुलींना व महिलांना त्यांच्या कायदेशीर अधिकारांबद्दल माहिती नसते. तसेच महिलांसबंधी विविध कायद्यांची कल्पना नसते. विशेषत: हुंडाविषयक कायदे, स्त्रीधन, मालमत्ता अधिकार, वारसा हक्क, लग्न, घटस्फोट, पोटगीविषयक कायदे, बलात्कारविषयक कायद्यातील तरतूदी, लग्नानंतरचे अधिकार. त्यामुळे सदर विषयावर महाविद्यालय व इतर ठिकाणी मुली व महिलांसाठी लेक्चर ठेवण्यात यावे व यासाठी या विषयाबाबत कुशल वकीलाची नेमणूक करण्यात यावी. तसेच चांगल्या वकीलाची निवड करण्यासाठी जिल्हास्तरीय निवड समिती असावी व यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा सरकारी वकील, सिनीयर जे.एफ.एम.सी. (ज्युडीशियल मॅजिस्ट्रेट) इ.अधिकारी असावेत, जेणेकरुन फक्त चांगल्या वकीलांची निवड होईल.

**७) किशोरवयीन मुलींना व मुलांना लैंगिक शिक्षण, जेंडर (gender) प्रशिक्षण व जीवनकौशल्याचे प्रशिक्षण देणे** :- किशोरवयीन मुलांना व मुलींना शाळेत सर्वसाधारण शिक्षण देण्यात येते. परंतु लैंगिक व विशिष्ट किशोरवयीन समस्यांबद्दल शिक्षण देण्यात येत नाही. असे निदर्शनास आले आहे की, त्यामुळे त्यांना काही मानसिक व सामाजिक, मनोवैज्ञानिक अडचणींना तोंड द्यावे लागते. याबाबत अनुभवी व संवेदनशील तज्ज्ञ/स्वयंसेवी संस्थांमार्फत सदर प्रशिक्षण आयोजित करण्यात यावे. त्याचे स्वरुप स्थानिक आवश्यकतेनुसार ठरविण्यात यावे. उदा. शाळेत / महाविद्यालयात शिकणा-या मुलींसाठी किंवा गळती झालेल्या मुलींसाठी दर आठवडयाला एक वर्ग (तसेच मुलांसाठी स्वतंत्र वर्ग) भरविण्यात यावेत. प्रत्येक वर्ग १ ते २ तासांचा असावा. बाहेरील तज्ज्ञांना व डॉक्टरांना, मनोवैज्ञानिकांना सदर सत्र घेण्यासाठी निमंत्रित करण्यात यावे. त्यांना प्रत्येक सत्रासाठी साधारणपणे रु.२०० ते ४०० मानधन देण्यात यावे.

**या प्रशिक्षणात मुलींसाठी साधारणत: खालील बाबींचा समावेश असावा** :-

अ) स्त्रियांच्या मासिक पाळीचे शास्त्र व उद्देश

ब) मासिक पाळीच्या काळात आरोग्यविषयक घ्यावयाच्या काळजीची आवश्यकता.

क) स्त्रियांच्या मासिक पाळीसंदर्भातील गैरसमज. उदा.मासिक पाळीच्या काळात स्त्रिया अशुध्द असतात आणि त्यांना इतरांपासून व स्वयंपाकघरापासून वेगळे ठेवणे.

ड) गर्भधारणेचे शास्त्र, सर्वसाधारणपणे कुटुंबनियोजनाची साधने.

इ) बालविवाहामुळे आरोग्यास होणारे दुष्परिणाम.

फ) लैंगिक छळ, त्यापासून स्वसंरक्षण कसे करावे, कोणाची मदत घ्यावी. अशा परिस्थितीत हेल्पलाईनचा उपयोग करणे.

भ) एडस् नियंत्रण.

यासंदर्भात आरोग्य संचालनालय, केईएम रुग्णालय तसेच मुंबई महानगरपालिकेने चांगले मार्गदर्शक पुस्तक प्रसिध्द केले आहे. त्याच प्रकारच्या पुस्तिका तयार करुन वापरणे, मुलांसाठी स्वतंत्र विषयक निश्चित करावे. उदा. शरीरशास्त्र, विकास, एडस्, मुली/स्त्रियांबरोबर कसे वागावे, लैंगिक रोगांबद्दल गैरसमज व अंधश्रध्दा इ.

<u>**८. महिलांसाठी समुपदेशन केंद्र चालविणे :-**</u> कुटुंबातील मारहाण, लैंगिक छळ व इतर तऱ्हेने त्रासलेल्या तसेच मानसिकदृष्टया असंतुलित महिलांच्या सामाजिक, मानसशास्त्रीय, कायदेशीर समुपदेशनासाठी सदर योजना राबवावी. यासाठी समुपदेशक व सल्लागार यांच्या मानधनावर खर्च करण्यात यावा. समुपदेशक व सल्लागाराची निवड अनु.क्र.६ मधील योजनेत अंतर्भूत केलेल्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या समितीमार्फत करण्यात येईल. सदर योजना महाविद्यालय / तज्ज्ञांच्या संस्थांमार्फत राबवावी. उदा. ज्या संस्थांकडे यापूर्वीच अशा प्रकारच्या समुपदेशनासाठी आवश्यक मनुष्यबळ, जागा, अनुभव व सोईसुविधा उपलब्ध असतील. सध्या देण्यात आलेल्या सुविधा व समुपदेशन यांचा विस्तार करण्याची आवश्यकता असल्यास असे प्रस्तावही मंजूर करण्यात यावेत. मात्र यासाठी संस्थेकडे स्वतःची जागा असणे आवश्यक आहे. तसेच त्यांनी स्वतः कार्यालयीन फर्निचर व इतर अनावर्ती खर्चाची व्यवस्था करावी. समुपदेशकाचे व सल्लागाराचे मानधन जास्तीत जास्त साधारणपणे दरमहा रु.८०००/- पर्यंत असावे. तथापि स्थानिक दराप्रमाणे मानधन ठरवावे. याशिवाय कार्यालयीन / प्रशासकीय आवर्ती मासिक खर्चासाठी जिल्हा परिषदा यांनी स्वतः मर्यादा निश्चित करावी व त्याप्रमाणे अनुदान देण्यात यावे. तसेच वस्तू साहित्य खरेदीवर एकूण योजनेवरील खर्चाच्या ३०% पेक्षा जास्त खर्च करण्यात येऊ नये.

**९. सामुहिक विवाह :-** हुंडापध्दतीला आळा घालण्यासाठी कमीतकमी खर्चात कोणत्याही इच्छुक मुलामुलींसाठी सामुहिक विवाह आयोजित करण्यात यावेत व यात प्रति दांपत्य रु.५०००/- पर्यंत खर्च करण्यात यावा. विशेषतः गरीब कुटुंब, कर्जात बुडालेला शेतकरी, भूमिहीन शेतमजूर अशा प्रकारच्या कुटुंबांना या योजनेचा लाभ द्यावा.

**१०. तालुकास्तरावर शिकणा-या मुलींसाठी होस्टेल चालविणे :-** ग्रामीण भागात माध्यमिक शाळा नसल्यामुळे ८ वी ते १२ वी वर्गापर्यंत शिकणा-या मुलींना शिक्षण घेण्यासाठी स्वतःच्या गावांपासून लांब अंतरावर जाऊन रहावे लागते. तालुक्याच्या ठिकाणी जेथे माध्यमिक शाळा असतात, तेथे अशा मुलींना वसतीगृह उपलब्ध करुन दिल्यास मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढेल. यामुळे १८ वर्षांपूर्वी लग्न न करण्यासाठी त्यांच्या कुटुंबियांना प्रवृत्त करता येईल. या योजनेखाली वसतीगृह इमारतींचे बांधकाम न करता, भाडयावर इमारत/घर/फ्लॅट घेण्यात यावेत. सदर वसतीगृह स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात यावीत. फक्त भाडे व प्रशासकीय खर्चासाठी अर्थसहाय्य देण्यात यावे. जेवणाचा खर्च लाभार्थ्यांनी सोसावा. कमीतकमी १० मुलींसाठी एक वसतीगृह असावे. प्रशासकीय खर्चाची मर्यादा जिल्हा परिषदांनी निश्चित करावी, पण ती रु.५००/- प्रति लाभार्थी प्रति माह (भाडे वगळून) यापेक्षा जास्त नसावी.

**११. कुपोषित मुलांसाठी अतिरिक्त आहार :-** ग्रामीण / आदिवासी भागातील मुलांमध्ये कुपोषणाचे प्रमाण जास्त असल्याचे आढळून आले आहे. ते प्रमाण कमी करण्यासाठी कुपोषित मुलांना अंगणवाडयांमार्फत दुप्पट आहार दिला जातो. तथापि कुपोषण कमी करण्यासाठी तो पुरेसा नसल्याने कुपोषित मुलांना अंगणवाडीत पुरविण्यात येणाऱ्या आहाराव्यतिरिक्त विशेष आहार म्हणून स्थानिक उपलब्धतेनुसार दूध, अंडी, फळे, गूळ, शेंगदाणे, इ. वस्तूंचा पुरवठा करण्यात यावा.

**१२. अंगणवाडयांना साहित्य पुरविणे :-** एकात्मिक बाल विकास योजनेखाली अंगणवाडयांना लागणा-या साहित्याची खरेदी, जी नियमित योजनेखाली खरेदी करणे शक्य होणार नाही, अशा वस्तूंवर महिला व बाल कल्याण समितीने खर्च करावा. तथापि, ज्या अंगणवाडया समिती स्वतःच्या निधीमधून चालविल, त्यावरील खर्च समितीने स्वतःच्या निधीमधून करावा.

अंगणवाडी साहित्य खरेदी करण्याची प्रक्रिया विहित पध्दतीने दरवर्षी एप्रिल महिन्यापासूनच सुरु करावी. यामुळे अंगणवाडयांना वेळेवर आवश्यक साहित्यपुरवठा होऊ शकेल.

**१३. अंगणवाडीतील बालकांसाठी जंतनाशन कार्यक्रम :-** अंगणवाडीतील बालकांना जंताचा प्रादुर्भाव आल्याचे दिसून येत आहे. परिणामी बालकांचे वजन न वाढणे व कुपोषणाचे प्रमाण वाढत जाणे. अंगणवाडयांना शासनामार्फत जंतनाशक गोळयांचा पुरवठा करण्यात येतो. तथापि नियमितपणे दर सहा महिन्यांनी बालकांचे जंतनाशन (डिवार्मिंग) करणे आवश्यक असल्याने ज्या भागात अंगणवाडयांना जंतनाशक गोळयांची कमतरता भासेल, अशा ठिकाणी जंतनाशक गोळयांचा पुरवठा करण्यात यावा. जंतनाशनाची औषधे दर सहा महिन्यांनी म्हणजेच १४ नोव्हेंबर (बालदिन) व १ मे (महाराष्ट्र दिन) या दिवशी अंगणवाडी सेविका व आरोग्य कर्मचारी यांच्यामार्फत देण्यात यावीत.

**१४. कुपोषण कमी करण्यासाठी परसबाग तयार करणे :-** ग्रामीण / आदिवासी भागात फळे, पालेभाज्या, फळभाज्या, वेलवर्गीय भाज्या यांचा आहारात दररोज वापर होत नसल्यामुळे कुपोषणाचे प्रमाण वाढत जाते. त्यामुळे कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी कुपोषणाचे प्रमाण जास्त असेल त्या भागात बालकांना / गर्भवती स्त्रिया / स्तनदा माता यांना आहारात दररोज भाज्या उपलब्ध होण्यासाठी परसबाग तयार करण्यात यावी. या योजनेमध्ये परसबाग तयार करण्यासाठी बीज देण्यात यावे. तसेच अंगणवाडी सेविका / आरोग्य कर्मचारी यांच्यामार्फत बीजाची वाढ, संगोपन याबाबत कुटुंबकर्त्यास ज्ञान देण्यात यावे. परसबाग लावण्यासाठी सांडपाण्याचा उपयोग करण्यात यावा.

**१५. अर्भकांसाठी हायपोथर्मिया प्रतिबंध किट देणे :-** ग्रामीण/आदिवासी भागात अर्भकास (एक वर्षापर्यंतच्या) बाळास जन्मानंतर काही दिवस कडे घातले जात नाही अथवा जमिनीवर झोपविले जाते. त्यामुळे बाळाचे तपमान कमी होते. नंतरच्या काळात बाळाने लघवी/संडास केल्यानंतर ओले होणारे कपडे न बदलल्याने शरीराचे तपमान कमी होऊन मुले आजारी पडतात/कुपोषित होतात. या बाबी टाळण्यासाठी बाळाच्या वापरासाठी हायपोथर्मिया प्रतिबंधक किट उपलब्ध करुन देण्यात यावी. या किटमध्ये मच्छरदाणी, मिनी वुलन ब्लँकेट (3"x4"),

सुती कपडे (नॅपकिन) (4"x3") चे चार संच इ. वस्तूंचा समावेश असावा. त्या किटमधील वस्तूंचा वापर करण्याबाबत गर्भवती स्त्रिया/ संगोपनकर्त्यास प्रशिक्षण देण्यात यावे.

**१६. गरोदर स्त्रिया / स्तनदा माता यांना आयोडीनयुक्त मीठ पुरविणे :-** ग्रामीण / आदिवासी भागात दैनंदिन आहारात आयोडीनयुक्त मीठाचा वापर होत नसल्याने गलगंड सारखे गंभीर आजार उद्भवतात. अशा रोगांवर प्रतिबंध करण्यासाठी गरोदर स्त्रिया, स्तनदा माता यांना आयोडीनयुक्त मीठाचा पुरवठा करण्यात यावा.

**१७. बारावी पास मुलींना MS-CIT प्रशिक्षण देणे :-**सध्या शासकीय/निमशासकीय नोकरीसाठी MS-CIT उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे.संगणकाबाबतचे ज्ञान तसेच संगणक चालविण्याचे कौशल्य प्राप्त करण्यासाठी १२ वी पास मुलींना MS-CIT अभ्यासक्रमासाठी प्रशिक्षण देण्याची योजना यामुळे उपयुक्त राहील. त्याप्रमाणे एखाद्या मान्यताप्राप्त संस्थेला फी देऊन त्याबाबतचे प्रशिक्षण आयोजित करण्यात यावे.

उपरोक्त योजनांखालील प्रशिक्षक, समुपदेशक, स्वयंसेवी संस्था इ.ची निवड करताना अनुक्रमांक '६' येथील योजनेप्रमाणे निवड समिती गठित करण्यात यावी. तसेच **वस्तू व साहित्य खरेदीवर योजनेच्या एकूण खर्चाच्या ३०% पेक्षा जास्त खर्च करु नये.** जेणेकरुन जास्त भर प्रशिक्षणाच्या योजनांवर राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संगणक सांकेतांक **20060629153623001** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सुनील चव्हाण)
विशेष कार्य अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,
प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,

(कृ.मा.प.)

सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
संचालक, महिला व बालविकास, पुणे,
संचालक, एकात्मिक बालविकास सेवा योजना, कोकण भवन, नवी मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग,
मुख्यमंत्र्यांचे सचिवालय,
सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
ग्राम विकास व जलसंधारण विभागाची सर्व कार्यासने,
निवड नस्ती, कार्यासन क्र.पंरा-१, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत,

१) सचिव, महिलांचे हक्क व कल्याण समिती, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.

२) सचिव, पंचायत राज समिती, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई यांजकडे माहितीसाठी रवाना.

# परिशिष्ट - "ब"

# शासन निर्णय

परिशिष्ट - "क"

बैठकीची उपस्थिती

**महिलांचे हक्क व कल्याण समिती**
**मंगळवार, दिनांक २८ ऑक्टोबर, २०१५**
**स्थळ : नवी मुंबई महानगरपालिका**

**उ प स्थि ती**

**(१)** श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. तथा समिती प्रमुख
**(२)** श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स
**(३)** डॉ.भारती लव्हेकर, वि.स.स
**(४)** श्री.योगेश घोलप, वि.स.स
**(५)** श्रीमती दिपीका चव्हाण,वि.स.स
**(६)** श्रीमती स्मिता वाघ, वि.स.स
**(७)** श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स
**(८)** ॲड हुस्नबानू खलिफे, वि.प.स

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**
श्री. विलास आठवले, उप सचिव

**नवी मुंबई महानगरपालिका :**

(१) श्री.दिनेश वाघमारे, आयुक्त
(२) श्री.अंकुश चव्हाण, अतिरिक्त आयुक्त
(३) श्री.जे.एन.सिन्नरकर, उप आयुक्त
(४) श्री.अ.र.पटनिगीरी, उप आयुक्त (शिक्षण)
(५) श्री.उमेश वाघ, उप आयुक्त (स्थानिक संस्था कर विभाग)
(६) डॉ.वर्षा भगत, संचालक (ई.टी.सी)
(७) श्रीमती तृप्ती सांडभोर, उप आयुक्त
(८) श्री.बाबासाहेब राजळे, उप आयुक्त
(९) श्री.धनराज गरड, लेखाधिकारी
(१०) श्रीमती चित्रा बाविस्कर, महापालिका सचिव
(११) श्रीमती शुभांगी दोडे, कार्यकारी अभियंता
(१२) श्रीमती संध्या अंबादे, उप आयुक्त
(१३) डॉ.दिपक परोपकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी

**महिलांचे हक्क व कल्याण समिती**
**बुधवार, दिनांक १२ जुलै, २०१७**
**स्थळ : कल्याण-डोंबिवली महानगरपालिका**

**उपस्थिती**

(१) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स.तथा समिती प्रमुख
(२) श्रीमती सीमा हिरे, वि.स.स.
(३) श्रीमती दिपिका चव्हाण, वि.स.स.
(४) श्रीमती स्मिता वाघ, वि.प.स.
(५) श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स.
(६) ॲड.हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**
श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव
श्री. ह.वि. तामोरे, कक्ष अधिकारी

**कल्याण-डोबिवली महानगरपालिका क्षेत्रीय अधिकारी**

(१) श्री. वेलरासू, आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका
(२) श्री. संजय घरत, अतिरिक्त आयुक्त
(३) श्री. विजय पगार, उपायुक्त
(४) श्री. दिग्विजय चव्हाण, मुख्य लेखा अधिकारी
(५) श्री. नितीन नार्वेकर, सहाय्यक आयुक्त
(६) श्री. मिलिंद धाट, सहाय्यक आयुक्त
(७) श्री. अनिल लाड, प्रभारी व कर निर्धारण व संकलक
(८) श्रीमती (डॉ.) रोडे, प्रभारी वैद्यकीय आरोग्य अधिकारी
(९) श्री. जे. जे. तडवी, उप अभियंता
(१०) श्रीमती रोहिणी लोकरे, उप अभियंता

**महिलांचे हक्क व कल्याण समिती**
**गुरुवार, दिनांक १९ नोव्हेंबर, २०१५**
**स्थळ : सांगली महानगरपालिका**

**उ प स्थि ती**

(१) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स.तथा समिती प्रमुख
(२) श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स.
(३) श्रीमती सीमा हिरे, वि.स.स.
(४) डॉ.भारती लव्हेकर, वि.स.स.
(५) श्रीमती दिपीका चव्हाण, वि.प.स.
(६) श्रीमती स्मिता वाघ,वि.प.स
(७) ॲड.हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. विलास आठवले, उप सचिव

**सांगली महानगरपालिका क्षेत्रीय अधिकारी**

(१) श्री. अजीज कारचे, आयुक्त
(२) श्री. सुनील पवार, उपायुक्त (मुख्यालय)
(३) श्री. सुनील नाईक, उपायुक्त
(४) श्री. टी.सी.गवळी, सहायक आयुक्त,मिरज
(५) श्री. आर.एल.वाघमारे, सहाय्यक आयुक्त, सांगली
(६) श्री. सी.बी.चौधरी, सहाय्यक आयुक्त, कुपवाड
(७) श्री. सी.जी.सोनवणे, प्रभारी शहर अभियंता
(८) डॉ.रोहिणी कुलकर्णी, तत्कालीन आरोग्य अधिकारी
(९) डॉ.चारुदत शहा, वैद्यकिय आरोग्य अधिकारी
(१०) श्री.चंद्रकांत आडके, प्रशासन अधिकारी, आस्थापना
(११) श्री.हणमंत बिराजदार, प्रशासन अधिकारी, शिक्षण
(१२) श्री.अर्जुन जाधव, लेखाधिकारी

**महिलांचे हक्क व कल्याण समिती**
**शुक्रवार, दिनांक २० नोव्हेंबर, २०१५**
**स्थळ : सांगली जिल्हा परिषद**

**उपस्थिती**

(१) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स.तथा समिती प्रमुख
(२) श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स.
(३) श्रीमती सीमा हिरे, वि.स.स.
(४) डॉ.भारती लव्हेकर, वि.स.स.
(५) श्रीमती दिपीका चव्हाण, वि.प.स.
(६) श्रीमती स्मिता वाघ,वि.प.स
(७) ॲड.हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**
श्री. विलास आठवले, उप सचिव

**सांगली जिल्हा परिषद क्षेत्रीय अधिकारी**

(१) श्री. दिलीप पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) श्री. अजयकुमार माने, प्रकल्प संचालक, जिग्राविय.
(३) श्रीमती शुभांगी पाटोळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
(४) श्री. रविकांत अडसुळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं)
(५) श्री. विक्रांत बगाडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र)
(६) श्री. किरण जाधव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.)
(७) श्री. संजय माळी, कार्यकारी अभियंता (बांधकाम)
(८) डॉ.रामचंद्र हंकारे, जिल्हा आरोग्य अधिकारी
(९) श्रीमती निशादेवी वाघमोडे, शिक्षणाधिकारी (प्रा.)
(१०) श्री.मधुकर यादव, शिक्षणाधिकारी (मा.)
(११) श्री.सचिन कवले, समाज कल्याण अधिकारी

**महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती**
**मंगळवार, दिनांक २५ एप्रिल, २०१७**
**स्थळ : डहाणू नगरपरिषद**

**उ प स्थि ती**

**(१)** श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. तथा समिती प्रमुख
**(२)** श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स.
**(३)** श्रीमती सीमा हिरे, वि.स.स.
**(४)** डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स.
**(५)** श्रीमती दिपीका चव्हाण, वि.स.स.
**(६)** श्रीमती स्मिता वाघ, वि.प.स.
**(७)** ॲड.हुस्नबानु खलिफे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**
श्री. विलास आठवले, उप सचिव
श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव

**क्षेत्रिय कार्यालयातील अधिकारी**

(१) श्री.विनोद डवले, मुख्याधिकारी
(२) श्री.प्रदीप जोशी, उपमुख्याधिकारी
(३) श्री.तुकाराम बारी, नगर अभियंता
(४) श्री.इरफान पठाण, लेखापाल
(५) श्रीमती नलिनी माच्छी, कर निरीक्षक
(६) श्री.राम पांढरे, जन्म-मृत्यू विभाग प्रमुख

**महिलांचे हक्क व कल्याण समिती**
**बुधवार, दिनांक ०७ जून, २०१७**
**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उ प स्थि ती**

(१) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स.

(३) श्रीमती स्मिता वाघ, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव

**विभागीय प्रतिनिधी**

(१) श्री.श्रीकांत सिंह, प्रधान सचिव, गृह विभाग
(२) श्री.ता.मा.शेळेकर, सह सचिव, संसदीय कार्य विभाग
(३) श्री.ज.ना.पाटील, सह सचिव, नगरविकास विभाग
(४) श्री.भा.र.गावित, सह सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
(५) श्री.अनिल परशुरामे, उप सचिव, महिला व बालविकास विभाग
(६) श्री.सं.रा.मोटे, उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग
(७) श्री.सु.ना.शिंदे, उप सचिव, आदिवासी विकास विभाग
(८) श्री.गिरीश भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग
(९) श्री.रं.स.गोदे, सह संचालक, आरोग्य विभाग
(१०) श्री.संजय भोसले, जनसंपर्क अधिकारी

**क्षेत्रिय कार्यालयातील अधिकारी**

(१) श्री.कमलाकर फंड, आयुक्त, एकात्मिक बाल विकास योजना, महिला व बालविकास विभाग
(२) डॉ.एन.रामास्वामी, आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका
(३) श्री.अंकुश चव्हाण, अतिरिक्त आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका
(४) श्रीमती तृप्ती सांडभोर, उपायुक्त, नवी मुंबई
(५) श्री.संजय तिवारे, उपायुक्त, ठाणे महानगरपालिका
(६) श्री.विवेक भिमनवार, मुख्य कार्यकारी अधिकारी, ठाणे जिल्हापरिषद
(७) श्रीमती एम.जे.नरहरे (येमले), गृहपाल, मुलींचे शासकीय वसतीगृह, कळंबोली

**महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती**
**मंगळवार, दिनांक २० जून, २०१८**
**स्थळ : विधान भवन, मुंबई.**

**उ प स्थि ती**

(१) डॉ.भारती लव्हेकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्रीमती दिपीका चव्हाण, वि.स.स.
(३) श्रीमती सुमन पाटिल, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**
श्री.विलास आठवले, उप सचिव
श्रीमती सांयली कांबळी, अवर सचिव
प्रियांका कांदळगावकर, कक्ष अधिकारी

**विभागीय प्रतिनिधी**

(१) श्री.विनीता सिगंल, सचिव, महिला व बालविकास विभाग
(२) श्री.टि.वा.करपते, उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग
(३) श्री.सुनिल रावडे, अवर सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग
(४) श्री.प्रिदर्शन शंकरराव कांबळे, अवर सचिव, ग्रामविकास विभाग
(५) श्रीमती प्रमिला वसंत आंबले, गृहपाल, समाजकल्याण सामाजिक न्याय विभाग
(६) श्री.विकेला पांडे, कक्ष अधिकारी, नगरविकास विभाग
(७) श्री.र.पु.इंगोले, सहायक कक्ष अधिकारी, नगरविकास विभाग
(८) श्री.अशोक कस्तुरबा, कक्ष अधिकारी, सामाजिक न्याय विभाग

**क्षेत्रिय कार्यालयातील अधिकारी**

(१) श्री.रविंद्र खेबुडकर, आयुक्त सांगली, महानगरपालिका
(२) श्री.प्रशांत शिर्के, विभागीय आयुक्त, सांगली महानगरपालिका
(३) श्रीमती सु.प्र.आहिरराव, सहाय्यक संचालक, सांगली महानगरपालिका

**सांगली जिल्हा परिषद क्षेत्रिय कार्यालयातील अधिकारी**

(१) शिवा विलास पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी बाल कल्याण
(२) डॉ.ए.बी.साळुंखे, जिल्हा शल्यचिकित्सक ,

**महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती**
**मंगळवार, दिनांक ०५ सप्टेंबर, २०१८**
**स्थळ : विधान भवन, मुंबई.**

**उ प स्थि ती**

(१) डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्रीमती सुमन पाटील, वि.स.स

(३) ॲड हुस्नबानू खलिफे, वि.प.स

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**
श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव
श्रीमती प्रियांका कांदळगांवकर, कक्ष अधिकारी

**विभागीय प्रतिनिधी**

(१) श्री.ला.रा.गुजर, सह सचिव, महिला व बालविकास विभाग
(२) श्री.सिध्दार्थ खरात, सह सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग
(३) श्री.सौरभ विजय, सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग
(४) श्री.गिरीष भालेराव, उच सचिव, ग्रामविकास विभाग
(५) श्री.सचिन सहस्त्रबुध्दे, अवर सचिव, नगरविकास विभाग
(६) श्री.सु.बा.रावडे, अवर सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग
(७) श्री.अ.को.अहिरे, अवर सचिव, सामाजिक न्याय विभाग
(८) श्रीमती मेघना शिंदे, कक्ष अधिकारी, गृह (परिवहन) विभाग

**क्षेत्रिय कार्यालयातील अधिकारी**

(१) श्रीमती शीतल उगले-तेली, अतिरिक्त आयुक्त, पुणे महानगरपालिका

(२) डॉ.प्रविणउ आष्टीकर, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

(३) डॉ.सुहास पेडणेकर, कुलगुरु, मुंबई विद्यापीठ

(४) डॉ.दिनेश कांबळे, कुल सचिव, मुंबई विद्यापीठ

(५) श्री.दत्ता घुगे, उप कुल सचिव,मुंबई विद्यापीठ

(६) श्री.अनिल मुळे, उप आयुक्त, पुणे महानगरपालिका

(७) श्री.सुरज मांढरे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे

(८) श्री.दिपक चाटे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे

(९) डॉ.एस.एम.जाधव, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद पुणे

(१०) श्रीमती आर.आर.पोतदार, पर्यवेक्षिका, जिल्हा परिषद, पुणे

(११) श्री.एस.जी.गुंजाळ, जिल्हा परिषद, पुणे

(१२) श्री.सी.जी.उगले, जिल्हा परिषद, पुणे

(१३) श्रीमती स्नेहा जोशी, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, पुणे

(१४) डॉ.शेफाली पंडया, पिठासीन अधिकारी

(१५) श्री.राजेश अंकुश आगळे, प्रशासन अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

(१६) श्री.संभाजी ऐंवढे, समाज विकास अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

(१७) श्री.दिलीप हिवराळे, उपायुक्त, महिला व बालविकास, पुणे विभाग

**महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती**
**गुरुवार, दिनांक ०३ जानेवारी, २०१९**
**स्थळ : विधान भवन, मुंबई.**

**उ प स्थि ती**

(१) डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. अशोक पाटील, वि.स.स.
(३) श्रीमती सुमन पाटील, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का)
श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव

**विभागीय प्रतिनिधी**

(१) श्री.श्रीकांत सिंह, अतिरिक्त मुख्य सचिव, गृह विभाग
(२) श्रीमती स्मिता निवतकर, उप सचिव, महिला व बालविकास विभाग
(३) श्री.नारायण कराड, उप सचिव, गृह विभाग
(४) श्री.व्यंकटेश भट, उप सचिव, गृह विभाग
(५) श्री. टि.वा.करपते, उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग

**क्षेत्रिय कार्यालयातील अधिकारी**

(१) डॉ.संजय मुखर्जी, अतिरिक्त आयुक्त, मुंबई महानगरपालिका
(२) श्री.राजवर्धन, पोलिस महानिरीक्षक, कारागृह मुंबई, दक्षिण विभाग
(३) श्री.सु.मु.धामणे, उपायुक्त , सार्वजनिक आरोग्य, मुंबई महानगरपालिका
(४) श्रीमती अ. अ. मुगूटराव, उपअधिक्षक जिल्हा पोलिस अधिकारी, भायखळा कारागृह.
(५) डॉ.वाकोडे, सह संचालक, वैद्यकिय अधिकारी, ब्रम्हकुमारी, रुग्णालय, अंधेरी
(६) डॉ.एस.बी. तायडे, अधिष्ठाता जे.जे. रुग्णालय, मुंबई
(७) डॉ.वर्णन वेल्हो, प्राध्यापक, जे.जे. रुग्णालय,मुंबई
(८) श्री.डी.व्ही.देसावळे, उप आयुक्त, जिल्हा महिला व बालविकास विभाग
(९) श्री.आर.एस.पाटील, उप आयुक्त, जिल्हा महिला व बालविकास विभाग
(१०) डॉ.प्रिया पाटील, सह प्राध्यापक, औषधवैदयकिय शास्त्र, जे.जे. रुग्णालय, मुंबई
(११) डॉ.उषा बडोले, विभाग प्रमुख, बधिरीकरण शाखा,जे.जे. रुग्णालय, मुंबई

(१२) डॉ.निवेदिता सु.किनळेकर, वैद्यकिय अधिकारी, भायखळा कारागृह
(१३) डॉ.हरिदास राठोड, वैद्यकिय अधिकारी, ब्रम्हकुमारी रुग्णालय, अंधेरी मुंबई
(१४) डॉ.अशोक महेता, वैद्यकिय अधिकारी, ब्रम्हकुमारी रुग्णालय, अंधेरी मुंबई
(१५) ॲड अमित महेता, व्यवस्थापन कायदेशीर सल्लागार, ब्रम्हकुमारी रुग्णालय,अंधेरी
(१६) ॲड. वैशाली संघवी, कायदेशीर सल्लागार, ब्रम्हकुमारी रुग्णालय,अंधेरी
(१७) ॲड स्मिता पांडे, कायदेशीर सल्लागार, ब्रम्हकुमारी रुग्णालय,अंधेरी
(१८) डॉ.शशांक जोशी, नेरोलॉजिस्ट, ब्रम्हकुमारी रुग्णालय,अंधेरी
(१९) श्री.विनय कुलकर्णी, सहाय्यक पोलिस आयुक्त, दादाभाई नौरोजी नगर, अंधेरी पोलिस ठाणे,मुंबई
(२०) श्री.परमेश्वर गणये, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, अंधेरी पोलिस ठाणे, मुंबई
(२१) श्री.अनिल रोकडे, उपनिरीक्षक, चौकशी अधिकारी, अंधेरी पोलिस ठाणे, मुंबई
(२२) श्रीमती निवेदिता महाडीक, परिविक्षा अधिक्षक, जिल्हा महिला बालविकास अधिकारी, विभाग
(२३) श्रीमती सपना यंदे, परिविक्षा अधिकारी, जिल्हा महिला बालविकास अधिकारी, विभाग
(२४) श्री.प्रविण भावसार, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, मुंबई शहर तथा मुख्य अधिकारी चिल्ड्रेन एण्ड सोसायटी.

**महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती**
**मंगळवार, दिनांक ०८ जानेवारी, २०१९**
**स्थळ : विधान भवन, मुंबई.**

**उपस्थिती**

(१) डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी, वि.स.स.
(३) श्री. अशोक पाटील, वि.स.स.
(४) श्रीमती सुमन पाटील, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय** :
श्री.विलास आठवले, सह सचिव (२) (का)
श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव

**विभागीय प्रितिनिधी :**

(१) श्री.टि.वा.करपते, उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग
(२) श्री.गिरीष भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग
(३) श्री.कैलास बधान, उप सचिव, नगरविकास विभाग
(४) श्री.व्यंकटेश भट, उप सचिव. गृह विभाग
(५) श्री.प्रकाश वळवी, उप सचिव, ग्रामविकास विभाग
(६) श्रीमती प्रतिभा चौधरी, कक्ष अधिकारी, महिला व बालविकास विभाग

**क्षेत्रिय कार्यालयातील अधिकारी :**

(१) श्री.रविंद्र खेबुडकर, आयुक्त, सांगली महानगरपालिका,
(२) डॉ.नरेश भ.गिते, मुख्य कार्यकारी अधिकारी, नाशिक जिल्हापरिषद,
(३) श्री.अ.बा.लांडगे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, नाशिक जिल्हापरिषद,
(४) श्रीमती स्मृती पाटील, उपायुक्त, सांगली महानगरपालिका,

(५) श्री.डी.बी.मुंडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (बाल कल्याण विभाग) नाशिक जिल्हापरिषद,

(६) श्री.प्रदिप मधुकर चौधरी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (सामान्य प्रशासन विभाग) नाशिक जिल्हापरिषद,

(७) श्री.दिलीप घोरपडे, सहायक आयुक्त, सांगली महानगरपालिका,

(८) डॉ.विजय एन. डेकाटे, जिल्हा आरोग्य अधिकारी, नाशिक जिल्हापरिषद,

(९) डॉ.निलेश पाटील, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, नाशिक जिल्हापरिषद,

(१०) श्रीमती सुनिता धनगर,गट विकास अधिकारी तथा विशाखा समिती अध्यक्ष,

(११) श्री.राजेंद्र पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामविकास विभाग) नाशिक जिल्हापरिषद,

(१२) डॉ.वैशाली झनकर, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) नाशिक जिल्हापरिषद,

(१३) डॉ.प्रकाश वाकोडे, सहसंचालक, वैद्यकिय शिक्षण विभाग,

(१४) डॉ.एस.एम.पाटील, वैद्यकिय अधिकारी, ब्रम्हकुमारी रुग्णालय, अंधेरी,

(१५) श्री.परमेश्वर गणमे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, उपनगर,

(१६) श्री.अनिल रोळे,पोलिस अधिकारी , उपनगर,

(१७) श्री.अमित मेहता, वैद्यकिय अधिकारी, ब्रम्हकुमारी रुणालय, अंधेरी,

(१८) डॉ.शशांक जोशी, वैद्यकिय अधिकारी, ब्रम्हकुमारी रुग्णालय, अंधेरी,

(१९) डॉ.कमलेश, जनसंपर्क अधिकारी, ब्रम्हकुमारी रुग्णालय, अंधेरी.

(२०) डॉ.जावेदा मोहेकर, वैद्यकिय अधिकारी, ब्रम्हकुमारी रुग्णालय, अंधेरी,

(२१) डॉ.रजत सरकार, वैद्यकिय अधिकारी, ब्रम्हकुमारी रुग्णालय, अंधेरी,

(२२) डॉ.प्रतिभा नेगांधी, भुलतज्ज्ञ, ब्रम्हकुमारी रुग्णालय, अंधेरी,

(२३) ॲड चारु शुक्ला, ॲडव्होकेट, ब्रम्हकुमारी रुग्णालय, अंधेरी.

**महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती**
**मंगळवार, दिनांक २६ फेब्रुवारी, २०१९**
**स्थळ : विधान भवन, मुंबई.**

**समिती प्रमुख**

डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**समिती सदस्य**

(१) श्रीमती तृप्ती सावंत, वि.स.स.

(२) श्रीमती दिपीका चव्हाण, वि.स.स.

(३) श्रीमती सुमन पाटील, वि.स.स.

(४) ॲड.हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

(५) श्री.दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव

समितीने उक्त बैठकीत नवी मुंबई महानगरपालिका, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, सांगली महानगरपालिका, सांगली जिल्हापरिषद, डहाणू नगरपरिषद येथे दिलेल्या भेटीच्या संदर्भात प्रारुप अहवालावर विचार विनिमय करुन तो संमत केला.

**शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई**